म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र. १५७०


# सावरकर

[ महाकाव्य ]

भाग पहिला

गोपाळ गोविंद अधिकारी

REFBK-0013503

अधिकारी प्रकाशन, पुणें २

# सावरकर

## [ महाकाव्य ]

भाग पहिला

गोपाळ गोविंद अधिकारी

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ...... वि: ......
क्रमांक ...... नों. दि: ......

REFBK-0013503
REFBK-0013503

अधिकारी प्रकाशन, पुणें २

प्रकाशक :

**सौ. कमलाबाई अधिकारी**

मालक — अधिकारी प्रकाशन

३९६ नारायण पेठ, पुणें २

* * *

दि. २८ मे १९६३

किंमत रुपये बारा

* * *

मुद्रक :

शंकर रामचंद्र दाते

यशवंत मुद्रणालय

१८३५ सदाशिव पेठ, पुणें २

# प्रस्तावना

'सावरकर' या महाकाव्याचा पहिला भाग ग्रंथस्वरूपांत प्रसिद्ध झालेला पाहून मला बरें वाटलें. या काव्यांतील घटना हा इतिहास आहे. या महाकाव्याच्या पहिल्या सर्गाचें गायन स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनीं आपल्या पुणें मुक्कामांत शेंकडों लोकांच्या उपस्थितींत ऐकलें होतें. ज्यांच्या जीवनावर हें महाकाव्य आहे त्यांच्यापुढेंच त्या काव्याचें गायन व्हावें हा अपूर्व योग होय.

या काव्याची भाषा अगदीं सोपी आहे. म्हणजे बोलतो तशी रचना केली आहे; पण उच्चारतां तशी ती लिहिली नाहीं. काव्याची भाषा अशीच असावी म्हणून हेतुपुरस्सर पहिला प्रयत्न पुणें शहरांतील प्रख्यात पंडित कै. महादेव मोरेश्वर कुंटे यांनीं आपल्या 'राजा शिवाजी' या काव्यांत केला. त्या काळांत टीकाकारांनीं त्यांची टिंगलच केली. त्यांच्या काव्यावर टीकाकारांनीं घेतलेले कांहीं आक्षेप रास्त असले तरी मराठी काव्यांत नव्यानें येऊं पहाणाऱ्या या काव्य-भाषापद्धतीचा उगम नैसर्गिक होता. महादेव मोरेश्वर कुंटे हे त्या पद्धतीचे आद्य पुरस्कर्ते होते इतकेंच. 'राजा शिवाजी' या कुंटे यांच्या काव्यांतील भाषापद्धति, तीवर झालेल्या टीकेमुळें बंद पडली असें नव्हे. तो ओघ त्या वेळेपासून सारखा चालूंच आहे. हें आतांपर्यंत झालेले काव्यग्रंथ नुसते चाळून पाहिले तरी दिसून येईल. श्री. ग. ह. पाटील, श्री. ग. दि. माडगूळकर आणि स्वयमेव मृगेंद्रता असलेले आचार्य अत्रे (केशवकुमार) इत्यादि अनेक कवींची भाषापद्धति अशीच आहे. हीच काव्यभाषापद्धति यापुढें वाढणार आहे. 'सावरकर' महाकाव्य वाचून त्या काव्यभाषापद्धतीला अधिक जोराची चालना मिळेल.

काव्यांत प्रसाद हा गुण मुख्यत्वें असला पाहिजे आणि त्यांत प्रतिभेचें तेज झळकलें पाहिजे हेंही खरेंच आहे. त्याशिवाय, अलंकार, सुभाषितें, सिद्धान्त स्वरूपाचीं वचनें इत्यादि गुणांनीं तें भूषविलेलें असावें. हे आणि असे अनेक काव्यगुण या महाकाव्यांत दिसून येतात.

खरें म्हटलें तर मराठी वाचकांना महाकाव्याची कल्पनाच नाहीं. कारण मराठी भाषेंत महाकाव्यें कोणी लिहिलींच नाहींत. 'यशवंतराव होळकर' हें एक महाकाव्याचें नांव सूचींत फक्त वाचावयास मिळतें. आणि माधवज्यूलियन यांचें 'सुधारक' हें महाकाव्य आहे असें म्हणणारे एकच विद्वान् मला आढळले. 'सावरकर' महाकाव्य हें मराठींतील पहिलें महाकाव्य होय. आणि इतर भाषांतील काव्यासंबंधीं मला जी माहिती मिळाली त्यावरून भारतांतील कोणत्याही प्रादेशिक भाषेंत या 'सावरकर' महाकाव्यासारखें अनेक काव्यगुणांनीं संपन्न आणि सरस असें ऐतिहासिक अथवा राजकीय विषयावरील महाकाव्य नाहीं. असो.

'सावरकर' या महाकाव्याचा हा पहिला भाग प्रकाशित करण्याच्या कामांत दे. भ. मामाराव दाते यांच्याखेरीज कोणाचेंच साहाय्य मला झालेलें नाहीं. त्यांचेच तेवढे मला आभार मानावयाचे आहेत आणि तसे त्यांचे आभार मी समक्ष मानलेच आहेत. येथें ते प्रकटपणें मन:पूर्वक मानतों.

पुणें शहर<br>मिति सौर ज्येष्ठ ७,<br>शके १८८५

**गो. गो. अधिकारी**

# सावरकर महाकाव्य—भाग पहिला

## अनुक्रमणिका


**सर्ग पहिला—**

| | | |
|---|---|---|
| १. | सती राधाबाई | २ |
| २. | विनायक | ११ |
| ३. | राधाबाईंचा मृत्यु | १६ |
| ४. | दामोदरपंत | २५ |
| ५. | बाळपणांतील खेळ | ३४ |

**सर्ग दुसरा—**

| | | |
|---|---|---|
| ६. | तीर्थ नाशिक | ४३ |
| ७. | तिळभांडेश्वर गल्लींतील मुलें | ५० |
| ८. | भगूर गावानें केलेलें स्वागत | ५७ |
| ९. | पुणें शहरांत लष्कर | ६३ |
| १०. | रँडसाहेबाचा खून | ६७ |
| ११. | टिळक म्हणाले ' सांभाळा रे ' | ८० |
| १२. | रक्ताची तहान रक्तानें शमते | ८९ |

**सर्ग तिसरा—**

| | | |
|---|---|---|
| १३. | टिळकांना अटक | ९८ |
| १४. | द्रविड-बंधु | १०९ |
| १५. | चाफेकरांना फांशी | ११९ |
| १६. | द्रविडबंधूंचा वध | १३४ |
| १७. | सावरकर यांची प्रतिज्ञा | १४१ |

### सर्ग चौथा--


| | | |
|---|---|---|
| १८. | दामोदरपंताचें देहावसान | १४९ |
| १९. | मित्रमेळ्याची स्थापना | १६७ |
| २०. | संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा | १७७ |
| २१. | शिवजन्मोत्सवाचें महत्त्व | १८९ |


### सर्ग पांचवा--


| | | |
|---|---|---|
| २२. | मुक्तभारताची पहिली सभा | २०० |
| २३. | विलायती कापडाची होळी | २१३ |
| २४. | सावरकरांचें लंडनला प्रयाण | २२४ |
| २५. | गुप्तमंडळाची स्थापना | २३८ |


### सर्ग सहावा--


| | | |
|---|---|---|
| २६. | सावरकरांची नेतेपदीं निवड | २४५ |
| २७. | बडोदानरेशांचें आश्वासन | २५६ |
| २८. | साहेबावर लाठी हल्ला | २६५ |
| २९. | हेर कीर्तिकर | २७२ |
| ३०. | नेपाळेश्वरांचें आगमन | २८३ |
| ३१. | पडतील कौलें माणिकमोत्यांची | २९१ |


### सर्ग सातवा—


| | | |
|---|---|---|
| ३२- | बाडग्यांचा संबंध नको | २९६ |
| ३३. | गणेश सावरकरांना शिक्षा | ३०४ |
| ३४. | गणेशपंतांची मिरवणूक | ३०९ |
| ३५. | येसूवहिनींचें अभिनन्दन | ३१७ |
| ३६. | मदनलाल फांशीं गेला | ३२८ |

# महाराष्ट्र शारदेस

कौशिक गोत्री थोर घराणें कुल माझें कुलवान
पुण्यवान ती आई माझी तिचें मला वरदान.
तुझ्या प्रसादावीण शारदे, कसा परी गाणार!
वीर विनायक-चरित्र सागर पार कसा होणार!

तुझ्या प्रसादाखेरिज प्रतिभा कशी बरें फुलणार!
तुझ्या प्रसादावीण कथेला रंग कसा भरणार!
तुझाच सगळा विलास देवी, ज्ञान आणि विज्ञान
व्यास वाल्मिकी पुनीत झाले तुझें तया वरदान.

बाण भवभुती श्रेष्ठ कवी हे, कविवर कालीदास
कृपा तुझी नसती तर होते कोठुनिया कवि भास!
एकनाथ श्रीमुक्तेश्वर श्रीज्ञानेश्वर कविराज
समर्थ, तुलसीदास तयांवर प्रेम तुझें निर्व्याज.

तेंच मला दे देवि शारदे, गाण्याचें वरदान!
तुझ्या मंदिरीं मला मिळावा पहिला पहिला मान!
तुझें मूल मी तुला विनवितों नको करूं अनमान.
तुझ्या मुलाचा देवि शारदे, राख एवढा मान.

नगर पुण्याचा महाकवी मी हा माझा अभिमान!
देवि शारदे, घे तुज माझें हें मानाचें पान.

# सावरकर

## [ महाकाव्य ]

### सर्ग पहिला

जय हो जय हो विनायकाचा मंगल जयजयकार
मंगल जयजयकार करा हो मंगल जयजयकार.
धन्य गांव तें धन्य लोक ते त्या गांवामधले
इतिहासांतरि नांव जयाचें अजरामर झालें.

## (१) सती राधाबाई

नाशिक शहरापासुनि नाही तितकेसें दूर
भगूर त्याचें नांव मराठी आहे महशूर.
खळखळ होती नदी वाहती आणि तिच्या काठीं
नांदत होती शेसव्वाशें लोकांचीं घरटीं. १

नाशिक शहरापासून भगूर फारसें दूर नाही. (भगूर हें) त्याचें नांव महाराष्ट्रांत महशूर आहे. या गांवाच्या बाजूला खळखळ आवाज करीत नदी वहात होती. तिच्या कांठावर लोकांचीं शेसव्वाशें घरटीं असत.

जशी मोकळ्या केंसावरती अबोलिची वेणी,
जशी शोभती चंद्रमुखीला कर्णफुलें कानीं,
रांगोळीनें जसें शोभतें केळीचें पान,
गांवाला शोभवीत होतें आंब्याचें रान. २

ज्याप्रमाणे (तरुणीच्या) मोकळ्या बांधलेल्या केसांवर अबोलीच्या फुलांची वेणी शोभते किंवा चंद्रासारखें मुख असलेल्या तरुणीच्या कानांत कर्णफुलें शोभून दिसतात किंवा सभोवार रांगोळी काढल्याने केळीच्या पानाची जशी शोभा वाढते, त्याचप्रमाणे लागूनच असलेल्या आंबराईनें भगूर गांवाला शोभा आली होती.

पुण्य काय तें भगुर गांवचें ठाउक देवाला !
सुखांत होतें नांदत; नव्हती चिंता कोणाला.
दानत मोठी, धर्मपरायण वृत्ति लोकांची !
कशी पडावी वाण तयांना सुख-समृद्धीची ! ३

या भगूर गांवची एवढी काय पुण्याई होती देवालाच ठाऊक! या गांवातील सर्व लोक सुखांत होते. त्यांना कशाचीही चिंता नव्हती. ज्या लोकांची दानत मोठी असते आणि वृत्ति धर्मपरायण असते, अशा लोकांना सुखसमृद्धीची कमतरता कशी पडणार !

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
दा. क्र. 73403

**धर्मपरायण वृत्ती ज्यांची अन् शुद्धाचरण**
**इह लोकीं परलोकीं होतें त्यांचें कल्याण.**
**नीतिधर्म पाळतात जे जे काय कमी त्यांना !**
**न सांगता खेळती तयांच्या घरीं सुखें नाना. ४**

ज्यांची धर्मपरायण वृत्ति असते आणि ज्यांचें शुद्धाचरण असतें त्यांचें इहलोकीं आणि परलोकीं कल्याण होतें. जे नीतिधर्म पाळतात त्यांना कशाचें कमी पडणार ! अपेक्षा न करताही नाना प्रकारचीं सुखें त्यांचें घरीं खेळत असतात.

**भगूर पाहुनि सुखी गांव तें सावरवाडीचे**
**नारायणभट रहावयाला आले कायमचे;**
**सुखांत जे नांदतात त्यांची आशा बाळगुनी**
**सहज असें त्याकडे बघावें गोरगरीबांनीं. ५**

भगूर हें सुखी गांव आहे असें पाहून कायमची वस्ती करून राहण्यासाठीं सावरवाडीचे नारायणभट भगूर गांवीं रहावयास आले. जे सुखी असतात त्यांच्याकडून आश्रय मिळेल अशा अपेक्षेनें गोरगरीबांनीं त्यांच्याकडे बघावे हें साहजिकच आहे.

**गोड बोलणें सरळ वागणें अजोड विद्येंत**
**सावरकर भट प्रसिद्ध झाले पंचक्रोशींत;**
**पंत पेशवे प्रसन्न झाले कीर्ति ऐकूनी**
**दिलें तयांनीं गांव राहुरी इनाम लावूनी. ६**

अजोड विद्वत्ता, शिवाय गोड बोलणें आणि सरळ वागणें यामुळें नारायणभट पंचक्रोशींत प्रसिद्ध झाले. ही त्यांची कीर्ति कानावर गेल्यानें श्रीमंत पेशवे यांनीं राहुरी गांव नारायणभट यांस इनाम लावून दिला.

**विद्वानांचा मान नि संभावना जिथें होते,**
**ते मोठे विद्वान आणि तें सरकारहि मोठें.**
**मिळे समाजाकडूनि आश्रय, मान नृपाकडुनी.**
**समृद्ध त्या त्या कला नि समजा प्रबुद्ध जनवाणी. ७**

ज्या देशांत विद्वानांना मान मिळतो आणि सरकारकडून त्यांची संभावना होते ते विद्वान् मोठे असतात आणि तें सरकारही मोठें असतें. समाजाकडून आश्रय आणि राजसत्तेकडून (नृपाकडून) मान मिळतो त्या त्या कला समृद्ध असतात आणि लोक प्रबुद्ध विचाराचे असतात असें समजा.

**तेव्हांपासुनि क्षात्रवृत्ति वाढली घराण्यांत**
**सावरकर घर प्रसिद्ध झालें मराठि राज्यांत.**
**शक सतराशें अठ्याहत्तर या शुभ वर्षांत**
**सावरकर कुळिं जन्म पावले दामोदरपंत. ८**

तेव्हांपासून (इनाम मिळाल्यापासून) घराण्यांत क्षात्रवृत्ति वाढून मराठी राज्यांत सावरकर घराणें प्रसिद्ध झालें. आणि अशा या प्रसिद्ध घराण्यांत शके सतराशें अठ्याहत्तर सालीं सावरकर कुळांत दामोदर-पंतांचा जन्म झाला.

**बांधा गोंडस चतुर बोलणें नम्र वागण्यांत**
**हवेहवेसे झाले आण्णा भगूर गांवांत.**
**पत्नी त्यांची धर्मपरायण सति राधाबाई**
**लोक बोलती अजूनि बाई अशि झाली नाहीं. ९**

देखणें शरीर, चतुर बोलणें आणि नम्र वागणूक यामुळें आण्णा (म्हणजे दामोदरपंत) गांवाला हवेहवेसे वाटत. त्यांची धर्मपरायण पत्नी सती राधाबाई यांच्यासारखी बाई आम्ही पाहिलीच नाहीं असें अजून लोक बोलतात.

**स्तुती करावी गांवामधल्या लहान थोरांनीं**
**वैभव दिसतें शोभुन घरचें अशाच सुगुणांनीं.**
**' सांगावें मज काम सतीनें कांहि करायास,**
**वाटत होती यांत धन्यता तेथिल लोकांस. १०**

गांवातल्या लहानमोठ्यांनीं स्तुति करावी अशा सद्‌गुणांनीं श्रीमंती शोभून दिसते. सती राधाबाईनीं आपणास कांहीं काम करावयास सांगावें यांत भगूर गांवच्या लोकांना धन्यता वाटे !

**व्रतवैकल्यें करी चालवी रीत घराण्याची;**
**असें न झालें तिची राहिली पूजा तुळशीची.**
**कुळाचार कुळधर्म पाळणें आवडतें स्त्रीला**
**हिंदुस्त्रीचा विशेष गुण हा भूषवितो तिजला. ११**

सती राधाबाई व्रतवैकल्यें करीत आपल्या घराण्याच्या चालीरिती पाळीत असत. त्यांची तुळशीची पूजा एक दिवस राहिली असें कधी झालें नाहीं. कुळाचार आणि कुळधर्म पाळणें स्त्रियांना आवडतें. हा विशेष गुण हिंदू स्त्रियांना शोभून दिसतो.

**गोड बोलणें जणू चांदणें शरदपौर्णिमेचें**
**देवताचि ही वाटे पाहुनि तेज मुखावरचें.**
**खेळत होतें सुख संसारीं कमि नव्हतें त्यांना,**
**उणीव होती एवढीच कीं मूल नसे त्यांना. १२**

सती राधाबाईचें बोलणें शरद ऋतूमधील पौर्णिमेच्या चांदण्याप्रमाणें गोड असे. त्यांच्या मुखावरील तेज पाहून ह्या कोणी देवताच आहेत असें वाटे. त्यांचा संसार सुखांत चालला होता, त्यांत त्यांना कांहींच कमी नव्हतें. त्यांना मूल नव्हतें एवढीच काय ती उणीव होती.

**मुलामुलींचें शाळेवरचें प्रेम जसें असतें**
**संसारावर तिच्या सुखाचें प्रेम तसें होतें.**
**परी खेळतें आणि रांगतें घरीं कुणी नव्हतें**
**म्हणुनि तिच्या संसारसुखावर प्रेम तिचें नव्हतें. १३**

मुलामुलींचें शाळेवरती जसें प्रेम असतें तसें राधाबाईंच्या संसारावर सुखाचें प्रेम होतें. पण घरांत खेळतें रांगतें कोणी नसल्यामुळें तिच्या संसारसुखावर तिचें प्रेम नव्हतें.

**मूल अंगणीं, घरांत गृहिणी, धनि कामावरती**
**हाच खरा संसार सुखाचा संसारी म्हणती.**
**घरांत नाहीं मूल खेळतें इनामदारांना**
**वाटत होता खेद तयांचा मनांत लोकांना ! १४**

अंगणांत मूल खेळत आहे, धनीण घरांत काम करीत आहे आणि कारभारी कामावर गेले आहेत हाच खरा सुखाचा संसार असें संसारी लोक म्हणतात. इनामदारांना मूल नाहीं याचा लोकांनाही खेद वाटे.

**नथीवीण शृंगार बाईचा, पदराविण साडी,**
**वृंदावनविण अंगण, अथवा ओढ्याविण खेडीं,**
**फळाफुलांविण बागबगीचा, साथीविण गाणें,**
**उदास असतें संसाराला फूल तसें नसणें. १५**

नथ घातल्याखेरीज बाईनें केलेला शृंगार, पदर नसलेली साडी, वृंदावन नसलेलें अंगण, शेजारीं ओढा नसलेलीं खेडीं, फळेंफुलें नसलेला बागबगीच्या किंवा साथ नसलेलें गाणें ज्याप्रमाणें उदास असतें त्याप्रमाणें मुलाखेरीज असलेला संसार उदास वाटतो.

**ढगाळ कोंदट जसा वाटतो दिन शरदामधला**
**तशी मुलाविण उदासवाणी येइ घरास कळा;**
**दुःखामध्यें दुःख यांत कीं दोन मुलें झालीं;**
**दोन मुलें झालीं नि झालि तों देवघरीं गेलीं ! १६**

शरद ऋतूमधे ढगाळ आणि कोंदट असलेला दिवस जसा वाटतो त्याप्रमाणें मूल नसल्यानें घराला उदासवाणी कळा येते. दुःखांत दुःख असें कीं राधाबाईना दोन मुलें झालीं; पण दोन्ही मुलें झालीं तर्शी तीं देवघरीं गेलीं.

**घालुनि सांगड कर्तव्याची आणि भावनेची**
**वागावें ही रीतच असते सुविद्य लोकांची.**
**परिस्थिती, कर्तव्य, भावना आणि व्यवहार**
**संसाराच्या सर्वमान्य या चतुःसिमा चार. १७**

कर्तव्य आणि भावना यांची सांगड घालून वागावें ही शहाण्या लोकांची वागण्याची पद्धतच असते. परिस्थिति, कर्तव्य, भावना आणि व्यवहार या सर्वमान्य असलेल्या संसाराच्या चार चतुःसीमा आहेत.

**हंसत मुखानें काम करितसे सति राधाबाई**
**दुःख मनांतिल तिनें कुणाला दिसूं दिलें नाहीं.**
**जरी कुणाला दुःख मनांतिल दिसूं दिलें नाहीं,**
**जातें मन बिसरूनि दुःख तें होत असें नाहीं. १८**

सती राधाबाई घरांतलें काम हंसत मुखानें करीत असे. मनांतलें दुःख त्यांनीं कोणाला कळूं दिलें नाहीं. पण मनांतील दुःख जरी कोणाला कळूं दिलें नाहीं तरी मनाला दुःखाचा विसर पडतो असें कांहीं होत नाहीं.

**सुखसौख्यें विसरून तेवढीं दुःखें आठवणें**
**सहजवृत्ति ही असे स्त्रियांची; मन बापुडवाणें.**
**सायंकाळीं रोज लावतां ओटीवर पंथी**
**सति राधेच्या डोळ्यांमधुनी अश्रू ओघळती. १९**

आपलीं सुखसौख्यें तेवढीं विसरून जावयाचें आणि दुःखें आठवीत रहावयाचीं ही स्त्रियांची सहज प्रवृत्ति असते. मन बापुडवाणें आहे. ओटीवर सायंकाळीं पंथी लावताना राधाबाईंच्या डोळ्यांतून अश्रू गळत असत.

**नवस आणि उपवास करितसे सति राधाबाई**
**कारण त्याचें तिनें पतीला कळू दिलें नाहीं;**
**मुलामुलींची ओढ एवढी नसते पुरुषास**
**मुलामुलींविण दिवस काढणें कठिण पडे स्त्रीस. २०**

सती राधाबाई नवस करीत, उपवास करीत. मात्र हे नवस उपवास कशाकरतां हें दामोदरपंतांना त्यांनीं कळू दिलें नाहीं. कारण पुरुषांना मुलामुलींची तेवढी ओढ नसते. (उलट) स्त्रीला मुलामुलींखेरीज दिवस काढणें कठीण असतें.

**देव-घरांतील मंद दिव्याची वात सारताना**
**विचार येती सति राधेच्या मनामधें नाना;**
**काय ईश्वरी, असाच का हा जन्म जावयाचा ?**
**वंश दिवा लागणार माझ्या कधीं घराण्याचा ? २१**

देवघरांतील मंद दिव्याची वात सारतांना सती राधाबाईंच्या मनांत नाना प्रकारचे विचार येत. (ती म्हणे) हे ईश्वरी देवी, असाच का हा जन्म जाणार आहे ? माझ्या घराण्याचा वंशदिवा लागणार तरी केव्हां ?

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे

 अनुक्रम ...................... विं. ....
क्रमांक ...................... नों. दि.

देवाविण देउळें नि झाडें पानावांचून,
गंधावाचुनि पुष्पें किंवा वेल फुलांवीण.
तसें मुलाविण अवघें वैभव उणें उणें पडतें,
घरांतल्या नांदत्या सुखाचें वर दुखणें होतें. २२

देवांखेरीज देउळें, पानांखेरीज झाडें, सुवासाखेरीज फुलें किंव फुलाखेरीज वेल, तसेंच मुलामुलींखेरीज श्रीमंती उणी दिसते. (इतकेंच नव्हे) उलट घरांत नांदणाऱ्या सुखाचें दुखणें होतें.

तुळशीपाशीं बसुनि करी जप सति राधाबाई,
नेमधर्म पाळले कशाचें कमि केलें नाहीं.
देवि पावली चढूं लागलें तेज मुखावरलें,
गोड वृत्त हें हळूंहळूं पण चार मुखीं झालें. २३

सती राधाबाई तुळशीपुढें जप करीत बसत. नेमधर्म पाळीत. कशाचें कांहीं कमी केलें नाहीं. (अखेर) देवी प्रसन्न झाली. राधाबाईच्या आधीच तजेलदार असलेल्या मुखावर तेज चढूं लागलें. आणि ही गोड बातमी हळूहळू चारा मुखीं झाली.

महिलांमध्यें त्वरित पोंचतें महिलांचें वृत्त;
वृत्त कळाया सदाच महिला उत्सुक असतात.
उत्सुक होती नदी दारणा त्या दिवसासाठीं;
सगे सोयरे उत्सुक होते त्या वार्तेसाठीं. २४

स्त्रियांच्या विषयीचें वृत्त स्त्रियांमध्यें लौकर प्रसृत होतें. स्त्रियांविषयींचें वृत्त ऐकावयास स्त्रिया नेहमींच उत्सुक असतात. तो दिवस कधी उजाडतो याची नदी दारुणेला उत्सुकता होती व त्या वृत्तासाठीं आप्त मित्रमंडळीही उत्सुक होती.

**सुदिन उगवला तो नि वाटली साखर गांवांत**
**गणेश ठेवा नांव बोलले दामोदरपंत.**
**नांव ठेवलें गणेश; नव्हता थाट बारशाचा;**
**डोळ्यापुढुनी गेला नव्हता प्रसंग पूर्वीचा.** २५

(अखेर) तो सुदिन उगवला. गांवांत साखर वाटण्यांत आली. दामोदरपंत म्हणाले मुलाचें नांव गणेश ठेवा. मुलाचें नांव गणेश ठेवलें पण बारशाचा कांहीं थाट नव्हता ! (साहजिकच आहे कीं) डोळ्यापुढून पुर्वीचा प्रसंग गेला नव्हता.— म्हणजे दोन मुलें अशींच नांव ठेवल्यावर मृत्यु पावलीं हा प्रसंग त्यांना आठवत होता.

**नाती गोती आणि सोबती येती पंतांचे**
**स्नेहभरानें कौतुक करती बाळ गणेशाचें.**
**खेळवावया मुलास घेई जो तो उचलून**
**धांवत आलें सति राधेच्या घरीं समाधान.** २६

पंताची नातेवाईक मंडळी आणि स्नेही आले म्हणजे बाळ गणेशाचें प्रेमानें कौतुक करीत. खेळवण्यासाठीं जो तो त्या मुलाला उचली. (मुलगा झाल्याचें पाहून) सती राधाबाईच्या घरीं समाधान आलें होतें. म्हणजे घर समाधानानें भरलें होतें.

*　　*　　*

**धन्य गांव तें धन्य लोक ते त्या गांवामधले**
**इतिहासांतरिं नांव गांव जें अजरामर झालें.**

## (२) विनायक

गेलीं वर्षें तीन सुखाची संसारामधलीं;
कधीं संपलीं कशी संपलीं नाहि कुणा कळलीं.
जसें अचानक धों धों पाणी वळवाचें पडतें
तसें सुखाचें सदाच असतें न सांगतां येतें. २७

अशा स्थितींत संसारांतील सुखाचीं तीन वर्षें गेलीं. हीं वर्षें कशीं संपलीं आणि कधीं संपलीं हें कोणाच्या लक्षांतही आलें नाहीं. ज्याप्रमाणें धों धों वळवाचें पाणी अचानक पडतें तसेंच सुखाचें नेहमी असतें; तेंही अचानक येतें.

सुख आल्यावर किती राहिलें तरि अपुरें पडतें,
जसें सखीशी किती बोललें कमीच तें असतें.
सर्व सुखाहुनि सौख्य आगळें संसारीं असतें
सर्व सुखें एकत्र नांदती हेंच तिथें दिसतें. २८

ज्याप्रमाणें आपल्या पत्नीशी कितीही बोलत राहिलो तरी तें कमीच वाटतें तसेच सुखाचे दिवस प्राप्त झाल्यावर तें सुख किती दिवस राहिलें तरी अपुरें वाटतें. सर्व सुखांत संसारसौख्य हें आगळेंच आहे. संसारांत सर्व सुखें एकत्र राहतात असें दिसून येतें.

वैशाखांतिल कृष्ण षष्ठिच्या मंद तिमीरांत
असंख्य होते दीप लागले निळच्या बगीच्यांत
आणि त्यामधें दाटि दाटली देवदेवतांचीं
भरली होती मैफल तेथें सुरगंधर्वांची. २९

वैशाखांतील कृष्णपक्षाच्या षष्ठीच्या अंधुक अंधारांत निळ्या बगीच्यामध्यें म्हणजे आकाशामधें असंख्य तारे चकाकत होते. देवदेवतांची गर्दी झाली होती. सुरगंधर्वांची एक मैफलच भरली होती म्हणाना !

**नाचत होत्या गोड अप्सरा तालसुरावरती**
**दिन भाग्याचा असा उगवतो अनेक शतकान्तीं.**
**तोंच घटी चाळीस संपल्या नृत्यगायनांत**
**मंगल वाद्यें वाजु लागलीं वर आकाशांत.** ३०

त्या बगीच्यामधें गोड ताल सुरांत अप्सरांचें नृत्य चाललें होतें. अनेक शतकांनंतर असा भाग्याचा दिवस उगवत असतो. (अशा गडबडींत) चाळीस घटका झाल्या नाहींत तोंच आकाशांत मंगलवाद्यें वाजूं लागलीं.

**तोंच दिला चौफेर उधळुनी सुगंध वाऱ्यानें;**
**डोलु लागल्या वृक्षवल्लरीं प्रमत्त डौलानें.**
**थाटमाट जाहला कधींचा गृहनक्षत्रांचा;**
**उजळुनि गेले अंबर खुलला रंग बहारीचा.** ३१

तोंच वाऱ्यानें चोहीकडे सुगंध उधळला. वृक्षवल्लरीं प्रमत्त डौलानें डोलूं लागल्या, ग्रह आणि नक्षत्रांनीं कधीपासून थाटमाट केला होता. त्यामुळें आकाश उजळून गेलें होतें. आकाशाला बहारीचा रंग आला होता.

**उधळा उधळा माणिक मोती धनिक कुबेराचीं;**
**सृष्टिदेवते, उधळ फुलें तूं रानगुलाबांचीं**
**सावरकर कुळदीप उजळला राष्ट्र धन्य झालें,**
**विनायकाचा जन्म जाहला; नवस फळा आले !** ३२

उधळा, श्रीमंत कुबेराची माणिक मोती उधळा. सृष्टिदेवते, रानगुलाबाचीं फुलें तूंही उधळ. सावरकरांच्या घरीं कुलदीपक जन्मास आला आहे. देश धन्य झाला आहे. आणि नवस फळास आले आहेत.

**नाचु लागल्या अनेक रंभा गात गात गाणीं,**
**सुवर्णपुष्पें उधळुनि केलें स्वागत देवांनीं.**
**स्वर्गंगेचे कांठीं बसुनी ब्राह्मण केव्हांचे**
**घोषित होते मंत्र सहर्षें आशीर्वादाचे. ३३**

अनेक रंभा गाणीं गातगात नाचत आहेत. सुवर्णपुष्पें उधळून देवांनीं स्वागत केलें आहे. स्वर्गगेच्या काठांवर बसून ब्राह्मण आर्यविद्येच्या मंत्रांचा केव्हापासून घोष करीत आहेत.

**कौतुक तें बघण्यास लागतें दृष्टि महाकविची**
**दृष्टि लागते महाकवीची आणि महात्म्यांची.**
**बाल्यांतील संस्कार साजरे करि राधाबाई**
**पंतांनीं कौतुकांत कांहीं कमि केलें नाहीं. ३४**

हें कौतुक बघण्यास महाकवीची दृष्टि लागते, महाकवीची आणि महात्म्याची दृष्टि लागते. राधाबाईनीं बालपणीं करावयाचे सर्व संस्कार साजरे केले. मुलांच्या कौतुकांत दामोदरपंतांनीं कांहीं कमी पडूं दिलें नाहीं.

**इनामदारांकडे बायका किति येती जाती,**
**नको म्हणा तरि विनायकाला कडेवरी घेती;**
**आणि सांगती वहिनी काढा दृष्ट राजसाची.**
**भारिच असते बाललसी ही जात बायकांची. ३५**

किती तरी बायका इनामदारांकडे येत जात असत. नको म्हटलें तरी त्या विनायकाला कडेवर घेत. आणि जातांना राधाबाईंना दृष्ट काढा असें सांगन जात. मुलाचें कौतुक करण्याची बायकांना भारीच आवड असते.

**करी सडासंमार्जन काढी चित्र स्वस्तिकाचें**
**मंगल घरचें चिन्ह असें तें शुभ सौभाग्याचें.**
**मुलास घेउनि फुलें आणणें देवपुजेसाठीं**
**माय–मनाला यांत वाटते हौस जरा मोठी. ३६**

राधाबाई नित्य सडासंमार्जन करून दारापुढें रांगोळीनें स्वस्तिक काढीत. स्वस्तिक हें घराच्या शुभ सौभाग्याचें चिन्ह असतें. मुलाला घेऊन देवाच्या पूजेसाठीं फुलें गोळा करणें याची आईच्या मनाला मोठी हौस वाटते.

**काउचिऊच्या गोष्टि सांगुनी भरवि दूधभात;**
**उणीदुणी जातात विरोनी अशा कौतुकांत !**
**आईनें घेऊनी कडेवर मुख पुसलें ज्याचें**
**धन्य बालपण तेंच खरोखर, ते जन भाग्याचे ३७**

मुलाला काऊ चिऊच्या गोष्टी सांगून दूधभात भरविणें अशा-सारख्या कौतुकांत संसारांतील उणींदुणीं सारीं विरून जातात. कडेवर घेऊन ज्याचें मुख आईनें पुसलें त्याचें तें बाळपण धन्य होय. ते लोक खरोखर धन्य होत.

**एका मागुनि एक विनायक प्रश्न करी कांहीं,**
**स्तिमित होउनी जाइ बिचारी सति राधाबाई.**
**प्रज्ञा बघुनि प्रश्न विलक्षण ऐकुनि तात्याचे**
**वाटे कौतुक आणि तिला सुख निज अज्ञानाचें. ३८**

विनायक एकामागून एक प्रश्न करी ते ऐकून बिचाऱ्या राधाबाई चकित होऊन जात. तात्याचे (म्हणजे विनायकाचे) विलक्षण प्रश्न आणि त्याची हुषारी पाहून राधाबाईंना स्वतःच्या अज्ञानाचें सुख आणि मुलाचें कौतुक वाटे.

**प्रश्न मुलांचे जणु गरुडाची झेंप जगावरती**
**करूं न शकती पंडित त्यांची जिज्ञासातृप्ती !**
**प्रश्न मुलांचे आणि अपेक्षा नव्या नव्या वधुच्या**
**चिरप्रवासी काळाविण त्या नच संपायाच्या. ३९**

मुलांचे प्रश्न गरुडाच्या आकाशांतील झेपेसारखे असतात. मुलांची जिज्ञासा पंडितांनाही तृप्त करतां येत नाहीं. मुलांचे प्रश्न आणि वधूच्या नव्या नव्या अपेक्षा चिरप्रवासी काळाखेरीज संपायच्या नाहींत.

**मधुर बोलणें विनायकाचें ऐकावें म्हणुनी**
**आड करूनी वाटा परिचित येति हजारांनीं.**
**स्नेहि सोबती येती जाती निमित्त काढूनी,**
**दमलेल्यांना जणूं मिळावें माठांतील पाणी. ४०**

विनायकाचें गोड बोलणें ऐकावयास मिळावें म्हणून हजारो परिचित मंडळी मुद्दाम आड वाट करून भगूरला येत आणि स्नेही सोबतीही कांहीं तरी कारण काढून येत जात असत. दमलेल्यांना माठांतील पाणी मिळाल्यानें समाधान होतें तसें विनायकाचें गोड बोलणें ऐकून समाधान होई.

**हजरजबाबी चौकस वृत्ती बाळाची बघुनी**
**महापुरुष होईल पुढें हा म्हणे कुणी कोणी.**
**पडो कुठेंही अस्सल सोनें चकाकुनी दिसतें**
**मोठेपण हें सहज कुणाचें सहजपणें कळतें. ४१**

विनायकाची हजरजबाबी आणि चौकस वृत्ति पाहून कोणा-कोणाला हा पुढें महापुरुष होईल असें वाटे. कोठेंही पडलें तरी अस्सल सोनें चकाकून दिसतें. त्याप्रमाणें एकाद्याचें मोठेपण सहजासहजी लक्षांत येतें.

* * *

**धन्य गांव तें धन्य लोक ते त्या गांवामधलें**
**इतिहासांतरि नांवगांव जें अजरामर झालें.**

## (३) राधाबाईचा मृत्यु

**पांच संपुनी वर्षे गेलीं, झालि सुरूं शाळा;**
**होउ लागली गांवामधलीं चार मुलें गोळा.**
**विटीदांडुचे छपाछपीचें चेंडु लगोऱ्यांचे**
**खेळ जाहले सुरूं विनायक इनामदारांचे; ४२**

विनायकाचें पांचवें वर्ष संपलें आणि त्याचें शाळेत जाणें सुरूं झालें. गांवातलीं चार मुलें (त्याच्या घरीं) जमू लागलीं. आणि विनायक इनामदाराचे विटूदांडूचे, छपाछपीचे आणि चेंडू-लगोऱ्यांचे खेळ सुरू झाले.

**विनायकाचे खेळ खोडकर अपूर्व पाहून**
**वाटत होतें भगूरच्या लोकांस समाधान.**
**कौतुक करती लोक आपल्या लहान बाळाचें**
**पाहुनि तें सुख सुखांत निवती लोचन आईचें. ४३**

विनायकाचे अपूर्व खेळकर खेळ पाहून भगूर गांवच्या लोकांस समाधान वाटत होतें. आपल्या लहान मुलाचें लोक कौतुक करतात हें सुख पाहून समाधानानें आईचे डोळे निवतात.

**खेळ खेळतां दंगल करती मुलें अंगणांत**
**काय चाललें आहे तात्या दरडावति पंत.**
**रागामध्यें राग किती अनुराग किती त्यांत**
**जन्मापासुनि मनें मुलांचीं सहज जाणतात. ४४**

अंगणांत खेळतांना चालणारी मुलांची दंगल (आरडाओरडा) पाहून " तात्या, काय चाललें आहे" असें दामोदरपंत दरडावीत. रागांत खरोखर राग किती आणि अनुराग किती हें मुलांना जन्मापासूनच कळत असतें.

**निळ्या अंगणीं तारांचें पदविलास छुमछुमतें**
**अंधाराच्या दाराआडुनि उषा जशी बघते,**
**तसा मुलांचा खेळ मजेचा पुन्हा सुरू होई.**
**कौतुक दाराआडुनि बघती सति राधाबाई. ४५**

निळ्या निळ्या नभांतील तारांचा चमचमाट अंधाराच्या आड राहून जशी उषा बघते त्याप्रमाणें मुलांचा खेळ पुन्हा सुरू झाल्यावर तें कौतुक सती राधाबाई दाराआडून पाहात.

**शुभं करोती म्हणती, म्हणती श्लोक समर्थांचें;**
**होइ परवचा आणि गिरविती अक्षर पुस्तीचें**
**आणि वांचुनी अभ्यासांतील धडे; म्हणे कविता**
**विनायकाचा नित्यक्रम हा नित्याचा होता. ४६**

'शुभं करोती' म्हटल्यावर समर्थांचे श्लोक होत. त्यानंतर परवाचा होई, आणि मग पुस्ती वा अक्षर गिरवणें होई. त्यानंतर अभ्यासाचे धडे वाचून झाल्यावर तो कविता म्हणे. विनायकाचा हा नित्याचा नित्यक्रम होता.

**संपवुनि घरकाम रात्रिचें वाचाया कांहीं**
**पंत बैसती; नियम तयांचा कधिं चुकला नाहीं.**
**भारत रामायणादि पोथ्या घरिं वाचायाची**
**खेड्यामधल्या घरांत असते रीत घराण्याची. ४७**

घरकाम संपल्यानंतर पंत रात्रीं कांहीं वाचावयास बसत. त्यांचा हा क्रम कधीं चुकला नाहीं. भारत रामायण इत्यादि पुराणें घरीं वाचण्याची खेडेगावांत घराण्यांतून रीत असे.

पंत वाचती आणि ऐकती सति राधाबाई
बाळ विनायक नसे तिथें हें कधि झालें नाहीं.
मुलें लागलीं वाढुं लागले वाढु तसे लाड
लक्ष ठेवती पंत विनायक होउ नये द्वाड. ४८

पंत वाचीत आणि सती राधाबाई तें ऐकत. त्यावेळीं विनायक तेथें ऐकत बसला नाही असें कधीं होत नसे. मुलें मोठीं होऊं लागलीं तसतसे त्यांचे लाडही वाढूं लागले; पण विनायकानें द्वाडपणा करूं नये इकडे दामोदरपंतांचें लक्ष असे.

घेउनि जाती आपुल्या संगें इनाम गांवास
'धनी धाकटे', कौतुक त्याचें वाटे सर्वांस.
' काय पाहिजे मालक सांगा धनी तुम्ही अमुचे '
या या म्हणती, करती स्वागत इनामदारांचें. ४९

इनाम गांवी जात तेव्हां ते त्यास आपल्याबरोबर घेऊन जात. धन्याचे सर्वांना कौतुक वाटे. या छोट्या इनामदारांचें या या म्हणून स्वागत करीत आणि मालक तुम्ही आमचे धनी आहांत, काय पाहिजे बोला असें लोक म्हणत.

गोड आणि ठसक्यांत तयाची तऱ्हा बोलण्याची.
विनायकानें मनें जिकलीं लहानथोरांचीं.
सतेज डोळे प्रफुल्ल मुद्रा ऐट चालण्याची
होइ भास कीं मूर्ति असावी माधवरायाची. ५०

त्याचें बोलणें गोड आणि ठसक्याचें असे. त्यामुळें लहानथोरांची मनें विनायकानें जिंकलीं होतीं. पाणीदार डोळे, प्रफुल्ल मुद्रा आणि त्याची चालण्याची ऐट पाहून हे दुसरे थोरले माधवराव आहेत असा भास होई.

**घाट नदीला जसा नि जैसें झुंबर पोशीला,**
**घरांस ओटी तशी शोभते राई गांवाला.**
**भगुर गांवच्या सीमेवरची गर्द आंबराई**
**पावन केली विनायकानें शक नाहीं नाहीं.** ५१

नदीला घाट ,तक्तपोशीला झुंबर, घराला ओटी किंवा गांवाला आंबराई शोभून दिसते त्याप्रमाणें भगूर गांवच्या बाजूला शोभून दिसणारी गर्द आंबराई विनायकानें पावन केली यांत शंकाच नाही.

**आम्बेराईमधें अजूनी त्या गांवातील**
**चला बघा जा, बाल पावलें तुम्हांस दिसतील.**
**त्याच पावलावरी मुलांनीं पाउल टाकून**
**भगुर गांवच्या इतिहासाचें रंगविलें पान.** ५२

त्या गांवाच्या आंबराईमध्यें जाऊन बघा. तुम्हांला त्याची छोटी छोटीं पावलें अजूनही दिसतील. त्याच पावलावर पाऊल टाकून मुलांनीं भगूर गांवच्या इतिहासाचें पान रंगविलें आहे.

* * *

**धन्य गांव ते धन्य लोक ते त्या गांवामधलें**
**इतिहासांतरि नांव गांव जें अजरामर झाले.**

* * *

**भगूर गांवीं सावरकरघर सुखसमृद्धीनें**
**फुलून गेलें होतें जैसा वृक्ष मोहरानें.**
**जोडि उभी दारावर त्यांच्या बकूळ चाफ्याची.**
**पुढेच होती वेल जाइची आणि मुकुंदाची.** ५३

जसे मोहराने आंब्याचें झाड बहरून जातें त्याप्रमाणें सुखसमृद्धीने सावरकरांचें घर फुलून गेलें होतें. दारापाशी एका बाजूला बकुळाचें व एकाबाजूला चाफ्याचें अशी झाडांची जोडी उभी होती. आणि त्यांच्या पुढेंच जाईची आणि मुकुंदाची वेल होती.

**मागिल परसावांत बाजुला आम्ब्याचें झाड**
**नजराणा देतसे धन्याला दरवर्षा आड.**
**घराभोवतीं सुगंध पसरे पारिजातकाचा**
**सायंकाळीं गंध मोहवी गोड गुलाबाचा.** ५४

मागील परसावांत आंब्याचें झाड होतें. तें दरवर्षा आड मालकाला नजराणा देत असे; म्हणजे त्या झाडाला एक वर्ष आड आंबे येत असत. पारिजातकाच्या फुलांचा घराभोंवती सुगंध दरवळत असे. सायंकाळीं येणाऱ्या गोड गुलाबांच्या वासानें मन मोहून जाई.

**मधेंच होता मधुर जलाचा आड चिरेबंदी.**
**त्यावें पाणी कुणी कुणाला नसे कधीं बंदी.**
**आणि शेवटीं नित्य जागता लहानसा गोठा**
**दूध देतसे; दह्या तुपाला कधिं नव्हता तोटा.** ५५

गोड पाण्यानें भरलेली चिरेबंदी विहीर मधेंच होती. या विहिरीचें पाणीं कोणीही नेई. कुणाला कधीं बंदी नसे. आणि परसावाच्या शेवटीं अगदी लहानसा गोठा होता. तो गोठा नेहमी जागता असे. म्हणजे बाराहि महिने या गोठ्यांतील गाई, म्हशी दूध देत असत. दह्या दुधाला कधी तोटा नसे.

**येती जाती शास्त्रीपंडित आणि पुराणीक**
**होई संभावना तयांची पाहुनि लौकीक.**
**वकील मुनसफ येती जाती नोकर सरकारी.**
**कीर्ती मोठी; नव्हती मोठी मिळकत सरदारी.** ५६

शास्त्री, पंडित, पुराणिक यांची घरीं नेहमी ये जा असे. लौकिक पाहून त्यांची संभावना होई. वकिल मुनसफ वगैरे सरकारी नोकर यांचीही ये जा असे. सरकारनें दिलेली जहागिरदारी मोठी नसली तरी दामोदरपंतांची कीर्ति मोठी होती.

**तेथुनि नव्हता फार दूरसा पार पिंपळाचा**
**गांवामधलीं लहानमोठीं मुलें जमायाचा.**
**विनायकाच्या मित्रांचे जे बेत ठरायाचे**
**या पाराला सर्वांआधीं प्रथम कळायाचे. ५७**

या घरापासून पिंपळाचा पार फारसा लांब नव्हता. गांवातील लहान मुलें या पारावर जमत. विनायकाच्या मित्राचें जे कांहीं बेत ठरत ते या पाराला प्रथम कळावयाचे !

**नोकर होते काम कराया कमि नव्हतें कांहीं.**
**घरांत होती नांदत लक्ष्मी सति राधाबाई.**
**सदाचार गोडवा जयाच्या सुखसंसाराला**
**लक्ष्मी त्याच्या घरीं नांदते काय कमी त्याला. ५८**

काम करायाला नोकर असत. कशाचीही ददात नव्हती (कारण) सती राधाबाईच्या रूपानें पंतांच्या घरांत लक्ष्मी नांदत होती. ज्यांच्या संसारसुखाला सदाचाराचा गोडवा असतो त्यांच्या घरीं लक्ष्मी नांदत असते. त्याला काय कमी पडणार आहे ! !

**पंतांचे हें वैभवशाली सुख संसाराचें**
**किती खोडकर–दैव तयाला पाहवते कैचें ! !**
**आषाढीच्या पहिल्या दिवशीं प्रथम पहाटेला**
**सुखी घरावर दुर्दैवाचा ओढवला घाला ! ५९**

दामोदरपंतांच्या संसाराचें हें वैभवशाली सुख, दैव किती खोडकर असते त्याला कसचें पाहवणार ! आषाढांतल्या पहिल्याच दिवशीं पहिल्याच पहाटेला त्या सुखी घरावर दुर्दैवाचा घाला ओढवला.

**निमित्त झालें काय कळेना दु:ख सुरूं झालें**
**आणि सतीनें एकाएकीं अंथरूण धरलें.**
**विनायकाचा हात आपुल्या घेउनि हातांत**
**विनायका – एवढें म्हणाली अन् झाली श्रांत. ६०**

काय कारण झालें कळलें नाहीं. एकाएकीं दुखणें सुरूं होऊन राधाबाईनीं अंथरूण धरलें. विनायकाचा हात आपल्या हातांत घेऊन 'विनायका' एवढेंच राधाबाई म्हणाल्या आणि थकून गेल्या.

**दोन दिवसही पुरे न गेले धांवाधावींत,**
**अखेर गेला क्षण शेवटचा करूनिया घात.**
**एकवार पाहिले भोंवतीं अपुल्या बाळांस**
**आणि सोडला सति राधेनें शेवटचा श्वास. ६१**

दोन दिवसही या धावपळींत गेले नसतील तोंच शेवटचा क्षण अखेर घात करून निघूनही गेला. सती राधाबाईंनी एकवार आपल्या मुलांकडे पाहिलें आणि त्यांनीं शेवटचा श्वास सोडला.

**राधे राधे कशी ग गेलिस आम्हां टाकून**
**दीर सतीचे रडूं लागले धाय मोकलून.**
**पंतांचा आक्रोश केवढा सिमा नसे त्याला**
**रडूं लागलीं मुलें पाहुनी घोळ घरामधला. ६२**

राधाबाईंचे दीर राधे राधे कशी ग आम्हाला सोडून गेलीस असें म्हणून धाय मोकलून रडू लागले. पंतांनीं किती आक्रोश केला त्याला सीमाच नव्हती. घरांत चाललेला हा घोळ पाहून मुलें रडू लागलीं.

**वार्ता गेली क्षणांत जमले गांव घरांभोती,**
**गेलि गांवची आय आमुची जन सारे म्हणती.**
**काळ पाउले जरी न कळती कुण्या मानवाला**
**भविष्य सगळे पुढील असतें ठाउक काळाला. ६३**

ही बातमी क्षणांत पतरली आणि सारा गांव घराभोवतीं जमला. आमच्या गांवाची आई गेली असे सारे लोक म्हणाले. कोणाही मानवाला जरी काळाचीं पाउलें कळलीं नाहींत तरी काळाला मात्र पुढलें भविष्य कळत असतें.

**निर्दय कोणी म्हणोत कोणी कठोर काळाला**
**असेंहि होतें कधीं कुणाची येइ दया त्याला.**
**काय पाहिलें असेल ठाउक तें त्याचें त्यास;**
**अर्ध्या डावावरुनि गेला घेउनि राधेस. ६४**

काळाला कोणी निर्दय म्हणोत, कोणी कठोर म्हणोत पण काळाला कधी कोणाची दया येते असेंही कधी कधी दिसून येतें. संसाराच्या अर्ध्या डावावरून सती राधाबाईला काळ घेऊन गेला. यांत त्यानें काय पाहिलें हें त्याचें त्याला ठाऊक !!

**कुणी येउं द्या कुणी जाउं द्या तिज पर्वा नसते**
**संसाराची सरिता खळखळखळ वाहत असते.**
**रात्र संपते दिवस उजडतो दिन वर्षें जातीं**
**कोण थांबला, कोण थांबतो कोण कुणासाठीं ! ६५**

कोणी येऊ द्या कोणी जाऊ द्या, तिला पर्वा असत नाहीं. संसाराची नदी खळखळ करीत वहात असते. रात्र संपते, दिवस उजाडतो असे दिवस वर्षे निघून जातात. कोणासाठीं कोण थांबतो, कोण थांबला आहे ?

**राधा कसली घरची लक्ष्मी घर सोडुनि गेली**
**संपवुनी अवतार आपुला परत घरा गेली.**
**रंग उडाला तरी फुलांना, गंध जसा असतो**
**निघूनि गेला गुणी तरी गुण मागें दरवळतो. ६६**

त्या राधाबाई कसल्या, घरांत नांदणारी लक्ष्मी घर सोडून गेली. आपला अवतार संपवून परत आपल्या घरीं गेली. रंग उडाला तरी फुलांना जसा गंध असतो, त्याप्रमाणें गुणी निघून गेला तरी त्याचे गुण त्याच्या मागें दरवळतात; म्हणजे लोक गुण गात असतात.

**तशी देखणी सद्‌गुणमंडित देवि मूर्तिमंत**
**निघून गेली तरी तिचें गुण जन होते गात.**
**क्रिया कर्म संपलें, मंडळी गेली नात्याची**
**घरांत झाली सुरूं पुनरपि वर्दळ नित्याची. ६७**

त्याप्रमाणें सुंदर आणि सद्‌गुणी जणू मूर्तिमंत देवीच अशा सती राधाबाई मरण पावल्या तरी लोक त्यांचे गुण गात होते. क्रिया कर्म संपलें. नात्यागोत्याची मंडळी निघून गेली आणि पूर्वीप्रमाणें घरांत नित्याची वर्दळ सुरूं झाली.

* * *

**धन्य गांव ते धन्य लोक ते त्या गांवामधले,**
**इतिहासांतरि नांव गांव जे अजरामर झालें.**

## (४) दामोदरपंत

**दैव आपुलें फिरलें उलटे दिवस सुरू झालें**
**काळ बदलला पंतानी हें कधींच ओळखलें.**
**अधिक काळ राहते शर्वरी शरद् ऋतूकाळीं**
**लौकर जाते रखरखणाऱ्या ग्रीष्म ऋतूकाळीं. ६८**

आपलें नशीब फिरलें आहे, उलटे दिवस सुरू झाले आहेत, काळ बदलला आहे हें दामोदरपंतांनीं केव्हांच ओळखलें. शरद ऋतूंत रात्र मोठी असते आणि रखरखणाऱ्या ग्रीष्म ऋतूंत ती लौकर संपते.

**काळ पाहुनी पाउल टाकी तोच खरा कर्ता;**
**विवेक करुनी बोले चाले तोच खरा ज्ञाता.**
**क्षणाक्षणाला स्मरण पत्निचें होई पंतास;**
**करूनि घ्यावें लागे सांत्वन परि त्यांचें त्यांस. ६९**

त्याप्रमाणें काळ पाहून जो पाऊल टाकतो तोच खरा कर्ता होय. विवेक करून जो बोलतो चालतो तोच खरा शहाणा होय. दामोदरपंतांस क्षणाक्षणाला राधाबाईंचें स्मरण होई; पण त्यांचें त्यांनाच सांत्वन करून घ्यावें लागे!

**समाचार घ्यावया गांवचे जन येती जाती;**
**त्यांतिल कोणी कांहि शहाणे कांहीं सुचवीती.**
**वेळि अवेळीं आणि अयाचित बोध करायाचा**
**स्वभाव असतो समाजांतल्या अनेक लोकांचा. ७०**

समाचारासाठी गांवचे लोक येत जात. त्यांतील कोणी शहाणे कांहीं तरी सुचवीत. वेळीं अवेळीं आणि विचारलें नसतांही उपदेश करण्याचा समाजातल्या अनेक लोकांचा स्वभाव असतो.

**थोर दृष्टिचे पंत खरोखर प्रेमळ हृदयाचे.**
**शिवू दिले नाहींत मनाला विचार मोहाचे.**
**गोजिरवाणीं खेळत असतां मुलें पुढें मागें**
**सैल कसें होणार पत्निच्या प्रेमाचे धागे!** ७१

दामोदरपंत खरोखर दूर दृष्टीचे आणि प्रेमळ हृदयाचे होते. त्यांनीं आपल्या मनाला मोहाचे विचार शिवू दिले नाहींत. त्यांच्यापुढें मागे त्यांची गोजिरवाणीं मुलें खेळत असतां पत्नीप्रेमाचें धागे सैल कसे होणार!

**बाळ मुलास्तव तरी करावा विचार लग्नाचा**
**होउं लागला पुन्हा पुन्हा हा आग्रह थोरांचा.**
**हाल मुलांचे होतिल उलटे द्वितिय विवाहानें;**
**कित्येकांचीं होतीं त्यांच्यापुढें उदाहरणें.** ७२

लहान मुलांकडे पाहून तरी लग्नाचा विचार करावा असा मोठ्या लोकांचा पंतांना पुन्हां पुन्हां आग्रह होऊ लागला. पण द्वितीय विवाहानें मुलांचे उलटे हाल होतील असें त्यांना वाटे. त्यांच्यापुढें कित्येकांची उदाहरणें होतीं.

**गेले सुख तें नाहि कुणाला पुन्हः मिळायाचें**
**पुष्प एकदा सुकल्यावरती नाहि फुलायाचें.**
**गृहस्वामिनी गेलि एकदा दुसरी येईल**
**हृदय देवता गेल्यावरती पुन्हां न येईल.** ७३

जें सुख नाहींसे झालें तें सुख पुन्हां मिळावयाचें नाहीं. एकदां फूल सुकलें की तें पुन्हां टवटवीत व्हावयाचें नाहीं. घराची मालकीण एकदां गेली तरी दुसरी येईल पण हृदयदेवता घर सोडून गेली तर मात्र तिच्या ऐवजी दुसरीस आणतां येणार नाही.

**वसंत येई जाइ; कोकिळा कुहूँ कुहूँ करती,**
**एकदांच पण वसन्त फुलतो संसारावरती.**
**नित्य सुखाची नित्य अपेक्षा करित रहायाचें**
**हेंच खरोखर कारण असतें अनेक दु:खांचें !!** ७४

वसंतऋतु येतो आणि जातो. त्या त्या वेळीं कोकिळा गातात पण संसारावर एकदाच वसन्त फुलतो. नित्य सुखाची सारखी अपेक्षा करावयाची हेंच खरोखर अनेक दु:खांचें कारण असतें.

**गृहस्वामिनी गेली तर ती घर घेउनि जाते;**
**हृदयदेवता गेली तर ती हृदयासह जाते.**
**विवाह पहिला निसर्गसुंदर असतो संसार.**
**विवाह दुसरा तडजोडीचा असतो व्यवहार.** ७५

घराची मालकीण गेली तर ती घर घेऊन जाते. हृदयदेवता गेली तर ती हृदयासह जाते. पहिल्या विवाहाचा संसार निसर्ग सुंदर असतो. दुसरा व्यवहार तडजोडीनें केलेला व्यवहार असतो.

**विवाह आहे एक मनोहर फूल निसर्गाचें;**
**विवाह आहे अमोल भूषण मधुसंसाराचें.**
**विवाह असतो पवित्रतम संस्कार मनुष्याचा**
**वैवाहिक जीवनांत कळतो मार्ग निवृत्तीचा.** ७६

विवाह म्हणजे निसर्गाचें एक मनोहर फूल आहे. विवाह म्हणजे गोड संसाराचें अमोल भूषण आहे. विवाह हा मनुष्याचा पवित्रतम संस्कार असतो. याच वैवाहिक जीवनांत निवृत्तीचा मार्ग दिसतो.

**विवाह दुसरा किती झाहला सुखसमृद्धीचा,**
**सुगंध नाहीं होत नाहिसा प्रथम विवाहाचा.**
**विवाह दुसरा किती असूं द्या सुखसंतोषाचा.**
**प्रथम पत्निच्या विरहाचा व्रण नाहिं बुजायाचा. ७७**

दुसरा विवाह किती सुखाचा आणि संमृद्धीचा झाला तरी पहिल्या विवाहाचा सुगंध नाहीसा होत नाहीं. दुसरा विवाह कितीही सुखकारक आणि संतोषदायक झाला तरी पहिल्या पत्नीच्या विरहाचा व्रण बुजत नाहीं.

**पानपाचुरा सारुनि जैसे पाणी भरतात,**
**डाळ आणि तांदूळ निवडुनी जैसे घेतात,**
**विचार करुनी तसा तयांनीं झाल्या गेल्याचा**
**दूर सारिला बोध अयाचित वडीलधाऱ्याचा. ७८**

जसे केरकचरा सारून तळ्यातलें पाणी भरतात, डाळ तांदूळ ज्या प्रमाणें निवडून घेतात. त्याचप्रमाणें झाल्यागेल्याचा विचार करून वडीलधाऱ्यांचा अनपेक्षित उपदेश दामोदरपंतांनीं एका बाजूस सारला.

**प्रिय पत्नीच्या विरहानें मन दुःखित असतांना**
**करूं लागले पंत घरांतिल तीं कामें नाना.**
**फुलूं लागलीं फुलें; लागलीं खेळुं मुलें भवती;**
**ठाउक नसतो मुलांस दुःखें आणि कशी असतीं. ७९**

प्रिय पत्नीच्या विरहानें मन दुःखित असतांही घरांत पंत नाना-प्रकारचीं कामें करूं लागले. फुलें फुलूं लागलीं. आई नाहीं यांचें विस्मरण होऊन; त्यांचीं मनें प्रसन्न होऊन मुलें पंतांच्या आगे मागें खेळूं लागलीं. दुःखें म्हणजे काय आणि तीं कशीं असतात हें मुलांना ठाऊक नसतें.

**सुख बघणें सर्वांत मुलांची नैसर्गिक वृत्ती,**
**रडे विसरण्याकडे मुलांची असते प्रवृत्ती.**
**तीक्ष्ण बुद्धिच्या विनायकानें ओळखून कांहीं**
**आइ कधीं येणार कुणाला विचारलें नाहीं. ८०**

आपल्याला आवडतें तेवढेंच घ्यावें ही मुलांची नैसर्गिक वृत्ति असते. रडें विसरावें हीही त्यांची प्रवृत्ति असते. सर्व कांही ओळखून तीक्ष्ण बुद्धीच्या विनायकानें आई कधीं येणार असें कोणाला विचारलें नाहीं.

**मातृहीन पाहून मुलांना हळहळती पंत;**
**स्मृति मातेची न व्हावि म्हणुनी झुरति अहोरात्र.**
**न्हाउं घालती कपडे करती अंगाई म्हणती**
**स्वतः शिजवलें जें जेवण तें मुलांस जेवविती. ८१**

मुलांची आई नाही याची पंतांना फार हळहळ वाटे. त्यांना आईची आठवण होऊं नये म्हणून पंत अहोरात्र जपत असत. त्यांना स्नान घालीत, त्यांचे कपडे करीत. त्यांना निजवतांना अंगाई गाणींही म्हणत. इतकेंच नव्हे तर मुलांचें जेवण ते स्वतः शिजवून त्यांना जेवावयास घालीत.

**इतर सुखें लाजतात जेव्हां आई झोपवितें**
**विश्वाचें संगीत आइच्या ओविमधें असतें.**
**आई आई म्हणा कि दुःखें हलकीं होतात**
**दुःखावरती एकच औषध आईचा हात. ८२**

जेव्हा आई झोपवीत असते तेव्हां इतर सुखें लज्जित होतात. (निजवितांना) आई ज्या ओव्या म्हणते त्या ओव्यांत विश्वाचें संगीत असतें. आई आई असें म्हटलें की दुःखें हलकीं होतात. आईनें अंगावरून हात फिरवावा हेंच दुःखावरती एक औषध आहे.

**आई मुलांची करी जसें तें पंत तसें करती;**
**निजलेंलीं पाहिलीं मुलें कीं पंत सुखें निजती.**
**आईच्या ममतेंत दिवस अन् जे क्षण जातात.**
**तोच काळ तेवढा सुखाचा या आयुष्यांत. ८३**

जसें आई मुलाचें करते तसे पंत मुलांचे करीत. आणि मुलें निजलेलीं पाहिलीं की मग पंत सुखानें निजत. आईच्या ममतेंत जे क्षण आणि दिवस जातात तेवढाच काय तो आयुष्यांत सुखाचा काळ असतो.

**करूनि खोडचा उलट आइला त्या सांगाव्यात**
**वाटत असतें बाल मनाला भूषण त्यांच्यात!**
**खेळ खोडकर बघुनि एकदा रागवली आई**
**समाधान वाटतें मुलांना रीत मुलांची ही. ८४**

दुसऱ्याच्या खोडचा करावयाच्या आणि उलट आईला त्या सांगावयाच्या यांत लहान मुलांच्या मनाला समाधान वाटतें. आणि मुलांचा हा खोडकर खेळ पाहून आई एकदा रागावली कीं मुलांना समाधान वाटतें. मुलांची ही एक तऱ्हा असते.

**अंगणातलें कौतुक धांवत माजघरीं जाई**
**परंतु नव्हत्या पहावयाला सति राधाबाई.**
**दिवसामागुनि दिवस चालले उजाड संसारीं.**
**घरांत गढुनी गेली होती पंताची स्वारी. ८५**

अंगणांत खेळत असतांना मुलें मध्येंच माजघरांत जात पण मुलांचे तें कौतुक पहायला सती राधाबाई आतां घरांतच नव्हत्या. उजाड संसारांतील दिवस एकामागून एक चालले होते. पंतांची स्वारी घरांत गढून गेली होती.

**मुंजि मुलांच्या झाल्या, झालें लग्न गणेशाचें.**
**थाट काय तो; लोक जेवले पंचक्रोशीचे.**
**आज पाहिजे होति मुलांची आइ बघायाला**
**वाटत होती उणिव एवढी आल्या गेल्याला.** ८६

मुलांच्या मुंजी झाल्या; गणेशाचें लग्नही झालें. काय तो थाट! पंचक्रोशींतील लोकांना जेवण देण्यांत आलें. हा सोहळा बघायला मुलांची आई पाहिजे होती एवढीच उणीव आल्यागेल्यांना वाटत होती.

**जरी पाहिला कार्यपसारा हजार डोळ्यांनीं**
**प्रशंसलें तें हंसत मुखानीं जरी अनेकांनीं.**
**सहर्ष होतें जरी करित ते स्वागत लोकांचें,**
**पत्नी स्मृतिनें भरलें होतें लोचन पंतांचे.** ८७

हजारो लोकांनीं जरी कार्य पाहिलें आणि अनेकांनी जरी त्याची सहर्ष प्रशंसा केली, आणि दामोदरपंत आल्यागेल्याचें जरी सहर्ष स्वागत करीत होते तरी पत्नीच्या स्मृतीनें त्यांचे डोळे भरलेले होते.

**कितीहि कोणी करोत कौतुक केल्या कार्याचें**
**जोडिदार नाहीं तर नाहीं महत्त्व त्या स्तुतिचे.**
**पहावया पाहिजे म्हणोनी बघत बघायाचे;**
**हंसावया पाहिजे म्हणोनी हंसत हंसायाचे.** ८८

केलेल्या कार्याचें कोणी कितीही कौतुक करोत, आपला जोडीदार नसेल तर त्या स्तुतीचें महत्त्व वाटत नाहीं. पहावयाला पाहिजे म्हणून पहात रहावयाचें, हंसावयास पाहिजे म्हणून हंसत असावयाचें.

**जगावया पाहिजे म्हणोनी उगिच जगायाचें.**
**जोडिदार गेल्यावर जगणें–जगणें मरणाचें,**
**जोडिजोडिनें करावयाचा असतो संसार**
**जोडिदार गेल्यावर निघुनी सगळा अंधार !** ८९

जगावयाला पाहिजे म्हणून उगीच जगावयाचें. जोडीदार गेल्यावर जगणें हें मरणाचें जगणें असतें. संसार हा जोडीजोडीनें करावयाचा असतो; जोडीदार निघून गेल्यावर सगळाच अंधार !

**घरांत आली सून यशोदा–नांव किती गोड !**
**विनायकाची वहिनि यशोदा–नांव किती गोड**
**विनायकाला बहिण लाभली–नांव किती गोड**
**विनायकाची सखी यशोदा–नांव किती गोड!** ९०

पंतांच्या घरांत सून आली. तिचें यशोदा नांव किती गोड, विनायकाच्या वहिनीचें नांव यशोदा किती गोड ! विनायकाला बहीण लाभली तिचें नांव किती गोड, विनायकाची सखी यशोदा तिचें नांव किती गोड !!

**श्रमिक मनाला गोड चांदणें जैसे पुनवेचे,**
**घरांत येणें तसें जहालें गोड यशोदेचें.**
**आनंदानें सुगंधलें घर नितांत पंतांचें.**
**आणि सासरे सहर्ष करती लाड यशोदेचे.** ९१

दमलेल्या मनाला पौर्णिमेचें चांदणें जसें गोड वाटतें, तसेंच यशोदा आपल्या संसारांत येण्यानें घरांत समाधान पसरलें. पंतांचें सर्व घर आनंदाच्या सुगंधानें भरून गेलें. आणि सासरे यशोदेचे आनंदानें लाड करूं लागले.

**असें व्हायची धनीण घरची सून घराण्याची**
**म्हणूनि असते सून लाडकी लहान मोठ्यांची.**
**स्वसुख सुनेच्या सुखांत मानुनि सरत्या काळांत**
**संतोषानें वडिल माणसें दिवस काढतात. ९२**

घरची आणि घराण्याची धनीण सून व्हावयाची म्हणून लहान मोठ्यांची सून लाडकी असते. सुनेचें सुख तेंच आपलें सुख मानून वडील माणसें आपल्या आयुष्याचे शेवटचे दिवस संतोषानें काढीत असतात.

**करा मुलांचे लाड वाढवा कितीहि निष्ठेनें**
**आईविण एकांगीं जीवन अन् बापुडवाणें.**
**आईच्या मायेतिल जीवन फूल गुलाबाचें.**
**आईविण गेलेलें जीवन फूल कण्हेरीचें ! ९३**

मुलांचे कितीही लाड करा, त्यांना कितीही निष्ठेनें वाढवा. आईखेरीज त्यांचें जीवन एकांगीं आणि बापुडें असतें. आईच्या मायेंत चाललेले दिवस गुलाबाच्या फुलासारखे असतात. आईखेरीज जाणारे दिवस कण्हेरीच्या फुलासारखे असतात — म्हणजे त्यांना गंधच असत नाही.

**आई असतां मुलांस असते ओढ घराकडची**
**तहानलेल्या मृगास जैशी ओढ तलावाची;**
**आई नसल्यामुळें मुलांचें चित्त घरांतून**
**होउं लागलें कमी नि गेलें मुलांत गुंतून. ९४**

तान्हेल्या मृगांना जशी तलावाची ओढ असते त्याप्रमाणें आई असली तर मुलांना घराची ओढ असते. आई नसल्यामुळें मुलांचें घरांत चित्त कमी कमी होऊं लागलें. इतर मुलांशीं खेळण्यांतच तें गढून जाई.

* * *

**धन्य गांव ते धन्य लोक ते त्या गांवामधले**
**इतिहासांतरिं नांव गांव जें अजरामर झालें.**

## (५) बालपणांतील खेळ

रमूं लागलीं मनें मुलांची खेळ खेळण्यांत
विनायकाची तऱ्हा निराळी पण दिसली त्यांत.
बांधि देवळें करी साजिरे उत्सव देवांचे.
काढि छबीने सहाय्य त्याला पण गोपाळांचे ! ९५

मुलांचीं मनें खेळांत रमूं लागलीं, पण त्या खेळांत विनायकाच्या खेळांची तऱ्हा निराळीच दिसून आली. तो देवळें बांधी, देवांचे उत्सव साजरे करी, त्यांचे छबिने काढी. यांत त्याला मुलांचें साहाय्य असे.

नेमबाजिचें शिक्षण केव्हां घोड्यावर बसणें,
आंबेराईतुनी मुलांसह स्वैरपणें फिरणें,
पुराणांतल्या कथा नि गोष्टी इतिहासामधल्या
स्वतःच वाची वाचुनि घेई सांगे वाचाया. ९६

विनायक कधीं नेमबाजीचें शिक्षण घेई तर केव्हां घोड्यावर बसण्यास शिके. आंबराईतून केव्हां मुलांबरोबर स्वच्छंद फिरत असे. तर कधीं पुराणातल्या कथा आणि इतिहासांतल्या गोष्टी विनायक मुलांना सांगे. स्वतः वाचून दाखवी, मुलांकडून वाचून घेई तर कधीं त्यांनाच वाचावयास सांगे.

छंद लागला विनायकाला कविता करण्याचा
शाहिर झाला बालविनायक भगूर गांवाचा.
फटके झगडे गाउं लागले लोक तमाशांत,
विनायकाची कीर्ती झाली पंचक्रोशींत. ९७

विनायकाला कविता करण्याचा गोड छंद लागला आणि भगूर गांवचा शाहीर म्हणून बाळ विनायकाची प्रसिद्धि झाली. त्यानें रचलेले फटके, झगडे लोक तमाशांत म्हणूं लागले. अशी पंचक्रोशींत विनायकाची कीर्ति झाली.

**आणि जाहला चमत्कारहो, त्याच सुमारास**
**वरचेवर दृष्टांत लागले होऊं पंतास.**
**दुर्गादेवी म्हणे येउनी पंतांच्या स्वप्नीं,**
**स्थापन अपुल्या घरीं मला कर जा मज घेऊनी. ९८**

आणि लोकहो, याच सुमारास एक चमत्कार झाला. दामोदरपंतांना वरचेवर दृष्टान्त होऊ लागले. मला येथून घेऊन जा आणि तुझ्या घरीं माझी स्थापना कर असें पंतांच्या स्वप्नांत येऊन दुर्गादेवी सांगू लागली.

**थोर घराणें थोर तुझें कुळ, तूंही भाग्याचा;**
**तुझ्या घरीं अवतार जाहला थोर विभूतीचा.**
**महाथोर उद्धारक हिंदू, हिंदू राष्ट्राचा**
**तुझ्या घरीं अवतार जाहला महान् पुरुषाचा. ९९**

तुझें घराणें थोर आहे, तुझें कुलही थोर आहे आणि तूंही भाग्याचा आहेस. तुझ्या घरीं थोर विभूतीचा अवतार झाला आहे. तो हिंदुराष्ट्राचा थोर उद्धारक आहे. तुझ्या घराण्यांत महापुरुष अवतरला आहे.

**देइल तो नववेद हिंदुना हिंदूराष्ट्राचा.**
**उज्ज्वल आहे काळ महत्तम हिंदू जातीचा.**
**सहाय्य माझें त्यास पाहिजे भाव बळायास**
**करावयाचा आहे मजला तुझ्या घरीं वास. १००**

तो हिंदुराष्ट्राचा नववेद देईल. महत्तम हिंदुजातीचा काळ उज्ज्वल आहे. हिंदुजातीच्या भावना घनिष्ठ होण्यासाठी माझें साहाय्य त्याला मिळावयास पाहिजे आणि त्याकरतां मला तुझ्या घरीं रहावयास यावयाचें आहे.

**मंदिरांत मी जा घेवोनी; नको करूं चिंता;**
**काळचक्र येईल कधी कां कुणास थांबविता?**
**राष्ट्रभावना नष्ट जाहली हिंदुसमाजाची**
**करील हा पुनरपी स्थापना हिंदूराष्ट्राची. १०१**

मी मंदिरांत आहे. मला घेऊन जा. चिंता करूं नकोस. कालचक्र हें कोणाला थांबवितां का येणार आहे ! हिंदुसमाजाची राष्ट्रभावना नष्ट झाली आहे. हिंदुराष्ट्राची विनायक पुन्हां स्थापना करील.

**सुरू जाहले नव्या युगाचें इथुनि नवें पान;**
**मला पाहिजे रक्त रक्त नी रक्ताचें स्नान.**
**फार काळ जाहला – मिळालें रक्त मला नाहीं;**
**तहान माझी रक्तावांचुनि सरायची नाहीं. १०२**

येथूनच नव्या युगाचें नवें पान सुरू होत आहे. मला रक्त पाहिजे रक्त ! आणि रक्ताचें स्नान मला पाहिजे. बराच काळ होऊन गेला, मला रक्तच मिळालें नाहीं. रक्तांवाचून माझी तहान भागावयाची नाहीं !

**कधींच नाहीं ज्यास विसावा काळ तया म्हणती**
**काळाची मी बहिण धाकटी दुर्गा मज म्हणती;**
**मलाच म्हणती सती पार्वती देवि कुणी कोणी.**
**मलाच म्हणती देवि भवानी जय अंबा कोणी. १०३**

कधींच जो विसावा घेत नाहीं त्याला काळ म्हणतात. मी काळाची धाकटी बहीण आहे. मला दुर्गा म्हणतात. मलाच कोणी सती म्हणतात. मलाच कोणी देवी पार्वती म्हणतात. मलाच देवी भवानी म्हणतात आणि कोणी मलाच अंबा म्हणतात.

**रुधिरप्रिय देवता करिल ही तुमचें वाटोळें**
**नका आग ही घरांत आणू कोणि असें म्हटलें.**
**रुधिराचें पाहिजे स्नान जर असेल देवीला**
**महत् भाग्य तें लाभो माझ्या पूज्य घराण्याला. १०४**

श्रीदुर्गा ही रुधिरप्रिय देवता आहे. ही आग घरांत आणूं नका. तुमचें वाटोळें करील असें कोणी म्हणाले. पण देवीला रुधिराचें स्नान जर पाहिजे असेल तर तें स्नान घालण्याचें महद्भाग्य माझ्या घराण्याला लाभो !

**ईश्वर इच्छा दिसे मला ही घडो पुढें कांहीं**
**विरोध कोणाचा पंतांनीं जुमानिला नाहीं.**
**कर्माला अनुसरून होते बुद्धि माणसाला**
**म्हणती कोणी नियति; नेमानेम कुणी त्याला. १०५**

पुढें कांहीं होवो. मला ही ईश्वराची इच्छा दिसते. असें म्हणून दामोदरपंतांनीं कोणाच्या विरोधाची पर्वा केली नाहीं. कर्माला अनुसरून माणसाला बुद्धि होत असते. त्याला कोणी नियति म्हणतात. कोणी त्याला नेमानेम म्हणतात.

**वाजत गाजत मूर्ति आणुनी घरिं सन्मानांनीं**
**स्थापन केली समरदेवता सशास्त्र पंतांनीं.**
**घरांत आली दुर्गा माता बघून हर्षून**
**भक्त जाहला तिचा विनायक तेव्हांपासून. १०६**

सन्मानपूर्वक पंतांनीं वाजत गाजत मूर्ति आणली व तिची आपल्या घरीं सशास्त्र स्थापना केली. घरांत दुर्गादेवी आली आहे असें पाहून विनायकाला आनंद झाला आणि तेव्हांपासून तो तिचा भक्त बनला.

**जें जें येई मनांत सांगें दुर्गा मातेस**
**भाव मुलाचा बघूनि देई कौल तसा त्यास.**
**सांगत होता काय विनायक दुर्गा मातेला,**
**सांगत होती काय देवता अपुल्या भक्ताला !** १०७

मनांत जें जें येई तें तें तो दुर्गामातेला सांगे. मुलाचा म्हणजे विनायकाचा भाव पाहून तसा त्याला कौल मिळे. दुर्गामातेला तो काय सांगत असे आणि तीही आपल्या बालभक्ताला काय सांगे ?

**दैवी भाषा कशी कळावी अभक्त लोकांस**
**पूर्व जन्मिचें पुण्य लागतें ती समजायास.**
**निश्चय, निष्ठा, श्रद्धा तैसा अंतरिचा भाव**
**असेल तर बोलतो तयाशीं दगडांतिल देव !** १०८

अभक्त लोकांना दैवी भाषा कशी कळणार ? ती समजावयास पूर्वजन्मींचें पुण्य लागतें. निश्चय, निष्ठा, श्रद्धा, आणि अंतरीं भाव असेल तर दगडांतला देव भक्ताशीं बोलतो.

**निष्ठा, श्रद्धा, बुद्धि, निश्चया या बहिणी बहिणी**
**सवें चालता निसर्गांतलीं उलगडतीं गाणीं;**
**या देवींची कृपा लागते थोर पुढाऱ्याला**
**या बहिणी जर प्रसन्न होतिल काय कमी त्याला !** १०९

निष्ठा, श्रद्धा, बुद्धि आणि निश्चया या बहिणी बहिणी आहेत. या एकमेकींबरोबर चालत असतात तेव्हां निसर्गातल्या गाण्यांचा अर्थ कळतो. थोर पुढाऱ्याला या देवींची कृपा लाभावी लागते. या बहिणी जर प्रसन्न झाल्या तर त्याला काय कमी पडणार आहे ?

**निळ्या पटावर गृहनक्षत्रें शोभुनि दिसतात**
**भाव – अंबरीं तसें बुद्धिचें सुरंग खुलतात.**
**जग आहे हा प्रकर्ष केवळ प्रबुद्ध बुद्धीचा**
**ओलावा लागतो तयाला भावविभावाचा. ११०**

ज्याप्रमाणें निळ्या आकाशांत ग्रहनक्षत्रें शोभून दिसतात, तसे भावनेच्या आकाशांत बुद्धीचे सुरंग शोभून दिसतात. जग हा प्रबुद्ध बुद्धीचा प्रकर्ष आहे. त्याला भावबुद्धीचा ओलावा असावा लागतो.

**विनायकानें बखर वाचली शूर शिवाजीची,**
**आणि वाचली अनेक वेळा बखर पेशव्यांची.**
**निबंधमाला झाली वाचुनि आणि कथासार.**
**स्वातंत्र्याविण व्यर्थ – काढलें त्यांतुनि हें सार! ! १११**

विनायकानें शिवाजीची बखर वाचली आणि पेशव्यांची बखरही अनेक वेळां वाचली. निबंधमालाही त्याची वाचून झाली आणि कथासार हाही ग्रंथ वाचला. स्वातंत्र्याखेरीज सर्व व्यर्थ आहे हें त्यांतून त्यानें सार काढलें.

**करूनि गोळा मुलें केसरी दाखवि वाचून**
**आणि त्यांतल्या वार्ता त्यांना देई समजून.**
**वार्ता आली दंगा झाला हिंदूयवनांचा**
**क्षोभ जाहला विनायकाच्या विचार लहरींचा. ११२**

गांवांतलीं मुलें गोळा करून विनायक त्यांना केसरी वाचून दाखवी आणि त्यांतल्या बातम्या तो त्यांना स्पष्ट करून सांगे. हिंदुमुसलमानांचा दंगा झाल्याचें केसरींतलें वृत्त वाचून विचारांचें काहूर उठलें.

**घरें जाळलीं ठार जहाले हिंदु शेंकडयांनीं,**
**हिंदुस्त्रीवर हात टाकला टवाळ यवनांनीं,**
**लुटालूट जाहली उडाला कहर मुंबईंत**
**आणि फोडल्या चांडाळानीं मूर्ति येवल्यांत. ११३**

घरांची जाळपोळ झाली आणि शेकडों हिंदु ठार झाले, त्याचप्रमाणें हिंदुस्त्रियांवर मुसलमानांनीं हात टाकला. लुटालूट झाली. असा मुंबईंत कहर उडाला आणि एवढ्यांत चांडाळांनी मूर्तिहि फोडल्या असें वृत्त आलें होतें.

**आग आग जाहली, भडकला, झाला बेभान;**
**आणि जाउनी धरलें त्यानें देवीचे चरण.**
**मानव योनींतील जिवाचें हें येणें जाणें**
**एका पानापुढील असतीं हीं पुढचीं पानें. ११४**

तें वाचून त्याच्या अंगाची आग आग भडकली, तो बेभान झाला. आणि त्यानें जाऊन देवीचे पाय धरले. मानवाचे जन्म हे एका पाना-पुढील एक पानें असतात.

**स्वयंस्फूर्त वा सहजस्फूर्त वा सहजपणें सुचणें**
**यांसचि म्हणती पूर्व जन्मिचें हें देणें घेणें.**
**नाहि लागलें शिकावयाला; कळें त्यास त्याचें**
**स्मरण जाहलें विनायकाला श्रीशिवरायाचें. ११५**

स्वयंस्फूर्त किंवा सहजस्फूर्त अथवा सहज सुचणें हें मागील जन्मांतील देणें घेण्यासारखें असतें. विनायकाला कांहीं शिकवावयास लागलें नाहीं. त्याचें त्यालाच सुचत होतें. त्यानुसार वरील वृत्तें वाचून विनायकाला श्रीशिवरायाचें स्मरण झालें.

**म्हणे काय उच्छाद मांडला टवाळ यवनांनीं**
**आणि तयांना सहाय्य द्यावें कसें इंग्रजांनीं !**
**स्वप्न राहिलें अपुरें अमुच्या श्रीशिवरायाचें**
**स्वप्न राहिलें अपुरें श्रीमन् माधवरायाचें. ! ११६**

तो स्वतांशीच म्हणाला : या टवाळ यवनांनीं काय उच्छाद मांडला आहे! आणि त्यांना इंग्रजांनीं साहाय्य कसें द्यावें? आमच्या श्रीशिवरायाचें स्वप्न अपुरें राहिलें, श्रीमंत माधवरावाचें स्वप्न अपुरें राहिलें.

**चला करूं निर्यवन गडयांनों, हा अपुला देश.**
**म्हणे मुलांना चला करूं या स्वतंत्र हा देश**
**प्रताप सांगे बाल विनायक श्रीशिवरायाचे**
**सुरू जाहले खेळ मुलांचे गड जिंकायाचे!! ११७**

गडयांनों, आपला देश आपण निर्यवन करूं या आणि हा देश स्वतंत्र करूं या, असें म्हणून श्रीशिवाजी महाराजांच्या पराक्रमाच्या त्यानें गोष्टी सांगितल्या. गड जिंकायाचे खेळ खेळणें मुलांचें सुरू झालें.

**आणि जाहलें काय एकदा मित्रांसमवेत**
**हल्ला केला विनायकानें शिरून मशिदींत !**
**नवल वाटलें विनायकाचें भगूर गांवाला !**
**वाटे कुणि अवतार असावा हा ज्याला त्याला. ११८**

आणि एकदा काय जाहलें, विनायकानें आपल्या मित्रांसह मशिदी-वर हल्ला चढवून मशिदींत प्रवेश केला. ही वार्ता ऐकून भगूर गांवातील लोकांना विनायकाचें नवल वाटलें. ज्याला त्याला विनायक हा अवतार असावा असें वाटे.

**बाळपणीं दिसतात लक्षणें थोरा मोठ्यांचीं**
**स्वभावतां असतात पुढें तीं विकसित व्हायाचीं.**
**पिकावरुनि अंदाज बांधती पुढील भावाचा**
**बाळ लक्षणांवरुनी कळतो काळ भविष्याचा ११९**

थोरपणाचीं आणि मोठेपणाचीं लक्षणें बालपणांत दिसतात व तींच लक्षणें पुढें स्वभावत: मोठीं होत जातात. पीक पाहून पुढील भावाचा जसा अंदाज बांधतात त्याप्रमाणें लहानपणीं दिसून येणाऱ्या लक्षणांवरून पुढचें भविष्य कळतें.

**हुशार मुलगा परी करावें काय शिक्षणाचें**
**विचार झालें सुरू सारखे वडील पंतांचे.**
**अखेर ठरलें धाडायाचें पुढें शिकायास,**
**बाळ विनायक आला आला नाशिक शहरास. १२०**

मुलगा हुषार आहे तेव्हां त्याच्या पुढील शिक्षणाची कशी व्यवस्था करावी याचा दामोदरपंत विचार करूं लागले. आणि अखेर बाहेर गांवीं शिक्षणासाठीं विनायकाला ठेवण्याचा त्यांचा विचार ठरला. आणि त्याप्रमाणें विनायक नाशिकास पुढील शिक्षणासाठीं गेला.

**आग भडकली देशभक्तिची भगूर गांवांत**
**तीच पुढें पेटणार आतां नाशिक शहरांत.**
**ज्योत पेटली भगूर गावीं दास्यमोचनाची**
**प्रकाशीत ती करील हृदयें नाशिक शहराचीं. १२१**

भगूर गांवांत देशभक्तीची जी आग भडकली तीच आतां नाशिकांत भडकणार. दास्यमोचनाची ज्योत भगूर गांवांत पेटली तीच आतां नाशिक शहरातील लोकांचीं हृदयें प्रकाशित करील.

**स्वयंप्रकाशित तारा दिसला भगूर गांवाला**
**तोच दिपवुनी टाकिल आतां नाशिक शहराला.**
**धन्य गांव तें धन्य लोक ते त्या गांवामधले.**
**इतिहासांतरिं नांव गांव जे अजरामर झालें. १२२**

भगूर गांवाला ज्या स्वयंप्रकाशित ताऱ्याचें दर्शन झालें, त्या ताऱ्यानें नाशिक शहरांतील लोकांचे डोळे दिपून जातील. इतिहासांत जें गांव आणि जें नांव अजरामर झालें तें गांव धन्य होय.

* * *

**जय हो जय हो विनायकाचा मंगल जयजयकार**
**मंगल जयजयकार करा हो, मंगल जयजयकार.**

* * *

# सर्ग दुसरा

## (६) तीर्थ नाशिक

नव्या युगाचें सुरू जाहलें नवें नवें पान
घालुं चला स्वातंत्र्यदेविला रक्ताचें स्नान

*　　　*　　　*

**झुलतें डुलतें नाशिक आहे श्रीगोदेकाठीं**
**लहान आहे गांव तयाची कीर्ति परी मोठी.**
**फूल जाइचें लहान जातो गंध किती दूर**
**तसें तीर्थ नाशीक भारतीं आहे महशूर. १**

श्री गोदावरी नदीचे कांठीं गजबजलेलें नाशिक शहर आहे. गांव लहान असलें तरी त्याचा नांवलौकिक मोठा आहे. जाईचें फूल लहान असतें. तरी त्याचा सुवास जसा दूरवर जातो तसें नाशिक तीर्थ भारतांत महशूर आहे.

**क्षेत्रेंतीर्थें विभूषणें हीं भारत देशाचीं**
**तीर्थें हीं जागतीं दैवतें हिंदू धर्माचीं.**
**भारतामध्यें तीर्थ महत्तम तीर्थ नाशिकाचें**
**इथेंच झालें पूज्य राहणें रामजानकीचें. २**

तीर्थें आणि क्षेत्रे भारताचे अलंकार आहेत. हिंदू धर्माचीं तीर्थें हीं जागतीं दैवतें होत. भारतांतील तीर्थांत नाशिक तीर्थ फार मोठें आहे. श्रीरामचंद्रप्रभु आणि सीतामाई यांचें या ठिकाणीं कांहीं दिवस वास्तव्य होतें.

**इथेंच होता आश्रम त्यांचा पांच वडाखालीं**
**निज वास्तव्यें प्रभुनें पावन पंचवटी केली.**
**ऋषी महर्षी योगि वियोगी आणि साधुसंत**
**गोदावरिचें स्नान कराया इथेंच येतात. ३**

इथेंच पांच वडाखालीं त्यांचा एक आश्रम होता. आपल्या वास्तव्यानें रामचंद्रांनी पंचवटी पावन केली आहे. योगी, वियोगी, साधु, संत, ऋषि, महर्षि गोदावरीचें पवित्र स्नान घडावें म्हणून येथेंच येतात.

**इथेंच केलें पुरश्चरण श्रीसंत समर्थांनीं**
**इथेंच झालें ज्ञान नि दिधलें दर्शन रामांनीं;**
**कांहीं काळ राहणें जाहलें जेथें थोरांचें**
**येतें त्या स्थानास थोरपण पुण्यक्षेत्राचें.** ४

संतश्रेष्ठ श्रीसमर्थ रामदासांनीं याच ठिकाणीं पुरश्चरण केलें. श्रीरामचंद्रप्रभूनीं त्यांना इथेंच दर्शन दिलें आणि येथेंच त्यांना ज्ञान-प्राप्ति झाली. कांहीं काळ ज्या स्थळीं थोर पुरुषांचें वास्तव्य होतें, त्या स्थानाला पुण्यक्षेत्राचा मोठेपणा मिळतो.

**पक्षि पांखरें येथिल म्हणतीं 'रामचंद्र की जय'**
**घाटावरचे दगड बोलती 'रामचंद्र की जय'**
**कोटिकोटि गातात कंठ 'जय रामचंद्र की जय'**
**आणि लोकहो, तुम्हीहि बोला 'रामचंद्र की जय'** ५

येथील पक्षी पांखरेंही श्रीरामप्रभूचा जयजयकार करतात. गोदावरीच्या कांठावर बांधलेल्या घाटाचे दगडही श्रीरामचंद्रांचा जयजयकार करतात. तेथें कोटचवधि कंठ श्रीरामचंद्रांचाच जयजयकार करतात आणि लोकहो, तुम्हीही श्रीरामचंद्रांचा जयजयकार करा.

**असें जाहलें वरुनि राममय नाशिक एकूण**
**ठाउक नव्हतें परि कोणाला राज्य करी कोण ?**
**हिंदूवरती चाल केवढी यवन इसायांची**
**या लोकांना मुळीं कल्पना नव्हति कधीं याची!** ६

अशा प्रकारें नाशिक शहर वरून राममय झालें होतें. पण राज्य कोणाचें आहे हें मात्र लोकांना ठाऊकही नव्हतें. ख्रिश्चन आणि मुसलमान यांचें हिंदूवर केवढें आक्रमण चालू आहे याची नाशिकामधील लोकांना कधीं कल्पनाच नव्हती.

**कणाकणानें भूमिविसर्जन अन् भू आक्रमणें**
**करतो सागर परी न कळतें हें त्याचें करणें.**
**परधर्माच्या आक्रमणाचीं न पाउलें कळुनी**
**समाज होतो तसाच सारा नष्ट जगांतूनी. ७**

भूमीचें आक्रमण आणि भूमिविसर्जन समुद्र कणाकणाने करीत असतो. पण त्याचें हें आक्रमण लक्षांत येत नाहीं. त्याचप्रमाणें पर-धर्माच्या आक्रमणाचीं पावलें लक्षांत येत नाहींत. आणि सारा समाज या जगांतून नष्ट होऊन जातो.

**स्वदेशदृष्टी स्वधर्मदृष्टी गेली सोडून**
**गुलामगिरिचें दुःख तयांना होइल कोठून!!**
**स्वदेश दृष्टी स्वधर्म दृष्टी सुटली जनतेची**
**काळ पाउलें त्या लोकांना कशीं कळायाचीं! ८**

स्वदेशाचें हित कशांत आहे आणि स्वधर्म काय हें ज्यांना कळत नाहीं अशा लोकांना गुलामगिरीचीं दुःखें तरी कशीं कळणार! ज्या लोकांची स्वदेशदृष्टि आणि स्वधर्मदृष्टि सुटली अशा लोकांना काळाची पावलें कशीं पडत आहेत हें कळणार कसें!!

**प्रत्येकाला जसें असें ऋण आईवडिलांचें**
**तसेंच असतें डोईवर ऋण स्वदेश-धर्माचें.**
**करा दान वा सहाय्य जोडा जोड वैभवाची**
**ऋणें दिल्याविण गती कुणाला नाहि मिळायाची. ९**

प्रत्येकाला जसें मातृऋण असतें, पितृऋण असतें तसेंच प्रत्येकाच्या डोक्यावर स्वदेशाचें ऋण असतें आणि स्वधर्माचेंही ऋण असतें. कितीही वैभव संपादन करा, बरेंच दान द्या किंवा लोकांना मदत करा, वरील ऋणें फेडल्याखेरीज कोणालाही सद्गति मिळत नाहीं.

**राज्य चालतें कसें आणि तें चालवितो कोण**
**स्वराज्य म्हणजे काय कशाला विचारतो कोण ?**
**ठाउक होते टिळक तेवढे आणि काळकर्ते**
**काय म्हणे केसरी परंतू कळत तया नव्हतें. १०**

राज्य कसें काय चाललें आहे आणि तें राज्य कोण करीत आहे, स्वराज्य म्हणजे काय हें कोण कशाला विचारतो? टिळक आणि काळकर्ते शिवराम महादेव परांजपे यांचीं नांवें तेवढीं त्यांना ठाऊक होतीं. परंतु टिळक काय म्हणतात तें कांहीं त्यांना कळत नव्हतें.

**वनस्पतीचें ठाउक असतें नांव परी त्याचा**
**कळावया उपयोग पाहिजे कसा करायाचा.**
**ठाउक असतीं नांवेगांवें फक्त पुढाऱ्यांची**
**ठाउक नसते परी तयांच्या महती कार्याची. ११**

वनस्पतीचें नांव ठाऊक असतें पण त्याचा उपयोग कसा, केव्हां करावयाचा हें कळलें पाहिजे. पुढाऱ्यांचीं नांवें गांवें फक्त ठाऊक असतात त्यांच्या कार्याचें महत्त्व मात्र ठाऊक नसतें.

**सांगावे संकल्प जेवणें जेवण जिलबीचें**
**झोंप काढुनी अन् खेळावे खेळ सोंगट्यांचे;**
**सायंकाळीं बघत रहावे खेळ पतंगांचे !**
**उनाड जीवन काढित होते लोक नाशिकाचे. १२**

तीर्थावर संकल्प सांगावेत, जिलबीचें जेवण झोडावें, दुपारीं झोप काढून सोंगट्यांचा डाव मांडावा आणि सायंकाळीं गोदावरीच्या कांठावर पतंगांचे खेळ बघावे असें उनाड जीवन नाशिकचे लोक काढीत असत.

**ज्यास जीवनीं ध्येय धोरणें कधींच नसतात**
**असें समाजामधें भांबरे अनेक असतात.**
**स्वदेश म्हणजे काय कशाला स्वराज्य म्हणतात,**
**या लोकांना ठाउक नव्हतें सुख स्वातंत्र्यांत ! १३**

ज्यांना आयुष्यांत ध्येयधोरण कधींच नसतें असें भांबऱ्या वृत्तीचे लोक समाजांत अनेक असतात. स्वदेश म्हणजे काय आणि स्वराज्य कशाला म्हणतात, स्वातंत्र्याचें सुख कसें असतें हें या लोकांना ठाऊकच नसतें.

**काळचक्र अन् राज्यचक्र हीं ठाउक नसतात**
**असे लोक असतात सर्वदा सर्व समाजांत.**
**नाहीं प्रभुच्या चरणीं नाहिं वा केशकलापांत**
**कुठें पडावें अशींच पुष्पें अनेक असतात. १४**

सर्वच समाजांत असे लोक असतात की, काळचक्राचें आणि राज्यचक्राचें त्यांना कांहीं ज्ञानच नसतें. प्रभुचरणीं किंवा तरुणीच्या केशकलपांत स्थान न मिळाल्यानें कोठें तरी सुकून जावें अशींच अनेक फुलें असतात.

**गलिच्छ वस्ती बिभत्स भाषा वैभव तीर्थाचें**
**नसे कमी लौकिकामधें या नाशिक गांवाचें.**
**कुरूप त्यांतुनी गबाळ जीवन जसें कुण्या स्त्रीचें**
**नाशिक होतें दिसावयाला अशा रहाणीचें. १५**

गलिच्छ वस्ती आणि बीभत्स बोलणें हें तीर्थाचें वैभव असतें. असा जो तीर्थांचा लौकिक त्या दृष्टीनें नाशिक गांव मागें नव्हतें ! ! दिसावयास कुरूप आणि गबाळ राहणी अशा एखाद्या स्त्रीसारखें नाशिक गांव दिसत होतें.

**अशाच एका बोळामध्यें राष्ट्रिय दृष्टीची**
**होति काढिली लहान शाळा कुणी इंग्रजीची.**
**लहान शाळा परंतु होते चालक शाळेचे**
**उत्साही अन् स्वार्थत्यागी राष्ट्रियदृष्टीचे.** १६

अशाच एका बोळांत राष्ट्रीय दृष्टीनें कोणी एकानें इंग्रजी शिकवण्याची व्यवस्था असलेली एक शाळा चालविली होती. शाळा लहानच होती, पण शाळेचे चालक राष्ट्रीय विचाराचे आणि मोठे उत्साही होते.

**ध्येय भव्य अन् विशाल दृष्टी असेल संस्थेची**
**लोकोत्तर अन् महान् संस्था तीच म्हणायाची.**
**विनायकानें नांव घातलें अशाच शाळेंत;**
**नांव ' शिवाजी ' त्या शाळेचें झालें विख्यात.** १७

ज्या संस्थेचें ध्येय भव्य असतें आणि दृष्टि विशाल असते ती लोकोत्तर आणि मोठी संस्था म्हणावी. अशाच संस्थेच्या शाळेंत नाशिकास आल्यावर विनायकानें नांव घातलें. आणि त्यामुळें त्या शाळेचें 'शिवाजी' हें नांव विख्यात झालें.

**फुलाफळांचें असें ताटवे वैभव बागेला**
**हुशार विद्यार्थ्यांचें असतें वैभव शाळेला.**
**गुलाब पुष्पें सुंदर सुंदर बागेची शोभा**
**सुशील विद्यार्थ्यांची असते शाळेला शोभा.** १८

निरनिराळ्या फुलांचे ताटवे हें जसें बागेचें वैभव असतें त्याचप्रमाणें हुषार विद्यार्थी शाळेचें वैभव असतात. गुलाबाचीं सुंदर सुंदर फुलें हीं ज्याप्रमाणें बागेची शोभा असते, त्याचप्रमाणें शाळेचे विद्यार्थी सुशील असणें ही शाळेची शोभा असते.

**मधेंच होई स्मरण तयाला भगूर गांवाचें**
**आम्बेराईराइतुनी स्वच्छंद फिरायाचें;**
**शिवरायाच्या कथाकीर्तनीं रंगुनि जायाचे.**
**आणि बेत तें हिंदूराष्ट्र निर्यवन करायाचे. १९**

विनायकाला मधूनच भगूर गांवचें स्मरण होई. आमराईतून स्वच्छंद हिंडत असूं याचेंही त्याला स्मरण होई. त्याचप्रमाणें श्रीशिवाजी महाराजांच्या गोष्टी सांगण्यांत रंगून जात असूं याचें त्याला स्मरण होई आणि हिंदुराष्ट्र निर्यवन करावयाचे मनसुबे आपण कसे करीत असूं याचेंही त्याला स्मरण होई.

**बाळपणांतिल आठवणी असतात अशा कांहीं**
**संगत त्यांची क्षण शेवटवर सुटायची नाहीं.**
**आयुष्याचे भले बुरे दिन – दिन जे जातात,**
**श्रुतिस्मृतीच्या धाग्यांतुनि ते उठून दिसतात. २०**

बालपणांतील कांहीं आठवणी अशा असतात कीं शेवटच्या क्षणाच्या वेळीं सुद्धां त्या मनांतून नाहींशा व्हावयाच्या नाहींत. आयुष्यांतील जे सुखाचे दिवस जातात आणि जे दुःखाचे दिवस जातात ते श्रवण आणि स्मरण यांच्या धाग्यांतून सुखावह होतात.

**स्मृती न होइल सुखी न जातिल दिन आयुष्याचे;**
**आठवणींवर मनुष्य जगतो जीवन सोन्याचें;**
**सुखदुःखाच्या आठवणी हें जीवन सौख्याचें**
**आठवणींविण जीवन म्हणजे जगणें वेडयाचें. २१**

आठवणीच जर झाल्या नाहीत तर आयुष्याचे दिवस सुखाचे होणार नाहींत. आठवणींवर मनुष्य सोन्यासारखे दिवस काढतो. सुख-दुःखांच्या आठवणी या सौख्याचें जीवन असतात. आठवणीखेरीज जीवन म्हणजे वेडयांचें जगणें होय.

* * *

**नव्या युगाचें सुरू जाहलें नवें नवें पान**
**चला घालु स्वातंत्र्यदेवीला रक्ताचें स्नान!!**

## (७) तिळभांडेश्वर गल्लींतील मुलें

ओळख नव्हती नाशिकामधें नव्हतें जोडीचें;
नव्हतें कोणी तिथें तयाच्या रुची-प्रवृत्तीचे.
समवृत्तीचा समस्वभावी नसेल जर साथी
एकलेंपणें उदासवाणें दिवस पळें जाती. २२

नाशिकांत विनायकाची कोणाशीं ओळख नव्हती आणि त्याच्या वयाचा स्नेही त्याला मिळाला नव्हता. किंवा त्याच्या रुचि-प्रवृत्ती-सारखी रुचिप्रवृत्ति असणारेही कोणी त्याला लाभले नाहींत. समवृत्तीचा आणि समस्वभावी मित्र जर लाभला नाहीं तर दिवस आणि पळें उदासवाणी जातात.

करीत असतो चंद्र-चंद्रिमा साथ सागराची,
कोकिळ करतो गोड गाउनी साथ वसंताची,
मंद समीरण करीत असतो साथ सुगंधाची,
जीवनामधें साथ लागते कुणास कोणाची. २३

चंद्रचंद्रिमा सागराची साथ करतात, गोड गाऊन कोकिळ वसंताची साथ करतो, मंद वारा सुगंधाची साथ करतो. कोणाला कोणाची तरी साथ असावी लागते.

रुची प्रवृत्ती एक लागते स्नेह जमायाला
स्नेहयासाठीं त्याग लागतो स्नेह टिकायाला.
कुशल पहाया येति मुलांचे दामोदरपंत
दोन दिवस तेवढे तयांचे जाती हर्षांत. २४

स्नेह जमावयाचा तर दोघांचीही रुचि–प्रवृत्ति एक असावी लागते. स्नेह राखावयाचे तर स्नेह्यांसाठी त्याग करावा लागतो. मुलाला हवें नको पाहण्यासाठीं दामोदरपंत येत, तेवढेच दोन दिवस विनायकाचे मजेंत जात.

मराठी ... ग्रा. क्र. ९३४०३

हवे नको पाहूनि परतले वडील त्याचे
उदासवाणें जीवन होई पुन्हां सुरू त्याचें
लेख लिही वाचूनि दाखवी कविता गाऊन
शिक्षक शाळेमधले होती विस्मित ऐकून. २५

विनायकाचें हवे नको पाहून वडील परत गेले म्हणजे त्याचे उदासवाणें जीवन पुन्हां सुरू होई. तो लेख लिही, दुसऱ्यांना वाचून दाखवी. तशाच स्वतःच्या कविताही तो गाऊन दाखवीत असे. तें ऐकून शाळेंतले शिक्षक विस्मयचकित होऊन जात.

वय अवघें चौदाच परंतु ज्ञान किती त्याला;
'हिंदुसंस्कृती' लेख तयाचा छापुनिया आला.
प्रगटपणें लागलीं तयाचीं होऊं व्याख्यानें;
ऐकुनिया शाबास म्हणावें कीं ज्यानें त्यानें. २६

तो चौदा वर्षांचा होता तरी त्याला किती तरी ज्ञान होतें. हिंदूसंस्कृतीवर त्यानें लिहिलेला लेख छापून आला. त्याचीं प्रगट व्याख्यानें होऊं लागलीं. तीं व्याख्यानें ऐकल्यावर जो तो त्याला शासाबकी देई.

हळूहळू विख्यात विनायक झाला गांवांत;
शाळेमधला हिरा लागला चमकू थोरांत.
हुषार विद्यार्थ्याचें स्वागत जन सारे करती;
आवडतो सर्वांस, तयाला ये सगळे म्हणती. २७

नाशिक गावांत हळुहळू त्याचें नांव सर्वतोमुखीं झालें. शाळेमधला हा हिरा म्हणजे शाळेंतील विद्यार्थी थोर लोकांत चमकू लागला. हुषार विद्यार्थ्यांचें स्वागत सारे लोक करतात. तो सर्वांना आवडतो. त्याला सारे हांक मारतात.

**शास्त्रीपंडित हांक मारती बैस जरा म्हणती**
**विनायकाचें प्रेमें कौतुक पुन्हां पुन्हां करती**
**विद्यार्थ्यांसमवेत बोलण्यांतील समाधान**
**अपूर्व असतें; तें घेती जन जे जे विद्वान.** २८

शास्त्री पंडितही हांक मारून त्याला जरा बस म्हणत. आणि पुन्हा पुन्हा विनायकाचें प्रेमानें कौतुक करीत. विद्यार्थ्यांशीं बोलण्यांत अपूर्व समाधान असतें आणि जे विद्वान् लोक असतात ते असें समाधान अपूर्वतेनें घेतात.

**जसा जव्हेरी हिरा पाहुनी जातो मोहून,**
**जसा काय चित्रकार डुलतो निसर्ग पाहून,**
**मधुप फुलें पाहूनि डुले मधु गुंजन करतांना**
**हुषार विद्यार्थ्याचें असतें कौतुक लोकांना.** २९

हिरा पाहून जसा जव्हेऱ्याला मोह पडतो. निसर्ग म्हणजे सृष्टि-शोभा पाहून चित्रकार जसा डुलतो, गोड फुलें पाहून गुंजन करतांना भृंग जसा डोलतो, त्याचप्रमाणें लोकांना हुषार विद्यार्थ्यांचें कौतुक असतें.

**खरे पारखी बरवे करती लोभ तयावरती,**
**वजन वाढलें विनायकाचें द्वाड मुलांवरती.**
**तात्या तात्या करीत येती जमति तयाभवती,**
**हुषार आहे सावरकर हा सर्व मुलें म्हणती.** ३०

गावांतील खरे, पारखी, बर्वे यांच्या सारखे पुढारी त्यांच्यावर लोभ करीत होते. आणि त्यामुळें द्वाड मुलांवर विनायकाचें वजन वाढूं लागलें म्हणजे द्वाड मुलेंही त्याला दबकूं लागलीं. तात्या तात्या करीत तीं त्याच्या भोंवतीं जमत, "सावरकर किती हुषार आहे." असें मुलें म्हणत. (खरे, पारखी आणि बर्वे ही नाशिकांतील पुढाऱ्यांचीं नांवें होतीं. त्याचप्रमाणें हे शब्द विशेषणात्मकही होतात.)

**तिळभांडेश्वर गल्ली म्हणजे रास नाशिकाची**
**उनाड होतीं प्रसिद्ध पोरें येथिल लोकांची.**
**तिळभांडेश्वर बोळामधल्या उनाड पोरांनी**
**अनेक वेळां अनेक लोकां दाखवलें पाणी. ३१**

तिळभांडेश्वराची गल्ली म्हणजे नाशिक शहराची एक रासच होती. या गल्लींत राहणाऱ्या लोकांचीं मुलें उनाड म्हणून प्रसिद्ध असत. या तिळभांडेश्वर बोळांत राहणाऱ्या उनाड मुलांनीं अनेक लोकांना अनेक वेळां आपलें पाणी दाखविलेलें आहे.

**रातराणिच्या मधुर फुलांच्या गंध सुगंधाचा**
**धुंदपणा आगळाच असतो आणि बहारीचा!**
**तसाच गांवामधें एक तरी बोळ कुठें असतो;**
**त्या बोळांतिल तरुणांचा गुण विशेष झळझळतो. ३२**

रातराणीच्या गोड फुलांच्या गंधसुगंधाचा धुंदपणा जसा आगळाच आणि बहारीचा असतो तसाच गांवांत असा एक बोळ कोठेंतरी असतो कीं त्या बोळांतील तरुणांचा गुण विशेषपणें झळकतो.

**कपटरहित बेफिकीर जीवन उनाड पोरांचें,**
**हौशी अन् रंगेल वागणें उनाड युवकांचें,**
**थोडें कामी क्वचित निकामी उनाड पोरांचें**
**गांवाला चैतन्य आणतें उनाड पोरांचें. ३३**

उनाड मुलांचें वागणें निष्कपटी आणि बेफिकीर असतें. त्याचप्रमाणें उनाड तरुणांचें बोलणें चालणें हौशी आणि रंगेल असतें. त्याचप्रमाणें आग्रही आणि क्वचित् निरुपयोगी अशा उनाड मुलांच्या वागण्यानें गांवाला चैतन्य येतें.

**जसे अवश्यक कांटे असती फूल गुलाबाला,**
**तसे अवश्यक उनाड मुलगे असती गांवाला.**
**जसे नदीच्या जलप्रवाहीं भवरे असतात**
**लोकजीवनीं उनाड मुलगे तसेच असतात. ३४**

गुलाबाच्या फुलाला जसे कांटे आवश्यक असतात, तसेंच गांवाला उनाड मुलांची आवश्यकता असते. नदीच्या प्रवाहांत जसे भोवरे असतात तसे समाजजीवनांत उनाड मुलांचें स्थान आहे.

**जशी गरज गांवास लागते योग्य पुढाऱ्यांची**
**तशीच असते आवश्यकता उनाड पोरांची.**
**शिरीं जसा शिरपेंच, युवतिच्या कर्णफुलें कानीं**
**समाज जीवन तसें शोभतें उनाड तरुणांनीं. ३५**

योग्य पुढाऱ्यांची गांवाला जशी आवश्यकता असते, अशीच उनाड मुलांचीही आवश्यकता असते. शिरीं जसा शिरपेंच शोभतो. तरुणीच्या कानांत जशीं कर्णफुलें शोभून दिसतात, तसें उनाड तरुणा-मुळें समाज जीवन शोभून दिसतें.

**उनाड मुलगे म्हणजे उत्साहाचा अतिरेक**
**क्वचित प्रसंगीं शोभुनि दिसतो त्यांचा अविवेक !**
**विचार करूनी वागायाचा सद्‌गुण थोरांचा**
**यांस उतारा क्वचित लागतो अशा उनाडांचा. ३६**

उनाड मुलगे म्हणजे उत्साहाचा अतिरेक असतो. त्यांचा अविवेक क्वचित् प्रसंगीं शोभून दिसतो. विचार करून वागावयाचा थोरांचा सद्‌गुण असतो. (पण कधीं कधीं त्याचा अतिरेक होऊ नये म्हणून) क्वचित प्रसंगीं त्यांच्या या सद्‌गुणावर अशा उनाड मुलांचा उतारा लागतो.

दीनजनांचे सहाय्यकर्ते रक्षक दुबळ्यांचे;
थोर जनांचे आज्ञाधारक शत्रू दुष्टांचे.
चोर भामटे ज्यास पाहतां थरथर भीतात
अशीं असावीं उनाड पोरें गांवोगांवांत. ३७

गरीब लोकांना मदत करणारे, दुबळयांना संरक्षण देणारे, मोठ्या लोकांची आज्ञा पाळणारे, दुष्ट लोकांचे शत्रु, चोर आणि भामटे लोक ज्यांना पाहून थरथर कापतात असे गांवोगांवांत उनाड मुलगे असावेत.

जसें कपाळीं शोभुनि दिसतें गंध केशराचें
उनाडपण शोभतें शहाण्या सुशील युवकांचें.
गंध केशरी जसा त्यामधें टिळा कस्तुरीचा
देशभक्तिचा छंद शोभतो उनाड पोरांचा. ३८

जसें कपाळावर केशराचें गंध शोभून दिसतें तसें शहाण्या आणि सुशील तरुणांना उनाडपण शोभून दिसतें. केशरी गंध लावल्यावर त्यांवर कस्तुरीचा टिळा जसा शोभून दिसतो तसा उनाड पोरांचा देशभक्तीचा छंद शोभून दिसतो.

तिळभांडेश्वर गल्लीमधल्या अशा उनाडांचा
एक राव गोविंद दरेकर हा होता राजा.
राजा होता परंतु होता पायानें पंगू
बुद्धीनें पण चलाख; समजुनि घेई जें सांगू. ३९

तिळभांडेश्वर गल्लींतील अशा उनाड मुलांचा एक राव गोविंद दरेकर हा राजा होता. राजा होता खरा पण तो पायांनीं पंगू होता. त्याचबरोबर तो बुद्धिमान् होता. सांगावें तें तो समजावून घेई.

विनायकानें त्यास शिकविलें काव्याचे छंद;
प्रसिद्ध झाला मराठदेशीं शाहिर गोविंद !
लोखंडाचें सुवर्ण व्हावें परिसस्पर्शानें
तसें तयाचें जीवन झालें अमर सुभाग्यानें. ४०

त्याला विनायकानें काव्याचे छंद शिकविले. पुढें महाराष्ट्रांत तो गोविंद शाहीर म्हणून प्रसिद्ध झाला. स्पर्श होतांच लोखंडाचें सोनें व्हावें त्याप्रमाणें सुभाग्येंकरून त्याचें जीवन अमर झालें.

स्वातंत्र्याचें वेड लावलें ज्याच्या गीतांनीं,
धडधडलीं आसनें नृपांची जीं ऐकुनि गाणीं.
आणि लावला प्रतिशोधाचा तरुणांना छंद
जय हो जय हो! नांव तयाचें शाहिर गोविंद. ४१

ज्याच्या गीतांनीं लोकांना स्वातंत्र्याचें वेड लावलें, जीं गाणीं ऐकून नृपांचीं आसनें धडधडलीं आणि ज्याच्या गीतांनीं तरुणांना सूड घेण्याचें वेड लागलें त्याचा जयजयकार असो. त्याचें नांव गोविंद शाहीर

लाभ जाहला जर थोरांच्या शुभ सहवासाचा
बुद्धिमान माणूस उजळवी रंग जीवनाचा.
ज्या दगडाला घेइ आपुल्या जवळ कलावंत
त्या दगडाची सुरेख होते मूर्ति मूर्तिमंत. ४२

थोरांच्या शुभसहवासाचा जर लाभ झाला तर बुद्धिमान् माणूस आपल्या जीवनाचा रंग उजळून टाकतो. कलावंत ज्या दगडाला आपल्या जवळ घेतो त्या दगडाची मूर्तिमंत सुरेख मूर्ति होते. ४२

**सहवासानें सौंदर्याचा लाभ जीवनास**
**होतो ज्याच्यामुळें म्हणावें कलानिधी त्यास.**
**गोविंदाचें जिणें पांगळें अन् बापुडवाणें**
**धन्य जाहलें विनायकाच्या गोड संगतीनें. ४३**

ज्याच्या सहवासामुळें जीवनास सौंदर्याचा लाभ होतो त्याला कलानिधि म्हणतात. गोविंदाचें पांगळें आणि बापुडवाणें जिणें विनायकाच्या गोड संगतीमुळें धन्य झालें !

**तिळभांडेश्वर गल्लीमधला एक एक वीर**
**होउं लागला विनायकाचा खासा सरदार.**
**वाढु लागली विनायकाची कीर्ति नाशिकांत**
**करूं लागला बाळ विनायक नवे नवे बेत. ४४**

तिळभांडेश्वर गल्लींतील असा एक एक वीर विनायकाचा खास सरदार होऊं लागला. नाशिक गांवांत विनायकाची कीर्ति वाढूं लागली. विनायक एक एक बेत करूं लागला.

* * *

**नव्या युगाचें सुरूं जाहलें नवें नवें पान;**
**चला घालुं स्वातंत्र्यदेविला रक्ताचें स्नान.**

* * *

## (८) भगूर गांवानें केलेलें स्वागत

**ओढ असावी व्यापाऱ्याला परत फिरायाची,**
**ओढ जशी नोकरांस असते घरिं परतायाची,**
**मुलीस असते माहेराची गोड जशी ओढ**
**तशी मुलांच्या मनास असते गांवाची ओढ. ४५**

व्यापाऱ्याला परत फिरायची जशी ओढ असावी, नोकराला परत फिरण्याची जशी ओढ असावी किंवा मुलीला माहेराची जशी ओड असावी तशी मुलांना आपल्या गांवाची ओढ असते.

**पुन्हां परत जाईन कधी मी भगूर गांवास**
**वाटत होतें विनायकाला आज किती दिवस.**
**तोंच जाहला सुरूं विलक्षण गांठीचा रोग;**
**उभा राहिला नाशिक गांवापुढें नवा भोग!** ४६

भगूर गांवाला पुन्हां परत केव्हां जाईन असें विनायकाला आज कितीतरी दिवस वाटत होतें. तोंच गांठीचा नवा रोग फैलावून नाशिक गांवापुढें एक नवाच भोग उभा राहिला.

**स्फोटध्वनि ऐकतांच जाती पक्षि जसे उडुनि**
**गांवांतिल जन घरें भराभर गेले सोडोनी.**
**शिक्षण झालें स्थगित लागलें कुलूप शाळेला;**
**बाळ विनायक पुन्हा परतला भगूर गांवाला.** ४७

स्फोटाचा आवाज ऐकून जसे पक्षी उडून जातात तसें (रोगाचा प्रादुर्भाव होतांच) लोक भराभर आपलीं घरें सोडून गेले, शाळा बंद झाल्या आणि शिक्षण स्थगित झालें. बाळ विनायक भगूर गांवाला परतला.

**भगुर गांवचे शिवार लांबुनि त्यास जसें दिसलें**
**उन्हांतुनि सावलींत यावें असें तया झालें.**
**पाउस नसता मान टाकते शेतांतिल शेती**
**विनायकाविण उदास होती भगूरची वस्ती.** ४८

भगूर गांवचे शिवार त्याला जेव्हां लांबूनच दिसलें तेव्हां उन्हांतून सावलींत यावें तसें त्याला झालें. पाऊस नसला म्हणजे शेतांमधली शेती जशी निर्बळ होते (जशीं रोपें वाकतात) त्याप्रमाणें भगूर गांवचे लोक उदास होते.

**आला तात्या नाशिकाहुनी कळलें गांवाला;**
**लहान मोठीं झालिं माणसें सभोवती गोळा.**
**जशीं वासरें धांवत धांवत जाति दुधासाठीं**
**धांवत आले सखे सोबती विनायकासाठीं. ४९**

नाशिकाहून तात्या परत आला असें कळलें मात्र, लहानमोठीं माणसें त्याच्या भोंवतीं गोळा झालीं. जशीं वासरें दुधासाठीं धांवत सुटतात, तशीं विनायकाची मित्रमंडळी धांवत आली.

**या फांदीवर त्या फांदीवर बसून डौलांत**
**करूं लागले स्वागत पक्षी चिवचिव शब्दांत.**
**सळसळ सळलीं कवळीं ढवळीं वृक्षांचीं पानें,**
**भरूनि गेला गांव सुखाच्या हास्य सुगंधानें. ५०**

एकदां या फांदीवर तर दुसऱ्याच क्षणीं दुसऱ्या फांदीवर डौलात बसून चिव चिव शब्द करीत पक्षी विनायकाचें स्वागत करूं लागले. वृक्षांची कवळी ढवळीं पानें सळसळलीं. समाधानाच्या हास्य सुगंधानें सारा गांव भरून गेला.

**सुना धांवल्या बघावयाला येसूचा दीर,**
**वृद्ध बायका बघुनी गेल्या राधेचा प्यार.**
**कोणि म्हणाले विनायकाला घरीं येउनी जाई**
**आणि आणलें त्यास द्यावया कुणी कुणी कांहीं. ५१**

सून बाईचा (यशोदाबाईचा) दीर बघण्यासाठीं सुना धांवल्या, वृद्ध बायका राधाबाईच्या मुलाला एकदां पाहून गेल्या. आमच्या घरीं येऊन जा असें विनायकाला कोणी म्हणालें, तर कोणी कोणी त्याला देण्यासाठीं कांहीं घेऊन आले. ५१

**मुलगा आला असें वाटलें वृद्ध माणसांना;**
**भाऊ आला असें वाटलें भावाबहिणींना;**
**आणि वाटलें आला ईश्वर अपुला धांवून**
**विनायकाचे मित्र भाबडे गेले हर्षून. ५२**

गांवातल्या वृद्ध माणसांना जणूं काय आपला मुलगा आला असें वाटलें. भावावहिणींना आपला भाऊ आला असें वाटलें. आणि आपला ईश्वरच धांवून आला आहे असें वाटून विनायकाचे भाबडे मित्र अगदीं खुशींत होते.

**भाकर करते आणि वाढते चटणी लसणीची**
**खाउनि जा रे बाळ म्हणाली आई वाण्याची.**
**धनी धाकटे आले बघुनी गडी घरांमधले**
**त्वरित लागले काम कराया आनंदित झाले. ५३**

वाण्याची आई तर असें म्हणाली कीं, भाकर आणि लसणीची चटणी केली आहे ती खाऊन जा. घरांमधल्या नोकराचाकरांना धाकटे धनी आलेले पाहून कोण आनंद झाला ! उत्साहानें ते आपलीं कामें करूं लागले.

**धनी धाकटे आले बघुनि गोठा हुंबरला**
**आणि तांबुच्या गोड दुधाला गोडपणा चढला.**
**चुकलें पाडस आलें धांवत बघूनि मातेस**
**मोद वाटतो तसें जाहलें सून यशोदेस. ५४**

धाकट्या धन्याला म्हणजे विनायकाला पाहून गोठ्यांतील जनावरें हुंबरलीं. तांबू गाईचें दूध त्या दिवशीं किती तरी गोड वाटलें. चुकलेलें पाडस धांवत परत यावें म्हणचे आईला जसा आनंद वाटतो तसें सून यशोदेला झालें.

**यावा संपादुनी जयश्री वीर लढाईंत**
**तसें जाहलें विनायकाचें स्वागत गांवांत.**
**पाहुनि कौतुक विनायकाचें दामोदरपंत**
**'ती असती जर' मनांत म्हणती अन् पुसती नेत्र. ५५**

लढाईंत विजयी होऊन वीर परत गांवीं आला म्हणजे जसें त्याचें स्वागत होतें तसें गांवानें विनायकाचें स्वागत केलें. होणारें सारें कौतुक पाहून हें पहावयाला 'ती' असती तर असें दामोदरपंतांना वाटलें आणि त्यांनीं आपले डोळे पुसले.

**कौतुक करती लोक ज्यांस तें बघावया मिळतें**
**तेंच मुलांचें सौख्य खरोखर वडिलांना असतें.**
**भगुर गांवचें प्रेम केवढें विनायकावरती**
**जणूं अयोध्यानगर भाळलें श्रीरामावरती! ५६**

लोक कौतुक करतात तें ज्याला बघावयास मिळतें तेच खरोखर मुलांचे वडिलांना सुख असतें. विनायकावर भगूर गांवचें केवढें प्रेम ! जणूं अयोध्या नगर श्रीरामावर भाळलें होतें.

**शाळा आहे कशी नि शिक्षक कोण कसे असती,**
**कशीं भाषणें करतो लिहितो लेख कसे स्फुरती,**
**छापुनि येती लेख नि कविता ज्या प्रामुख्यानें**
**किती वाचूनि ग्रंथ जाहले सांगितले त्यानें. ५७**

शाळा कशी आहे, आणि शिक्षक कोण आहेत कसे आहेत, आपण व्याख्यानें कशीं देतों, लेख कसे लिहितों आणि लेखनाची स्फूर्ति कशी होते, कोणते लेख प्रसिद्ध झाले, कोणत्या कविता प्रामुख्यानें छापून आल्या, किती ग्रंथ वांचून झाले हें सर्व त्यानें आपल्या मित्रांना सांगितलें.

**बराच तूं जाहलास तात्या धीट अम्हांहून**
**नाहिं कसें निर्यवन जाहलें हें हिंदुस्थान;**
**अजूनि नाहीं इंग्रज गेला सांग कसा निघुनी**
**मित्रमंडळी जमली असतां विचारलें कोणी ! ५८**

तात्या, तूं आमच्यापेक्षां बराच धीट आहेस रे. पण हें हिंदुस्थान अजून कसें निर्यवन झालें नाहीं ? आणि इंग्रज अजून येथून कसा चालता झाला नाहीं असें मित्रमंडळींत एकानें विचारलें.

**नित्य जयाचा ध्यास चौकशी जर त्याची केली**
**बरें वाटतें प्रफुल्ल होतें मन त्या त्या वेळीं.**
**प्रश्न ऐकुनी कंठ दाटला अन् डोळे भरले.**
**जवळ घेउनी विनायकानें त्यांस हळू म्हटलें. ५९**

ज्याला ज्या गोष्टीचा नित्य ध्यास असतो त्यावद्दल विचारपूस केली असतां त्याच्या मनाला बरें वाटतें. हा मित्राचा प्रश्न ऐकून विनायकाचे डोळे ओलावले, त्याचा कंठ भरून आला, मित्राला जवळ घेऊन तो हळूच म्हणाला.

**वर्ष जाहलें एक गडचारे मजला जाऊनी**
**तुझ्यासारखा मित्र मिळाला नाहिं मला कोणी.**
**स्वतंत्र करुनी देश नि तो निर्यवन करायास**
**लढावया लागतील युद्धें हिंदुस्थानास. ६०**

गडचारे, मला जाऊन वर्षच झालें. शिवाय तुझ्यासारखा मित्र मला तिथें कोणी मिळाला नाहीं. देश स्वतंत्र करावयाचा आणि तो निर्यवन करावयाचा तर हिंदुस्थानला युद्धें करावीं लागतील!

**नव्या युगाचें सुरू जाहलें नवें नवें पान**
**चला घालु स्वातंत्र्यदेविला रक्ताचें स्नान.**

* * *

## (९) पुणें शहरांत लष्कर

**एका मागुनि एक चालले दिवस खेळण्यांत;**
**रंग दिसेना थांबायाचा रोग नाशिकांत.**
**भडकुनि वणवा ज्वाला जैशा पुढें पुढे जाती**
**प्लेग पोंचला पुण्यास त्यानें केली तिथें वसती. ६१**

भगूर गावीं खेळण्यांत एकामागून एक दिवस चालले होते. नाशिक शहरांतला प्लेग थांबण्याचा कांहीं रंग दिसेना ! ज्वाला भडकून वणवा जसा पुढें पुढें पसरतो तसा प्लेग पुण्यापर्यंत पोहोंचला. आणि तो तिथें मात्र बराच वेळ राहिला.

**येउ लागल्या कानावरती नव्या नव्या वार्ता.**
**वाढुं लागल्या गांवोगावीं जनतेच्या चिंता.**
**टपाल यावें ज्याच्याकडुनी आज खुशालीचें**
**उद्यां कळावें वृत्त तयाच्या अवचित मृत्यूचें. ६२**

नवीन नवीन बातम्या कानांवर येऊं लागल्या. गांवोगावीं लोकांची चिंता वाढूं लागली. ज्यांच्याकडून आज खुशालीचें पत्र यावें त्याच्या मृत्यूची बातमी दुसऱ्या दिवशीं कानावर येई.

**खेळत होतें मरण पुण्याच्या घरांघरांतून**
**निवडित होते दूत यमाचे कुणास त्यांतून.**
**जसें एकदा पूर्वीं लुटलें पुणें निजामानें**
**लुटीत होता पुणें शहर यम त्याच दिमाखानें. ६३**

पुणें शहरांत घराघरांतून मरण खेळत होतें. त्यांतून यमाचे दूत कोणाची तरी निवड करीत. पूर्वीं एकदा निजामानें जसें पुणें शहर लुटलें त्याच दिमाखांत यम पुणें शहर लुटीत होता.

**एकावरती एक ठेवुनी ओंढे रचतात**
**प्रेतावरतीं प्रेतें रचुनी होते जाळीत.**
**त्या प्रेतांच्या दुर्गंधीनें गांवोगांवांची**
**सुन्न झालिं मस्तकें न चाले बुद्धी कोणाची. ६४**

लाकडाचे ओंडके जसे एकमेकांवर रचतात त्याप्रमाणें प्रेतावर प्रेतें ठेवून तीं जाळींत. अशा प्रेतांच्या दुर्गंधीनें गांवोगावच्या लोकांचीं मस्तकें सुन्न होऊन गेलीं होतीं. कोणाची कांहीं अक्कल चालेना.

**एक पुसे दुसऱ्यास काय हो वृत्त पुण्याकडचें.**
**उभ्या महाराष्ट्रास लागलें ग्रहण काळजीचें.**
**वाटत होतें सुशिक्षितांचें भय सरकाराला**
**वाटत होता द्वेष तयांचा नोकरशाहीला. ६५**

पुण्याकडचें वृत्त काय आहे असें एक दुसऱ्याला विचारी ! उभ्या महाराष्ट्राला काळजीचें ग्रहण लागलें होतें. सरकारला सुशिक्षित लोकांचें भय वाटे. नोकरशाहीला त्यांचा द्वेष वाटे.

**अशिक्षितांना आणि बुद्धिच्या द्वाड नि दुष्टांना**
**वाटत असतीं सुशिक्षितांचीं मनीं भयें नाना.**
**चोराला भय जसें वाटतें स्वच्छ चांदण्याचें**
**सरकाराला वाटत असतें भय विद्वानांचें. ६६**

अशिक्षितांना आणि हुशार पण दुष्ट आणि द्वाड लोकांना मनांतून सुशिक्षितांचीं भयें वाटत असतात. स्वच्छ चांदण्याचें भय जसें चोराला असतें त्याचप्रमाणें विद्वानांचें भय सरकारला असतें.

मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ...................... वि: .....
क्रमांक ...................... नों. दि.


बरी वेळ ही दाखवावया सत्तेचा जोर
नगर पुण्याचे लोक माजले झाले शिरजोर;
लोकसभा मागतात वेडे हिंदुस्थानास
दाखवला पाहिजे खरोखर हात जरा त्यांस. ६७

आपल्या सत्तेचें सामर्थ्य दाखविण्यास हीच वेळ बरी आहे. पुणें शहरांतले लोक माजले आहेत, शिरजोर झाले आहेत. वेड्यासारखे हे लोक हिंदुस्थानला लोकसभा मागत आहेत. खरोखर त्यांना हात दाखविलाच पाहिजे.

प्लेग निवारण काम काढुनी बळेंच सरकारी
सरकारानें खास नेमला गोरा अधिकारी.
सरकाराचें धोरण पाहुनि काम करायाचें
धोरण असतें सरकाराच्या खास चाकराचें. ६८

म्हणून प्लेगप्रतिबंधक उपाययोजनेचें कारण पुढें करून सरकारनें एका खास गोऱ्या अधिकाऱ्याची नेमणूक केली. सरकारचें धोरण पाहून काम करायचें असें सरकारी नोकरांचें विशेष धोरण असतें.

होता मिस्टर रँड जरासा क्रूर स्वभावाचा;
गर्वहि होता त्यास आपुल्या प्रिय साम्राज्याचा.
साधारणता सरकारांतिल वरिष्ठ अधिकारी,
जननेत्यांची त्यास वाटते भयभीती भारी. ६९

रँड साहेब स्वभावानें जरासा क्रूर होता. आपल्या प्रिय साम्राज्याचा त्याला गर्वही वाटत असे. साधारणपणें सरकारच्या वरिष्ठ नोकरांना पुढाऱ्यांची भीति फार वाटत असतें.

**भलतिच होती रीत तयाची काम करायाची;**
**आणुनि त्यानें फलटण केली उभी हजारांची.**
**गोरे सैनिक पाहुनि जनता भिऊन जाईल**
**आणि वाटलें तयास अपुल्या आज्ञा मानील.** ७०

रँड साहेबांची काम करण्याची तऱ्हा कांहीं भलतीच होती. त्यानें पुणें शहरांत एक हजार गोऱ्यांची फलटण आणून ठेवली. गोरे सैनिक पाहून लोक भिऊन जातील आणि आपल्या आज्ञा लोक ऐकतील असें त्याला वाटलें.

**शहर पुण्यांतील लोक एवढे हुषार वस्ताद**
**अशा मूर्ख माकडांस देतिल काय कधी दाद.**
**स्वराज्य गेलें ; गेली नव्हती शहरांतिल बुद्धी !**
**पुणेंशहरची प्रसिद्ध आहे बुद्धि नि सद्बुद्धी.** ७१

पुणें शहरांतील लोक एवढे हुशार आणि वस्ताद, कीं ते या मूर्ख माकडाला दाद का देणार आहेत ! स्वराज्य गेलें, पण शहराची बुद्धि गेली नव्हती. पुणें शहराची बुद्धि आणि सद्विचार प्रसिद्ध आहेत.

**गोड बोलुनी करावयाचें काम करायाला**
**सैन्यामधलीं गोरीं पोरें हवींत काशाला!**
**तोडा जरि पदभूषण असला आणि वैभवाचा**
**काय कुणी तो तयार करतो मणभर सोन्याचा! ७२**

गोड बोलून जें काम करायचें त्याच्यासाठीं गोरे सैनिक हवे होते कशाला ! ! पायांतील सोन्याचा तोडा भूषणभूत आणि वैभवाचा द्योतक असला तरी तो काय कोणी मणभर वजनाचा करतात ?

**तलवारीनें फुलें कुणी कां कधीं तोडतात !**
**शिवावया का धोतर कोणी दाभण घेतात !**
**नेत्रांमधल्या कुसळासाठीं मुसळ अणायाचें**
**मूर्खाविण अन् उन्मत्ताविण नाहिं सुचायाचें. ७३**

तलवारीनें कोणी कधीं फुलें तोडतात काय? धोतर शिवावयास कोणी दाभण घेतात काय? डोळयांतलें कुसळ काढण्यासाठीं मुसळ आणण्याचें मूर्ख आणि उन्मत्तांखेरीज कोणास सुचावयाचें नाहीं.

**लष्कर आणुनि प्लेग निवारण कैसें होणार**
**तोफा डागुनि शहरसफाई कसची होणार !**
**लष्करांतलीं गोरीं घोरें आणुनि शहरांत**
**सरकारानें क्षोभ उठवला उगाच लोकांत ! ७४**

लष्कर उभें करून प्लेग कसा हटणार किंवा शहराची सफाई तोफा डागून कशी होणार? शहरांत गोरे सैनिक उभे करून लोकांत सरकारनें उगाच क्षोभ माजवला ! !

*    *    *

**सुरू जाहलें नव्या युगाचें नवें नवें पान**
**चला घालु स्वातंत्र्यदेविला रक्ताचें स्नान.**

## (१०) रँड साहेबाचा जुलूम

**मेघगर्जनेमधें चमकुनी वीज कडाडावी,**
**गांवावरती जशीं विमानें घरघरुनी जावीं,**
**आणि भीतिनें जसे दचकती जन गांवांमधले**
**वृत्त ऐकुनि भगूरचे जन घाबरुनी गेले. ७५**

मेघगर्जनेच्या गडगडाटांत जशी वीज कडाडावी, गांवावरून जशीं विमानें घरघरून जावीं, आणि त्यामुळें गांवामधले लोक जसे दचकतात त्याचप्रमाणें (पुण्याचें) वृत्त ऐकून भगूर गांवचे लोक घाबरून गेले.

**वाचित होता बाळ विनायक केसरिचे अंक,**
**ऐकुनि झाले विस्मित सारे भगूरचे लोक!**
**मिस्टर होता मूर्ख नि होते वरिष्ठ उन्मत्त;**
**या लोकांच्या युतींत पडले लोकांना कष्ट. ७६**

बाळ विनायक केसरीचे अंक वाचीत होता. तें ऐकून भगूरचे सारे लोक आश्चर्यचकित झाले. मिस्टर रँड मूर्ख होता आणि त्याचे वरिष्ठ उन्मत्त होते. या दोघांच्या युतींत लोकांचे मात्र हाल झाले.

**वृत्त वाचलें विनायकानें अन् झाला खिन्न**
**तसाच ठेवुनि खालि केसरी तो गेला निघुन**
**दुर्गादेवीपुढें विनायक बसला जाऊनी**
**कळे न कसला विचार मुलगा करि डोळे मिटुनी! ७७**

पुण्याचें वृत्त वाचून विनायक अगदीं खिन्न झाला. केसरी तसाच खालीं ठेवून तो निघून गेला आणि दुर्गादेवीपुढें जाऊन बसला. देवीपुढें डोळे मिटून तो कसला विचार करीत होता कुणाला ठाऊक !!

**अडलें पडलें मूल बिचारें आइकडे जातें**
**कोण बोललें काय जाह्लें आईला कथितें.**
**तसेंच येई मनांत जें अन् जें वाटे त्यास**
**जाउनि सांगत असे विनायक दुर्गादेवीस. ७८**

बिचारें लहान मूल अडलें पडलें कीं आईकडे जातें आणि कोण काय म्हणालें तें आईला सांगतें. त्याचप्रमाणें जें जें मनांत येई, जें जें त्याला सुचें तें तें सर्व विनायक दुर्गादेवीला सांगत असे.

**घरांत रोगी असेल त्याला ठेउ नये कोणी;**
**प्लेग लागता शुश्रूषागृहीं द्यावा धाडोनी.**
**साहेबाची आज्ञा फिरली पेठेपेठेंत;**
**विस्मित झाले लोक उडाली खळबळ शहरांत! ७९**

कोणी प्लेगाचा रोगी असेल तर त्याला घरांत ठेवूं नये. प्लेगाचा प्रादुर्भाव झाल्याबरोबर रोग्याला शुश्रूषागृहांत पोचवावें अशी साहेबाची आज्ञा पुण्याच्या पेठेपेठेंत प्रकट करण्यांत आली. ती ऐकून लोक विस्मित झाले. शहरांत खळबळ उडाली.

**प्लेग लागला रोगी जगणें कठीण असतांना,**
**कोण आपुला माणुस धाडिल तिथें रहायाला ?**
**जाणुनि घेइल कोण विषाचा प्याला पोटांत ?**
**जाणुनि टाकिल कोण आपुलें पाउल अग्नींत? ८०**

ज्याला प्लेग लागला असा रोगी जगणें कठीण असतांना आपला माणूस शुश्रूषागृहांत कोण नेऊन ठेवील ? जाणूनबुजून विषाचा प्याला कोण घेईल ? जाणूनबुजून आपलें पाऊल अग्नींत कोण टाकील ?

**पडूनि होतीं शुश्रूषागृहें सरसाहेबांचीं**
**आणि त्यामुळें मर्जि बिघडली नोकरशाहीची.**
**तसाच कपटी स्वभाव, त्रासिक, त्यांत महाखुनशी**
**गेला मिस्टर रँड खवळुनि बोले अपणाशीं. ८१**

त्यामुळें सरसाहेबांचीं शुश्रूषागृहें मोकळीं पडून होतीं. हें पाहून नोकरशाहीची मर्जी बिघडली. त्याचप्रमाणें कपटी, त्रासिक स्वभावाचा त्यांतून महाखुनशी असा मिस्टर रँड खवळून गेला आणि स्वतःशींच तो म्हणाला.

चावट लोक पुण्यांतिल त्यांचे मी पाहुनि घेतों,
प्लेग होइना कमी कसा हें आतां मी बघतों.
त्यास वाटलें लोक आपुले गुलाम आहेत;
मारुनि झोडुनि ठेवूं त्यांना अपुल्या आज्ञेंत! ८२

"पुण्यांतले लोक चावट आहेत. त्यांचें मी पाहून घेइन. पुण्यांतला प्लेग कसा कमी होत नाही हें मी आतां बघतों." पुण्यांतले लोक आपले गुलाम आहेत त्यांना मारून झोडून आपल्या आज्ञेंत ठेवूं असें त्याला वाटलें.

आणि सोडली आज्ञा त्यानें शिरा घरांतूनी
ओढुनि काढा रोगी, काढा सर्व घरें धुउनी.
आंच लागतां उतास जातें पय पात्रांतून
राग भडकल्यावरती जातो विवेक सोडून. ८३

घरांतून शिरा, रोगी असेल त्याला ओढून बाहेर काढा, आणि सर्व घरें धुऊन टाका अशी त्यानें आज्ञा सोडली. विस्तवाची आंच लागून भांड्यांतलें दूध उतास जातें. राग भडकला कीं विवेक सुटतो.

विवेक सुटतां येउ लागते शक्तीला घाण
आणि घालि थैमान त्यामुळें उगाच अज्ञान.
आधिच मर्कट त्यांत पाजली जर दारू कोणी!
काय माकडें करतिल सांगायास नको कोणी. ८४

विवेक सुटला म्हणजे सामर्थ्याला घाण येऊं लागते. आणि अज्ञानाचें उगाच थैमान सुरू होतें. आधीच माकडें, त्यांत त्यांना कोणी दारू पाजली तर माकडें काय करतील हें कोणास सांगावयास नको.

**पिसाळलेलें श्वान धावतें जसें डसायाला**
**शिरूं लागले घरांत सैनिक तसे लुटायाला!**
**तयास नव्हती कांहि कल्पना हिंदु रहाणीची.**
**हिंदूंच्या विनयशील अन् धार्मिक चालींची!!** ८५

पिसाळलेला कुत्रा (ज्याला त्याला) डसावयास धावतो तसे लुटण्यासाठीं सैनिक घरांतून शिरूं लागले. हिंदूंच्या रहाणीची आणि त्यांच्या विनयशील आणि धार्मिक चालींची त्यांना कांहींच कल्पना नव्हती.

**उठूं लागल्या अनेक वार्ता शहर पुण्यांतूनी**
**अनाचार गांवांत मांडला सोजिर लोकांनीं.**
**घरांत शिरती आणि बोलती उद्धट भाषेंत;**
**वेडिवाकडीं तोंडें करती हंसती चेष्टेंत.** ८६

सोजिरांनी गांवांत अनाचार मांडला आहे अशा पुणें शहरांत अफवा उठूं लागल्या. गोरे सैनिक घरांत शिरतात, उद्धट भाषा वापरतात, वेडीं वाकडीं तोंडें करतात. चेष्टेनें हसतात.

**चला दाखवा रोगी, आम्ही घेउनि जाणार;**
**दरडावुनि बोलती भामटे गोरे सोजीर.**
**हंसण्यावरुनी कळूनि येते चाल मनुष्याची**
**भाषेवरुनी कळूनि येते रीत रहायाची.** ८७

चला रोगी दाखवा, आम्ही त्याला घेऊन जाणार असे भामटे गोरे सोजीर दरडावून बोलत. हसण्यावरून मनुष्याचा हेतु लक्षांत येतो आणि भाषेवरून वागण्याची रीत कळून येते…

**मुलें लागतीं रडूं; बायका जाती घाबरुनी.**
**दीन वाणिनें हळूं बोलती दारा आडूनी—**
**पुरुष आमुचे घरांत नाहित; येऊं द्या त्यांना.**
**परंतु नव्हता धीर तेवढा द्वाड शिपायांना.** ८८

मुलें रडूं लागत आणि बायका घाबरून जात. आणि आड उभे राहून दीनवाणीनें म्हणत, आमचे पुरुष घरांत नाहीत, त्यांना येऊ द्या. परंतु त्या द्वाड शिपायांना तेवढाही धीर नव्हता.

**'ए बाई हो दूर म्हणाले, अन् आई पुढुनी**
**घेती ओढुनि मूल बापुडें अन् जाती निघुनी !**
**दया करा साहेब एवढी नेउं नका बाळ.**
**होइल आतां बरा; लागली झोप जरा काल.** ८९

"ए बाई, बाजूला दूर हो" असें ते म्हणाले. आणि आईच्या पुढचें बापुडें मूल घेऊन ते निघून गेले. "साहेब, एवढी दया करा, मुलाला घेऊन जाऊं नका, आतां तो बरा होईल; काल त्याला थोडी झोपही लागली होती.

**इतकें बोलुनि खालीं पडली फोडुनि किंकाळी**
**वाऱ्यानें कोसळूनि पडते, केळ जशी खाली.**
**किती वेळ ती तशीच होती पडून खोलींत**
**अशा प्रसंगीं कोण पाहतो डोकावुनि आंत !** ९०

इतकें बोलून तिनें किंकाळी फोडली आणि वाऱ्यानें जशी केळ कोसळून पडते तशी ती खाली पडली. खोलींत ती तशीच किती वेळ पडून होती. अशा प्रसंगीं आंत डोकावून कोण पाहतो ! !

**तीस दिसांची बाळंतिण ही राहूं द्या येथें;**
**औषधपाणी करीन, देइन तिला हवें तें तें.**
**हात धरोनी तिचा जरासें तिच्याकडे बघुनी**
**सांगितलें कळवळून त्यानें पुन्हां पुन्हां नमुनी. ९१**

हिला प्रसूत होऊन एक महिना झाला आहे. तिला मी औषधपाणी करीन. तिला हवें तें देईन. असें तिचा हात आपल्या हातीं घेऊन आणि जरासें तिच्याकडे बघत त्यानें हात जोडून पुन्हां पुन्हां सांगितलें.

**परी गाय गोठ्यांतुनि न्यावी बळेंच ओढून**
**लष्करांतलीं पोरें गेलीं तिजला घेऊन.**
**तेव्हांपासुनि भर बाराला अवसेच्या रात्रीं**
**कधीं कधीं तो अजून दिसतो शनिपारावरतीं ! ९२**

परंतु गोठ्यांत बांधलेली गाय बळेंच ओढून न्यावी त्याप्रमाणें लष्करांतल्या पोरांनीं तिला ओढून नेलें. तेव्हांपासून तो अमावास्येच्या रात्रीं बारा वाजतां शनीच्या पारावर कधी कधी अजून दिसतो.

**पाया पडते पदर पसरते नेउ नका यांना,**
**थांबा, घेते बोलावुनि मी माझ्या वडिलांना;**
**माझ्यावांचुनि कुणी न यांना हे तर हळुवार**
**जर नाहीं मी दिसलें नाहित औषध घेणार. ९३**

"पाया पडतें, पदर पसरतें, यांना नेऊ नका. थांबा जरा. मी माझ्या वडिलांना बोलावून घेऊन येतें. माझ्यावाचून यांना कोणी नाहीं. हे तर हळुवार आहेत. जर मी दिसलें नाहीं तर हे औषधसुद्धां घेणार नाहींत.

**आणि इथें ते दिसले नाहित, मी कोठें पाहूं !**
**त्यांच्यावाचुनि अशी एकटी कशी कुठें राहूं !**
**हलकट हंसले तिलाच, उलटें तिलाच ढकलून**
**तिच्या जिवाचा कलिजा गेले तसाच घेऊन. ९४**

आणि ते इथं दिसले नाहींत तर मी त्यांना कोठें पहाणार. त्यांच्यावाचून अशी एकटी मी कोठें राहूं?" लष्करांतले सैनिक तिलाच हसले आणि उलट तिलाच ढकलून तिच्या जिवाचा कलिजा ते तसाच घेऊन गेले.

**आणि नवा संसार आपुला तसाच टाकूनी**
**मुळामुठेला ठाऊक गेली ती कोठें निघुनी !**
**प्रतिवर्षाच्या प्रतीपदेला तिच्या घराण्यांत**
**तेव्हांपासुनि मुठा नदीची ओटी भरतात. ९५**

आणि ती आपला नवा संसार तसाच टाकून निघून गेली. कोठें निघून गेली तें मुळामुठेला ठाऊक! तेव्हांपासून प्रत्येक वर्षीच्या प्रतिपदेस तिच्या घराण्यांत मुठानदीची ओटी भरीत असतात.

**गेलीं माझीं मुलें राहिला एकटाच पोर;**
**मी म्हातारी तेवढाच हा माझा आधार;**
**गरीब आम्ही रहात असतो मोल मजूरीनें,**
**नका नेउ हो त्याला; केला काय गुन्हा त्यानें. ९६**

माझीं मुलें मरून गेलीं. हा एकटाच मुलगा मला आहे. मी म्हातारी आहे आणि मला एवढाच काय तो आधार आहे. मोल मजुरी करून आम्ही राहतों. आम्ही गरीब आहोंत. त्याला नेऊं नका. काय हो त्यानें गुन्हा केला?

**मस्तवाल ते त्यांनीं नेला तसाच ओढीत,**
**पूर नदीचा नेतो जैशी झाडाची फांद.**
**पाहिलात कां भिवा विचारित ती दारोदारीं;**
**तेव्हांपासुनि पुण्यांत होती भटकत म्हातारी. ९७**

नदीचा पूर झाडांची फांदी जसा नेतो त्याचप्रमाणें त्या मस्तवाल्यांनीं त्याला ओढीत नेलें. तेव्हांपासून "भिवा पाहिलांत का हो" असें विचारीत पुणें शहरांत म्हातारी दारोदार भटकत होती.

**केव्हां मेली कोठें मेली आणि कशी मेली**
**कुणी चौकशी म्हातारीची नाहि कधीं केली.**
**परि बाराचा सुमार होता मालघरापाशीं**
**केविलवाणें अजुनी येतें रडु ऐकायाशी ! ९८**

म्हातारी केव्हां मेली आणि कशी व कोठें मेली म्हणून चौकशी कोणी कधीं केली नाहीं. परंतु बारा वाजायच्या सुमारास मालधक्याजवळ केविलवाणें रडणें अजून ऐकूं येतें.

**"कोठें नेता वडील माझे ! बापु कुठें जाता?"**
**" नको रे बाळा रडूं असा तूं नको करूं चिंता;**
**आणि जाहलें माझें तिकडे भलेंबुरें कांहीं**
**नारायण वाहील काळजी; तुज चिंता नाहीं." ९९**

"माझ्या वडिलांना कोठें नेता ? बापू तुम्ही कोठें चालतात ?" "बाळा तूं रडूं नकोस आणि चिंताही करूं नकोस. माझें तिकडें भलेंबुरें कांहीं झालें तरी तुझी श्रीनारायण काळजी वाहील. तुला कशाची चिंता नाहीं."

पुन्हां कधीही नाहि पाहिलें त्यानें वडिलांस
तेव्हांपासुनि तोहि न दिसला पुण्यांत कोणास.
कांहि दिसांनीं प्रसिद्ध केलें वृत्त कुणी त्याचें,
त्या मर्दाला भाग्य लाभलें—भाग्य हुतात्म्याचें. १००

त्यानें वडिलांना पुन्हां कधीहि पाहिलें नाहीं. तेव्हांपासून तोही पुण्यांत कोणाला दिसला नाहीं. हुतात्म्याचें जें भाग्य तें भाग्य त्या मर्दाला लाभलें असें त्याच्याबद्दलचें वृत्त कांहीं दिवसांनीं कोणी प्रसिद्ध केलें.

कुणी कुणी सांगतात अजुनी येउनि रंगांत
सहर्ष चढला फांसावरती तो अंबाल्यांत !
कहर उडाला असा पुण्यांतिल घराघरांमधुनी
दीन बापुडे गेले सगळे लोक घाबरूनी. १०१

तो अंबाल्यांत फासावर सहर्ष चढला असें रंगांत येऊन अजून कोणी कोणी सांगतात. पुण्यांतील घराघरांतून असा कहर उडाला होता. दीन बापुडे सगळे लोक घाबरून गेले होते.

उदासवाणीं दिसूं लागलीं घरें पुण्यामधलीं
पाण्यावांचुनि बागेमधल्या जशा उभ्या केळी.
पडे जसा अंधार जगावर सूर्यग्रहणाचा
पुण्यांत पडला चोहिंकडे तम तसा निराशेचा ! १०२

पाणी न घातल्यामुळें बागेमधल्या उभ्या केळी जशा दिसतात तशीं पुण्यामधलीं घरें उदासवाणीं दिसत होतीं. सूर्यग्रहणामुळें जगावर जसा अंधार पडतो, तसा पुण्यांत चोहीकडे निराशेचा अंधार पडला होता.

**प्लेगापेक्षां भिऊनि गेले लोक सोजिरांना;**
**कसें करावें काय करावें कुणास समजेना !**
**रोगापेक्षां भिऊनि जावा रोगी वैद्यास**
**तसें जहालें शहर पुण्यांतिल लहान मोठ्यांस. १०३**

प्लेगापेक्षां लोक सोजिरांनाच भिऊन गेले होते. कसें करावें आणि काय करावें हें कोणाला समजत नव्हतें. रोग्याला रोगापेक्षां जशी वैद्याची भीति वाटावी, पुण्यांतील लहान मोठ्यांना तसेंच झालें होतें.

**रोगि नसेना घरांत शिरती तपासणीसाठीं;**
**चीज वस्तु जी बरी दिसे ती घेउनिया जाती.**
**पदर ओढती कुठें स्त्रियांचे, कपडे पेटविती,**
**देव फेंकती कुठें, लोणचीं ओतुनिया देती ! १०४**

रोगी असो नसो, घराची तपासणी करण्याकरतां सोजिर घरांत खुशाल शिरत. आणि चांगली दिसेल ती चीजवस्तु खुशाल घेऊन जात, कोठें स्त्रियांचे पदर ओढीत तर कोठें घरांतील कपड्यांनाच आग लावून देत ! कोठें देव फेकून देत होते तर कोठें लोणचींच ओतून टाकीत.

**घरांतलें सामान काढती भर रस्त्यावरती.**
**अशी घरोघर चालत होती गोऱ्यांची मस्ती!**
**मद्यापेक्षां कैफ अनावर सत्तेचा असतो;**
**सत्तेच्या कैफांत अनावर मस्तपणा येतो. १०५**

घरांतलें सामान रस्त्यावर फेकून देत, अशी घरोघर सोजिरांनीं मस्ती चालविली होती. मद्याच्या कैफापेक्षां सत्तेचा कैफ अनावर असतो. सत्तेच्या कैफांत अनावर मस्तपणा असतो.

**टिळक भेटले अनेक वेळां शहर पोलिसांना**
**परंतु मिस्टर रँड तयाची धुंदी उतरेना !**
**स्वराज्य गेलें याची हुरहुर होति पुढाऱ्यांना,**
**लष्करचा हा जुलूम त्यांना मुळीच सहवेना ! १०६**

शहरांतल्या पोलिसांना म्हणजे पोलिसांचे वरिष्ठांना अनेकवेळा टिळक भेटले. पण मिस्टर रँड यांची धुंदी कांहीं उतरेना. स्वराज्य गेल्याची पुढाऱ्यांना हुरहूर लागून होती. त्यांना लष्कराचा हा जुलूम मुळीच सहन होईना !

**अगरकरांनीं सवाल केला सुधारकांतूनी**
**बघता कैसे जुलूम असले स्वस्थ घरीं बसुनी.**
**वीरवृत्तिनें अन्यायाचा करणें प्रतिकार**
**प्रत्येकाचा स्वयं सिद्ध हा आहे अधिकार. १०७**

सुधारक पत्रांतून आगरकरांनीं प्रश्न केला कीं घरांत स्वस्थ बसून असले जुलूम कसे पहात बसले आहांत ? अत्याचाराचा वीर वृत्तीनें प्रतिकार करणें हा प्रत्येकाचा स्वयंसिद्ध हक्क आहे.

**जशास तसें न वागणें हा गुन्हा निसर्गाचा;**
**गुन्हा करिल हा अखेर त्याचा नाशच व्हायाचा.**
**असें स्त्रियांचें केले असते कोणी अपमान**
**पूर्वज अपुलें स्वस्थ रहाते कां कर जोडून ? १०८**

जशाच तसें न वागणें हा निसर्गाचा गुन्हा होय ! हा गुन्हा करणाऱ्यांचा अखेर नाशच व्हावयाचा असतो. आपल्या मायबहिणींचे असे अपमान जर कोणी केले असते तर आपले पूर्वज हात जोडून स्वस्थ बसले असते काय ?

**व्यवहारानें सोडवावया हवेत व्यवहार;**
**नाहि जया व्यवहार तयाची होत असे हार.**
**पद अग्नीवर ठेवतांच तें जळत जसें जळतें,**
**जशास तैसें न वागण्यानें जीवनसुख सुकतें. १०९**

व्यवहारानें व्यवहार सोडवायचे असतात. ज्याला व्यवहार कळत नाहीं, त्याचा पाय मागें येतो. अग्नीवर पाय पडला तर तो पाय जसा जळतो त्याप्रमाणें जशास तसें न वागण्यानें आयुष्याचें सुख सुकून पडतें.

**शहर पुण्यांतील तरुण निष्क्रिय असे कधी झाले?**
**सूड घ्यायचें मनांत त्यांच्या नाहिं कसें आलें?**
**स्वबांधवांची विटंबना जे पहात बसतात**
**ते राष्ट्राचा घात खरोखर करीत असतात. ११०**

पुण्यांतील तरुण असे निष्क्रिय केव्हांपासून झाले? सूड घ्यावा असें त्यांच्या मनांत कसें आलें नाही? जे स्वबांधवांची विटंबना पहात बसतात ते खरोखर राष्ट्राचा घात करीत असतात.

**अचित्त झाला बाळ विनायक वाचुनि आव्हान**
**लेख वाचुनी काळामधले गेला खवळून.**
**सूड पाहिजे घ्याया आपण या अपमानाचा**
**परी मुलांना समजेना तो कसा घ्यावयाचा. १११**

आगरकरांनीं केलेलें आव्हान वाचून बाळ विनायक अस्वस्थ झाला. त्याचप्रमाणें काळ वर्तमान पत्रांतील लेख वाचून तो खवळून गेला. या अपमानाचा आपण सूड घेतला पाहिजे असें तो म्हणे. पण सूड घ्यावयाचा कसा हें कांहीं मुलांना कळेना !!

* * *

**सुरू जाहलें नव्या युगाचें नवें नवें पान**
**चला घालु स्वातंत्र्यदेवीला रक्ताचें स्नान.**

## (११) टिळक म्हणाले 'सांभाळा रे!'

**नाशिकांतला प्लेग थांबला याच सुमारास**
**गणेशपंतांसवे विनायक जाइ शिकायास.**
**नाशिकांतले लोक परतले ,सुरु झाल्या शाळा.**
**होउं लागले विनायकाचे सवंगडी गोळा. १ १ २**

याच सुमारास नाशिकमधला प्लेग थांबला आणि आपले बंधु गणेशपंत यांच्याबरोबर विनायक शाळेंत जाऊं लागला. नाशिकांतले लोकही रहावयास परत आले. शाळाही सुरू झाल्या. विनायकाचे सवंगडी जमूं लागले.

**नाशिकामधें याच चालती प्लेगाच्या गोष्टी !**
**नाशिकांतले लोकहि होते याचमुळें कष्टी.**
**वृत्त वाचुनी केसरींतलें हळहळती लोक**
**भिजून गेले किती जणांचे अश्रूंनीं अंक. ११३**

नाशिकांतही प्लेगाचीच चर्चा चाले. नाशिकांतल्या लोकांनाही तसेच कष्ट काढावयास लागले होते. केसरींतील वृत्त वाचून लोक हळहळत. किती जणांच्या अश्रूंनीं केसरीचे अंक भिजून गेले.

**स्वजनांवरती जुलूम करती सैन्यांतिल पोरें**
**घरांत बसुनी बुळ्यासारखे हें बघतां कारे ?**
**जुलमाचा प्रतिकार पाहिजे केला मर्दांनी**
**बोलूं लागले शहर पुण्यांतील लोक कुणी कोणी. ११४**

आपल्या लोकांवर सैन्यांतील पोरें जुलूम करतात हें घरांत बसून बुळ्यासारखें काय पाहता. जुलमाचा प्रतिकार मर्दांनीं केला पाहिजे असें पुण्यांतील कोणीकोणी बोलूं लागले.

**सरकाराचं डोकं ठिकाणावर आहे काय ?**
**किती दिवस चालणार लोकांवर हा अन्याय.**
**असा कडाडुन सवाल केला श्रीमन् टिळकांनीं**
**जन म्हणती – शाबास पाहिजे हें लिहिलें कोणी. ११५**

सरकारचें डोकें ठिकाणावर आहे काय आणि लोकांवर असा अन्याय किती दिवस चालणार असा श्री. टिळकांनीं कडाडून सवाल केला. तो वाचून शाबास, असें कोणीं लिहिलें पाहिजे असें लोक बोलूं लागले.

**नीट पाहिजे कळावयाला हृदय समाजाचें,**
**लोकमताला धरुनि असावें स्वमत पुढाऱ्यांचें.**
**लोकांसाठीं लोकांचें मत बोलुनि दाखवितो**
**समाज त्याच्या म्हणुनि पाठिशीं नित्य उभा असतो. ११६**

समाजाचें हृदय नीट समजलें पाहिजे. लोकमताला धरून पुढाऱ्यांचें मत असावें, जो लोकांचे विचार लोकांना बोलून दाखवितो त्याच्याच पाठिशीं म्हणून सदोदित समाज उभा असतो.

**कळवळुनी बोलले आणखी टिळकमहाराज**
**' अर्थ यांत एवढाच झाले गरिब लोक आज. '**
**ध्वनी यांतला आणि सूचना या वाक्यामधलीं**
**ऐकुनी हृदयें कुणाकुणाचीं थरारुनी गेलीं !! ११७**

टिळकमहाराज कळवळून आणखी म्हणाले कीं, ' आज लोक गरीब झाले आहेत एवढाच यांत अर्थ दिसतो. ' या वाक्यांतील गर्भित अर्थ आणि या वाक्यांतील सूचना ऐकून कोणाकोणाचीं हृदयें थरारून गेलीं.

लोकशाहि वा राजशाहि वा असो हुकुमशाही
सहन कुणाचा जुलूम जनता करायची नाहीं.
लोकांमधुनी जन्म पावतो लोकांचा नेता
मोडुनि तोडुनि झुगारतो तो ती जुलमी सत्ता. ११८

हुकुमशाही असो, राजशाही असो, किंवा लोकशाही असो, जनता कोणाचाही जुलूम सहन करणार नाहीं. लोकांमधूनच लोकांचा नेता पुढें येत असतो आणि तो जुलमी सत्ता मोडूनतोडून झुगारून देतो.

टिळक तेवढे मांडित होते विचार लोकांचे;
दुःख बोलुनी दाखवीत ते होते जनतेचें.
टिळकांचे वाचूनि लेख अन् प्लेगाचें वृत्त
खवळुनि होतें जात तेवढें तरुणांचें पित्त! ११९

टिळक तेवढे लोकांचे विचार मांडीत होते. लोकांचें दुःख ते बोलून दाखवीत होते. टिळकांचे लेख आणि प्लेगाच्या बातम्या वाचून तरुणांचें तेवढें रक्त खवळून जाई.

नेत्याचीही चालत नाहीं जुलुम जबरदस्ती
लोकांतुनि प्रतिशोध तयाचा कधी कुणी घेती.
असा रोख-रोकडा चालतो विश्वव्यवहार
लोकशाहिचा यांस बोलती स्वच्छ कारभार. १२०

नेत्यांनींही जुलूम जबरदस्ती केली तर ती चालत नाहीं. लोकांपैकींच कोणी त्याचा प्रतिशोध घेतो. विश्वाचा व्यवहार असा रोकडा आणि रोख चालतो. यालाच लोकशाहीचा स्वच्छ कारभार म्हणतात.

**दह्यांत साखर आणि त्यामधें रंग केशराचा**
**जसा घालतां अधिक वाढतो मधुरपणा त्याचा.**
**तरुणांची सामर्थ्य – सुबत्ता, वृद्धांची बुद्धी–**
**कार्याला लाभली किं होते वृद्धी समृद्धी.** १२१

दह्यांत साखर घातली आणि त्यांत केशराचा रंग घातला म्हणजे मधुरपणा जसा अधिक वाढतो त्याचप्रमाणें कार्याला तरुणांचें भरपूर सामर्थ्य आणि वृद्धांचें मार्गदर्शन लाभलें कीं कार्य वाढतें आणि समृद्ध होतें.

**तरुणांचें सामर्थ्य, नियोजन शूर पुढाऱ्यांचें**
**करुनि टाकते तुकडे तुकडे परसाम्राज्याचें.**
**राजकारणांतील तत्त्व हें विसरुनि सरकार**
**मस्तपणानें करूं लागलें राज्यकारभार.** १२२

तरुणांचें सामर्थ्य आणि शूर पुढाऱ्यांचें नियोजन यांनीं परकीय साम्राज्याचे तुकडे तुकडे होतात हें राजकारणांतील तत्त्व विसरून सरकार मस्तपणानें राज्यकारभार करीत होते.

**श्रीटिळकांच्या नेतृत्वाची वाटुनिया भीती**
**सरकारानें लोक ठेवले हेरगिरीवरती.**
**देश महाराष्ट्रांत उडाली खळबळ जोराची;**
**होउ लागली स्मृति प्रजेला गत स्वराज्याची.** १२३

टिळकांच्या पुढारीपणाला भिऊन सरकारनें त्यांच्यावर हेरांकडून पाळत ठेवली होती. महाराष्ट्रांत जोराची खळबळ उडाली होती. आणि गेलेल्या स्वराज्याचें लोकांना स्मरण होऊं लागलें होतें.

**शहर पुण्याला ठाउक नव्हती अशी जबरदस्ती.**
**शहर पुण्यानें दुःखें असलीं अनुभवलीं नव्हतीं**
**लोक भेटले, करती चर्चा, म्हणती टिळकांना**
**काय करावें अशा प्रसंगीं तुम्हीच सांगाना. १२४**

अशी जुलूम जबरदस्ती पुणें शहराला कधीं ठाऊक नव्हती. पुणें शहराला असल्या दुःखांचा कधीं अनुभव नव्हता. टिळकांना लोक भेटत, त्यांच्याशीं चर्चा करीत आणि अशा प्रसंगीं काय करावें तें तुम्हीच सांगा असें म्हणत.

**समाज असतो जात मागुनि लोकपुढाऱ्यांचे**
**आणि पुढारी चालत असतो पुढें समाजाचे.**
**जसा लागतो खांब उभा अन् उंच मांडवाला**
**तसा अवश्यक असतो नेता लोकसमाजाला. १२५**

पुढाऱ्याच्या मागें मागें लोक असतात आणि लोकांच्या अग्रभागीं राहून समाजाचे पुढें पुढारी चालत असतो. जसा मांडवाला उंच आणि उभ्या खांबाची गरज असते त्याचप्रमाणें लोकसमाजाला नेत्याची आवश्यकता असते.

**शोधित फिरते लक्ष्मी जैसी प्रयत्नवाद्यांस**
**समाज असतो शोधित तैसा लोकपुढाऱ्यांस.**
**येउं लागलें जन टिळकांच्या घरीं विचारास**
**सांगु लागले दुःखें अपुलीं श्रीमन् टिळकांस. १२६**

प्रयत्नवाद्यांच्या शोधांत जशी लक्ष्मी असते. त्याचप्रमाणें समाज आपल्या पुढाऱ्यांच्या शोधांत असतो. चर्चा करण्यासाठीं लोक टिळकांच्या घरीं येऊं लागले आणि टिळकांना आपलीं दुःखें सांगू लागले.

**एके दिवशीं काय जहालें, सकाळच्या वेळीं**
**बोलत होते टिळक लावुनी पडवींतिल खोली.**
**लिहून होता पुरा जाहला लेख केसरीचा.**
**होते चर्चा करीत सांगत मार्ग निदानीचा ! १२७**

एके दिवशीं काय झालें, पडवीतील खोली लावून सकाळच्या वेळीं टिळक बोलत बसले होते. केसरीचा लेख लिहून पुरा झाला होता. चर्चा करीत होते. शेवटचा उपाय म्हणून काय करावें याचें मार्गदर्शन करीत होते.

**भेटु पुन्हां सांगून निघाले तरुण कुणी दोन;**
**बरें बरें या टिळक म्हणाले पाठ थोपटून.**
**आणि पाहिजे होता आशिर्वाद खरा त्यांस;**
**दिला तयांनीं दिला न त्यांना ठाउक देवींस ! १२८**

पुन्हां भेटूं असें सांगून दोन तरुण निघाले आणि त्यांची पाठ थोपटून बरें या असें टिळक त्यांना म्हणाले. टिळकांचा आशीर्वाद त्यांना पाहिजे होता. त्यांनीं तो त्यांना दिला किंवा नाहीं हें देवाला ठाऊक !!

**सांभाळारे टिळक सांगती त्यांना आंतून**
**हो हो बोलत बोलत आले थेट घरांतून;**
**फणकाऱ्यानें क्षणांत गेले नीट समोरून**
**जसा धनुष्यांतूनि सुटावा रामाचा बाण. १२९**

' सांभाळारे ' टिळकांनीं त्यांना आंतूनच सांगितलें. ' हो हो ' म्हणत ते दोन तरुण सरळ घराच्या बाहेर पडले. आणि रामाचा बाण धनुष्यांतून सुटावा तसें फणकाऱ्यांत समोरून थेट निघून गेले.

**दृष्टित दिसला निश्चय त्यांच्या आणि समाधान,**
**प्रथम श्रेणित जणूं परीक्षा झाले उत्तीर्ण.**
**काय तयांचें नांव तयांचें गांव कसें गाऊं**
**दुरूनि दिसले असावेत ते – ते भाऊ भाऊ. १३०**

त्याच्या दृष्टींत निश्चय दिसला आणि पहिल्या वर्गात परीक्षा उत्तीर्ण झाल्यामुळें जसें मुलाला समाधान होतें तसें समाधान त्यांच्या डोळ्यांत दिसत होतें. त्यांचें नांव काय आणि ते कोठे राहणारे हें कसें सांगावें ? लांबून ते भाऊ भाऊ असावेत असें दिसलें.

**प्लेग थांबुनी असतिल झाले महिने दो महिने**
**खुशीत होते हिंडत मिस्टर रँड दिमाखानें.**
**नृपसत्तेच्या अधिकाराचा मद ज्याला चढतो,**
**मस्तवाल तो धुंद फुंद मदमस्त सदा असतो. १३१**

प्लेग थांबून एकदोन महिने झाले असतील. मिस्टर रँड खुशींत दिमाखानें हिंडत होते. राजसत्तेच्या अधिकाराचा मद ज्याला चढलेला असतो तो मस्तवाल सदोदित धुंद फुंद आणि मदमस्त असतो.

**सत्ताधारी असो पुढारी कुणी पुढाऱ्यांचा**
**मीच खरा समजणें तयानें मूर्खपणा त्याचा**
**मीच बरोबर आणि खरा मी आग्रह हा ज्याचा;**
**अखेर पडतो राजकारणामधें बळी त्याचा. १३२**

पुढाऱ्यांचा सत्तासंपन्न कोणी पुढारी असला तरी त्यानें मीच बरोबर असें समजणें मूर्खपणा असतो. मीच बरोबर आणि मीच खरा असा ज्याचा आग्रह असतो त्याचा राजकारणांत शेवटीं बळीं पडतो.

**साहेबाला विरोध केला नाहिं कुणी कांहीं.**
**रँड म्हणे लोकांत राहिलें तेज अतां नाहीं !**
**परंतु या मूर्खास अजुनी हें कळलें नव्हतें,**
**शहरकडेला नेमबाजीचे वर्ग सुरू होते. १३३**

साहेबाला कोणी कांहीं विरोध केला नाहीं (त्यामुळें) लोकांत कांहीं तेज आतां राहिलें नाहीं असें रँडसाहेब म्हणूं लागला. परंतु पुणें शहराच्या एका बाजूला नेमबाजीचे वर्ग सुरूं होते याची या मूर्खाला माहितीच नव्हती.

**तोंच ऐकली एके दिवशीं वार्ता लोकांनीं,**
**सुधारकांना मरे मरे तों मारियले कोणी.**
**आणि ऐकली कांहिं दिसांनीं एक पुन्हा वार्ता–**
**बाडग्यास मारले, वाचले, ते मरतां मरतां. १३४**

याच वेळी एका सुधारकाला कोणी मरे मरेतों मारल्याची वार्ता लोकांना कळली. आणि त्यानंतर थोड्याच दिवसांनीं बाडग्याला म्हणजे धर्मांतर करून ख्रिश्चन झालेल्या इसमांना कोणी तरी मारलें आणि त्या वेळीं ते मरतां मरतां वाचले. असेंही दुसरें वृत्त ऐकूं आलें.

**कोणि मारलें कसें मारलें सुरु झाली चर्चा !**
**घरोघरीं हा विषय जाहला एकच चर्चेचा.**
**वार्ता झाल्या प्रसिद्ध तेव्हां सर्व दैनिकांत**
**नवल वृत्त हें वाचुनि होते कुणि आनंदांत !! १३५**

कोणी मारलें कसें मारलें याची चर्चा सुरू झाली. घरोघर या एकाच विषयावर चर्चा होत होती. हें आश्चर्यकारक वृत्त ऐकून कोणी आनंदांत होते.

**निषेध होता वरूनि; होता प्रमोद आंतूनी;**
**लिहावयाची रीत एक ही वापरतो कोणी.**
**परंतु नाहीं लिहिलें कांहीं श्रीमन् टिळकांनीं**
**अर्थ त्यांतला ध्यानिं घेतला हुषार लोकांनीं. १३६**

वर्तमानपत्रकारांनीं वरील कृत्यांचा निषेध केला असला तरी यांना आंतून आनंद वाटत होता. असें लिहावयाची (म्हणजे पोकळ निषेधात्मक लिहावयाची)कोणाची एक पद्धत असते. परंतु टिळकांनीं कांहीं लिहिलें नाहीं. असें न लिहिण्यांत टिळकांचा हेतु काय असावा हें हुषार लोकांच्या लक्षांत आलें.

**विरुद्ध असुनो विरुद्ध नाहीं कांहीं लिहायाची**
**पद्धत असते मतें विरोधी प्रगट करायाची.**
**स्वभाव ज्याचा जसा तसें तो मत अपुलें लिहितो;**
**जशी जयाची शक्ति तसें तो धोरण तें धरतो! १३७**

विरुद्ध असून तसें विरुद्ध कांहींच लिहावयाचें नाहीं ही आपलीं विरोधी मतें प्रगट करावयाची एक पद्धत असते. जसा ज्याचा स्वभाव तसा तो आपलें मत प्रगट करतो. जशी ज्याची शक्ति तसें त्याचें धोरण असतें.

**लिहिल्याविण जें लिहिलें जातें तें वाचायाला**
**लिहिणाराचें हृदय पाहिजे नीट कळायाला.**
**विनायकानें सभा घेतली खाशा स्वाऱ्यांची**
**समजावुनि सांगितली त्यांना भाषा टिळकांची. १३८**

लिहिल्याविण जें लिहिलें जातें तें वाचावयास लिहिणाराचें हृदय नीट कळावयास पाहिजे. विनायकानें आपल्या खास मित्रांची सभा घेतली आणि टिळकांचें मत काय असावें हें त्यांना समजावून सांगितलें.

आणि म्हणाला सभेंत ठाउक असेल सर्वांना
पुण्यामधें मारले कुणीतरि हिंदु बाडग्यांना.
धीटपणानें कोणी केलें हें मंगल काम
प्रसिद्ध नाहीं झालें कोठें त्याचें शुभनाम ! १३९

आणि विनायक म्हणाला " हिंदु बाडग्यांना पुण्यांत कोणीतरीं मारलें हें सर्वांनाच ठाऊक असेल. हें चांगलें कार्य धीटपणानें कोणीं केलें त्याचें शुभ नांव कोठें प्रसिद्ध झालें नाहीं.

ख्रिश्चन करुनी लोक येथले हिंदू धर्माचे
ख्रिश्चनमय हा देश करावा यत्न इसायांचें.
आणि गड्यांनों, हिंदुधर्म या मंगल देशांत
नसेल पूर्वी इतका आहे आज संकटांत!! १४०

हिंदुधर्माच्या लोकांना ख्रिश्चन करून हा हिंदुस्थान देश ख्रिश्चनमय करावा असें ख्रिश्चन लोकांचे प्रयत्न चालू आहेत. आणि मित्रांनों, या मंगल देशांत हिंदुधर्म पूर्वी नसेल इतका आज संकटांत आला आहे.

*   *   *

नव्या युगाचें सुरू जाहलें नवें नवें पान;
चला घालु स्वातंत्र्यदेवीला रक्ताचें स्नान !!

## (१२) रक्ताची तहान रक्तानें शमते

म्हणुनि मारलें धीटपणानें ज्यांनि बाडग्यांना
धन्यवाद पाहिजेत आपण खास दिले त्यांना.
ख्रिस्त प्रचारक प्रलोभनानें जे ख्रिश्चन करती
प्रथम पाहिजे उठवायाला ख्रिस्त्यांची वस्ती. १४१

म्हणून धीटपणानें ज्यानें बाडग्यांना चोपलें त्याला आपण खास धन्यवाद दिले पाहिजेत. प्रलो' नें दाखवून जे ख्रिस्ती प्रचारक हिंदूंना ख्रिश्चन करतात अशा ख्रिस्ती प्रचारकांची वस्ती येथून उठविली पाहिजे.

**देशभारती मातृभूमी ही समस्त हिंदूंची.**
**स्वच्छ करूं या घाण काढुनी यवन – इसायांची !**
**असेल महिना झाला आलें तोंच नवें वृत्त,**
**मुंबईमध्यें मंडप जाळुनि कुणि केला घात. १४२**

भारतदेश ही समस्त हिंदूंची मातृभूमी आहे. यवन, इसायांची घाण काढून टाकून हा देश स्वच्छ करूं या. महिना झाला असेल तोंच नवें वृत्त प्रसृत झालें कीं कोणी तरी मुंबईंत मंडपाला आग लावून घात केला.

**नवाच होता प्रकार सारा इंग्रज सत्तेला;**
**काय असावा हेतु कुणाचा नाहिं कुणा कळला.**
**परी न तिकडे लक्ष देउनी नोकरशाहीनें**
**करावयाचा एक योजला उत्सव थाटानें ! ! १४३**

इंग्रज सत्तेला हा सारा प्रकार नवाच होता. यामागें कोणाचा काय हेतु आहे हें कोणाला कळलें नाहीं. परंतु या प्रकाराकडे नोकरशाहीनें दुर्लक्ष केलें व एक थाटाचा उत्सव करण्याचें ठरविलें.

**वर्षें झालीं साठ राणिच्या पवित्र राज्याला**
**हीरक उत्सव करावयाचें सुचलें सत्तेला ! !**
**जसा दरवडेखोर सजवितो मंदिर नवसानें**
**तसेच असले उत्सव करणें परत्र सत्तेनें ! ! १४४**

राणीच्या पवित्र राज्याला साठ वर्षें पुरीं झालीं होतीं, म्हणून सरकारनें एक हीरकमहोत्सव करण्याचें ठरविलें. दरवडेखोरानें नवस केल्याप्रमाणें देवळाची दुरुस्ती करणें हें जसें तसेंच परकीय शासकांनीं असे उत्सव करणें होय.

**सामर्थ्याच्या प्रदर्शनानें दिपवावे लोक**
**आणि प्रजेला सामर्थ्याचा वाटावा धाक.**
**स्मृति न रहावी प्रजेस केव्हां केल्या जुलमांची**
**सरकाराची पद्धत असते ढोंग करायाची. १४५**

सामर्थ्याचें प्रदर्शन करून लोकांचे डोळे दिपवून टाकावेत आणि प्रजेला सामर्थ्याचा धाक वाटावा, केलेल्या जुलुमी कृत्यांची प्रजेला आठवणही राहू नये म्हणून अशीं सोंगें करावयाचीं सरकारची पद्धत असते.

**कसा करावा उत्सव याचा कार्यक्रम ठरला**
**आणि लागले राजनिष्ठ जन काम करायाला.**
**तोंच विलक्षण एक ऐकली वार्ता लोकांनीं.**
**राणीच्या पुतळ्यावर डांबर ओतियलें कोणी! ! १४६**

कसा उत्सव करावा याचा कार्यक्रम ठरला. आणि राजनिष्ठ लोक तयारी करूं लागले. तोंच एक विलक्षण वार्ता लोकांच्या कानांवर आली. राणीच्या पुतळ्यावर कोणीतरी डांबर ओतलें ! !

**भूकंपानें जसें हदरतें निजलेलें गांव**
**या वृत्तानें करूं लागले जन धांवाधांव !**
**संशय आला सरकाराला श्रीमन् टिळकांचा ;**
**उपाय नाहीं परी चालला नोकरशाहीचा ! १४७**

जसें निजलेलें गांव भूकंपानें खडबडून धांवपळ करतें तसें हें वृत्त वाचून लोकांची धावाधाव झाली. श्रीमन् टिळकांचा सरकारला संशय आला, परंतु (पुराव्या अभावी) नोकरशाहीचा कांहीं उपाय चालेना.

**सरकाराचा रोष न व्हावा म्हणून वरकरणी**
**अशीं नाटकें उगाच करती जन कोणी कोणी.**
**करो कांहि सरकार होउं द्या कांहि पुढाऱ्यांचे –**
**समाजांत असतात कांहि जन अलिप्त वृत्तीचे. १४८**

सरकारचा राग होऊ नये म्हणून वरकरणीं कोणी कोणी लोक अशीं उगाच नाटकें करीत असतात, तर सरकार कांहीं करो आणि पुढाऱ्यांचें कांहीं होवो तिकडे लक्षच द्यावयाचें नाहीं असे अलिप्त वृत्तीचे लोक समाजांत असतात.

**दिवस जाहले असतिल कांहीं अशा प्रकारांस;**
**दोन दिवस राहिले असावे अशा उत्सवास,**
**तरूण जमले सायंकाळीं आठ दहा कोणी;**
**बैठक झाली हनुमंताला साक्षी ठेवोनी. १४९**

या अपूर्व गोष्टींना कांहीं दिवस होऊन गेले आणि मुख्य उत्सवाला दोन दिवस राहिले होते. पर्वती टेकडीच्या खालीं सायंकाळच्या सुमारास आठ दहा तरुण जमा झाले. हनुमंताच्या साक्षींत त्यांची एक सभा झाली.

**करूनि जयजयघोष एकदां आइभवानीचा,**
**करूनि जयजयकार एकदां श्रीशिवरायाचा,**
**शपथ घेउनी श्रीफडक्यांच्या पवित्र आत्म्याची**
**आणि स्मरुनी पूज्य पाउलें आईवडिलांचीं. १५०**

एकदां आई भवानीचा जयघोष त्यांनीं केला. पुन्हां एकदां श्रीशिवाजी महाराजांचा त्यांनीं जयजयकार केला. क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडक्यांच्या पवित्र आत्म्याची त्यांनीं शपथ घेतली आणि आई वडिलांच्या पूज्य चरणांचें त्यांनीं स्मरण केलें.

**सांगुनि कांहीं निश्चयपूर्वक एकामेकांस**
**गेलें ते गेलेच न दिसले कधींच कोणास!**
**आणि जून बावीस दिनांकीं गणेश खिंडींत**
**राज्याच्या इभ्रतीस केला कोणी आघात. १५१**

एकमेकांस त्यांनीं कांहीं निश्चयपूर्वक सांगितले आणि ते तरुण जे गेले ते कोणाला कधीं दिसलेच नाहींत. आणि जूनच्या बावीस तारखेस गणेश खिंडींत राज्याच्या इभ्रतीवर कोणी तरी आघात केला.

**तृषाकांत तूं फार दिसांची रिपुरक्तासाठीं;**
**हा देतो घे तुला बळी मी आइ तुझ्यासाठीं.**
**आणि साधुनी नेम सोडली कोणि तरी गोळी;**
**मेला मेला मरूनि पडला धाडदिशी खाली. १५२**

फार दिवसांपासून तुला शत्रूच्या रक्ताची तहान लागली आहे. "आई तुझ्यासाठीं हा मी बळी तुला देतों आहे." (असें मनांत म्हणून) नेम धरून कोणी तरी गोळी मारली. मेला मेला. कोणी तरी धाडदिशीं खालीं पडला.

**एक नव्हे सोडले कुणीसें बारावर बार;**
**रँड नि आयर्स्ट अखेर झाले पुण्यामधें ठार!!**
**ऊन ऊन रिपुरक्त स्वकरें लावुनिया भाळीं**
**चंद्र जसा घन ढगांत तैसे ते गेले निघुनी. १५३**

एक नव्हे, कोणीतरी बारावर बार केले. पुणें शहरांत रँड आणि आयर्स्ट यांचा अखेर खून झाला. शत्रूच्या ऊन ऊन रक्ताचा टिळा आपल्या कपाळावर लावून ढगाआड जसा चंद्र जातो, तसे ते निघून गेले.

**नाहीं कळलें नांव कुणाला कोण गुन्हेगार**
**नाहीं कळलें कोण जाहला इतका शिरजोर !**
**काय पुढें होणार म्हणोनि घाबरले कांहीं;**
**कांहि सुशिक्षित खुळ्यांस आली झोंप अशी नाहीं. १५४**

हा गुन्हा कोणी केला त्याचें नांव गांव कोणाला कळलें नाहीं. असा शिरजोर कोण झाला आहे हें कळलें नाहीं. यापुढें काय होणार या विचारानें कांहीं लोक घाबरून गेले. तर कांहीं खुळ्या सुशिक्षित लोकांना झोंप कशी ती लागली नाहीं !

**फिरूं लागले श्रीटिळकांच्या हेर पुढें मागें**
**जसे भ्रमर फिरतात वेलिवर फुलांफुलांमागें.**
**जपुनि बोलती लोक भयानें रामापांडूंचे !!**
**नेम काय येईल निमंत्रण फरासखान्याचे. १५५**

वेलीवरील फुलांच्या भोंवती भृंगे फिरतात तसे टिळकांच्या पुढें मागें हेर फिरूं लागले. रामा पांडूच्या भयानें लोक जपून बोलत. नेम काय, फरासखान्याचें बोलावणें यावयाचें !!

**आग आग भडकली देशभर इंग्रज लोकांत,**
**निषेध केला प्रतिष्ठितांनीं गांवोगांवांत;**
**खरे नि निकली सामिल झाले अशा निषेधांत.**
**असें लागतें सोंग कराया चाराचौघांत !! १५६**

देशभर पसरलेल्या इंग्रज लोकांत आग भडकली. गांवोगांवीं प्रतिष्ठित लोकांनीं खुनाचा निषेध केला. मनापासून निषेध करणाऱ्यांनीं आणि वरकरणी निषेध करणाऱ्यांनीं त्यांत भाग घेतला. चारचौघांत असें ढोंग करावेंच लागतें.

**नाशिक गांवामधें जहाली अशी सभा एक;**
**अशा सभेला लोकहि होते जमले कित्येक!!**
**ऐकत होते विनायकाचें श्रोते व्याख्यान**
**जसा पाठ ऐकतात मुलगे देउनिया कान. !! १५७**

नाशिक शहरामधें अशीच एक सभा झाली. त्या सभेला लोकही कित्येक जमले होते, जसे विद्यार्थी कान देऊन पाठ ऐकत असतात त्याप्रमाणें श्रोते विनायकाचें व्याख्यान ऐकत होते.

**सुचवायाचें एकच मजला अशा प्रसंगानें**
**खुनास कारण काय पहावें नोकरशाहीनें.**
**आणि तयाचा प्रथम करावा विचार गोऱ्यांनीं.**
**बघा मागुनी केला शस्त्राचार कसा कोणी!! १५८**

अशा प्रसंगीं मला एकच सूचना करावयाची आहे. खून करावयास काय काय कारणें घडलीं तें नोकरशाहीनें पहावें आणि इंग्रज लोकांनीं त्याचा प्रथम विचार करावा. मग कशा बंदुका झाडल्या यांचा शोध करावा. शस्त्राचार कोणी केला हें मागून बघा.

**जात्या आहे सहनशील हा समाज हिंदूंचा;**
**शत्रूलाही सहसा नाहीं कधिं दुखवायाचा.**
**अशा प्रकारापासुनि घ्यावा बोध इंग्रजांनीं**
**स्पष्टपणें मत मांडावें हें सभेंत लोकांनीं!! १५९**

हिंदुसमाज हा जात्याच सहनशील आहे. शत्रूलाही सहसा दुखवावयाचा नाहीं. या प्रकरणावरून इंग्रजांनीं कांहीं शिकावें अशी लोकांनीं या सभेंत सूचना करावी.

**जसा संपदेमागुनि करतो छंद चमत्कार,**
**छळामागुनि तसाच येतो लोकप्रतिकार;**
**जें पेरावें तेंच उगवतें न्याय निसर्गाचा;**
**इंग्रज म्हणुनी निसर्ग नाहीं कधिं बदलायाचा. १६०**

जशी लक्ष्मी घरांत आली म्हणजे व्यसनांचे चमत्कार सुरू होतात तसा राजसत्तेकडून छळ सुरू झाला म्हणजे त्याला लोकांकडून प्रतिकार सुरू होतो. जें पेरावें तेंच उगवतें हा निसर्गाचा न्याय, इंग्रज झाले म्हणून निसर्ग कधीं बदलणार नाहीं !

**ऊन ऊन रक्तानें शमते तहान रक्ताची,**
**बळी दिल्यानें भूक थांबते आइ भवानीची.**
**असें बोलले सावरकर अन् ते बसले खालीं.**
**गंभिर झाले लोक; वाजली नाहिं कुठें टाळी. १६१**

रक्ताची तहान ऊन ऊन रक्तानेंच शमते. आई भवानीची भूक तिला बळी दिल्यानें थांबते. इतकें बोलून सावरकर खालीं बसले. लोक इतके गंभीर झाले होते कीं (भाषण झाल्यावर) कोठेंही टाळी पडली नाहीं.

**वारा नसता अनंत सागर जसा दिसे शांत,**
**ऐकत असतां भाषण होती तशी सभा शांत.**
**सभा संपली लोक लागले हळूंहळूं जाऊं;**
**कुणी म्हणाले विनायकाची भेट चला घेउं. १६२**

वारा नसला म्हणजे अफाट सागर जसा शांत दिसतो त्याप्रमाणें भाषण ऐकतांना सभा शांत होती. सभा संपली, लोक हळहळूं घरीं जाऊं लागले. विनायकाची भेट घेऊं या असें कोणी म्हणाले.

**खरें तेंच बोललास संशय यांत मुळीं नाहीं;**
**विनायका, पण पुन्हां असें तूं बोलूं नको कांहीं !**
**अशा प्रसंगीं खरें बोलणें गुन्हाच म्हणतात !**
**स्वतंत्र नाहीं भारत, नाहीं स्वराज्य देशांत; १६३**

" खरें तेंच बोललास यांत मुळींच संशय नाही पण विनायका, असें कांहीं पुन्हां बोलूं नकोस. अशा प्रसंगीं खरें बोलणें हाही गुन्हाच म्हणतात. भारत स्वतंत्र नाहीं आणि देशांत स्वराज्य नाहीं ! !

**तुझी हुषारी, तुझें, बोलणें ज्ञान तुझें बघुन**
**विनायका, वाटतो खरोखर आम्हा अभिमान.**
**प्रथम लक्ष दे क्रमांक मिळवीं तूं अभ्यासांत;**
**प्रेमानें फिरवला तयाच्या पाठीवर हात. १६४**

तुझी हुशारी, तुझें बोलणें आणि तुझें ज्ञान पाहून विनायका आम्हांला खरोखर अभिमान वाटतो. प्रथम अभ्यासाकडे लक्ष दे आणि क्रमांक मिळव, असें म्हणून त्यांनीं विनायकाच्या पाठीवरून हात फिरवला.

* * *

**सुरू जाहलें नव्या युगाचें नवें नवें पान**
**चला घालु स्वातंत्र्यदेवीला रक्ताचें स्नान.**

# सर्ग तिसरा

## (१३) टिळकांना अटक

देशासाठीं धर्मासाठीं जे कोणी लढले
धन्य धन्य ते बळी घेउनी स्वतां बळी गेले !

*　　　*　　　*

ठार मारले इंग्रज कोणी भर रस्त्यावरती
म्हणुनि जहाली शहर पुण्याची चोहिकडे कीर्ती.
अन्यायाचा जेव्हां कोणी करतो प्रतिकार
समाज त्याचा करीत असतो सदैव जयकार.　१

इंग्रजांना भर रस्त्यावर कोणीतरी ठार मारल्यामुळें पुणेंशहराची चोहीकडे कीर्ति झाली. जेव्हां कोणी अन्यायाचा प्रतिकार करतो तेव्हां समाज त्याचा सदैव जयजयकार करीत असतो.

गर्जुं लागलें पुन्हां पुण्याचें नांव भारतांत;
"शूर मराठे" खरे लागले बोलुं पुन्हां प्रांत.
अशी धिटाई आणि असा हा गुप्त कारभार
शहर पुण्यांतिल लोकांवांचुनि कुणास येणार !　२

भारतामध्यें पुणें शहराचें नांव पुन्हां सर्वतोमुखीं झालें. प्रांताप्रांतांतून मराठे खरोखर शूर आहेत, असा धीटपणा आणि ह्या अशा गुप्त गोष्टी (कारस्थानें) पुण्यांतील लोकांवाचून कोणास साधणार नाहींत असें लोक बोलूं लागले.

**पाण्यावांचुनि तलाव जैसे भकास दिसतात,**
**पशुपक्षाविण रानें जैशीं भयाण असतात,**
**पुरुषावांचुनि उदास असतें जीवन महिलेचें**
**लोकशाहिविण निष्प्रभ असतें जीवन राष्ट्राचें. ३**

पाण्यांवाचून तळीं जशीं भकास दिसतात, पशुपक्ष्यांखेरीज रानें जशीं भयाण असतात, स्त्रीचें जीवन पुरुषावांचून जसें उदास असतें त्याचप्रमाणें राष्ट्राचें जीवन लोकशाहीखेरीज निष्प्रभ असतें.

**दुःखित होतीं जीं जीं हृदयें स्वराज्य गेल्यानें**
**वृत्त ऐकुनी क्षणभर हंसलीं तीं अभिमानानें.**
**बरें वाटतें शिकूं लागलें मूल जसें बघुन**
**तसें तयांना क्षणभर झालें कांहि समाधान. ४**

स्वराज्य गेल्यामुळें जे जे लोक दुःखी होते ते भर रस्त्यावर कोणा इंग्रजांना ठार मारल्याचें वृत्त ऐकून क्षणभर हंसले. आपला मुलगा शाळेंत जाऊं लागला म्हणजे जसें वाटतें त्याचप्रमाणें त्यांना क्षणभर समाधानहि झालें.

**सुकूं लागल्या कळिवर पडता पाण्याचा बिंदू**
**तिला वाटते प्रसन्न झाला माझ्यावर सिंधू.**
**आणि तजेला जसा कळीला क्षणामधें येतो**
**वृत्त पुण्याचें ऐकुनि हंसला मनामधें जो तो. ५**

सुकत चाललेल्या कळीवर पाण्याचा बिंदु पडला तर आपणांवर सागर प्रसन्न झाला आहे असें तिला वाटतें. आणि क्षणांत तिला तजेला येतो. त्याप्रमाणें पुण्यांतील हें वृत्त ऐकून जो तो मनामध्यें हसत होता.

दिला उतारा कुणी चांगला हेंच बरें झालें;
इंग्रज आहे फार माजला कुणी असें म्हटलें.
कुणी म्हणे कोणास भयानें हळूंच कानांत,
जपून बोला हेर आपुल्या भवती फिरतात. ६

इंग्रज फार माजले आहेत, त्यांना हा उतारा कोणी दिला हेंच बरें झालें असें कोणी म्हणाले; तर जपून बोला आपल्या भोवतीं हेर फिरत आहेत असें कोणी भीतीनें दुसऱ्याच्या कानांत सांगे !

केला कोठें राष्ट्ररिपूचा कोणी अपमान
राष्ट्रभक्त मानतो त्यामधें कांहि समाधान.
खून जाहला गणेश खिडित दोन इंग्रजांचा
विनायकाला दिवस वाटला तो आनंदाचा. ७

आपल्या राष्ट्राच्या शत्रूचा जर कोणी कोठें अपमान केला तर देशभक्ताला त्याचें कांहींसें समाधान वाटतें. गणेश खिडींत दोन इंग्रजांचा खून झाला तो दिवस विनायकाला आनंदाचा वाटला.

होता वागत गुलाम समजुनि पुण्यांतले लोक,
त्यास दाखवावया पाहिजे असाच परलोक.
सांगत होता मुक्तपणानें अपुल्या स्नेह्यांस
विनायकाचा वाढत होता तसाच उत्साह. ८

पुण्यांतले लोक आपले गुलाम आहेत अशा समजुतीनें जो वागे त्याला असाच परलोक दाखवावयास पाहिजे असें विनायक आपल्या स्नेह्यांना उघडपणें सांगे. तसा त्याचा उत्साहही वाढत होता.

७५५०३ १०।

कौतुक होतें विनायकाचें वाढत लोकांत,
कुणी म्हणे हा काढिल मुलगा नांव भारतांत.
कुणी कुणी पाहूनि अलौकिक तेज मुखावरती
मुलांप्रमाणें करीत होतें प्रेम तयावरती. ९

विनायकाचें कौतुक लोकांत वाढत होतें. हा मुलगा भारतांत नांव काढील असें कोणी म्हणे. विनायकाच्या मुखावरील अलौकिक तेज पाहून स्वतःच्या मुलासारखें विनायकावर कोणी कोणी प्रेम करीत.

पाय सरकुनी पडता जातो ओशाळुनि कोणी
प्रमुख तसे अधिकारी गेले मनांत शरमूनी.
आणि आपुलें नाक कापलें कुणास वाटून
कुणी प्रतिष्टित गोरे गेले मनांत शरमून. १०

चालतांना पाय सरकून पडल्यावर पडणारा जसा ओशाळून जातो त्याप्रमाणें मुख्य अधिकारी मनांत शरमून गेले. तर आपलेंच नाक कापलें गेलें आहे असें कांहीं गोऱ्या प्रतिष्ठितांना वाटून तेही ओशाळून गेले होते.

जशा मोहऱ्या उष्ण काहिली तडतड उडतात,
तशीं लागलीं फिरूं प्रकरणें खात्याखात्यांत.
परंतु नाहीं कुणी मिळाला खुनी गुन्हेगार,
चिडूनि होता सरकाराचा अंध अहंकार. ११

कढईंतील तापलेल्या तेलांत मोहऱ्या टाकल्या म्हणजे त्या जशा तडतड उडतात तशी सरकारच्या खात्याखात्यांतून प्रकरणें फिरूं लागलीं; परंतु खून करणारा गुन्हेगार कोणी मिळाला नाहीं. त्यामुळें सरकारचा अंध अहंकार भडकून होता.

**झालि परीक्षा म्हणूनि आला भगूर गांवाला.**
**विनायकाला ताप लागला याच सुमाराला.**
**गंगा जैशी हिमालयांतुनि भारत भूमीस**
**धों धों धांवत धावत येते तिज भेटायास- १२**

त्याच सुमारास विनायकाला ताप येत होता म्हणून परीक्षा संपतांच तो भगूर गांवाला आला. धों धों धावत धावत जशी गंगा नदी भारतभूमी[illegible] भेटावयास येते,

**किंवा जैसें मूल भेटतें धांवत आईला,**
**तसा भेटला प्रथम विनायक दुर्गादेवीला.**
**आणि देविला म्हणें घालुनी तीन नमस्कार -**
**कुठें असूं दे सुखी असूं दे तुझा सुभेदार ! १३**

किंवा जसें आईला पाहिल्यावर मूल धावत जाऊन तिला भेटतें तसा तो प्रथम देवीला जाऊन भेटला आणि तिला त्यानें तीन नमस्कार घातले. तुझा सुभेदार (चाफेकर) कोठेंही असो, पण सुखी असूं दे अशी त्यानें देवीला प्रार्थना केली.

**तुझीच इच्छा आणि कृपा ही तुझी तयावरती**
**म्हणून त्यानें बळी घेतले भर रस्त्यावरती.**
**प्रसन्न होउनि तुळजापुरच्या देवि भवानीनें**
**रक्षावा तो काम कराया याहुनि जोमानें. १४**

तुझी इच्छा होती आणि तुझी कृपा होती म्हणून त्यानें भर रस्त्यावर बळी घेतले. तुळजापूरच्या देवी भवानीनें यापेक्षांही जोमानें त्याच्याकडून देशकार्य व्हावें म्हणून त्याचें रक्षण करावें.

**पिंजऱ्यांतला उंदिर करतो चिवचिव सुटण्याची,**
**तशीच तडफड चालत होती पोलिस खात्याची.**
**परंतु नाहीं कळलें कांहीं नांव गांव त्याचें**
**ज्यांनि घेतलें भरल्या रात्रीं बळी इंग्रजांचे.** १५

पिंजऱ्यांतल्या उंदराची सुटण्यासाठीं जशी चिवचिव चालत असते तसेंच पोलीस खातें तडफडत होतें. परंतु ज्यानें भर रस्त्यावर इंग्रजांचे खून केले त्यांच्या नांवाचा आणि त्यांच्या गांवाचा पत्ता लागला नाहीं.

**अपूर्वता पाहूनि वधाची चिडलें सरकार;**
**वधी मिळेना म्हणूनि चढली रागाची तार.**
**असेल कारस्थान सर्व हें श्रीमन् टिळकांचें**
**या शंकेनें मस्तक फिरलें नोकरशाहीचें !** १६

खून झाले ही अपूर्व गोष्ट होती आणि त्यामुळें सरकार चिडून गेलें होतें. खुनी मिळाला नाहीं म्हणून सरकारच्या रागाची तार चढली होती. हें सर्व टिळकांचें कारस्थान असावें या विचारानें नोकर-शाहीचें मस्तक भणाणून गेलें होतें.

**श्रीटिळकांना नेउनि केलें बंद तुरुंगांत,**
**शहर पुण्यांतील वृत्त पोचलें हिंदुस्थानांत;**
**प्लेगामधलें कष्ट पाहुनी श्रीमन् टिळकांचे**
**जडलें होतें टिळकांवरती प्रेम समाजाचें !** १७

श्रीटिळकांना सरकारनें तुरुंगांत नेऊन ठेवलें ही बातमी हिंदुस्थानभर झाली. प्लेगामध्यें टिळकांनीं लोकांसाठीं जे कष्ट घेतले त्यामुळें त्यांच्याबद्दल समाजास प्रेम वाटत होतें.

**ज्या सत्तेला वाटत असतो संशय सर्वांचा**
**तिचा न असतो मार्ग सरळ तो राज्य करायाचा.**
**चोर नि परसरकार दोन या महान धूर्तांची**
**एकच असते समाजाकडे रीत बघायाची. १८**

ज्या सत्तेला सर्वांचाच संशय वाटत असतो त्या सत्तेची राज्य करण्याची पद्धत सरळ असत नाहीं. चोर आणि परकीय राज्यकर्ते या या महा धूर्तांची समाजाकडे बघण्याची दृष्टि एकच असते.

**धो धो पाउसकाळीं अथवा प्रमत्त वाऱ्यांत**
**पिलें भयानें तरूकोटरीं लपून बसतात;**
**तसे बिचारे लोक ऐकुनी वार्ता टिळकांची**
**भिऊनि बसले कांहि लावुनी दारें वाड्यांचीं. १९**

धों धों पाऊस पडत असतां किंवा सोसाट्याचा वारा सुटला असतां पिलें भीतीनें जशी तरुकोटरीं लपून बसतात, त्याप्रमाणें टिळकांना पकडून नेल्याची बातमी ऐकून भीतीनें कांहीं लोक वाड्याचे दरवाजे बंद करून बसले.

**सरकाराला वाटत असतो द्वेष पुढाऱ्यांचा,**
**पाठ पुरावा समाज करतो अशा पुढाऱ्यांचा.**
**मान आणि सन्मान वाढला श्रीमन् टिळकांचा,**
**होउं लागला सरकाराला विरोध लोकांचा. २०**

सरकारला पुढाऱ्यांचा द्वेष वाटत असतो. तर समाज अशा पुढाऱ्यांचा पाठपुरावा करीत असतो. श्रीमन् टिळकांचा मान आणि सन्मान वाढला. आणि सरकारला लोकांचा विरोध होऊं लागला.

**काय करावें विनायकाला कळें जरी फार,**
**वय चवदाचें मूल काय तें करूनि करणार !**
**कसें करावें काय करावें अनेकदां कळतें,**
**कळुनि वागणें अनेक वेळां शक्य कुणा नसतें.** २१

अशा वेळीं काय करावें हें विनायकाला जरी कळत होतें तरी चवदा वर्षांचें तें मूल करून काय करणार ! कसें करावें आणि काय करावें हें अनेकदां कळतें परंतु कळूनसुद्धां त्याप्रमाणें वागणें अनेक वेळा कोणाला शक्य असत नाहीं.

**जसा केसरी जळफळ तडफड करतो जाळ्यांत**
**तशीच तडफड करी विनायक भगूर गांवांत.**
**कशीं प्रकरणें होतिल जातिल कोण कसे फांशीं**
**कसें पुढें होईल कळेना म्हणे स्वतांपाशीं !** २२

जाळ्यांत सापडलेल्या सिंहाची जशी तडफड चाललेली असते तशीच भगूर गांवात विनायक तडफड करीत होता. या प्रकरणाचें काय होणार आणि कोण कसे फांशीं जाणार आणि पुढें होणार तरी काय असें तो स्वतःशीच म्हणे.

**हेर धाडले कुठुनि कळावा कांहि समाचार,**
**परंतु हेरांकडुनि कळेना कोण गुन्हेगार !**
**अखेर केलें प्रगट निवेदन या अवघड वेळीं**
**गांवोगावीं सरकारानें वाजविली थाळी.** २३

कांहीं बातमी कळावी म्हणून सरकारनें हेर पाठवले पण कोणी गुन्हा केला याचा हेरांना पत्ता लागेना ! अखेर सरकारनें जाहीरनामा प्रसिद्ध केला आणि गांवोगांवी दवंडी पिटली.

**केला वध सांगेल कुणी जर नांव कुणी त्याचें**
**बक्षिस त्याला मिळेल सुरती वीस हजारांचें.**
**प्रलोभनाला महत्त्व असतें राजकारणांत;**
**राजनीतिचा भाग विलोभन सुज्ञ मानतात. २४**

कोणी खून केला त्याचें जर कोणी नांव सांगेल तर त्याला सुरती वीस हजार रुपयांचें रोख बक्षीस देण्यांत येईल. राजकारणांत लालूच दाखविणें याला फार महत्त्व असतें. लालूच दाखविणें हा राजकारणाचा एक भागच आहे असें शहाणे मानतात.

**जाइजुई यामधें कुणाचा गंध मजेदार,**
**गुलाब कमळामधें कुणाचा रंग छानदार,**
**कांचन अन् कामिनी यामधें कोण भलाईचे,**
**यांत नेमकें नाहि कुणाला कांहि कळायाचें. २५**

जाई आणि जुई यांच्यांत अधिक मजेदार गंध कोणाचा किंवा गुलाब आणि कमळ यांच्यापैकीं अधिक छानदार रंग कोणाचा, किंवा कांचन आणि कामिनी यांमध्यें अधिक आकर्षण कोणाचें हें कोणाला कांहीं नेमकें सांगतां येत नाहीं.

**वृक्ष लतांना न वाटतें भय पाउसपाण्याचें;**
**भय वाटे पण तोडाऱ्यांच्या दुष्ट कुऱ्हाडीचें.**
**पशुपक्षांना वाटत नाहीं भीति निसर्गाची,**
**भयभीती वाटतें तयांना मात्र शिकाऱ्याची! २६**

वृक्ष आणि वेली यांना पाउसपाण्याचें भय वाटत नाहीं. पण तोडारी लोकांच्या दुष्ट कुऱ्हाडीचें त्यांना भय वाटतें. पशुपक्षी निसर्गाला भीत नाहीत. त्यांना शिकाऱ्यांची भयभीति वाटते.

**विनायकाला चैन पडेना याच विचारानें**
**म्हणे मनाशी ठेवावा तो सुखांत देवानें;**
**अशीच कांहीं होवो त्यांच्या हातुनि सत्कार्यें**
**देशभक्त तो लढत रहावा देशास्तव शौर्यें !** २७

कोणी लालूच घेऊन साक्षीदार होईल किंवा काय या विचारानें विनायकाला चैन पडेना ! तो वधी देवानें सुखांत म्हणजे सुरक्षित ठेवावा व अशींच सत्कार्यें त्याच्या हातून होवोत आणि देशासाठीं तो देशभक्त लढत रहावा असें तो मनाशीं म्हणे. म्हणजे असे त्याच्या मनांत विचार चालत.

**फूल उमललें कुठें तरी तें सुकून जायाचें**
**जीव जन्मले त्यांस कधीं तरि असे मरायाचें.**
**मरायचें तर सार्थक व्हावें जीवन जगण्याचें;**
**मरण आपुलें उपयोगाला यावें राष्ट्राचे !** २८

उमललेलें फूल कोठेंतरी सुकून पडावयाचेंच, जो जन्मास आला त्याला कधींतरी मरावयाचेंच असतें, पण मरावयाचें असलें तरी जीवन जगल्याचें सार्थक झालें पाहिजे. आपलें मरण राष्ट्राच्या उपयोगाला यावें.

**ज्यानें छळले लोक रडविले मुलें धायधाय,**
**वध त्याचा जाहला यामधें वाइट तें काय ?**
**गुलाम मानुनि करी प्रजेवर जुलूम जुलमाचा**
**असाच असतो अखेर त्याचा शेवट व्हायाचा.** २९

ज्यानें मुलांना धाय धाय रडावयास लावलें आणि ज्यानें लोकांना छळलें त्याचा खून झाला यांत काय वाईट आहे ! प्रजा आपली गुलाम आहे असें समजून जो प्रजेवर जुलमाचा जुलूम म्हणजे अतिशय जुलूम करतो त्याचा अखेर असाच शेवट व्हावयाचा असतो.

**राष्ट्ररिपूच्या बलिदानासम पुण्य दुजें नाहीं.**
**राष्ट्रद्रोहासमान दुसरें पाप असें नाहीं.**
**घेति बळी जे राष्ट्रहितास्तव स्वर्ग तया मिळतो.**
**धन्य वंश तो इतिहासाचीं पानें भूषवितो.** ३०

राष्ट्राच्या शत्रूचा प्राण घेणें यासारखें दुसरें पुण्य नाहीं. राष्ट्राच्या हितासाठीं जे दुसऱ्याचा प्राण घेतात त्यांना स्वर्ग मिळतो. तो वंश धन्य होय. इतिहासाचीं पानें त्याच्यामुळे भूषविलीं जातात.

**उघडपणें बोलतो विनायक चारा चौघांत,**
**कसें मुलांचें होइल म्हणती दामोदरपंत!**
**म्हणुनि बाळा प्रथम होउं दे तव विद्या पुरती**
**विनायकाला जवळ घेउनीं समजावुनि देती.** ३१

असें विनायक उघडपणें चारचौघांत बोलत असे. त्यामुळें या मुलाचें काय होणार असें दामोदरपंत म्हणत. म्हणून 'बाळा प्रथम तुझी विद्या पुरी होऊं दे' असें विनायकाला जवळ घेऊन ते त्याला सांगत.

**चंद्रागमनें निळें निळें नभ जातें उजळून,**
**विद्वत्तेनें सद्‌गुण सगळे दिसती शोभून.**
**कळकटलेलें जुनें पुराणें पात्र जसें दिसतें,**
**विद्वत्तेविण पांडित्याला कळा तशी येते!** ३२

चंद्रोदयानें जसें निळें नभ उजळून जातें त्याप्रमाणें विद्वत्ता संपादन केली म्हणजे सगळे सद्‌गुण शोभून दिसतात. जुनेंपुराणें कळकटलेलें भांडें जसें दिसतें त्याप्रमाणें विद्वत्ता नसली तर पांडित्याला तशी कळा येते.

* * *

**देशासाठीं धर्मासाठीं जे कोणी लढले**
**धन्य धन्य ते बळी घेउनी स्वतां बळी गेले.**

## (१४) द्रविड बंधु

होता चिंता करित विनायक भगूर गांवांत
  विशेष होतें घडत पुण्याच्या एका पेठेंत.
मुरलिधराच्या मंदिरामधें सकाळच्या वेळीं
  करावया श्रावणी मंडळी कांहि जमा झाली. ३३

भगूर गांवीं विनायक अशा चिंतेंत दिवस काढीत असतां पुण्याच्या एका पेठेंत एक विशेष घटना घडत होती. मुरलीधराच्या देवळांत सकाळींच कांहीं ब्राह्मण श्रावणीसाठीं आले होते.

झाली गोळा मुलें कि येतो भर उत्साहाला,
  वसंत येता बहर बहरतो गोड वनश्रीला,
वर्षाकालीं नदीस येतो जसा महापूर,
  चार लोक जमल्यावर येतो गप्पांना पूर. ३४

चार मुलें गोळा झाली कीं त्यांच्या उत्साहाला जोर येतो. वसंत आला कीं वनश्रीला गोड बहर येतो, किंवा पाउसकाळीं नदीला जसा महापूर येतो त्याप्रमाणें चार मंडळी एकत्र जमली कीं गप्पांना जोर येतो.

विषयाविषयांमधें संगती नाहिं असायाची,
  मतें कुणाचीं कांहि कुणाला नाहिं पटायाचीं.
चालत असते अशी उचापत चार मंडळींत
  निर्हेतुक या उचापतीला गप्पा म्हणतात. ३५

एका विषयाचा दुसऱ्या विषयाशीं संबंध असावयाचा नाहीं, एकाचीं मतें दुसऱ्याला पटावयाचीं नाहींत अशी उचापत चार मंडळींत चाललेली असते आणि अशा या निर्हेतुक उचापतींना गप्पा म्हणतात.

**गप्पा ही करमणूक असते नियमित लोकांची;**
**लोकशाहिची शुभ गंगोत्री हीच म्हणायाची.**
**कुणी म्हणाले बेड्या घालुनि नेले टिळकांस**
**आणि अतां ठेवणार नेउनि तयास ठाण्यास. ३६**

कांहीं मोजक्या लोकांची गप्पा ऐकणें ही करमणूक असते. लोकशाहीची शुभ गंगोत्री हीच होय. म्हणजे लोकशाहीच्या गंगेचा येथूनच उगम असतो. कोणी म्हणाले, टिळकांना बेड्या ठोकून नेलें आणि त्यांना आतां ठाण्यास नेऊन ठेवणार आहेत.

**कुणी म्हणे, टिळकांचें आहे हें कारस्थान,**
**साहेबाचा खून करविला तरुण मुलांकडुन.**
**टिळकावांचुनि धाडस असलें कुणास होणार!**
**टिळकावांचुनि असल्या गोष्टी कुणास सुचणार. ३७**

कोणी म्हणाले, हें सारें टिळकांचें कारस्थान आहे. तरुण मुलांकडून साहेबाचा खून टिळकांनींच केला! टिळकांखेरीज असें धाडस कोण करणार! टिळकांखेरीज असल्या गोष्टी कोणाला सुचणार आहेत!

**कुणी म्हणाले ,छे हो असलें बोलुं नका कांहीं,**
**गोष्ट अशी ही टिळकांकडुनी घडायची नाहीं,**
**सर्व साहसें म्हणणें अपुल्या फक्त पुढाऱ्यांची**
**दिसून येते सदा सर्वदा वृत्ति समाजाची. ३८**

कोणी म्हणाले, छे हो, असलें कांहीं बोलूं नका. टिळक असलें कृत्य करणार नाहींत. साहसाच्या सर्व गोष्टींचें श्रेय आपल्या पुढाऱ्यांना देणें अशी समाजाची सदोदित वृत्ति असते.

**कुणी म्हणे आहेत यामधें नातू सरदार**
**उगीच कां पकडील तयांना इंग्रज सरकार !**
**कुणी म्हणाले होतील अजुनि खून इंग्रजांचे.**
**कुणी म्हणे, आहेत अजूनी लोक धरायाचे.** ३९

कोणी म्हणाले, यांत सरदार नातूंचाही हात असावा. इंग्रज सरकारनें त्यांना उगीच का पकडलें ? कोणी म्हणाले, इंग्रजांचे आणखी खून होतील; कोणी म्हणाले, अजून धरपकड होणार आहे.

**कुणी म्हणाले उगाच मारूं नका अशा बाता.**
**सांगत होते कुणी कुणाला भलभलत्या वार्ता.**
**चार मतांचे चार दिशांनीं जन जमल्यावरती,**
**गप्पागोष्टी करावयाला विषय नसे कमती.** ४०

कोणी म्हणाले, उगीच अशा थापा मारूं नका. कोणी कोणाला भलत्याभलत्या वार्ता सांगत होते. चार मतांचे चार दिशांनीं लोक जमल्यावर गप्पा गोष्टी करावयास विषय कमी पडत नाहींत !

**पुरांत येइल काय वाहुनी नाहिं कळायाचें !**
**चार मंडळी काय बोलतिल नाहिं कळायाचें !**
**नदी कसा बदलील ओघ हें नाहिं कळायाचें !**
**गप्पा जातिल कुठुन कोठें नाहिं कळायाचें !**

पुरांत काय वाहून येईल हें कळायाचें नाहीं. चार मंडळी जमल्यावर ते काय बोलतील हें कळावयाचें नाहीं, नदी आपला ओघ कसा बदलील हें कळावयाचें नाहीं, त्याचप्रमाणें गप्पा कोठून सुरू होतील आणि कोठें जातील हें कळावयाचें नाहीं.

**कधी कशाची उठेल अफवा नाहिं कळायाचे !**
**धरण कोणतें फुटेल केव्हां नाहिं कळायाचें.**
**उगिच कशाला तुम्ही बोलतां हें भलतेंसलतें.**
**कुणी म्हणाले, कळेल लौकर काय पुढें होतें. ४२**

कोणती अफवा कधीं उठेल हें कळायचें नाहीं, कोणतें धरण केव्हां फुटेल हें कळावयाचें नाहीं. भलतेंसलतें उगाच असें कशाला बोलता? पुढें काय होणार हें लौकर कळेल असें कोणी म्हणाले.

**नांव निशाणी कळविल त्याला वीस हजारांचें**
**प्रगटपणें लाविलें विलोभन पारितोषिकाचें.**
**आणि ऐकतो सरकारांतुनि लठ्ठ पगाराची**
**कुणी म्हणाले, त्यास नोकरी मिळेल जन्माची. ४३**

ज्यानें खून केला त्याची नांवनिशाणी जो कळवील त्याला वीस हजार रुपये मिळतील असें बक्षिसाचें आकर्षण जाहीर झालें आहे. आणि लठ्ठ पगाराची कायमची नोकरी सरकार देणार आहे असें ऐकतों, असें कोणी म्हणाले.

**आम्हि ऐकतों असें बोलुनी खुशाल ओघांत**
**स्वमत आपुलें कांही सज्जन सोडुनि देतात.**
**कांहि लोक उडवूनि वावडी हवेंत वार्तेची**
**उगाच चेष्टा करीत फिरती लोकसमाजाची ! ४४**

बोलण्याच्या ओघांत कांहीं सज्जन लोक आम्ही ऐकतो असें म्हणत स्वत:चेंच मत घुसडून देतात. कांहीं लोक हवेत बातम्यांच्या वावड्या उडवून लोकांची उगाच चेष्टा करीत फिरतात.

**जशी पाहते घार खालती आकाशांतून**
**पहात होते, ऐकत होते देउनिया कान.**
**ऐकलेंस कां निळू म्हणाले द्रवीड मुलग्याला**
**आणि चावला ओठ तयांनीं लगेच तो अपुला ! ४५**

आकाशांतून घार जशी खाली बघते त्याप्रमाणें ते पहात होते आणि कान देऊन ऐकत होते. द्रवीड आपल्या मुलाला म्हणाले, ' निळू, ऐकलेंस कां ' आणि लगेच त्यांनीं आपला ओठ दाबला.

**होते शेजारीच कुणीसें नीटस डोळ्यांचे,**
**होतें नातें कांहि दूरचें त्यांचें द्रविडांचें.**
**त्यांनि पाहिला प्रकार आला संशय द्रविडांचा**
**हेरगिरी करण्यांत असें क्रम, क्रम पहिला त्यांचा. ४६**

द्रविडांच्या शेजारींच नीटस डोळ्यांचा कोणी तरी एक इसम बसला होता. त्याचें आणि द्रविडांचें लांबचें नातें होतें. त्यानें हा प्रकार पाहिला. त्याला द्रविडांचा संशय आला. हेरगिरी करण्याच्या कामीं त्याचा पहिला नंबर होता.

**नजर घारिची आणि कान असतील चातकाचे**
**काम चांगलें होतें हातुनि अशाच हेरांचें.**
**जसा एकटा माड झुलावा पोफळ-बागेंत**
**तसा तयांचा लौकिक होता समस्त हेरांत. ४७**

चातकासारखे कान आणि घारीसारखी नजर ज्यांची असते अशाच हेरांचें काम चांगलें होतें. पोफळीच्या बागेंत जसा एकादा माड झुलतो तसा साऱ्या हेरांत त्याचा लौकिक होता.

**नाहिं दवडली वेळ घेतली द्रविडांची भेट**
**आणि काढली तयें वधाची सहजपणें गोष्ट.**
**फुंक मारुनी जसा चावतो उंदिर पायास**
**तसें वृत्त घेतात काढुनी हेर विनायास !** ४८

वेळ न दवडतां त्यानें द्रविडांची भेट घेतली आणि बोलण्याच्या ओघांत त्यानें खुनाचा सहज विषय काढला. फुंक मारीत जसा उंदीर पायाला चावतो तसे हेर सहज बातमी काढून घेतात.

**द्रविड म्हणाले 'छे हो नाहीं ठाउक आम्हाला;**
**नाहीं माझीं मुलें जायचीं भलत्या मार्गाला.**
**दार लावुनी दोघे होते बोलत केव्हांचे;**
**काय एवढें कोण बोललें कसें कळायाचें !'** ४९

द्रविड म्हणाले, छे हो, 'आम्हांला कांहीं माहिती नाहीं. माझी मुलें अशा भलत्याच मार्गाला जावयाचीं नाहींत. दार लावून ते दोघे केव्हांचे बोलत होते. एवढें कोण काय बोललें हें कसें कळणार !'

**दार उघडुनी द्रवीड आले बोलत पडवींत,**
**डाव्या खांद्यावरती पडली पाल अकस्मात.!**
**द्रवीड होते खुशींत झालें समाधान त्यांना**
**शुभाशुभाचा विचार त्यांच्या मनांत सावेना.** ५०

दार उघडून द्रवीड बोलत बोलत पडवीत आले. त्यांच्या डाव्या खांद्यावर अकस्मात् पाल पडली. द्रवीड खुशींत होते. त्यांना समाधान झालें होतें. शुभाशुभाचा विचार त्यांच्या मनांत आलाच नाहीं.

**ते गेल्यावर विचार झाले सुरू द्रवीडांचे.**
**पानावरतीं होतें कोठें लक्ष तरी त्यांचें ?**
**अग्नीसंन्निध जसें वितळतें भांड्यांतिल लोणी;**
**तशीं वितळतीं कुणा कुणांचीं मनें प्रलोभांनीं. ५१**

तो गेल्यावर द्रविडांचे विचार सुरू झाले. जेवणावर त्यांचें लक्ष तरी कोठें होतें. भांड्यांतलें लोणी विस्तवावर ठेवलें असतां जसें वितळतें तशीं कोणाकोणाचीं मनें प्रलोभनानें बदलतात.

**काय करावें बरें एवढ्या वीस हजारांचे,**
**नव्या योजनांमधें रंगुनी गेलें मन त्यांचें.**
**असेच गेले द्रविडांचे दिन कांहिं विचारांत,**
**कधीं बरें हे रुपये येतिल माझ्या हातांत!! ५२**

या वीस हजार रुपयांइतक्या मोठ्या रकमेचें करावयाचें तरी काय ?नव्या योजनांमध्यें त्यांचें मन रंगून गेलें. माझ्या हातीं ही रक्कम येणार तरी केव्हां अशा विचारांत द्रविडांचे कांहीं दिवस असेच गेले.

**अनायसें जाहला लाभ जर कुणास पैशांचा**
**अखेर होतो नाश त्यामुळें गोड जीवनाचा.**
**भ्रम पडतो चित्तास न राहे स्मृति परिणामाची.**
**मस्त राहतो करित कल्पना सुखसाम्राज्याची. ५३**

कांहीं श्रम न घेतां जर कोणाला द्रव्याचें डबोलें मिळालें तर त्याच्या गोड जीवनाचा अखेर नाश होतो. त्याच्या चित्ताला भ्रम पडतो आणि परिणामाचा विचार रहात नाहीं.

**मावळला दिन सांज जाहली पडला काळोख**
**आणि आपुल्या मुलांस त्यांनीं मारियली हांक.**
**कधीं गणू सुटणार आपुला सांग मला सारें;**
**सोडुनि द्या हें देशभक्तिचें भिकारडें वारें. ! ५४**

सूय मावळला. संध्याकाळ झाली. आणि काळोखही पडला. द्रविडांनीं आपल्या मुलाला हांक मारली आणि म्हणाले गणू येणार तरी केव्हां हें मला सारे सांग. देशभक्तीचे हे भिकारडे छंद सोडून द्या.

**देशभक्तिचें व्यसन तुम्हाला लावियलें कोणी ?**
**मनें मुलांची बिघडवलीं या उगाच टिळकांनीं.**
**द्रविड बोलले असें मुलांना तोंच गणू आला.**
**तो नव्हता गणु, दुर्दैवाचा तो होता घाला ! ५५**

हें देशभक्तीचें व्यसन तुम्हाला लावलें कोणी ? टिळकांनी मुलांचीं मनें निष्कारण बिघडवून टाकलीं आहेत. द्रवीड मुलांना असें जो बोलत आहेत तों गणू आला. गणू कसला, द्रविडांच्या घरावर तो दुर्दैवाचा घाला होता.

**जसें न कळतें पडेल केव्हां वळवाचें पाणी**
**तसेंच हें दुर्दैव न कळतें येइल कोठोनी !**
**दुसऱ्याचें सुख, जीवन असतें द्वाड नशीबाचें !**
**दुसऱ्याला रडवण्यांत असतें समाधान त्याचें! ! ५६**

वळवाचा पाऊस कधीं पडेल हें कळत नाहीं तसेंच कोठून दुर्दैव येऊन उभें राहील हें कळत नसतें. दुसऱ्याचें सुख हें द्वाड नशिबाचें अन्न असतें. दुसऱ्यांना रडविणें हें त्यांचें समाधान असतें !

**उनाड, चावट, खटचाळ सारीं मुलें द्रवीडांची;**
**ठाउक होती शहर पुण्याला दुष्कीर्ती त्यांची.**
**खोटी केली सही म्हणोनी अनेक वर्षांची,**
**होति जहाली गणूस शिक्षा सक्त मजूरीची. ५७**

द्रविडांची सारी मुलें उनाड, खटचाळ आणि चावट आहेत अशी त्यांची दुष्कीर्ती शहर पुण्याला ठाऊक होती. खोटी सही केल्याबद्दल गणू द्रविडाला अनेक वर्षांची सक्त मजुरीची शिक्षा झाली होती.

**शिक्षा होता पुरीं न आला सुटून बाहेर**
**नवल वाटलें कुणास; झाले कुणि चिंतातूर.**
**खोटा म्हणुनी लौकिक होता गणू द्रवीडाचा;**
**असे पहारा नित्य तयावर पोलिस खात्याचा. ५८**

ती शिक्षा पुरी न होतांच तो सुटून बाहेर आला यांचें कोणाला नवल वाटलें तर त्याची कोणाला चिंता वाटली. गणू द्रविड हा खोटा आहे म्हणजे तो वाटेल तें खोटें करील असा त्याचा लौकिक होता. आणि म्हणून पोलिस खात्याची त्याच्यावर नेहमी नजर असे.

**खुनी धराया सुरू जाहले यत्न द्रवीडांचे;**
**पोलिसामधें वजन वाढलें सहजपणें त्यांचें!**
**कमलदलावरचें जल किंवा वचन दरिद्र्याचें,**
**तसेच असती स्नेह सर्वदा पोलिस खात्याचे. ५९**

खुनी शोधून काढण्याचे द्रविडांचे प्रयत्न सुरू झाले. त्यामुळें पोलिसांत त्याचें सहजच वजन वाढलें. कमळाच्या पानावरील जलबिंदु प्रमाणें किंवा दरिद्र्याच्या वचनाप्रमाणे सर्वदा पोलिस खात्याचा स्नेह असतो.

**परी सत्य हें कळलें नाहीं गणू द्रवीडाला,**
**गेला भाळुनि मूर्ख तयांच्या गोड विलोभाला.**
**चित्त जयाचें लोभुनि जातें लोभ-विलोभास,**
**हिताहिताची पारख होइल कशी बरें त्यास! ६०**

परन्तु हें सत्य गणू द्रविडाला कळलें नाहीं. पोलिस खात्याच्या विलोभनाला तो मूर्ख भाळून गेला. ज्याचें चित्त लोभविलोभनाला मोहून जातें त्याला स्वत:च्या हिताहिताची पारख कशी बरें होणार!

**कधीं कधीं कावळा आणतो ऐट कोकिळाची,**
**तशीच असतें उर्मट खुळचट खोड दुर्जनांची.**
**खरें म्हणोनी असत्य जातें विकलें बाजारीं**
**कधीं कधीं दुर्जनास येतो भाव तसा भारी! ६१**

कधीं कधी कावळा जशी कोकिळाची ऐट आणतो तशीच उर्मट दुर्जनांना ऐट आणण्याची खोड असते. बाजारांत असत्य हेंच खरें म्हणून जसें विकलें जातें त्याचप्रमाणें दुर्जन लोकांना कधीं कधीं फार भाव येतो.

**आधिच दुर्जन त्यांत विलोभन वीस हजारांचें**
**आणि त्यामधें प्रेम नाटकी पोलिस खात्याचें;**
**फुगून गेला दुष्ट, ठेंगणें नभ त्याला झालें.**
**आणि व्हायचें अखेर त्याच्या तें नशिबीं आलें. ६२**

आधींच दुर्जन त्यांत वीस हजार रुपयांची लालूच आणि पोलिस-खात्याच्या नाटकी प्रेमाची त्यांत भर!! त्यामुळें तो दुष्ट फुगून गेला. त्याला आकाश ठेंगणें वाटू लागलें. आणि अखेर जें व्हावयाचें तेंच त्याच्या नशिबांत आलें.

मधुर ध्वनि ऐकून नाग जरि नादावुनि गेला
दूर रहावें जपून पण पद लावु नये त्याला.
फरासखान्यामधें जयांची ये जा ये असते
त्यांच्यापासुनि दूर रहावें हेंच बरें असतें. ६३

गोड आवाजानें नाग जरी नादावून गेला तरी जपून दूर रहावें, त्याला पाय लावूं नये. फरासखान्यांत म्हणजे पोलिस खात्याचे कचेरींत ज्याची ये जा असते त्याच्यापासून लांब रहावें हेंच चांगलें !

तोंच मान्यता छापुनि आली अनेक पत्रांत
दामोदर चाफेकर झाले प्रसिद्ध देशांत.
मित्र समजलें समजायाचें या मागिल गूढ,
कुणी त्यांतले सहज बोलले मी घेइन सूड ! ६४

तोंच खून केल्याचा कबुली जबाब वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाला आणि दामोदर चाफेकर यांचें नांव देशभर गाजलें. या मागें म्हणजे दामोदर चाफेकर कसे सांपडले या मागचें गूढ त्याचे मित्र समजले. त्यांच्यापैकीं कोणी सहज म्हणाले कीं याचा सूड आम्ही घेऊं.

* * *

देशासाठीं धर्मासाठीं जे कोणी लढले
धन्य धन्य ते बळी घेउनी स्वतां बळी गेले !

## (१५) चाफेकरांना फांशी

प्रसिद्ध होता नांव दामुचें भारत हादरलें;
भिऊन गेले लोक बिचारे शहर पुण्यामधले.
ऐकुनि गडगडणें नि विजेच्या चमका पाहूनी
भितात पोरें तसें भयानें गेले जन भिउनी. ६५

दामोदर चाफेकर याचें नांव प्रसिद्ध होतांच साऱ्या भारताला धक्का बसला. पुणें शहरांतले बिचारे लोक तर घाबरूनच गेले. मेघाचें गडगडणें ऐकून आणि विजेचा चकचकाट पाहून मुलें जशी भिऊन जातात तसे लोक भिऊन गेले.

**बघून मांजर जैसे उंदिर लपून बसतात,**
**कांहीं सज्जन लपुन राहिले घराघरांतुन !**
**डाग लाविला या मूर्खानें म्हणती जन कोणी;**
**नांव राखलें बहाद्दरानें जन म्हणती कोणी. ६६**

मांजराला बघून जसे उंदीर लपून बसतात, तसे कांहीं सज्जन घराघरांतून लपून बसले. या मूर्खानें (म्हणजे दामोदरपंत यांनीं) पुण्याच्या लौकिकाला डाग लावला असें कोणी म्हणाले तर या बहाद्दरानें पुण्याचें नांव राखलें असें कांहीं लोक म्हणाले.

**स्वातंत्र्यप्रिय शहर पुण्याची वाढविली कीर्ती**
**धन्य मर्द हा धन्य वीर हा असें कुणी म्हणती.**
**लोकांचें मत म्हणजे असतें डहाळ आम्ब्याची,**
**दोन्हि बाजुनि लोक बोलती; रीतच लोकांची. ६७**

स्वातंत्र्यप्रिय पुणें शहराची कीर्ति वाढविली, या मर्दाची धन्य आहे, या वीराची धन्य असें कोणी म्हणाले. आंब्याच्या डहाळीसारखें लोकांचें मत असतें. दोन्ही बाजूंनीं लोक बोलतात. लोकांना ही सवयच असते.

**वनस्पतीचा गुण न कळूनी फेकुनि देतात**
**तसें न कळतां महत्त्व, कोणी निंदा करतात.**
**भिऊनि गेले कोणी, गेले शहरहि सोडून**
**आणि टाकलीं नांवें अपुलीं कोणी बदलून. ६८**

वनस्पतीचा गुण न कळल्यामुळें ती जशी फेकून देतात त्याचप्रमाणें कार्याचें महत्त्व न कळल्यामुळें लोक कार्याची निंदा करतात. कांहीं लोक भिऊन गेले व त्यांनीं पुणें सोडलें तर कोणी आपलीं नांवेंच बदलून टाकलीं.

**बारि संपली न्यायमंदिरांतील तमाशाची.**
**सांगितली श्रीन्यायमूर्तिनीं शिक्षा फांशीची !**
**जें व्हायाचें तेंच जाहलें हें परिणामाला.**
**परिणामाची होति कल्पना सर्वच लोकांना!** ६९

न्यायमंदिरांतील चौकशीचें काम संपलें. न्यायमूर्तींनीं फांशीची शिक्षा सांगितली. परिणामीं जें व्हावयाचें तेंच झालें. निकालाची कल्पना सर्वांनाच होती.

**ठेवियले दामूस पुण्याच्या भव्य तुरुंगांत;**
**करीत होतें मरण तयाच्या मरणाची साथ!**
**भेटुनि नाहीं दिलें कुणाला स्नेहि सोबत्यास;**
**नाहिं भेटले वडील किंवा भाउ कुणी त्यास.** ७०

दामोदर चाफेकर यांना पुण्याच्या भव्य तुरुंगांत आणून ठेवलें. त्या ठिकाणीं मरण त्याच्या मरणाची सोबत करीत होतें. स्नेही सोबत्यांपैकीं कोणालाही भेटूं दिलें नाहीं. वडिलही त्याला भेटले नाहींत किंवा भाऊही त्याला भेटले नाहींत.

**नाहीं वाटत भयभीती कां विचारलें कोणी,**
**फांशी असते किती भयंकर आलें कां ध्यानीं ?**
**कोणी गवई सहज बोलतां तान जशी घेतो**
**'छे छे भीती यांत कशाची' सहज म्हणाला तो.** ७१

तुला भयभीती वाटत नाही कां ? फांशी किती भयंकर असते हें तुझ्या लक्षांत आलें कां असें कोणी त्याला विचारलें. तेव्हां जातां जातां कोणी गवई जशी तान घेतो तसें त्यानें 'छे हो त्यांत कसली भीति आहे' असें त्यानें उत्तर दिलें.

**जसा शिकारी स्वतांच होतो शिकार वाघाची,**
**घोड्यावरुनी पडे पालथी स्वारी कोणाची,**
**फूल चिरडतें पडुनि पावलें त्यावर कोणाचीं,**
**तसाच मेला रँड लागुनी गोळि बंदुकीची.** ७२

जसा शिकारी स्वतःच वाघाची शिकार होतो, किंवा कोणाची स्वारी घोड्यावरून खालीं पडते, किंवा लोकांच्या पावलांखालीं जसें फूल चिरडून जातें तशी बंदुकीची गोळी लागून रँड मेला.

**तसाच जाइन मीही मरुनी देतील मज फांशी !**
**भिण्यासारखें काय यामधें भिऊन जायाशी ! !**
**फडक्यांचें व्रत चालविलें मी त्यांच्यामागून;**
**दोन मारिलें गोरे आहे त्यांत समाधान.** ७३

आणि मीही एक दिवशीं तसाच मरून जाईन. मला फांशी देतील. यांत भिण्यासारखें काय आहे ? फडक्यांच्या मागून मी त्यांचें व्रत चालविलें. दोन गोरे लोक मारले यांत मला समाधान आहे.

**दिली न संधी मला परन्तु द्रवीडबंधूंनीं**
**याचा मजला खेद वाटतो पुन्हां पुन्हां म्हणुनी.**
**नसते झाले फितूर माझ्या मित्रांतिल कोणी**
**अशक्य होतें मला पकडणें पोलिस लोकांनीं.** ७४

द्रविड बंधूंनीं मला सवड दिली नाहीं याचा मला पुन्हां पुन्हां खेद वाटतो. माझ्या मित्रांपैकीं कोणी फितूर झाले नसते तर मला पकडणें पोलिसांना अशक्य होतें.

**कारागृह अधिकारि येउनी म्हणती दामूला**
**'इच्छा तुमची असेल कांहीं ती सांगा मजला.'**
**विचारुनी घ्या तुमची इच्छा आज्ञा मजवरची;**
**मला कळूं द्या काय आपुली असेल ती मर्जी.** ७५

तुरुंगाचे अधिकारी येऊन दामूला सांगू लागले: 'तुमची काय इच्छा असेल ती मला सांगा. तुमची इच्छा काय आहे ती विचारून घ्या असा मला वरचा हुकूम आहे. तुमचें काय म्हणणें आहे तें मला कळूं द्या.'

**भलतें कांही विचारुनी कां करतां अपमान?**
**असेंच मरुनी देणें मजला हा माझा मान.**
**शूर शिपाई क्रांतीचा हा माझा अभिमान,**
**स्वधर्म संरक्षण जन्माची ही माझी आण.** ७६

'भलतेंच कांहीं विचारून माझा अपमान कां करतां? असाच मृत्यु होणें हा माझा मान आहे. क्रांतीचा मी शूर शिपाई आहे याचा मला अभिमान वाटतो. स्वधर्म संरक्षण करणें ही माझी जन्माची शपथ आहे.'

**देशासाठीं धर्मासाठीं जे जे लढतात**
**क्रांतीचे ते शूर शिपाई त्यांना म्हणतात.**
**मरणाला मारूनि बहाद्दर सदैव असतात**
**संसाराचे असे तयांना पाशच नसतात!** ७७

देशासाठीं आणि धर्मासाठीं जे जे लढतात त्यांना क्रांतीचे शूर शिपाई म्हणतात. ते सदैव मरणाला मारून असतात. म्हणजे त्यांना मृत्यूची भीति नसते, संसाराचें असे पाशच त्यांना असत नाहींत.

**संन्यासी तो तरी अपेक्षा करतो मोक्षाची,**
**तीहि अपेक्षा नसते आम्हा क्रांतिकारकांची.**
**त्यांतलाच मी एक शिपाई हिंदुस्थानाचा**
**भारतभूस्तव जगणें मरणें हा धंदा माझा. ७८**

संन्यासी असला तरी तो मोक्षाची अपेक्षा करतो, आम्हा क्रांतिकारकांना तीही अपेक्षा असत नाहीं. त्यांच्यापैकीं मी हिंदुस्थानचा एक शिपाई आहे. जगावयाचें तें भारतभूसाठीं आणि मरावयाचें तेंही भारतभूसाठीं हा माझा धंदा आहे.

**विचारतां म्हणुनीच सांगतों जें सुचलें आतां,**
**आणुनि द्या मज टिळकांपासुनि श्रीभगवद्गीता.**
**जाउनि सांगा निरोप माझा लावा मज फांस**
**तेवढांच मी येइन लौकर पुण्यांत जन्मास. ७९**

विचारतां म्हणूनच मला आतां सुचलें तें सांगतों. टिळकांपासून मला एक श्रीमद्भगवद्गीता आणून द्या. माझा निरोप जाऊन कळवा. कीं मला फांशी द्या. तेवढाच मी लौकर पुण्यांत जन्मास येईन.

**याहुनि नाहीं तुम्हांस कांहीं मज सांगायाचें**
**ठाउक आहे मित्रांना कुणि काय करायाचें.**
**हिंदुधर्म अन् हिंदु संस्कृती असतां धोक्यांत**
**अल्पस्वल्प ही सेवा माझी रुजो समाजांत. ८०**

यापेक्षां अधिक मला कांहीं सांगावयाचें नाहीं. कोणी काय करावें हें मित्रांना ठाऊक आहे. हिंदुधर्म आणि हिंदु संस्कृति धोक्यांत असतां (त्याच्यासाठीं) मी केलेली अल्पस्वल्प सेवा समाजांत रुजावी.

बोलुनि इतकें सहर्ष झालें भजन सुरू त्यांचें.
सुखांत आहे सांगत होते भाव मुखावरचे.
आणि जसें मुख उदास दिसतें अनुत्तीर्णाचें
खालि घालुनि मान परतले प्रमूख वार्डाचे ! ८१

इतकें बोलून चाफेकरांचें भजन सुरू झालें. सुखांत आहोंत असें त्याच्या मुखावरचे भाव दिसत होते. आणि परीक्षेंत उत्तीर्ण न झालेल्या विद्यार्थ्याचें तोंड जसें दुर्मुखलेलें दिसतें तसें आपलें तोंड खालीं घालून वार्डाचे प्रमुख परत गेले.

पहिली पहिली पहाट सरली चाफेकर उठले;
स्नान-वंदनें झालीं; त्यांचें ध्यान सुरू झालें;
त्या रात्रीचें नवल एवढें कीं त्या बंदींत
होते घोरत खुशाल निजले दामोदरपंत. ८२

पहिली पहाट संपली. चाफेकर उठले. त्यांचें स्नान झालें. वंदनें झालीं. आणि त्यांचें ध्यान सुरू झालें. त्या रात्रीचें नवल असें कीं त्या बंदींत चाफेकर खुशाल निजले होते आणि घोरत होते.

कुणास ठाउक काय वाटलें आज असें त्याला,
नाहिं कोंबडा आरवला पण पूर्वपहाटेला !
नाहिं घातली उषेलत्यानें साद उठायाची
म्हणुनि काय थांबून रहाते स्वारी सूर्याची ! ८३

त्याला काय वाटलें कोणास ठाऊक. पहिला कोंबडा आज आरवला नाहीं, ऊठ म्हणून त्यानें उषेला हांक मारली नाहीं. पण त्यानें हाक मारली नाहीं म्हणून सूर्याची स्वारी काय थांबून रहाणार !

**नाहि निघाला विंचु न आला साप बिळांतूनी;**
**ढेकुण, पिसवा, उंदिर चिलटें गेलि कुठें पळुनी;**
**आणि पहारेकरी दांडगा दुष्ट स्वभावाचा**
**दुरूनि होता हात जोडुनी पहात केव्हांचा!** ८४

त्या रात्रीं खोलींत विंचू निघाला नाहीं. बिळांतून साप निघाला नाहीं. ढेकूण, पिसवा, उंदिर, चिलटें कोठेंतरी पळून गेलीं होतीं. आणि दुष्ट स्वभावाचा आणि दांडगा पहारेकरी चाफेकरांकडे हात जोडून लांबून केव्हांचा पहात होता.

**उजाडलें पण थांबुनि होता रवी ढगाआड,**
**लपुनि राहिला प्रभात-वारा मुलखाचा द्वाड.**
**घूं घूं होतें करित कुठेंसे घुबड जरा दूर,**
**भारत भूला मात्र लागली होती हुरहूर!** ८५

उजाडलें होतें तरी ढगाआड रवि बसला होता. मुलखाचा द्वाड असलेला सकाळचा वारा लपून राहिला होता. कोठेंतरी लांब घुबड घूं घूं करीत होतें. भारतभूला मात्र हूरहूर लागून राहिली होती.

**भविष्य होतें त्यास कळविलें काय निसर्गानें?**
**कळवित असतो पुढील गोष्टी निसर्ग नियमानें.**
**कळावयाला सहजपणें संकेत निसर्गाचे**
**मात्र लागतें तन्मय व्हाया चित्त मनुष्याचें.** ८६

निसर्गानें त्यांना पुढचें भविष्य कळविलें होतें काय? मात्र निसर्गाकडून पुढें घडणाऱ्या गोष्टीचे संकेत सहज कळावयाचे तर मनुष्याचें चित्त तन्मय व्हावयास लागतें.

**झाली होती वेळ परंतू कुणि उठलें नव्हते,**
**कारागृह तें भीषणतेनें भयाणलें होतें.**
**तोंच वाजला लांब कुठेंसा तास इषाऱ्याचा**
**आणि कुठें आवाज जाहला तों दरवाजाचा.** ८७

उठायची वेळ झाली होती पण कोणी उठलें नव्हतें. तें कारागृह भीषणतेनें भयाण झालें होतें. तोंच कोठेंसा लांब इषाऱ्याचा तास वाजला. आणि इतक्यांत कोठेंसा दरवाज्याचा आवाज झाला – म्हणजे कोठेंसा दरवाजा उघडला.

**बघा निघाला यमास दामू सहर्ष भेटाया,**
**दूत यमाचे उभेच होते त्यास पुढें न्याया.**
**मुक्त पुरुष अन् क्रांतिकारक जे कोणी असती**
**तेच तेवढे मरणापूर्वी मरण बघूं शकती.** ८८

यमाला भेटावयाला दामोदरपंत चाफेकर सहर्ष निघाले. यमाचे दूत त्याला नेण्यासाठीं पुढें उभेच होते. जे कोणी मुक्त पुरुष आणि क्रांतिकारक असतात त्यांनाच तेवढें मरणापूर्वीं आपलें मरण दिसतें.

**मरणाच्या खांद्यावर डावा स्वहस्त ठेऊनी,**
**करांत उजव्या भगवद्गीता सहर्ष घेऊनी,**
**उभी गाय गोठ्यांत रहाते जाउनि दाव्याशीं**
**तसा जाउनी उभा राहिला तो फांसापाशी.** ८९

मृत्यूच्या खांद्यावर आपला डावा हात ठेऊन आणि उजव्या हातांत सहर्ष भगवद्गीता घेऊन गोठ्यांतील दाव्याशी गाय जशी जाऊन उभी राहते तसा तो फांसापाशी जाऊन उभा राहिला.

**मोक्षप्राप्तीस्तव करणारा पंढरिची वारी**
**राष्ट्रासाठीं जो प्रिय मानी फांसाची दोरी**
**कोण यामधें श्रेष्ठ कुणाहुनि हें कळलें नाहीं;**
**विद्वानांनीं उत्तर याचें अजुनि दिलें नाहीं. ९०**

मोक्ष मिळावा म्हणून पंढरपूरची वारी करणारा आणि राष्ट्रासाठीं फासाची दोरी प्रिय मानणारा या दोघांत कोणापेक्षां कोण मोठा हें अजून कांहीं कळत नाहीं. याचें विद्वानांनीं अजून उत्तर दिलें नाहीं.

**उत्तर नाहीं हेंच तयाचें उत्तर समजावें**
**शिवविष्णू यामधें कुणाला लहान मानावें !**
**एकवार पाहिलें तयानें समोर लोकांस**
**एक बाजुला पुढेंच दिसला भाउ उभा त्यास. ९१**

उत्तर नाहीं हेंच त्याचें उत्तर समजावें. शिवविष्णु यामधें कोणाला लहान मानावयाचें ! एकवार त्यानें आपल्या समोर बसलेल्या लोकांकडे पाहिलें. तेव्हां एका बाजूला पुढेंच उभा असलेला त्याचा भाऊ त्याला दिसला.

**आणि पुन्हां जो पाहणार तो अपुल्या भावाला**
**शिव शिव हो केव्हांच पोंचला तो पंचत्वाला.**
**कुणि लावली होति उपरणीं अपुल्या डोळ्यांस**
**कुणी घातल्या माना खालीं नको बघायास. ९२**

आणि पुन्हां तो आपल्या भावाला बघणार तोंच शिवशिव दामोदर केव्हांच पंचत्वाला पोंचला होता. कोणी आपल्या डोळ्यांना उपरणीं लावलीं होतीं. आणि तें बघावयास नको म्हणून कोणी माना खालीं घातल्या होत्या.

**घे घे आई पुन्हां पुन्हां पाहूनि तुझा बाळ;**
**क्षणांत नेतिल त्यास येथुनी हे कर्दनकाळ.**
**आणि एकदां गेल्यावर तो नाहिं दिसायाचा;**
**हाच खरोखर अगम्य असतो विशेष मरणाचा ! ९३**

भारतमाते, पुन्हां पुन्हां बाळाला बघून घे. हे कर्दनकाळ त्याला येथून क्षणांत घेऊन जातील. आणि तो एकदा गेल्यावर पुन्हां दिसावयाचा नाहीं. मरणाचा हाच खरोखर अगम्य विशेष असतो.

**प्रकार हा पाहून वासुचें सळसळलें रक्त;**
**फणफणला रागांत निघाला तसाच जोरांत,**
**आणि जाउनी थेट राहिला उभा स्मशानांत;**
**पोलिस होते उभे चितेवर ठेउनिया प्रेत. ९४**

हा सारा प्रकार पाहून वासू चाफेकर याचें रक्त सळसळलें. रागानें फणफणत तो जोरांत तसाच निघून गेला आणि थेट स्मशानांत जाऊन उभा राहिला. चितेवर प्रेत ठेऊन पोलिस उभे होते.

**कुणी तरी बोलले कुणाला वेळ नका लावूं,**
**धरा धरा मूर्खास; तयाला येउं नका देऊं.**
**सूड बुद्धिनें भडकुनि जाता तरुणांचीं माथीं**
**आवरणारी तयांस नसते कुणामधें शक्ती. ९५**

वेळ लावूं नका; त्या मूर्खाला धरा. त्याला येऊं देऊं नका असें कोणीतरी कोणाला सांगितलें. सूड बुद्धीनें तरुणांची माथीं भडकून गेल्यावर त्यांना आवरील अशी कोणामधेंही शक्ति नसते.

ठेउनि चरणावरति दामुच्या कर अपुले दोन्ही
काहिं तरी बोलला कुणाला तें कळलें नाहीं !
विचार ज्यांचे एक नि झालीं एक मनें ज्यांचीं
तिथें संपते भाषा नसते गरज निरोपाची. ९६

दामोदर चाफेकर यांच्या पायावर आपले दोन्ही हात ठेऊन तो कांहींतरी बोलला. तें कोणाला समजलें नाहीं. ज्यांचे विचार सारखे आणि ज्याचीं मनें एक असतात, तिथें भाषा संपते. निरोपाची आवश्यकता नसते.

क्षणांत आल्या ज्वाला त्यांतुनि वरी उफाळून,
फडफडती ध्वज भास जाहला कुणास लांबून.
अजुनि बघा जा उभे राहुनी शनिवाड्यावरती
मुळा नदीच्या काठीं ते ध्वज अजूनि झळझळती. ९७

चितेंतून क्षणांत ज्वाळा वर उफाळून आल्या. लांबून ध्वजच फडफडत आहेत असा कोणाला भास झाला. शनवारवाड्यावर उभें राहून जा बघा, अजून मुळा नदीच्या कांठीं ते ध्वज झळझळत आहेत.

* * *

केळकरांच्या बागेमधल्या एका बाजूला
सहासात कुणि तरुण जमले त्याच सुमाराला;
असेल त्यांचें वय सतराचें त्याच सुमाराचें.
बोलत होते काहिं तरी ते पण निर्वाणीचें. ९८

त्याच सुमारास केळकरांच्या बागेच्या एका बाजूला कोणी सहा सात तरुण जमले होते. त्यांचें वय सतराचे सुमारास असावें. कांहीं तरी पण निर्वाणीचें त्यांचें बोलणें चालले होतें.

**एकच होती त्यांची भाषा, एकच शब्दाची,**
**लाल शाइची एकच होती दौत लिहायाची,**
**एकच होती लेख लेखणी बारीक टोकाची,**
**एकच होता कागद, होती एक घडी त्याची. ९९**

त्यांची एकच शब्दाची एकच भाषा होती. लिहावयाची लाल शाईची एकच दौत होती. त्यांची लिहावयाची बारिक टोकाची एकच एक लेखणी होती, एकच कागद होता आणि त्याची एकच घडी होती.

**रामा पांडू यासच धाडू यमास सांगाया**
**तुझे येत आहेत लाडके द्रवीड भेटाया.**
**रामा पांडू फरासखान्यामधील हा डोंब**
**प्रथम पाहिजे करावयाला त्यास जरा लांब. १००**

तुझे लाडके द्रवीड तुला भेटावयास येत आहेत असें यमाला कळविण्यासाठीं रामा पांडू यालाच पाठवूं. रामा पांडू हा फरासखान्यांतील डोंब त्यालाच आपण प्रथम लांब केला पाहिजे.

**प्रथम देउ या त्यास इषारा नीट रहायाचा.**
**प्रथम तयाला कळवुनि घेऊं प्रथम बळी त्याचा.**
**असे बोलला महादेव तों वासु म्हणे त्यास –**
**'त्यांत काय रे मीच पहातो रामा पांडूस.' १०१**

प्रथम त्याला सावध राहण्याचा इषारा देऊं. प्रथम त्याला कळवूं आणि पहिला बळी त्याचा घेऊं असें महादेव (रानडे) म्हणाला. तेव्हां वासुदेव चाफेकर (दामोदर चाफेकर यांचा भाऊ) म्हणतो 'त्यांत काय आहे. रामा पांडूला मीच पहातो.'

**इंग्रज अपुला शत्रू त्याला सहाय्य जे करती**
**बक्षिस त्यांना प्रथम देउं या भर रस्त्यावरती.**
**पारतंत्र्य काळांत असें भय देशद्रोह्यांचें !**
**स्वराज्यामधें भय राष्ट्राला असे फितुरांचें ! १०२**

आपला शत्रु जो इंग्रज त्याला साहाय्य जे करतात त्यांना भर रस्त्यावर प्रथम बक्षिस दिलें पाहिजे. पारतंत्र्यांत देशद्रोह्यांचें भय असतें. स्वराज्यांत फितुरांचें भय असतें.

**मन फितुराचें स्वबांधवांच्या प्रिय लोभाहून**
**परक्यांच्या नाटकी स्तुतीला जातें लोभून.**
**जसा कुणाला छंद चोरिचा छंद जुगाराचा**
**तसा कुणाला छंदच असतो फंदफितूरीचा. १०३**

फितुराचें मन देशबंधूंच्या प्रेमळ लोभापेक्षां परक्यांच्या नाटकी स्तुतीला भाळून जातें. जसा कोणाला चोरीचा छंद असतो, कोणाला जुगाराचा छंद असतो तसा कोणाला स्वबांधवांच्या प्रिय लोभापेक्षां फंद फितुरी करावयाचा छंद असतो.

**हेरगिरी हा कुणाकुणाचा व्यवसायच असतो;**
**स्वदेशभक्ति स्वधर्मनिष्ठा तो मानित नसतो.**
**द्रविडबंधुंना लोभ वाटला वीस हजारांचा**
**आणि घेतला बळी तयांनीं माझ्या भावाचा. १०४**

हेरगिरी करणें हा कोणाकोणाचा व्यवसायच असतो. तो स्वदेश भक्ति आणि धर्मनिष्ठा कांहीं मानीत नाहीं. द्रविडबंधूंना वीस हजार रुपयांचा लोभ सुटला आणि म्हणून त्यांनीं माझ्या भावाचा बळी घेतला.

**आपण घेऊं प्रथम बळी या द्रवीडबंधूंचा**
**राष्ट्रद्रोही धर्मद्रोही या चांडाळांचा !**
**सोडुनि द्यावा खुशाल शत्रू प्रसंग पाहून**
**सोडुं नये फितुरास परंतू; ही घ्यावी आण. १०५**

आपण प्रथम राष्ट्रद्रोही व धर्मद्रोही अशा या चांडाळांचा –द्रविड बंधूंचा –बळी घेऊं या. प्रसंग पाहून शत्रु सोडावा पण फितुराला सोडणार नाहीं ही शपथ घ्यावी.

**ठरलें त्यांचें एकच, त्यांच्या एक विचारानें;**
**भरलीं होतीं राजश्रींच्या वयवहिचीं पानें.**
**मरणाची भयभीती नसते क्रांतिकारकास**
**मरणालाही मारू असतो तयास विश्वास. १०६**

त्यांचें एक विचारानें एकच ठरलें. राजश्रींच्या (म्हणजे द्रविड. बंधूच्या) आयुष्याच्या वहीचीं पानें भरलीं होतीं. क्रांतिकारकांना मरणाची भयभीति असत नाहीं. मरणालाही मारूं असा त्याचा विश्वास असतो.

**त्यांनि ठरविला इकडे त्यांच्या मुहूर्त मरणाचा,**
**द्रवीड होते मोजित तिकडे ढीग रुपायांचा.**
**आखित होते क्रम चाफेकर त्यांच्या मरणाचा,**
**द्रवीड होते करीत तिकडे विचार लग्नाचा. १०७**

त्यांनीं इकडे त्यांच्या (म्हणजे द्रविडबंधूंच्या) मरणाचा मुहूर्त ठरवला, त्या वेळीं तिकडे द्रविड रुपयांचा ढीग मोजीत होते. द्रविड बंधूंच्या मरणाचा क्रम चाफेकर आखीत होते तर तिकडे द्रविडांचे लग्नाचे विचार चालू होते.

* * *

**देशासाठीं धर्मासाठीं जे कोणी लढले**
**धन्य धन्य ते बळी घेउनी स्वतां बळी गेले.**

## (१६) द्रविडबंधूंचा वध

**गेली नव्हती डोळ्यामधली संध्येची लाली**
**विस्कटलेला मळवट होता अजुनि तिच्या भाळीं.**
**दिशा पश्चिमा अजूनि नव्हती ती झाली शांत**
**अजून होते क्षण दिवसाचे तसेच अस्वस्थ. १०८**

गोड उषेच्या डोळ्यांतील लाली गेली नव्हती. तिच्या कपाळीचा मळवट अजून विस्कटलेला होता. पश्चिम दिशा अजून शांत झालेली नव्हती. दिवसाचे क्षण अजून अस्वस्थ होते.

**अजूनि नव्हते पाणी थांबले कांहि लोचनांचे**
**अजूनि नव्हते अश्रु वाळले कांहि मुखावरचें**
**अजूनि नव्हतीं कुणीं उघडलीं वाड्यांचीं दारें**
**अजूनि नव्हतीं खेळुं लागलीं पेठेंतुनि पोरें. १०९**

कांहींच्या डोळ्यांतून अजून पाणी येत होतें. कांहीं मुखावर ओघळलेले अश्रु अजून वाळले नव्हते. वाड्याचे दरवाजे अजून कोणी उघडले नव्हते. पेठेंतून मुलें अजून खेळूं लागलीं नव्हतीं.

**दामोदर चाफेकर गेले हंसतमुखें फांशीं**
**उघडपणें पण बोलत नव्हते कुणी कुणापाशीं.**
**दामोदर चाफेकर झाला विषय भारताचा**
**घराघरांतुनि गौरव होते करित कुणी त्यांचा ! ! ११०**

दामोदरपंत चाफेकर हंसत मुखानें फांशी गेले पण हें उघडपणें कोणी कोणाशीं बोलत नव्हते. दामोदरपंत हे भारतांत चर्चेचा विषय झाले होते, घराघरांतून कोणी त्यांचा गौरव करीत होते. १०६

**शहर पुण्याला दहशत बसली फरासखान्याची**
**भय वाटे कधि येइल चिठ्ठी रामापांडूची !**
**रामा पांडू एक मामुली इसम जमादार**
**झाला होता साहेबाचा आवडता प्यार. १११**

पुणें शहराला फरासखान्याची दहशत बसली होती. रामा पांडूकडून कधीं बोलावणें येईल याची लोकांना भीति वाटे. रामा पांडु एक मामुली जमादार साहेबाचा आवडता प्यारा झाला होता.

**भाव केवढा चढून होता रामापांडूचा !**
**कधीं कधीं वाढतो धन्याहुनि मान शिपायाचा**
**भर दिवसा झाडलें कुणीतरि पिस्तुल त्यावरती !**
**आयुष्याची बळकट होती दोरि परी त्याची. ११२**

रामा पांडूचा भाव केवढा चढला होता. ! मालकापेक्षां त्याच्या नोकराचा मान कधीं कधीं वाढतो. भर दिवसा त्याच्यावर कोणीतरी पिस्तूल झाडलें. पण त्याच्या आयुष्याची दोरी बळकट होती.

**पुढें होउनी तोच म्हणाला तरुण जोरांत.**
**वांचलास तूं याद राख पण दावुं पुन्हां हात.**
**दिला तुला मी आज इशारा करूं नको मस्ती;**
**आठ दहा दिवसांत तुलाही देइन मी बढती. ११३**

एक तरुण पुढें होऊन म्हणाला, ' तूं वांचलास ! पण पुन्हां हात दाखवूं, लक्षांत ठेव. मी तुला आज इषारा दिला आहे. जोरांत येऊं नकोस. आठ दिवसांत आम्ही तुला बढती देऊं.'

**आयुष्याची असेल दोरी बळकट जोंवरती**
**यमासहि लागते फिराया मागें तोंवरती.**
**अजूनि भरला नव्हता त्याचा रांजण पापांचा**
**छळ व्हायाचा अजूनि होता देशसेवकांचा. १९४**

आयुष्याची दोरी जोंवर बळकट असते तोंवर यमासही मागें फिरावें लागतें. त्यांच्या पापाचा रांजण अजून भरावयाचा होता. देश-सेवकांचा अजून छळ व्हावयाचा होता.

**काय नवें येणार कुणावर संकट यांतून**
**शहर पुण्यांतिल खुळचट गेले उगाच त्रासून !**
**फार दिवस जाहले न जों या खुनी प्रकारास**
**शहर पुण्यावर एक विलक्षण प्रकाशला दिवस ! ११५**

या नव्या प्रकरणांतून कोणतें नवें संकट येणार म्हणून पुणें शह-रांतील खुळचट उगाच त्रासून गेले होते. या खुनाच्या प्रकारास फार दिवस झाले नाहीत तोंच पुणें शहरांत एक विलक्षण दिवस उजाडला.

**देशद्रोही चांडाळांना त्यांच्या पापाचें**
**बक्षिस होतें तरुणांकडुनी आज मिळायाचें.**
**ज्यांनीं विकले प्राण दामुचें वीस हजाराला**
**आज जायचे होते यम दरबार पहायाला, ११६**

देशद्रोही चांडाळांना त्यांच्या पापाचें बक्षीस आज तरुणांकडून मिळावयाचें होतें. दामोदर चाफेकर यांचे प्राण ज्यांनीं वीस हजार रुपयांना विकले ते आज यमाचा दरबार पहावयास जावयाचे होते.

**मायभूमिला मळवट होता आज चढायाचा!**
**श्रीदेवीला नारळ होता आज फुटायाचा;**
**मायभूमिच्या शत्रूंना जे सहाय्य करतात**
**दोन मूर्ख जे आज जायचे होते नरकांत!** ११७

आज मायभूमीला मळवट चढावयाचा होता. देवीला नारळ फुटावयाचा होता. मायभूमीच्या शत्रूंना जे सहाय्य करतात ते दोन मूर्ख आज नरकांत जावयाचे होते.

**देशधर्म जे जाणत नव्हते स्वार्थाविण कांहीं,**
**आज तयांना मिळावयाची होती भरपायी!**
**फितूर जे जाहले शत्रुंना दो दमडयांकरतां**
**आज तयांचा दिवस येथला शेवटला होता.** ११८

स्वार्थापुढें जे देशधर्म जाणत नव्हते त्यांना आज भरपाई मिळावयाची होती. दोन दमडयांसाठीं शत्रूला जे फितूर झाले, आज त्यांचा येथील शेवटचा दिवस होता.

**दिवसभराचीं कामें सगळीं सहर्ष संपवुनी**
**पागेमध्यें करीत होते कुणि दाणापाणी.**
**दिवे लागले, लोक परतले कामें संपवुनी;**
**फिरावयाला गेलेले जन आले परतोनी.** ११९

दिवसभराचीं कामें समाधानपूर्वक संपवून पागेमध्यें कोणी दाणापाणी करीत होते. दिवे लागणी झाली, कामें संपवून लोक परतले होते. फिरावयास गेलेले लोक परतले.

**रस्त्यावरती वर्दळ नव्हती आल्यागेल्यांची**
**वेळ असावी असेल झाली साडे आठाची;**
**लुकलुक होते करीत कोठें कंदिल मार्गांत.**
**काढित होते धार गाइची मागिल गोठ्यांत. १२०**

जाणाऱ्या येणाऱ्यांची रस्त्यावर वर्दळ नव्हती. साडे आठाची वेळ झाली असावी. रस्त्यावरचे कंदील लुकलुकत होते. मागील गोठ्यांत गाईचें दूध कोणी काढीत होते.

**कुठें चालली होति आरती देवघरापाशीं;**
**करीत होतीं मुलें आपुला पाठ दिव्यापाशीं.**
**करीत होते बंद दुकानें, कुणि होतीं केलीं;**
**विकीत होते जाइजुईचे गजरे फुलमाळी. १२१**

देवघरांत कोठें आरती चालली होती. दिव्याशी बसून मुलें आपला पाठ करीत होतीं. कोणी दुकानें बंद केलीं होतीं तर कोणी बंद करीत होते. फुलमाळी जाईजुईचे गजरे विकीत होते.

**कुठें उघडलीं होतीं दारें हिरव्या माडींचीं,**
**जुळवित होते कोठें कोणी साथ सतारीची.**
**रंगत होता विडा कुणाच्या नाजुक हाताचा**
**करीत होते पदर सारखा कुणि माथ्यावरचा. १२२**

हिरव्या माडीचीं दारें कोठें उघडलीं होतीं. कोणी कोठें सतारीची साथ जुळवीत होते. कोणाच्या नाजुक हाताचा विडा रंगत होता तर माथ्यावरचा पदर कोणी सारखा करीत होते.

**जुन्या छत्रिच्या काळ्या मळकट वस्त्रासमकाळा**
**होता अंधकार पसरला चोहिकडे काळा.**
**त्यांत वेष पालटून आणुनि भय्याची ऐट**
**द्रविडांना जाऊनि म्हणाला दाराशीं थेट. १२३**

जुन्या छत्रीच्या मळकट वस्त्रासारखा काळा काळा अंधार सर्वत्र पसरला होता. त्यांत वेष पालटून भय्याची ऐट आणून द्रविडांना दाराशीं थेट जाऊन म्हणाला.

**साहेबाचें काम थांबलें तुमच्यावांचून**
**रामा पांडू मला म्हणाले बोलावुनि आण.**
**पुन्हां करावा गौरव तुमच्या पवित्र कार्याचा**
**विचार दिसतो नवीन बक्षिस तुम्हास द्यायाचा. १२४**

साहेबांचें काम तुम्ही नाहीं म्हणून थांबलें आहे. तुम्हांला बोलावून आण असें रामा पांडूनीं सांगितलें, तुमच्या पवित्र कार्याचा पुन्हां गौरव करावा आणि नवीन बक्षीस द्यावें असा विचार दिसतो.

**लौकर लौकर चला असावें काम महत्त्वाचें;**
**तुमच्यास्तव साहेब राहिले थांबुनि केव्हांचे !**
**क्षण भरल्यावर सुमार नाहीं रहात कोणाला**
**स्थळ काळाचा विचार नाहीं सुचत मनुष्याला. १२५**

लवकर लवकर चला. महत्त्वाचें काम असावें. केव्हांपासून तुमच्यासाठीं साहेब थांबून राहिले आहेत. वेळ आली म्हणजे कोणाला सुमार रहात नाहीं. मनुष्याला स्थळकाळाचा विचार सुचत नाहीं.

**ओळखिचा आवाज असोनी ओळखलें नाहीं;**
**हांक मारतो तरी कोण तें पाहियलें नाहीं !**
**तसेच झाले पुढें नि गेले दूर जरा कांहीं**
**अंधाऱ्या वाटेंत नीटसें त्यां दिसलें नाहीं !!** १२६

परिचयाचा आवाज असूनसुद्धां ओळखलें नाहीं, हांक कोण मारीत आहे हें पाहिलें नाहीं. तसेंच पुढें झालें आणि कांहींसे लांब गेले. अंधाराची, काळोखाची वाट असल्यानें त्यांना नीटसें दिसलें नाहीं.

**तूंच कळविलें नांव दामुचें फितूर होऊन,**
**स्वार्थासाठीं तुम्हीच विकले दामूचे प्राण.**
**हें घे बक्षिस हरामखोरा, तुझ्या फितूरीचें**
**बोलत कोणी समोर झाले पुढें द्रवीडांचे.** १२७

तूंच फितूर झालास, आणि दामोदर चाफेकर याचें नांव सांगितलेंस. चाफेकर यांचे प्राण स्वार्थासाठीं तुम्ही विकलेत. हरामखोरा, तुझ्या फितुरीचें हें घे बक्षीस असें बोलत द्रविडांचे पुढें कोणी उभे राहिले.

**आणि भुकेला घांस भराभर घेतो खाऊन**
**तशा झाडल्या गोळ्या त्यांनी नीट समोरून. !**
**द्रवीडबंधू क्षणांत पडले धाडदिशीं खालीं;**
**तोंच कुठेंशी कुणी खुणेची वाजवली टाळी !** १२८

आणि भूक लागलेला इसम जसा भराभर घास घेतो तशा नीट समोरून त्यांच्यावर भराभर त्यांनीं गोळ्या झाडल्या. द्रविडबंधु क्षणांत धाडदिशी खालीं पडले. तोंच कोणी कुठेंशी खुणेची टाळी वाजविली.

**आणि पुढें ते सहर्ष गेले पुण्यामधें फांशीं**
**आणि म्हणाले कृतार्थ झालों येउनि जन्माशीं.**
**तुझ्याच उदरीं भारतमाते, जन्म पुन्हां घेऊं;**
**तुझींच नमनें अभिमानानें पुन्हां पुन्हां गाऊं. १२९**

आणि पुढें ते सहर्ष फांशीं गेले. म्हणाले कीं जन्मास येऊन कृतार्थ झालों. भारत माते, तुझ्याच उदरीं पुन्हां जन्मास येऊं. तुझींच नमनें पुन्हां पुन्हां अभिमानानें गाऊं.

* * *

**देशासाठीं धर्मासाठीं जे कोणी लढले**
**धन्य धन्य ते बळी घेउनी स्वतां बळी गेले.**

## (१७) सावरकरांची प्रतिज्ञा.

**वाचित होता बाळ विनायक वृत्त हुतात्म्यांचें**
**श्रोते होते गाळित अश्रू सहानुभूतीचे !**
**विरोधदर्शन समाजामधें परि झालें नाहीं !**
**सरकाराचा निषेध कोठें कुणि केला नाहीं ! ! १३०**

हुतात्म्यांचें हें वृत्त बाळ विनायक वाचीत होता. श्रोते सहानुभूतीचे अश्रु गाळीत होते. परंतु फांशीविरुद्ध कोणी निषेध प्रगट केला नाहीं किंवा विरोधही कोणी दाखविला नाहीं.

**विनायकाला हीच रुचेना वृत्ती लोकांची.**
**उघडपणें तो करी वाहवा थोर हुतात्म्यांची.**
**बळी घ्यावया लागत असते शूराची छाती**
**फांसावर जावया लागते मर्दाची मस्ती. १३१**

लोकांची हीच वृत्ति विनायकाला आवडली नाहीं. थोर हुतात्मे म्हणून तो त्यांची स्तुति करी. बळी घ्यावयास शूराची छाती लागते आणि फांसावर जावयास मर्दाची मस्ति लागते.

**दंगे धोपे इथें करावे परधर्मीयांनीं,**
**हिंदूवरती जुलुम करावा इथें इसायांनीं,**
**उघडे ठेउनि नेत्र बघावे प्रकार हे सारे**
**लाजिरवाणें जिणें याहुनी नाहि असें दुसरें. १३२**

परधर्मांतल्या लोकांनीं इथें दंगेधोपे करावे. हिंदूवरती ख्रिश्चनांनीं जुलूम करावा आणि हे सारे प्रकार डोळे उघडे ठेऊन बघावे यापेक्षां लाजिरवाणें जिणें दुसरें नाहीं.

**परदेशाचे लोक येउनी हिंदुस्थानांत**
**धनीपणानें हिंदूवरती राज्यें करतात.**
**सांगतील ते तसें करावें सोशित फटकारे**
**लाजिरवाणें जिणें याहुनी नाहि असें दुसरें. १३३**

परदेशांतले लोक हिंदुस्थानांत येऊन धनीपणानें हिंदूवरती राज्यें करतात. फटकारे सोसत ते सांगतील तसें करावें यापेक्षां लाजिरवाणें जिणें दुसरें नाहीं.

**एकामागुनि एक चालले फांसावर फांशीं**
**परदास्यांतुनि देश आपुला मुक्त करायाशी.**
**अशीच मीही कां न करावी देशाची सेवा?**
**मीहि कां न हा देशासाठीं प्राण समर्पावा? १३४**

आपला देश मुक्त करण्यासाठी एकामागून एक फांसावर चढत आहेत. अशीच देशाची सेवा मीही कां करूं नये, मी सुद्धां देशासाठीं प्राणार्पण कां करूं नये !!

**रात्रीं मागुनि रात्री गेल्या याच विचारांत;**
**देशभक्तिची ज्योत पेटली त्याच्या हृदयांत!**
**येऊं लागले विचार त्याच्या मनामधें नाना;**
**करूं काय मी देशासाठीं निश्चय होईना. १३५**

याच विचारांत रात्रीमागून रात्री गेल्या. त्याच्या हृदयांत देशभक्तीची ज्योत पेटली. त्याच्या मनांत नानाप्रकारचे विचार येऊं लागले. देशासाठीं मी काय करावें याचा निश्चय होइना !

**मरण घेउनी तळहातावर लढत रहायाची**
**ज्योत पेटली देशासाठीं त्याग करायाची.**
**समिधा मागुन समिधा टाकुनि अपुल्या देहांची**
**पेटवावया हवींत कुंडें अशींच युद्धाचीं. १३६**

तळहातावर मरण घेऊन लढत रहाण्याची व देशासाठीं त्याग करायाची ज्योत पेटली. आपल्या देहांच्या समिधामागून समिधा टाकून युद्धाचीं कुंडें चेतवावयास पाहिजेत.

**त्या यज्ञांतुनि स्वातंत्र्याच्या प्रचंड युद्धाचें**
**असेंच असतिल महायज्ञ जर पुढें घडायाचे,**
**त्या यज्ञास्तव बळी देउनी बळी जावयास**
**देशासाठीं पाहिजेत जन पुढें यावयास. १३७**

त्या यज्ञांतून स्वातंत्र्याच्या प्रचड युद्धाचे महायज्ञ जर होणार असतील तर त्या यज्ञांसाठीं बळी घ्यावयास आणि बळी जाण्यास देशाकरतां लोक पुढें आले पाहिजेत.

**शासन असतें साधन केवळ हें सर्वोन्नतिचें**
**हवें कराया संपादन अन् संरक्षण त्याचें.**
**जसें मोकळें लागत असतें खगास आकाश**
**माणुसकीला तसें लागतें राज्य असायास. १३८**

सर्वोन्नतीचें साधन केवळ राज्यकारभार असतो. त्या राज्य-कारभारचें संपादन आणि संरक्षण करावयास पाहिजे. पक्ष्यांना जसें आकाश मोकळें लागतें तसें माणुसकीला राज्य मोकळें असावें लागतें.

**विशाल ऐशा स्वातंत्र्याच्या वटवृक्षाखालीं**
**धर्म आणि संस्कृतीस येती दिन वैभवशाली.**
**पराधीनता संपणार ही केव्हां हिंदूंची**
**चिंता होता करित विनायक हिंदुस्थानाची. १३९**

विशाल स्वातंत्र्याच्या वटवृक्षाखालीं धर्माला आणि संस्कृतीला वैभवशाली दिवस येतात. हिंदूंची पराधीनता संपणार केव्हां? विनायक हिंदुस्थानची चिंता करीत होता.

**अभिनव होता विचार त्याच्या मनामधें आला.**
**नव्या विचारापुढें सुचेना पण कांहीं त्याला.**
**खेळत असतां मधेंच थांबुनि स्वस्थ उभा राही;**
**अडुनि रहावें प्रवाहामधें फूल जसें कांहीं. १४०**

त्याच्या मनांत एक अभिनव विचार आला. या नव्या विचारापुढें त्याला दुसरें कांहीं सुचेना ! प्रवाहामधें वहात जाणारें फूल मधेंच कशाला तरी अडून रहावें तसा तो खेळत असतां मधेंच थांबे आणि स्वस्थ उभा राही.

बोलत असतां मधेंच पाही लांब कुठें दूर
जशी सागरातील दिव्याची पोंचावी नजर.
ताटावरती घेउनि राही मुखामधें घांस
जसा राहतो वाघ घेउनी मुखांत शेळीस. १४१

बोलत असतां मध्येंच समुद्रदिव्याची लांब नजर पोचते तसा तो लांब दूरवर पहात राही. वाघ जसा शेळीला आपल्या मुखांत धरून राहतो तसा जेवतां जेवतां त्याचा घास तोंडांत राही.

अभ्यासाला बसे लिहाया घेई गृहपाठ,
चुके लिहाया, होते त्याचे धडे जरी पाट.
चाफेकरबंधूंस दिले कां आणि कसें फांशीं
तीच तीच ती गोष्ट आपुल्या सांगे स्नेह्यांशीं. १४२

अभ्यासाला बसे, गृहपाठ लिहावयास घेई. त्याचे धडे पाठ होते तरी लिहितांना त्याची चूक होई. चाफेकरबंधूंना कां आणि कसें फांशीं दिलें याची तीच तीच हकीगत तो आपल्या मित्रांना सांगे.

असेच गेले कांहीं महिने याच विचारांत
उजाडला शुभ भाग्याचा दिन एक अकस्मात.
आणि जाहला निश्चय त्याचा निश्चय जन्माचा
ध्येय धोरणें ठरलीं, ठरला क्रम त्या कार्याचा. १४३

या विचारांत असेच कांहीं महिने गेले. अकस्मात एक भाग्याचा शुभ दिवस उजाडला आणि त्या दिवशीं त्याचा निश्चय ठरला. तो जन्माचा निश्चय होता. त्याचें ध्येय ठरलें, धोरणें ठरलीं, कार्याचा क्रम ठरला.

**चाफेकर रानड्यांसारख्या उमद्या तरुणांनीं**
**दिला धडा घालून सहर्ष प्राण समर्पूनी.**
**देशासाठीं मीहि कां न तें व्रत स्विकारावें !**
**स्वातंत्र्याचें मीहि कां न तें आवाहन घ्यावें ! १४४**

सहर्ष प्राण समर्पून चाफेकर–रानडे यांच्या सारख्या उमद्या तरुणांनीं धडा घालून दिला आहे. तें स्वातंत्र्याचें व्रत मीसुद्धां कां घेऊं नये! देशासाठीं तें आवाहन मी कां स्वीकारूं नये.

**विचारांत संपली रात्र अन् पहाटच्या वेळीं**
**विनायकाला झोंप जराशी आली न जों आली.**
**तोंच कुणी तरि हांक मारली तयास मोठ्यानें**
**हांक मारली तयास त्याच्या दुर्गा देवीनें ! १४५**

अशा विचारांत रात्र गेली. पहाटेंस त्याला झोंप लागली असेल नसेल, तोंच त्याला मोठ्यानें कोणी तरी हांक मारली. त्याच्या दुर्गा देवीनें त्याला हांक मारली.

**येतो येतो ओरडला तो तसाच झोपेंत,**
**धांवत आले पहावयाला दामोदरपंत.**
**आणि विनायक शांतपणानें निजलेला बघुनी**
**सहज घातलें विनायकावर पांघरणें त्यांनीं. १४६**

तसाच येतो येतो ओरडला. दामोदरपंत त्याला पहावयास आले. आणि विनायक शांतपणें निजला आहे असें बघून त्यांनीं त्याच्यावर पांघरूण घातलें.

**तोंच गळाले अश्रु तयाच्या गालावर दोन,**
**बाळ विनायक उठून बसला जागा होऊन.**
**विशेष होता दिवस आजचा आणि निराळाच,**
**देवपुजेचा थाट आणि उत्साह निराळाच. १४७**

तोंच त्याचे अश्रु विनायकाच्या गालांवर पडले. विनायक जागा होऊन उठून बसला. आजचा दिवस विशेष होता आणि निराळाही होता. देवपूजेचा थाट निराळा आणि उत्साह निराळाच होता.

**महिशासुर मर्दिनी भवानी श्रीदुर्गामाता**
**तिच्यापुढें ध्यानस्थ कधींचा तो बसला होता.**
**चढलें होतें तिच्या मुखावर तेज निराळेंच.**
**तिच्या गोडवेपणास आली गोडि निराळीच. १४८**

महिषासुर मर्दिनी जी भवानी दुर्गामाता तिच्यापुढें तो केव्हांचा ध्यानस्थ बसला होता. तिच्या मुखावर आज निराळेंच तेज चढलें होतें; तिच्या गोडवेपणास आज निराळीच गोडी आली होती.

**होती तेवत निरांजनांतिल वात सुवर्णाची**
**तारांच्या ताह्मणांत जैशी कोर चतुर्थीची.**
**हात जोडुनि म्हणे विनायक दुर्गादेवीस**
**तुझ्या कृपेचा मी याचक, मी नम्र तुझा दास. १४९**

तारांच्या ताम्हणांत जशी काय चतुर्थीची कोर दिसते तशी निरांजनांत सुवर्णासारखी वात तेवत होती. हात जोडून विनायक दुर्गादेवीला म्हणाला: मी तुझ्या कृपेची अपेक्षा करणारा तुझा नम्र भक्त आहे.

**रिपुरुधिराचे दीप तुजपुढें लाख लाख लावूं.**
**साम्राज्याच्या मयूर सिंहासनीं तुला बसवूं.**
**आणि लावला तिला तयानें टिळा स्वरक्ताचा,**
**आणि घातला हार देविला लाल गुलबशीचा. १५०**

शत्रूच्या रक्ताचे लाख लाख दिवे तुझ्यापुढें लावूं. आणि साम्राज्याच्या मयूर सिंहासनावर तुला बसवूं. आणि आपल्या रक्ताचा टिळा त्यानें देवीला लावला. आणि लाल गुलबक्षीच्या फुलांचा हार त्यानें देवीला घातला.

**शपथ घेतली विनायकानें स्वराष्ट्रसेवेची**
**परदास्यांतुनि भारतभूमी मुक्त करायाची.**
**धन्य धन्य होईल राष्ट्र हें राज्यवैभवानें**
**जय भगवा ध्वज हिमालयावर डुलेल मानानें १५१**

परदास्यांतून भारतभूमि मुक्त करण्यासाठीं विनायकानें स्वराष्ट्रसेवेची शपथ घेतली. राज्यवैभवानें या राष्ट्राला धन्यता प्राप्त होईल. जय भगवा ध्वज हिमालयावर मानानें फडकेल.

**होतिल होतिल शतशत तोफा मान वंदनेस**
**तुझा करिल जयकार जगाचा नवीन इतिहास**
**तोंच जहाली अशी नभांतुनि देवाची वाणी**
**नाचं लागले आनंदानें मयूर मयुराणी. १५२**

तुझ्या वंदनेसाठीं शंभर तोफा गर्जतील, जगाचा नवीन इतिहास तुझा जयजयकार करील. तोंच अशी नभांतून देववाणी झाली. मयूर मयुराणी (लांडोर) आनंदानें नाचूं लागले.

* * *

**देशासाठीं धर्मासाठीं जे कोणी लढले**
**धन्य धन्य ते बळी घेउनी स्वतां बळी गेले!!**

# सर्ग चौथा

## (१८) दामोदरपंतांचें देहावसान

भारतभू जयकार जयाचा त्रिवार गर्जू या !
राष्ट्रासाठीं जगणें मरणें हें सुख समजूं या.

*  *  *

शपथ घेतली विनायकानें स्वराष्ट्रसेवेची
भारतभूमी परदास्यांतुनि मुक्त करायाची.
चालू होते अध्ययनाचे पाठ जरी त्याचे
वाचन होतें करीत सावरकर इतिहासाचें. १

भारतभूमि परदास्यांतून मुक्त करण्याची आणि स्वदेशसेवेची विनायकानें शपथ घेतली. शाळेमधला अभ्यास चालू असतांना सावरकर इतिहासाचीं पुस्तकें वाचीत असत.

लिहीत होता लेख नि होता देतहि व्याख्यानें;
ऐकुनि तीं वाहवा करावी कीं ज्यानें त्यानें.
सुटींत येई परत विनायक भगूर गांवास
गारठ्यांतुनी उबेंत यावें होइ असें त्यास. २

शिवाय लेखही लिही आणि व्याख्यानेंही देई. त्याचीं व्याख्यानें ऐकून जो तो त्याची वाहवा करी. सुटी झाली म्हणजे विनायक भगूर गांवास येई. तेव्हां गारठ्यांतून उबेत आलों आह्मों असें त्यास वाटे.

**असाच आला एके दिवशीं भगूर गांवाला**
**आणि जाहले सहासात दिन येउनिया त्याला.**
**तोंच जाहला रोग गांठिचा सुरू अकस्मात;**
**या दुःखाचा अनुभव नव्हता कुणास गांवांत.** ३

असाच एक दिवशीं तो भगूर गांवाला आला. त्याला सहासात दिवस येऊन झाले असतील तोंच भगूर गांवांत प्लेग सुरू झाला. भगूर गांवांतील कोणालाही या रोगाची माहिती नव्हती.

**ज्या प्लेगाच्या अनेक होत्या ऐकियल्या गोष्टी**
**आणि जहाले होते ऐकुनि जन सारे कष्टी,**
**तोच पुढें येऊनि राहिला प्रसंग गांवांत.**
**भगूर गांवामधें उडाला एकच आकांत.** ४

प्लेगासंबंधीं त्यांनीं अनेक गोष्टी ऐकल्या होत्या. आणि त्या गोष्टी ऐकून साऱ्या लोकांना वाईटही वाटलें होतें. भगूर गांवांत तोच प्रसंग पुढें येऊन उभा राहिला. प्लेगानें गांवांत एकच आकांत उडाला.

**ज्याच्यासाठीं करित असावें चिंता दुसऱ्याची**
**तोच रहावा भोग उभा ही चाल नशीबाची !**
**नको नको जें म्हणून आपण दूर करावें तें**
**तेंच नेमकें लागुनि मागें गळ्यामधें पडतें.** ५

दुसऱ्याची चिंता ज्याच्यामुळें करावी तोच भोग चिंता करणाऱ्याच्याही पुढें उभा रहावा हा नशिबाचा खेळ आहे. नको नको म्हणून आपण जें दूर सारावें तेंच नेमकें आपल्या गळ्यांत पडतें.

**एका मागुनि एक कोंबड्या मरून पडतात,**
**एकामागुनि एक तारका निघून जातात;**
**तशी लागलीं घरें भराभर ओस पडायाला.**
**जावें कोठें वेळहि नव्हता हें ठरवायाला. ६**

मरूं लागल्या कीं कोंबड्या जशा एकामागून एक मरून पडतात, किंवा दुसरें उदाहरण देऊन सांगावयाचें तर तारका एकामागून एक जशा निघून जातात, तशीं गांवातील घरें एकामागून एक ओस पडूं लागलीं. कोठें निघून जावें हें ठरवावयासही लोकांना वेळ मिळाला नाहीं.

**आगगाडिचा डबा पडावा उलटुनि वाटेंत**
**तसा प्लेगनें कहर उडवला भगूर गांवांत !**
**जसें हवाई जहाज पडतें कोसळुनी खालीं**
**तशी प्लेगनें भगुर गांवची वाताहत झाली. ७**

वाटेंत जसा आगगाडीचा डबा कोसळून पडावा म्हणजे कहर उडतो. त्याप्रमाणे भगूर गावांत प्लेगनें कहर उडवला होता. हवाई जहाज म्हणजे विमान कोसळून पडल्यावर त्या विमानाची जशी वाताहत होते तशी भगूर गांवची वाताहत झाली होती.

**कोण कुणाचा अशा प्रसंगीं नसतो जगतांत.**
**जीव कोण घालील कुणास्तव उगाच धोक्यांत.**
**आणि बेतला प्रसंग केव्हां जर जीवावरती**
**प्रथम आपुल्या जिवास जे ते जन सारे जपती. ८**

अशा प्रसंगीं कोणी कोणाचा नसतो. दुसऱ्यासाठीं आपला जीव कोण धोक्यांत घालील ! असें आहे की आपल्याच जिवावर प्रसंग बेतला तर जो तो इसम प्रथम आपल्या जिवास जपतो.

**गांवामधलें स्थान आपुलें ओळखुनी पंत**
**समाचार घ्यावयास होते घरोघरीं जात.**
**गांवावरचें संकट हें अपुल्याच घरावरती,**
**संकट मानुनि थोर माणसें घरोघरीं फिरतीं. ९**

गांवामधली आपली प्रतिष्ठा ओळखून दामोदरपंत घरोघर जाऊन लोकांचा समाचार घेत असत. गांवावरचें संकट म्हणजे आपल्या घरावरील संकट समजून मोठे लोक घरोघर जातात.

**चिंता जो वाहतो नि करतो चिंता दुसऱ्याची**
**लोक मानिती वडिलपदासम पूज्यपदें त्याची.**
**वाटत नव्हतें बरें मनाला आणि बरें नव्हतें.**
**पंतांचें मन उदास होउनि उदासलें होतें ! १०**

जो दुसऱ्याची चिंता करतो आणि चिंता वाहतो, लोक वडिलांच्या चरणासारखीं त्याचीं पाउलें पूज्य मानतात. पंतांना बरें नव्हतेंच आणि मनाला बरें वाटतही नव्हतें. पंत उदास झाले होते. आणि उदास झाल्यासारखें त्यांना वाटत होतें.

**फूल जसें कोमेजुनि जातें मावळत्या वेळीं**
**पंतावरती सांज सांवली पण होती पडली !**
**बोलत होते, करीत होते विचार लोकांचा;**
**ठाउक नव्हता समीप होता काळ उभा त्यांचा ! ११**

सायंकाळीं फूल जसें कोमजून पडतें तशी पंतांवर सांजसावली पडली होती. ते बोलत होते आणि लोकांची काळजी वहात होते, पण त्याच्याही समोर काळ उभा आहे हें मात्र त्यांना कळलें नाहीं.

**जिकडे तिकडे रडणें कण्हणें ओरड ऐकून**
**धीराचे पण पंतहि गेले मनांत चरकून.**
**होती त्यांच्या पायाखालिल नित्याची वाट;**
**दिसली नाहीं वाट आणि ते पडले वाटेंत ! १२**

जिकडे तिकडे रडणें, कण्हणें आणि ओरडणें ऐकून एवढे धीराचे दामोदरपंत पण तेही चरकून गेले. त्यांच्या रोजची पायाखालची वाट होती. पण ती त्यांना दिसली नाहीं आणि ते वाटेंत पडले.

**तसेंच उठुनी पुढें निघाले दामोदरपंत;**
**मन नसतां जाग्यावर होतो असाच अपघात.**
**पिलें जशीं घरट्यांत बसूनी वाट पहातात.**
**पहात होता वाट विनायक बसूनि दारांत. १३**

तसेच उठून दामोदरपंत पुढें चालू लागले. मन जाग्यावर नसलें म्हणजे असेच अपघात होतात. घरट्यांत बसून पिलें जशीं आईची वाट पहात बसतात तसा दारांत बसून विनायक पंतांची वाट पहात होता.

**राग लोभ अन् सुखदुःखाचे भाव मुखावरचे**
**मुलांस कळती सहजपणें हें नवल निसर्गाचें.**
**कांहि तरी जाहलें असावें अपुल्या वडिलांस,**
**नाहीं लागला विनायकाला वेळ कळायास. १४**

चेहऱ्यावर रागाचे, लोभाचे आणि सुखदुःखाचे भाव मुलांच्या सहज लक्षांत येतात. हें निसर्गाचें एक नवल आहे. पंतांचें कांहींतरी बिघडलें आहे हें विनायकाच्या लक्षांत यावयास फारसा वेळ लागला नाहीं.

आणि उठोनी मुलें सकाळीं जाउन बघतात
पडले होते पंत येउनी प्लेगाची गांठ !
कळूनि चुकलें काय व्हायचें अखेर पंतांना;
भविष्य बघुनी पाणि लोचनीं त्यांच्या मावेना. १५

आणि सकाळीं उठून मुलें जो बघतात तों प्लेगाची गांठ येऊन दामोदरपंतांना ताप आला होता. आपलें काय होणार हें पंतांना कळून चुकलें होतें. पुढील भाकितामुळें त्यांच्या डोळ्यांतून अश्रु वहात होते.

प्रसंग होता कठीण आला विनायकावरती,
घरांत नव्हतें वडीलधारें कुणीच त्या रात्रीं.
येणारी रोजची मंडळी रात्रीं बेरात्रीं
रोगानें पण केली त्यांची वाताहत होती ! १६

विनायकावर मोठा प्रसंग आला होता. त्या रात्रीं वडीलधारे माणूस घरांत कोणी नव्हतें. रात्रीं बेरात्रीं येणाऱ्या लोकांचीही प्लेगानें वाताहत करून टाकली होती.

येसुबाइच्या कष्टाळू अन् सहास्य साह्यानें
विनायकानें आवरलें घर मोठ्या धीरानें.
घरांत नव्हते वडीलबंधू याच सुमारास;
अशा प्रसंगीं हाक तरी मारणार कोणास ! १७

येसूवहिनीच्या कष्टाळू आणि हंसतमुखानें केलेल्या मदतीनें धीर करून विनायकानें सारीं कामें आवरलीं. याच वेळीं मोठे बंधु घरांत नव्हते. आणि अशा प्रसंगांत हांक तरी कोणाला मारावयाची ! !

**असेंच होतें : प्रसंग आला जर कोणावरती**
**लोक आपुले ज्यास म्हणावे ते निघुनी जाती.**
**कधीं कुणा आधार वाटतो नात्यागोत्याचा**
**केवळ असतो शुष्क उमाळा तो प्रारंभींचा. १८**

असेंच होतें; कोणावर प्रसंग आला तर ज्यांना आपले लोक म्हणावे ते सारे निघून जातात. नात्यागोत्याचे लोकांचा आपणांस आधार आहे असें कधीं कोणाला वाटतें. पण प्रारंभीच्या म्हणजे प्रत्यक्ष अनुभव येण्यापूर्वीचा तो कोरडा जिव्हाळा असतो.

**शांतसागरीं एकाएकीं वादळ उसळावें,**
**स्वच्छ अंबरीं एकाएकीं ढग भरुनी यावे,**
**तशाच त्यांच्या विस्कटलेल्या उजाड संसारीं**
**आपत्तीचे मेघ लागले करावया फेरी. १९**

शांत सागरांत वादळ एकदम उठावें, स्वच्छ आकाशांत एकाएकीं ढग भरून यावेत तसेंच दामोदरपंतांच्या विस्कटलेल्या उजाड संसारावर संकटांचे ढग येऊं लागले.

**जें व्हायाचें तेंच जहालें हाय अखेरीस;**
**दामोदरपंतास लागला शेवटचा श्वास.**
**तोंच लेक येऊनि ठेपली घरीं रहायाला**
**आणि तिनें आकांत मांडला वडिल बघायाला. २०**

अखेरीस जें व्हावयाचें तेंच झालें. दामोदरपंतांना शेवटचा श्वास लागला आणि त्याच वेळीं त्यांची मुलगी माहेरपणासाठीं घरीं येऊन पोहोचली. वडिलांची भेट पाहिजे म्हणून तिनें आकांत केला.

**आठवल्या तिज बालपणांतिल मायेच्या गोष्टी;**
**आठवणी आठवूनि झाली मनामधें कष्टी.**
**परंतु घेऊं दिलें न दर्शन तिजला वडिलांचें**
**आणि बुडालें शोक सागरीं हृदय बिचारीचें. २१**

लहानपणाच्या मायेच्या अनेक गोष्टींचें तिला स्मरण झालें. आणि त्या आठवणींनीं तिला दु:ख झालें. परंतु तिला वडिलांकडे कोणीही जाऊं दिलें नाहीं, आणि त्यामुळें बिचारीचें हृदय शोक सागरांत बुडून गेलें.

**तुम्हीच ना माहेरपणाला मला आणलीत.**
**आणि कसें हो तुम्हीच गेला असे अकस्मात.**
**काय कोणता माझ्या हातुनि कधीं गुन्हा झाला;**
**न बोलतां मजजवळ शब्दही निघुनि तुम्ही गेला. २२**

माहेरपणासाठीं तुम्हीच ना मला आणलीत आणि अकस्मात कसे हो निघून गेलांत. माझ्या हातून कोणता आणि केव्हा हो असा गुन्हा झाला. माझ्याशीं एक शब्दही न बोलतां तुम्ही कसे हो निघून गेलात!!

**वडिलांचा आधार नि प्रेमळ कौतुक आईचें**
**हेंच मुलींना वैभव असतें प्रिय माहेराचें.**
**असो किती संसार सुखाचा नसेल माहेर,**
**त्या सुख-संसाराचें कौतुक कुणास असणार! २३**

वडिलांचा आधार आणि आईचें प्रेमळ कौतुक हेंच आवडत्या माहेराचें मुलींना वैभव वाटतें. स्वत:चा संसार म्हणजे आपलें सासर कितीही सुखांत आणि वैभवांत असलें तरी माहेर नसलें म्हणजे आपल्या संसाराचें कोडकौतुक कोणास असणार आहे!

**किती वेळ ती अशीच होती करीत आकांत;**
**अशा प्रसंगीं कोण करूं शकणार तिला शांत !**
**रडली रडली ग्लानी येउनि अखेर ती पडली.**
**माहेराला आलि परंतू आलि तशी गेली ! २४**

अशी किती वेळ तरी ती आकांत करीत होती. अशा प्रसंगांत तिचें सांत्वन कोण करूं शकणार ? रड रड रडली आणि ग्लानी येऊन ती पडलीं. माहेरला आली खरी पण आली त्याच पावलीं परत गेली.

* * *

**घरांत ज्यांच्या चार पाहुणे नित्य असायाचे,**
**ओटीवरती गांवांमधले शिष्ट दिसायाचे,**
**कुळें नि गरजू यांची वर्दळ नित्य असायाची**
**अशा प्रसंगीं वाट वांकडी झालि न कोणाची ! २५**

ज्याच्या घरांत चार पाहुणे नेहमीं असावयाचें, ओटीवर गांवांतील शिष्ट मंडळी बसलेली असायची; कुळें आणि गरजू यांची सतत ये जा जा असावयाची, पण या प्रसंगीं पंतांच्या घराकडे कोणीही फिरकलें नाहीं ! !

**ज्यांनि पाहिल्या पदर मोडुनी सोयि अनेकांच्या**
**योग काय हा अन्ति नसावें जवळ कुणी त्यांच्या !**
**पांच सहा लोकांस आणलें कसेंबसें धरुनी**
**दामोदरपंतास नेउनी अग्नि दिला त्यांनीं. २६**

पदर मोडून ज्यांनीं अनेकांच्या सोयी पाहिल्या अशा थोर माणसाच्या अन्तकाळीं त्याच्याजवळ कोणी नसावें या योगाला काय म्हणावयाचें ? कसे बसे पांच सहा लोकांना बोलावून आणलें आणि दामोदरपंतांना नेऊन त्यांनीं अग्नि दिला.

**परत येउनी धुवून झालीं असतिल जो अंगें**
**तोंच लागला पोलीसांचा ससेमिरा मागें.**
**सावकार सरकार लागले मागें कोणाचे,**
**काळवंडतें भल्या भल्यांच्या सुख संसाराचें. २७**

अग्नि देऊन परत आल्यावर स्नानें झालीं नाहीं तोंच पोलिसांचा ससेमिरा सुरूं झाला ! सरकार आणि सावकार एकदां मागें लागले कीं भल्याभल्यांच्या संसाराचें सुख काळवंडतें ! !

**अशा प्रसंगीं मुले मुलें जाणार कुठें निघुनी;**
**विचार नाहीं मुळीच केला पाटिलदादांनीं.**
**हा सारा परिणाम खरोखर सेवावृत्तीचा;**
**गंधच नसतो नोकरांस पण या माणुसकीचा. २८**

अशा प्रसंगीं मुलें मुलें निघून जाणार कोठें. याचा पोलीस पाटलांनीं विचारसुद्धां मनांत आणला नाहीं. हा सारा नोकरवृत्तीचा परिणाम आहे. नोकरांस माणुसकीचा गंधच असत नाहीं !

**केलेले उपकार विसरले पाटिल गांवाचे;**
**उभे राहिले काळ होउनी समोर बाळांचे.**
**चोरावरती ठेउं नये विश्वास जसा कोणी**
**उपकृतांचा तसा भरंवसा धरूं नये कोणी ! २९**

पंतांनीं केलेले उपकार गांवाचे पाटील विसरले आणि काळ होऊन मुलांच्या समोर उभे राहिले ! चोरावर जसा कोणी विश्वास ठेऊं नये त्याचप्रमाणें उपकृतांचाही कोणी भरंवसा धरू नये.

**जाउनि तीं राहतील ऐसें घर त्यांना नव्हतें.**
**आवरील घर वडीलधारें असें कुणी नव्हतें.**
**घर असलें तरि कोण बोलविल अशा प्रसंगांत**
**एक ईश्वरावांचुनि नसतो वालि संकटांत ! ! ३०**

कोणाकडे जाऊन राहतील अशी त्यांना सोय नव्हती. घर आवरील असें वडीलधारेंही घरांत कोणी नव्हते. आणि सोय असली तरी अशा प्रसंगांत कोण बोलावणार ? संकट प्रसंगीं एका ईश्वरावाचून कोणीही त्राता नसतो.

**चला जाउ या आपण राहूं गांवाबाहेर,**
**आपणांस हीं इथें गिधाडें राहुं न देणार !**
**पाहूं पुढचें पुढें काय जें असेल होणार;**
**म्हणे विनायक पुशीत डोळे देउनिया धीर ! ३१**

चला. आपण गांवाबाहेर राहू या. हीं गिधाडें आपणांस येथें राहूं देणार नाहींत. पुढें काय होणार असेल तें पुढें पाहूं. डोळे पुशीत आणि धीर देत विनायक म्हणाला.

**वडील गेले आणि आपुलें घरही जाणार,**
**असें वाटुनी अश्रु मुलांचे ओघळले चार !**
**चीज वस्तु सावरून लावुनि शेवटचें दार**
**भर बाराला बेघर झाले सोडुनि घरदार. ३२**

वडील गेले आणि आपलें घरही जाणार असें वाटून मुलांच्या डोळ्यांतून अश्रु येऊं लागले. चीज वस्तु सावरून आणि शेवटचें दार लावून भर बारा वाजतां घरदार सोडून सावरकर बेघर झाले.

**या योगाला काय म्हणावें हा कसला संसार !**
**कीर्ती ज्यांची सावकार ते–ते झाले बेकार !**
**ऊन कधीं सावली कधीं अन् जीवन याचें नांव;**
**सुखदुःखांतुनि गिरक्या घेते संसाराची नाव. ३३**

या योगाला काय म्हणावें ? हा कसला संसार ! सावकार ही ज्यांची कीर्ति ते बेकार झाले. कधीं ऊन कधीं सावली याचें नांव जीवन! सुखदुःखांतून संसाराची नांव गिरक्या घेते.

**अश्रूंचा अभिषेक प्रभूवर शेवटचा करुनी.**
**गेले ते गेलेच; परतले नाहि पुन्हा फिरुनी.**
**त्या दिवसापासूनि लागला दिवा घरीं नाहीं**
**जाइजुईचा सुगंध दारीं दरवळला नाहीं. ३४**

घरच्या देवावर शेवटचा अभिषेक करून ते बाहेर पडले ते पडलेच. पुन्हां म्हणून परत आलेच नाहीत. तेव्हांपासून जाई जुईचा सुगंध दारीं दरवळला नाहीं.

**फुलें न आलीं तेव्हांपासुनि पारिजातकाला;**
**तेव्हांपासुनि घरांत नाहीं गोठा हुंबरला. !**
**आम्रतरूंवर गोड कोकिळा नाहीं कधीं दिसली !**
**तेव्हांपासुनि घार घरावर नाहि कधीं बसली ! ३५**

तेव्हांपासून पारिजातकाला फुलें आलीं नाहींत. तेव्हांपासून घरचा गोठा हंबरला नाहीं. आंब्याच्या झाडावर कोकिळा कधीं दिसली नाहीं. आणि तेव्हांपासून घरावरती घारही कधीं बसलेली कुणी पाहिली नाहीं.

**होइल मंदिर संगमरवरी आजूबाजूस,**
**अनेक येतिल पुण्यवास्तु ही लोक बघायास;**
**या आशेवर दगड तेवढे अजूनि दारांत**
**शुभ कालाची पथप्रतीक्षा करीत असतात. ३६**

सभोंवती संगमरवरी दगडाचें मंदिर होईल आणि ही पुण्यवास्तु पहाण्यासाठीं अनेक लोक येतील या आशेवर तेथील दगड मात्र त्या शुभकाळाची मार्गप्रतीक्षा करीत आहेत.

**पुढें विनायक मागें बंधू गणेशबाबाजी**
**आणि मागुनि चालत होत्या वहिनि यशोदा जी.**
**बोलत नव्हत्या परंतु होत्या दुःखाच्या दारीं**
**घरवाडीचें स्त्रियांस असतें आकर्षण भारी. ३७**

पुढें विनायक आणि मागें त्यांचे थोरले बंधु गणेशबाबा, आणि त्यांच्यामागे यशोदा वहिनी चालत होत्या. पण त्या मनांतून फार दुःखी होत्या. (साहजिकच आहे.) घरवाडीचें स्त्रियांना फार आकर्षण असतें.

**उजाड गांवामधिल एकही घर उघडें नव्हतें;**
**आगें मागें बघावयाला कुणी उभें नव्हतें;**
**पुढें पाहुनी दोन देवळें गांव शिवेवरची,**
**कशीबशी घेतली करूनी सोय रहायाची. ३८**

उजाड झालेल्या भगूर गांवांत एकही उघडें घर नव्हतें. आणि त्यामुळें त्यांना बघण्यासाठीं आजूबाजूस कोणी उभें नव्हते. शिवेवरच दोन देवळें पाहून त्या देवळांत रहावयाची त्यांनीं कशीबशी सोय करून घेतली.

**सोय करुनी सोयिसोयिनें जीवन जगण्याचा**
**उपजत असतो स्वभाव साऱ्या जीवजिवाणूंचा.**
**सोयिसोयिनें करतो बघतो दुसऱ्यांच्या सोयी**
**देव तयाचें उणें कशाचें देत पडूं नाहीं. ३९**

सोय करून एकमेकांच्या सोयीसोयीनें जीवन जगावें हा साऱ्या जीवजिवाणूंचा उपजत स्वभाव असतो. सोयीसोयीनें सोयी करतो आणि दुसऱ्यांच्या सोयी बघतो त्यांना देव कशाचीही उणीव पडूं देत नाहीं.

**धगधगणाऱ्या स्मशानांतल्या लाल उजेडांत**
**रात्र खरीं पण नाहिं वाटलें भय अंधारांत.**
**सहजपणें वाटतें एऱ्हवी भय ज्यांचें भारी**
**कधीं कधीं ते होति आपुले स्नेही सहकारी. ४०**

स्मशानांतल्या धगधगणाऱ्या लाल उजेडांत रात्र असूनसुद्धां अंधारामध्यें त्यांना कशाचीही भीति वाटली नाहीं. ज्यांचें एऱ्हवी सहजपणें भय वाटतें तेच कधीं कधीं आपले स्नेही आणि सहकारी होतात.

**दुर्दैवाचे खेळ विलक्षण विचित्र असतात.**
**मधेंच दावुनि आशा, अन्तीं निराश करतात.**
**स्मशानांतल्या देवळांमधें राहियलीं बाळें,**
**ऐकुनिया हें चुलत्याचें मन गहिंवरुनी आलें! ४१**

दुर्दैवाचे खेळ, विलक्षण आणि विचित्र असतात. मधेंच आशा दाखवून अन्तीं निराशा करतात. स्मशानामधल्या देवळांत मुलें जाऊन राहिलीं आहेत हें ऐकून सावरकरांच्या चुलत्याचें मन गहिंवरलें !!

**मुलें पोरकी वाऱ्यावरती कशीं अशीं सोडूं !**
**स्मशानामधें रहावयाला त्यांस कसा धाडूं !**
**माझ्यावांचुनि कोण पुढें येणार सहाय्यास**
**असें बोलुनी तेहि निघाले तिथें रहायास. ४२**

पोरकी मुलें; त्यांना वाऱ्यावर कसा सोडूं ! आणि स्मशानांत त्यांना कसा धाडू ? माझ्यावांचून त्यांना कोण मदत करणार असें म्हणून तेही तिकडेच (देवळांत) रहावयास गेले.

**ज्याच्याकडुनी जी न अपेक्षा कधीं कुणी केली**
**तोच नेमका उभा राहतो होउनिया वाली.**
**विश्वासानें मान मांडिवर घेउनि बसतात**
**हवेत तेव्हां तेच नेमके निघून जातात ! ४३**

मांडीवर मान घेऊन बसणारे खात्रीचे लोक, त्यांची जेव्हां गरज असते त्याच वेळीं नेमके निघून जातात. आणि ज्याच्याकडून कधीं कोणी अपेक्षा केलेली नसते तोच नेमका आपल्या संकटांत मदतीसाठीं उभा राहतो.

**बघतिल आतां चुलते पुढचें कुठें रहायाचें;**
**आणि यापुढें सांगतील ते तसें करायाचें.**
**मुलें पोरकीं सहज वाटला धीर जरा त्यांस.**
**प्रसंगामधें काडीवरही बसतो विश्वास. ४४**

चुलते आहेत, पुढे कोठें रहावयाचें वगैरे तेच बघतील आणि यापुढे ते सांगतील तसें करावयाचें. पोरक्या मुलांना तेवढाच सहज धीर वाटला. प्रसंग आल्यावर काडीवरही मनुष्य विश्वास ठेवतो.

**अशा विचारामधें मुलांचा दिवस बरा गेला**
**आणि मुलांना संकटांत या धीर जरा आला.**
**परंतु नाहीं दिवस लोटले दोन अकस्मात**
**दुर्दैवानें पहा तयांवर केलि पुन्हां मात.** ४५

अशा विचारांत मुलांचा दिवस जरा बरा गेला आणि आपत्कालीं त्यांना जरा धीरही आला. पण दोन दिवसही लोटले नसतील तोंच दुर्दैवानें त्यांना पुन्हां गांठलें.

**येति संकटें एकामागुनि एक कुणावरती.**
**संकट नाहीं येत एकटें तसें कुणावरती.**
**विश्वासुनि आधार वाटतो सग्यासोयऱ्यांचा,**
**केवळ असतो शुष्क उमाळा तो आरंभींचा.** ४६

कोणावर संकटें यावयाचीं झालीं तर तीं एकामागून एक येत रहातात. त्याचप्रमाणें संकट कोणावर एकटेंच येत नाहीं. मित्र आणि सोयरे यांच्यावरील विश्वासामुळें त्यांचा आधार वाटतो. पण तो आरंभीं आलेला कोरडा उमाळा होय.

**जसा चोर कोणास गांठतो अवचित मार्गांत**
**प्लेगानें चुलत्यास गांठलें तसें अकस्मात.**
**पूर्वकर्म आधीन असें हें जीवन सर्वांचें.**
**कृतकर्माचें कुणास नाहित भोग चुकायाचे.** ४७

जसा चोर हा एखाद्याला मार्गांत अवचित गांठतो त्याप्रमाणें सावरकरांच्या चुलत्याला प्लेगानें अकस्मात गांठलें. सर्वांचें जीवन हें पूर्व कर्माधीन असतें. कृतकर्माचे भोग कोणालाही चुकत नाहींत.

**परंतु नाहीं धीर सोडला गणेशबाबांनीं**
**किती संकटें येतिल बघुं या योजियलें त्यांनीं.**
**दंड उगारुनि उभे राहतां देउनि आव्हान**
**दुर्दैवाचें देखिल जातें गळून अवसान ! ४८**

परंतु गणेश सावरकरांनीं धीर सोडला नाहीं. किती संकटें येतात तें बघावयाचें त्यांनीं ठरविलें. आवाहनपूर्वक दंड थोपटून आपण उभे राहिलों तर दुर्दैवाचें देखील अवसान गळून जातें.

**व्याजानें वाढतात जैशी लोकांचीं देणीं**
**दुःखाची भयभीति मानतां दुणावतीं दुखणीं.**
**जीवन आहे एक नदीचें खळखळतें पाणी**
**रंग जसा टाकाल तसें तें जातें रंगूनी. ४९**

व्याजानें जशीं लोकांची देणीं वाढतात त्याप्रमाणें दुःखाची भीति मानली तर ती वाढतच जाते. जीवन हें नदीचें खळखळ वाहणारें पाणी आहे, यांत जो रंग टाकाल तसा त्या पाण्याचा रंग होतो.

**केलें स्वागत तर दुःखेंही निष्प्रभ होतात,**
**गुलबक्षीच्या फुलांसारखीं सुकून जातात.**
**गेला दिन आजचा उद्याचें उद्यां बघायाचें.**
**पहात होते सावरकरजी खेळ नशीबाचे. ५०**

दुःखाचें स्वागत केलें म्हणजे दुःखाची तीव्रता नाहींशी होते आणि गुलबक्षीच्या फुलांसारखी ती सुकन जातात. म्हणजे त्यांचें कांहीं वाटेनासें होतें. आजचा दिवस गेला, उद्याचें उद्या बघूं अशा तऱ्हेनें सावरकर नशिबाचे खेळ पहात होते.

**देव आणि दुर्दैव यांतला समेट मोडून**
**अखेर आला दीन दयाळू देवच धांवून.**
**गांव वेशिच्या देवळांमधें अनाथ होऊनी**
**सावरकर राहतात दुःखद वार्ता ऐकूनी; ५१**

देव आणि दुर्दैव यांच्यांतील समेट मोडून अखेर दीनदयाळू देवच धांवून आला. अनाथासारखे गांवच्या देशीवर असलेल्या देवळांत सावरकर राहतात हें दुःखकारक वृत्त ऐकून–

**आठवुनी दिन मागिल अपुल्यावरिल संकटाचे,**
**आठवुनी उपकार मागचे गणेशपंतांचे,**
**धांवत आले मित्र सोबती गणेशबाबांचे;**
**उभें राहिलें पुण्य तयांच्या समाजसेवेचें. ५२**

आणि मागें आपल्यावर संकट आलें होतें तें आठवून आणि त्या वेळीं आपल्यावर केलेले उपकार स्मरून गणेशबाबांचे स्नेही सोबती धांवले. गणेशपंत सावरकरांनीं केलेल्या समाजसेवेचे पुण्य त्यांच्या मागें येऊन उभें राहिलें.

**आठवुनि उपकार धांवतो नित्य सहाय्यास**
**समाज देतो मान कृतज्ञें अशा गृहस्थास.**
**करती जे निरपेक्ष बुद्धिनें सहाय्य लोकांना**
**कमी कशाचें पडूं न देतो देव कधीं त्यांना. ५३**

उपकार आठवून जो नेहमी मदत करावयास धावतो अशा गृहस्थाला समाज कृतज्ञतापूर्वक मान देतो. निरपेक्षपणें जे लोकांना साहाय्य करतात त्यांना देव कशाचेंही कमी पडू देत नाहीं.

**घरांत ज्याच्या गोड पौर्णिमा नित्य फुलायाची,**
**करूं लागली तिथें पहारा बाई अवसेची!**
**छत्र जयाचें असावयाचें पंचक्रोशीस**
**उपरे होउनि तेच निघाले नाशिक तीर्थास. ५४**

ज्या घरांत नेहमी गोड पौर्णिमा फुलायची म्हणजे ज्या घरांत नेहमी समाधान असावयाचें त्या घरावर आवस पहारा करूं लागली; म्हणजे त्या घरांत नेहमीं दुःखी आणि कष्टी वातावरण झालें. पंचक्रोशीला ज्यांचा आधार असावयाचा ते उपरे होऊन नाशिक तीर्थाला निघाले.

**निरोप द्याया पुढें नि मागें लोक असायाचे**
**आज परंतू कुणीच नव्हते भगूर गांवाचे.**
**कोठिल न कळे परंतु होतें मरतुकडें श्वान**
**होतें तें दुर्दैव चाललें मागुनमागून !! ५५**

निरोप द्यावयास पुढें मागें लोक असावयाचे पण आज भगूर गांवचें कोणीही दिसले नाहींत. कोठलें कोणाला ठाऊक पण एक मरतुकडें कुत्रें त्यांच्याबरोबर चालत होतें. तें दुर्दैवच त्यांच्या मागून मागून चाललें होतें.

* * *

**भारत भू जयकार जयाचा त्रिवार गर्जू या**
**राष्ट्रासाठीं जगणें मरणें हें सुख समजू या.**

## (१९) मित्रमेळयाची स्थापना

**राहु लागले सावरकरजी नाशिक शहरांत,**
**दुर्दैवानें नाहिं सोडली परि त्यांची पाठ.**
**दुर्दैवाचा असाच असतो छंद छळायाचा;**
**दुर्दैवाचा फेरा लौकर नाहिं सुटायाचा! ५६**

सावरकर नाशिक शहरांत राहूं लागले. पण दुर्दैवानें त्यांची पाठ सोडली नाहीं. दुर्दैवाचा दुसऱ्यांना असाच छळण्याचा छंद असतो. दुर्दैव एकदां मागें लागलें म्हणजे तें लौकर सोडीत नाहीं.

रडा ओरडा दुर्दैवाच्या तें नसतें गांवीं;
दुर्दैवाला हृदयचि नसतें, दया कशी यावी !
रामायण घ्या भारत वाचा दर पानोंपानीं
दुर्दैवाचें चरित्र आहे लिहिलें व्यासांनीं. ५७

रडा ओरडा, दुर्दैवाचें तिकडे लक्षही असत नाहीं. दुर्दैवाला हृदयच नसतें तेव्हां त्याला दया कशी येणार ! रामायण वाचा, भारत वाचा, श्रीव्यासांनीं पानापानावर दुर्दैवाचें चरित्र लिहून ठेवलें आहे.

होतें नव्हतें घरांत जें जें भगूर गांवांत
तें चोरांनीं लुटून नेलें स्वच्छ उजेडांत !
कागदपत्रें जळलीं; जळलीं लोकांचीं घेणीं;
फक्त राहिलीं त्यांच्यासाठीं लोकांचीं देणीं ! ५८

भगूर गावच्या घरांत जें जें होतें तें चोरांनीं भर दुपारीं लुटून नेलें. कागदपत्रें जाळून टाकलीं. लोकांचीं देणीं जळून गेलीं. फक्त सावरकरांसाठीं लोकांचीं देणीं शिल्लक राहिलीं होतीं.

करी काळजी आणि काळजी करि येसूबाई
लहान तीही परी सोडला धीर तिनें नाहीं.
हंसून दोघे काढित होते दिवस बिऱ्हाडांत,
धीर द्यावया कुणीच नव्हतें या संसारांत. ५९

विनायक काळजी करी आणि येसूबाई काळजी करीत. तीही लहान होती. पण तिनें धीर सोडला नाहीं. बिऱ्हाडांत ती दोघे हंसत दिवस काढीत होती. या संसारांत त्यांना धीर द्यावयास कोणी नव्हतें.

**न कळे झाली चूक कोणती निर्दय दैवाची !**
**बरी होउनी परतुनि आली स्वारि गणेशाची;**
**तरि न सोडलें दुर्दैवानें सावरकरजींना**
**दारिद्राच्या पुढें तयांचे कांहीं चालेना. ६०**

निर्दय दवाची काय चूक झाली कळलें नाहीं, गणेशपंत बरे होऊन दवाखान्यांतून घरीं परत आले; तरीसुद्धां दुर्दैवानें सावरकरजींना सोडलें नाहीं. दारिद्र्यापुढें त्यांना हात टेकावे लागले.

**कसें बसें दिन काढित होते गणेशबाबाजी**
**शिकेल तात्या जातिल हे दिन ही आशा त्यांची !**
**भरलें आहे जीवन सगळें अनंत दुःखांनीं**
**आशेवरती हे जन जगती म्हणति कुणी कोणी. ६१**

गणेशपंत सावरकर कसेबसे दिवस काढीत होते. तात्या शिकेल आणि हे दिवस नाहीसे होतील अशी त्यांना मोठी आशा वाटे. संसार अनन्त दुःखानीं भरला आहे. लोक आशेवर जगत असतात असें कोणी कोणी म्हणतात.

**परदास्यांतुनि कधीं मुक्तता होइल देशाची,**
**भारतभू निर्धवन आपुली कशी करायाची,**
**स्वातंत्र्याचा सूर्य भारती कधि उगवायाचा,**
**राव विनायक करीत होते विचार देशाचा. ६२**

परदास्यांतून देश केव्हां मुक्त होईल, भारत देश निर्यवन कसा करावयाचा, स्वातंत्र्यरवि भारतावर केव्हां उगवावयाचा ? राव विनायक देशाचा विचार करीत होते.

**देश कोणता स्वतंत्र झाला अर्ज विनंत्यांनीं!**
**आणि जाहला लाभ कुणाला वाद निषेधांनीं!**
**जुमानील कां इंग्रज अमुच्या अर्जविनंत्यांस,**
**जाइल कां हा देश सोडुनी अपुल्या देशास? ६३**

अर्ज विनंत्या करून कोणता देश स्वतंत्र झाला आहे? वादविवाद करून आणि निषेध करून कोणाचा लाभ झाला आहे? आमच्या अर्ज विनंत्यांची इंग्रज पर्वा करील काय? आणि हा देश सोडून आपल्या देशीं निघून जाईल काय?

**सांपडलेला परिस सुखानें देतिल टाकून,**
**सांपडलेल्या कामधेनुला देतिल सोडून,**
**कल्पवृक्ष टाकतील घरचा बळेंच तोडूनी**
**असे मूर्ख इंग्रजांत नव्हते मुत्सद्दी कोणी. ६४**

सहजासहजीं सापडलेला परीस टाकून देतील, किंवा सापडलेल्या कामधेनूला सोडून देतील, घरीं लावलेले कल्पवृक्ष आपण होऊन तोडून टाकतील असे मूर्ख मुत्सद्दी इंग्रजांत कोणी नव्हते.

**केवळ पानें खुडून कां विषवृक्ष मरायाचा?**
**केवळ गर्जत राहुनिया का वाघ मरायाचा?**
**मेघ गर्जुनी नद्यांस केव्हां पूर कधीं येतो?**
**घरांत बसुनी काय कुणाचा मळा कधीं पिकतो! ६५**

विषवृक्षाची नुसतीं पानें खुडून विषवृक्ष मरून जाईल काय? केवळ ओरडत राहून वाघ मरेल का? मेघांच्या नुसत्या गर्जनांनीं नद्यांना कधीं पूर येतो काय किंवा घरांत बसून कोणाचा मळा कधीं पिकतो का?

**उठाव देशामधें पाहिजे सशस्त्र बंडाचा**
**आणि डोंब पेटला पाहिजे महान् युद्धाचा.**
**सदासिद्ध युद्धास तरुण पाहिजेत देशाचे.**
**रणावीण स्वातंत्र्य कुणाला नाहिं मिळायाचें. ६६**

सशस्त्र बंडाचा देशांत उठाव झाला पाहिजे आणि महायुद्धाचा डोंब पेटला पाहिजे. देशाचे तरुण युद्ध करावयास सदा सिद्ध असले पाहिजेत. युद्धाखेरीज कोणालाही स्वातंत्र्य मिळावयाचें नाहीं.

**अभ्यासाविण परीक्षेंत यश नाहिं मिळायाचें,**
**घांव घातल्यावीण दागिने नाहित व्हायाचें,**
**आणि पैलुविण तेज हिऱ्याचें नाहिं पडायाचें,**
**रणावीण स्वातंत्र्य कुणाला नाहिं मिळायाचें. ६७**

अभ्यास केल्याखेरीज परीक्षेंत यश मिळत नसतें. घांव घातल्याखेरीज (म्हणजे ठोकल्याखेरीज) दागिनें होत नाहींत. पैलू पाडल्याखेरीज हिऱ्याला तेज चढत नाहीं (त्याचप्रमाणें) युद्धाखेरीज कोणालाही स्वातंत्र्य मिळावयाचें नाहीं.

**भाषण ऐकुनि विनायकाचें 'छान' म्हणे जो तो.**
**पहात होता त्यांत विनायक कोण पुढें येतो.**
**विनायकानें अनेक वेळां बोलुन बोलून**
**म्हसकर पागे यांस घेतले नीट निरिक्षून. ६८**

विनायकाचें असें भाषण ऐकून जो तो छान असें म्हणाला. त्यांपैकीं आपल्या बरोबर कोण पुढें येतो इकडे विनायकाचें लक्ष होतें. अनेक वेळां चर्चा केल्यानंतर म्हसकर व पागे यांची त्यानें निवड केली.

**विनायकानें शपथ दिली त्या स्वदेशसेवेची**
**मारित मारित आणि मरेतों झुंज करायाची.**
**शुभदिन तो कोणता कुणाच्या नाहीं स्मरणांत;**
**"राष्ट्रसमुह" संघटणा झाली स्थापन देशांत. ६९**

विनायकानें त्यांना स्वदेशसेवेची आणि मारीत मारीत मरेपर्यंत झुंजत रहावयाची शपथ दिली. आणि 'राष्ट्रसमूह' ही सशस्त्र क्रांतिकारकांची संघटना त्यांनीं देशांत प्रथमच स्थापन केली. स्थापनेचा तो शुभ दिवस कोणता होता हें कोणाच्याही लक्षांत नाहीं.

**होउं लागल्या गुप्त बैठकी राष्ट्रसमूहाच्या,**
**होउं लागल्या अतृप्त चर्चा स्वदेश सेवेच्या.**
**संमत झाले नियम आणि निर्बंध मंडळाचे**
**कुणास घ्यावें करुनि सभासद राष्ट्रसमूहाचें. ७०**

राष्ट्रसमूहाच्या गुप्त बैठकी होऊं लागल्या. स्वदेशसेवेच्या अतृप्त चर्चा होऊं लागल्या. 'राष्ट्रसमूहा'चे कोणाला सभासद करून घ्यावे यासंबंधीचे नियम आणि निर्बंध संमत करण्यांत आले.

**स्फूर्ती देइल जी तरुणांना स्वदेश सेवेची,**
**आकर्षित जी करील चित्तें लोकसमाजाची**
**उघडपणें जी करील कामें लोक उठावाची,**
**असेंहि ठरलें एक असावी संस्था तरुणांची. ७१**

स्वदेशसेवेची तरुणांना जी स्फूर्ति देईल, लोकांचीं मनें आकर्षित करील अशी लोक-उठावाचीं कामें करणारी एखादी तरुणांची स्वतंत्र संस्था असावी असेंही ठरलें.

**तरुणांचा उत्साह नि आशिर्वाद अनेकांचा**
**मातृभूमिचा उजळवितो पथ सुखसमृद्धीचा.**
**म्हणुनि योजलें विनायकानें गुप्त बैठकींत**
**गांवामधल्या सर्व चळवळी घ्याव्या वळणांत. ७२**

तरुणांचा उत्साह आणि अनेकांचा आशीर्वाद मातृभूमीच्या सुखसमृद्धीचा मार्ग प्रकाशित करतो. म्हणून एका गुप्त बैठकींत गांवामधल्या सर्व चळवळी आपल्या हातीं घ्याव्यात असें ठरलें.

**असेल ज्याची सदा तयारी कुठेंहि जायाची,**
**पडतिल त्या त्या हालअपेष्टा सहन करायाची,**
**कमी बोलका अन् विश्वासू भेदक दृष्टीचा**
**असा असावा तरुण सभासद गुप्त मंडळाचा. ७३**

कोठेही जाण्याची आणि पडतील त्या हालअपेष्टा सहन करावयाची ज्याची नेहमी तयारी असते, आणि जो कमी बोलका, विश्वासू आणि भेदक दृष्टीचा, असा गुप्तमंडळाचा सभासद असावा लागतो.

**मृत्यू ज्याचा खेळ, सदा जो तयार मरणास.**
**जगू म्हणे जो केवळ रिपुचे गळे चिरायास.**
**मारित मारित झुंजत राहिल हा बाणा ज्याचा**
**तरुण सभासद असा असावा क्रांतिमंडळाचा. ७४**

मरणाशीं खेळणें हा ज्याचा खेळ असतो आणि प्रसंगीं मरावयासही ज्याची तयारी असते, आपल्या शत्रूचे गळे चिरण्यासाठीं जगावें असें जो म्हणतो, मारीत मारीत झुंजत राहील हा ज्याचा बाणा असतो असा तरुण क्रांतिमंडळाचा सभासद असावा.

**जसे हिऱ्याचे रत्नपारखी पैलू बघतात,**
**मोती मोती जसे जव्हेरी निवडुनि घेतात,**
**गुप्त सभेनें असे तरुण पारखून घ्यायाचे**
**निश्चित केलें स्थापायाचें मंडळ तरुणांचे. ७५**

रत्नपारखी हिऱ्याचे जसे पैलू बघतात, जव्हेरी जसे मोती मोती निवडून घेतात, त्याप्रमाणें तरुणांची पारख करून एक मंडळ काढावयाचें निश्चित करण्यांत आलें.

**कधीं करावा कसा करावा मुहूर्त संस्थेचा**
**विचार होता करित विनायक मनामधें याचा.**
**यावि लागते वेळ कराया कार्य नवें कांहीं.**
**आल्याविण शुभ वेळ व्हायचें काम कधीं नाहीं! ७६**

या संस्थेचा आरंभ कसा करावा आणि कधीं करावा याचा विचार विनायकाचे मनांत असे. नवें कार्य करायला तशी वेळ यावी लागते. शुभवेळ आल्याखेरीज काम कधीं होत नाहीं.

**मित्रमंडळीसवें विनायक याच सुमारास**
**गांवामधलें नाटक गेला एक पहायास;**
**आणि तिथें येऊनि कुणीसे सांगितलें त्यास**
**अनिर्बंध सोडले पुण्यांतिल नातू बंधूस. ७७**

याच सुमाराला आपल्या स्नेह्यांबरोबर एक नाटक बघावयाला, विनायक गेला असता नाटकगृहांतच विनायकाला कोणी सांगितलें. कीं पुण्यांतील नातूबंधूंस अनिर्बंध सोडून दिलें.

हर्ष जाहला विनायकाच्या मित्रमंडळातें
म्हणे विनायक चला घेउं या प्रकट सभा येथें.
अनायसें आहेत उपस्थित जन प्रयोगाला
वेळ नाहिं लागणार कांही एक ठरावाला. ७८

विनायक आणि त्याची मित्रमंडळी यांना त्या वार्तेनें आनंद झाला. इथेंच प्रकट सभा घेऊं, अनायासें प्रयोगाला लोक उपस्थित आहेत, एक ठराव करावयास कांहीं वेळ लागणार नाहीं असें विनायक म्हणाला.

नातूंचें अभिनन्दन करु या ते सुटले म्हणुनी
नाहिं ऐकले विनायकाचें परी पुढाऱ्यांनीं.
सरकाराच्या विरुद्ध कांहीं असें करायाची
कधीं तयारी नव्हती गांवांतील पुढाऱ्यांची. ७९

परंतु नातूंची सुटका झाली म्हणून त्यांचें अभिनंदन आतांच करावें हें विनायकाचें म्हणणें पुढाऱ्यांनीं ऐकलें नाहीं. सरकारच्या विरुद्ध असें कांहीं करावयाची गांवांतल्या पुढाऱ्यांची कधीं तयारी नव्हती.

तशीच आली वेळ कधीं हे गोमे गांवाचे
सरकाराची बाजु घेतल्याविण न रहायाचे !
करी न पर्वा घेइ न बाजू स्वदेशभक्तांची
करा कशाला उगाच पर्वा अशा पुढाऱ्यांची ! ८०

तसा प्रसंग आला तर हे गांवचे गोमे म्हणजे शिष्ट सरकारची बाजू घेतल्याखेरीज रहावयाचे नाहींत. देशभक्तांची जे पर्वा करीत नाहींत, आणि त्यांची बाजू घेत नाहींत अशा पुढाऱ्यांची पर्वा कशाला करावयाची!

**मातृभूमि आराध्य देवता भक्ति तिची करतो,**
**हिंदुत्वाच्या अभिमानाचा गर्व जया असतो,**
**लोकहितास्तव प्राणपणानें सदैव लढण्याची**
**असावया लागते तयारी लोकपुढाऱ्यांची. ८१**

मातृभूमि ही आराध्य देवता मानून जो तिची भक्ति करतो, हिंदुत्वाचा ज्याला अभिमान असतो अशा लोकपुढाऱ्याची लोकहितास्तव प्राणपणानें लढण्याची नेहमी तयारी असावी लागते.

**स्वातंत्र्यास्तव ज्यांनि आपदा भोगियल्या नाना**
**धन्यवाद पाहिजेत आपण खास दिले त्यांना.**
**करावया अभिनन्दन त्यांचें भय वाटे ज्यास**
**कसें म्हणावें बरें पुढारी अशा पुढाऱ्यांस ! ८२**

स्वातंत्र्यास्तव ज्यांनीं अनंत कष्ट सोसले अशा लोकांना आपण धन्यवाद दिले पाहिजेत. त्यांचें अभिनंदन करावयास ज्यांना भय वाटतें अशा पुढाऱ्यांना पुढारी कसें वरें म्हणतां येईल?

**घरवाडी व्हावया लागती कष्ट करायास.**
**विद्येसाठीं लागत असतो सदैव अभ्यास.**
**मान पाहिजे त्यास लागतो त्याग करायाला;**
**रोष लागतो सहन करावा लोकपुढाऱ्याला. ८३**

घरवाडी करावयाची तर कष्ट करावे लागतात. विद्या संपादन करावयासाठीं अभ्यास करावा लागतो, ज्याला मान पाहिजे असेल त्यानें त्याग केला पाहिजे (आणि प्रसंगीं) पुढाऱ्यांना लोकांचा रोषही सहन करावा लागतो.

निश्चित झालें नवीन संस्था स्थापन करण्याचें
नि मित्रमेळा नांव ठेवलें नवीन संस्थेचें.
बलिदानानें पेटविलें नभ या नवसंस्थेनें;
नांव काढलें विनायकाच्या मित्रमंडळानें. ८४

नवीन संस्था स्थापन करण्याचें निश्चित झालें व त्याप्रमाणें संस्था स्थापन करून 'मित्र मेळा ' हें तिचें नांव ठेवण्यांत आलें. या नवीन संस्थेनें बलिदान करून सारें आकाश पेटवून टाकलें ! विनायकाच्या मित्रमंडळानें नांव गाजविलें.

देइल स्फूर्ती करील कीर्ती स्वराष्ट्रधर्माची
अशी असावीं ध्येयधोरणें राष्ट्रिय संस्थांचीं.
प्रगमशीलता कार्य विपुलता असेल संस्थेंत
अशाच संस्था इतिहासांतार गर्जत असतात. ८५

लोकांना स्फूर्ति देईल व स्वराष्ट्रधर्माची कीर्ति करील म्हणजे स्वराष्ट्रधर्माची वाढ करील अशीं राष्ट्रीय संस्थांचीं ध्येय धोरणें असावींत. ज्या संस्था प्रगमनशील असतात आणि संस्थेपुढें विपुल कार्य असतात, अशाच संस्थांचें नांव इतिहासांत होतें.

* * *

भारत भू जयकार जयाचा त्रिवार गर्जू या
राष्ट्रासाठीं जगणें मरणें हें सुख समजू या.

## (२०) संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा

वाढुं लागले तरुण सभासद मित्रमंडळाचे,
गर्जु लागलें नांव नाशिकामधें मंडळाचें;
आणि घेतली विनायकानें सभा मंडळाची
होति सभा पहिलीच उपस्थिति होती सर्वांची. ८६

मित्रमंडळाचे तरुण सभासद वाढू लागले. नाशिकमध्यें मंडळाचें नांव सर्वतोमुखीं झालें. मंडळाची सभा विनायकानें बोलावली. ती पहिलीच सभा होती आणि सर्व सभासद उपस्थित होते.

**घालुनि वस्त्रें नवीं वाटतें जसें नवें कांहीं**
**तसें मुलांना वाटत होतें आज नवें कांहीं.**
**मुलें मुलें तीं उत्साहाला काय कमी त्यांच्या!**
**चालत होत्या मुलांत गोष्टी स्वराष्ट्रसेवेच्या.** ८७

नवीं वस्त्रें घातलीं म्हणजे कांहीतरी विशेष वाटतें त्याप्रमाणें मुलांना (म्हणजे मंडळाच्या सभासदांना) आज कांहीं नवेंच वाटत होतें. मुलेंमुलें जमल्यावर त्यांच्या उत्साहाला काय कमी पडणार! स्वराष्ट्र सेवेच्या गोष्टी मुलें एकमेकांत करीत होतीं.

**उभा राहिला राव विनायक भाषण करण्यास**
**देउनि टाळ्या सभासदांनीं मान दिला त्यास.**
**स्वातंत्र्याच्या चर्चेसाठीं जिथें मुलें जमलीं**
**हिंदुस्थानामधील होती हीच सभा पहिली.** ८८

राव विनायक भाषण करण्यास उभा राहिला तेव्हां सभासदांनीं टाळ्या वाजवून आपला आदर व्यक्त केला. संपूर्ण स्वातंत्र्याची मुलें एकत्र जमून घोषणा करीत आहेत अशी हिंदुस्थानांतील हीच पहिली सभा होय.

**परसत्ता पाहिजे द्यावया आपण फेकून**
**वाढवावया राष्ट्रामध्यें हिंदूंचा मान.**
**विचार याचा करावयास्तव जिथें मुलें जमलीं**
**हिंदुस्थानामधील आहे हीच सभा पहिली.** ८९

राष्ट्रांमध्यें हिंदुराष्ट्राचा मान वाढवावयाचा तर परसत्तेचें जोखड आपण फेकून दिलें पाहिजे, आणि याचाच विचार करण्यासाठीं मुलें जमलीं होतीं अशी हीच हिंदुस्थानांतील पहिली सभा होय.

**कसें आपुलें राष्ट्रभारती मुक्त करायाचें**
**यवन इसाई कसें येथुनी नष्ट करायाचे,**
**मार्ग कोणता पंथ कोणता या शुभ कार्याचा**
**आज आपणां विचार आहे हाच करायाचा. ९०**

आपला भारत देश स्वतंत्र कसा करावयाचा, यवन इसायांचा नायनाट कसा करावयाचा आणि या शुभकार्यासाठीं कोणता मार्ग स्वीकारावयाचा आणि कार्याची पद्धति कोणती असावी याचाच आपणांस आज विचार करावयाचा आहे.

**कमी करा निर्बंध नि जाचक कर अमुच्यावरचे**
**रडगाणें हें किती सारखें गात बसायाचें !**
**विषवृक्षाची कुठवर पानें खुडत रहायाचें;**
**धोरण मजला चूक वाटतें राष्ट्रिय पक्षाचें. ९१**

आमच्यावरचे जाचक कर आणि निर्बंध कमी करा हें रडगाणें सारखें किती दिवस गात रहावयाचें ! विषवृक्षाचीं पानें किती दिवस खुडत रहाणार ! राष्ट्रीय पक्षाचें धोरण मला चुकीचें वाटतें.

**रूपांतर कां विषवृक्षाचें अमृतवृक्षांत**
**होइल अर्ज विनंत्यांचें जल घालित बसलात ?**
**धोरण मजला चूक वाटतें या नेमस्तांचें**
**हात जोडुनी जी जी जी जी किती करायाचें ! ९२**

अर्ज विनंत्यांचें पाणी घालीत राहून विषवृक्षाचें अमृत वृक्षांत का रूपांतर होणार आहे ? या नेमस्तांचें धोरणही मला चुकीचें वाटतें. हात जोडून ' साहेब ' ' साहेब ' असें किती दिवस करीत रहावयाचें ?

**दिसेल जेथें साप हवा तो तिथेंच ठेचाया.**
**गळूं जाहलें अंगावर तें हवेंच कापाया.**
**जर अंबा नासला हवा तो दूरच फेकाया.**
**परसत्ता ही तशी उलथुनी हवीच टाकाया. ९३**

जिथे दिसेल तिथे सापाला ठेचलाच पाहिजे. गळू झालें तर तें कापलेंच पाहिजे. आंबा नासला तर तो दूर फेकलाच पाहिजे; त्याचप्रमाणें परसत्ता ही उलथून टाकलीच पाहिजे.

**परसत्तेच्या सावलींत जें राष्ट्र फशीं पडतें**
**मानवतेच्या गुणांस मुकुनी राष्ट्र उणें होतें.**
**परसत्तेतिल शेतिमधें हा दोष असे भारी;**
**स्वाभिमान लोपूनि येतसे पदरीं लाचारी ! ९४**

परसत्तेच्या सावलींत ज्या राष्ट्राची फसगत होते त्या राष्ट्रांतील मानवतेचे गुण कमी होऊन त्या राष्ट्रास उतरती कळा लागते. परसत्तेकडून मिळणाऱ्या अन्नांत हा दोष असतो. स्वाभिमान नाहीसा होतो आणि पदरीं लाचारी येते.

**उच्च भव्य अन् उदात्त ऐशा ध्येयाच्या भवतीं**
**त्यागाची जाज्वल्य प्रभावळ लावुनि धगधगती,**
**आकर्षुनि घेतल्यावांचुनी हृदयें लोकांचीं**
**स्फुरावयाचीं नाहित गाणीं त्यास लढाईचीं ! ९५**

उच्च, भव्य आणि उदात्त ध्येयाभोवती अतीव त्याग असावा लागतो. लोकांचीं हृदयें आकर्षून घेतल्याखेरीज लोकांना समरगीतें स्फुरावयाचीं नाहींत.

**स्वतंत्रता अन् संरक्षण अन् देशाची प्रगति**
**वटवृक्षासारखी निरंतर असावयासाठीं,**
**समाजास पाहिजे कल्पना अपुल्या शक्तीची.**
**दूर पाहिजे झालि उपेक्षावृत्ति समाजाची. ९६**

स्वातंत्र्य, संरक्षण आणि देशाची प्रगति वटवृक्षासारखी निरंतर असावी म्हणून आपल्या सामर्थ्याची समाजास कल्पना असली पाहिजे. समाजाची उपेक्षावृत्ति दूर झाली पाहिजे.

**देशासाठीं बंदिघराला घर म्हटलें ज्यांनीं,**
**देशासाठीं घरें आपुलीं पेटविलीं ज्यांनीं,**
**करावया अभिनन्दन त्यांचें मन धडकें ज्यांचें**
**असें सुसज्जन गांवपुढारी काय करायाचे ! ९७**

देशासाठीं कारागृह हेंच ज्यांनीं आपलें घर मानलें, स्वतःचीं घरें ज्यांनीं पेटवून दिली, अशा थोरांचे अभिनंदन करावयास ज्यांचें मन धडधडतें असे सुसज्जन असले तरी गांवाचे पुढारी हवेत कशाला ?

**गर्जुनि सांगावया पाहिजे उंच अवाजांत**
**रणभूमीवर राष्ट्रांमधलें विवाद मिटतात.**
**सन्मित्रांनो, दिव्य भव्य तें साध्य करायाला**
**देश पाहिजे उभा राहिला अशा प्रसंगाला. ९८**

राष्ट्राराष्ट्रांमधले वाद रणभूमीवर मिटतात असें मोठ्या आवाजांत ओरडून सांगितलें पाहिजे. सन्मित्रांनो, तें दिव्य आणि भव्य ध्येय साध्य करण्यासाठीं अशा वेळीं सारा देश उभा राहिला पाहिजे.

**राष्ट्राराष्ट्रांमधील कांहीं वादविवादांचें,**
**समरभूमि हें मंदिर असतें न्याय मिळायाचें.**
**रणांगणावर होइल निर्णय जो रणचंडीचा**
**मान्य करावा तोच लागतो; न्याय निसर्गाचा. ९९**

राष्ट्राराष्ट्रामधल्या वादांत न्याय मिळवण्याचें समरभूमी हेंच न्यायमंदिर असतें. रणांगणावर रणचंडी जो निर्णय देईल तो निसर्गानें दिलेला न्याय मान्य करावा लागतो.

**उदक सोडुं या आपण सगळें महान कार्याचें**
**त्रिखंड होइल नांव आपुल्या हिंदुस्थानाचें.**
**स्वातंत्र्याची उच्च गर्जना करावया भरली**
**हिंदुस्थानामधील तुमची हीच सभा पहिली. १००**

आपण सगळे महान् कार्य करावयाचें उदक सोडू या. हिंदुस्थानचें नांव त्रिखंडांत गाजेल. स्वातंत्र्याची उच्च गर्जना करण्यासाठीं हिंदुस्थानांतील हीच आपली पहिली सभा आहे.

**सिंधुसागरा पार कराया यवन इसायास,**
**स्वतंत्र अन् सार्वभौम अपुला देश करायास,**
**उघड घोषणा आणि प्रतिज्ञा सभेमधें झाली**
**हिंदुस्थानामधील आहे हीच सभा पहिली. १०१**

सिंधुसागराच्या पलीकडे यवन इसायांना हाकलून देण्याची आणि आपला भारत देश सार्वभौम करण्याची उघड घोषणा आणि प्रतिज्ञा ज्या सभेंत करण्यांत आली अशी हिंदुस्थानांतील हीच पहिली सभा होय.

**देशाचें 'स्वातंत्र्य' ध्येय हें गर्जुनि सांगू या;**
**सशस्त्र क्रांती साधन त्याचें गर्जुनि सांगू या.**
**विनायकाचें भाषण असलें ऐकत असतांना**
**रात्र जाहली याचें नव्हतें भान परी कोणा! १०२**

देशाचें स्वातंत्र्य मिळवणें हें आपलें ध्येय मोठ्यानें सांगू या आणि तें साध्य करावयाचें 'सशस्त्र क्रांति' हें साधन आहे हेंही आपण मोठ्यानें सांगू या. विनायकाचें असें हें भाषण ऐकत असतां रात्र झाली याचें कोणाला भानही राहिलें नव्हतें.

**अमर्याद आनंद जाहला कवि गोविंदांना,**
**नभ झालें ठेंगणें सहाजिक गणेशबाबांना.**
**आणि ठरविलें देवसाक्ष श्रीगणेशबाबांनीं**
**देशासाठीं जगेन किंवा मरेन मानांनीं. १०३**

कवि गोविंद यांना अतिशय आनंद झाला. साहजिकच गणेश बाबांना आकाश ठेंगणें झालें. देशासाठीं जगावयाचें आणि देशासाठींच मानानें मरावयाचें असा देवाला साक्षी ठेवून गणेशबाबांनीं निश्चय केला.

**गाभाऱ्यांतिल मंगल मंगल धुंद सुगंधांत**
**जसें वाटतें बसुनि रहावें शांतपणें शांत,**
**सभा संपली तरी राहिले बसुनि तसे कांहीं**
**हलावेंच येथूनि वाटलें त्यांस मुळीं नाहीं! १०४**

गाभाऱ्यांतील उदबत्तीच्या मंद मंद आणि धुंद सुगंधांत कोणताही विचार मनांत न आणतां शांतपणानें शांत बसावें असें ज्याप्रमाणें वाटतें त्याप्रमाणें सभा समाप्त झाली तरी कांहीं सभासद बसून राहिले होते. येथून बाहेर पडावें असें त्यांना वाटेंच ना!!

**मंडळांत लागले जमाया तरुण नाशिकाचे**
**उत्साहानें सुरूं जाहलें कार्य स्वदेशाचें.**
**होउं लागल्या नित्य बैठकी मित्रमंडळाच्या**
**मंडळ झाला विषय एवढा मुखिं ज्याच्या त्याच्या. १०५**

मंडळांत नाशिकांतील मुलें वाढूं लागली, स्वदेशाचें कार्य उत्साहांत सुरू झालें. मित्रमेळ्याच्या बैठकी नेहमी होऊं लागल्या. ‘मित्रमेळा’ हा गावांत ज्याच्या त्याच्या तोंडी चर्चेचा विषय झाला होता.

**बोलु लागले तरुण सभासद राजकारणांत;**
**होउ लागले स्वातंत्र्याचें घोष नाशिकांत;**
**विचारिना कोणीच नाशिकांतील पुढाऱ्यांना !**
**तरूण नव्हते भीत अताशें पोलिस लोकांना. १०६**

राजकारणावर तरुणांचीं व्याख्यानें होऊं लागलीं. नाशिक शहरांत स्वातंत्र्याच्या घोषणा होऊं लागल्या. नाशिकांतील पुढाऱ्यांना कोणी विचारीनासे झाले. पोलिसांना तर तरुण मुलें आतां भीत नव्हती.

**जगावयाचें केवळ आपुल्या भारतभूसाठीं,**
**मरावयाचें भारतभूच्या स्वातंत्र्यासाठीं,**
**अशी जयांनीं शपथ घेतली आणि मनें केलीं**
**त्यास काय वाटेल कुणाची भयभीती कसली! १०७**

भारतभूमीसाठींच आपण जगावयाचें आणि भारतभूच्या स्वातंत्र्यासाठींच आपण मरावयाचें अशा ज्यांनीं शपथा घेतल्या आणि मनाचा निर्धार केला. त्यांना कोणाची कसली भीति वाटणार आहे ?

**याचक होते सरकाराच्या कृपाप्रसादाचें,**
**करीत होते पुरस्कार जे अर्ज–विनंत्यांचे,**
**मुलें तयांची चेष्टा होतीं करीत गांवांत**
**देशभक्तिचे वाढत होते मळे समाजांत. १०८**

सरकारच्या कृपाप्रसादाचे जे याचक होते आणि अर्ज, विनंत्या सरकारला करीत, त्यांची गावांत मुलें चेष्टा करीत होती. समाजांत देशभक्तीचे मळे वाढत होते.

**असें एकदा झालें; गेलीं मुलें फिरायाला.**
**केलि घोषणा बघूनि त्यांनीं पोलिस बाजूला.**
**खवळुनि गेला पोलिस त्यांच्या जयजयकारानें;**
**धरुनि ठेवलें मुलास एका नाक्यावर त्यानें. १०९**

असें एकदा झालें कीं मुलें फिरावयास गेलीं असतां तिकडे पोलिस जवळच उभा आहे असें पाहून (वंदेमातरम्‌च्या) घोषणा त्यांनीं केल्या. तो मातृभूमीचा जयजयकार ऐकून पोलीसास राग आला आणि त्यानें एका मुलाला नाक्यावर बसवून ठेवलें.

**त्यास सोडवावयास नव्हती मुलांमधें शक्ती,**
**मुलामुलांनीं म्हणुनि योजली एक नवी युक्ती.**
**कधीं कधीं जें थोरानांही सुचायचें नाहीं.**
**मुलें मुलें शोधूनि काढती नवें असें कांहीं! ११०**

त्या मुलाची सुटका करण्याची इतर मुलांत शक्ति नव्हती म्हणून मुलामुलांनीं एक युक्ति योजली. मोठ्या माणसालाही जें कधीं सुचत नाहीं असें कांहीं नवें मुलें शोधून काढतात.

तसेच गेले पुढें, लागले घोष करायाला;
धांवत आला पुन्हां शिपाई त्यांस धरायाला !
चिंचेवरती जमुनी पोरें झडप घालतात.
तसें घेरले मुलामुलांनीं त्यास अकस्मात. १११

इतर मुलें तशीच पुढें गेलीं आणि त्यांनीं पुन्हां घोषणा केल्या. तोंच त्यांना धरावयास पोलिस धांवत आला. चिंचेवरती मुलें जशीं झडप घालतात त्यांप्रमाणें मुलांनीं त्या पोलिसाला एकदम घेरलें.

एक म्हणे कां पोलिसदादा येतां रागांत?
बाप घोषणेमुळें तुझा का पडतो नरकांत!
तोंच विचारी दुसरा कोणी सभ्यपणें त्याला
मडुम येते तुझ्या घरीं का पगार द्यायाला? ११२

एक मुलगा म्हणाला, पोलिसदादा असे रागावता काय? या घोषणेमुळें तुझे बापजादे नरकांत का पडतात? तोंच दुसरा मुलगा शांतपणें म्हणाला तुला पगार द्यावयाला मडुम का येते?

दूर सरा रे सोडुनि द्या या गरिब बिचाऱ्यास
नाहीं तर तो आणिल अपुल्या इंग्रज काकास.
येतिल पोलिस कुणी म्हणाला मग तिसरा कोणी
सुचें न उत्तर; पोलिस गेला खजील होवोनी! ११३

"दूर सरारे, या गरीब बिचाऱ्याला सोडून द्या, नाहींतर तो आपल्या इंग्रज काकाला बोलावून आणील आणि मग आणखी पोलिस धावून येतील" असें तिसरा मुलगा म्हणाला. पोलिसाला काय बोलावें सुचेना. तो खजील होऊन गेला.

**पोलिस दादा फार इमानी म्हणत कुणी त्यांत**
**पाठीवरती दिली ठेउनी थाप अकस्मात !**
**हसूं लागलीं मुलें बिचारा गेला गोंधळुनी**
**तोंच उडवली कुणी तयाची पगडी मागूनी! ११४**

पोलिसदादा फार इमानी आहे असें एका मुलानें म्हणत म्हणत अकस्मात् त्याच्या पाठीवर जोराची थाप मारली. मुलांना हसू आलें. पोलिस बिचारा गोंधळून गेला. तोंच कोणीतरी मागून त्याची पगडी उडविली.

**तोंच ठेवलें धरून त्याला गणेशबाबांनीं,**
**आणि काढला पळ एकाकीं तेथुनि सर्वांनीं !**
**उडून जावा थवा गोजिऱ्या राजस हंसांचा**
**तसा घोळका पळूनि गेला तिथून पोरांचा. ११५**

इतक्यांत त्याला गणेशपंतांनीं जोराने आवळून धरलें. तोच सर्व मुलें एकाएकीं निघून गेली. गोजिऱ्या राजहंसाचा थवा जसा उडून जावा तसा पोरांचा घोळका पळून गेला.

**सुखें विसरतीं दुःख विसरती विसरतात सारें,**
**मनांस नाहीं शिवत जयांच्या लोभाचें वारें.**
**फुलासारखी वृत्ति जयांची निर्मळ हंसतात**
**सदासर्वदा मनें मुलांचीं निकोप असतात. ११६**

ज्यांना कशाचा लोभ नसतो ते सुखेंही विसरतात आणि दुःखांचाही त्यांना विसर पडतो. ज्यांची वृत्ति फुलांसारखी असते, ज्यांचें हंसणें अगदीं निर्मळ असतें, अशीं मुलें सदोदित निकोप असतात.

**दुसऱ्या दिवशीं वृत्त पसरलें नाशिक गांवांत.**
**सांगु लागला रावविनायक चारा चौघांत,**
**वाढाया उत्साह जोम विश्वास समाजांत**
**वेळ पाहुनी अशा चढाया क्वचित कराव्यात! ११७**

दुसऱ्या दिवशीं गावांत ही बातमी पसरली; विनायक चारचौघांत उघड बोलू लागला. तो म्हणे समाजामध्यें विश्वास जोम आणि उत्साह वाढण्यासाठीं वेळ पाहून अशा चढाया कराव्या लागतात.

**दीन आणि दुबळ्यांस वाटतें भीति लढाईची;**
**शस्त्रहीन लोकांस वाटते भीती सत्तेची !**
**अशीं भयें घालवावयाला स्वदेशबंधूंची**
**सवय अशी लोकांस पाहिजे नित्य चढाईची. ११८**

दुबळ्या आणि अशक्त लोकांना लढाईचें भय वाटतें. शस्त्रहीन लोकांना सत्तेचें भय वाटतें. अशी आपल्या देशबांधवांची भीति घालविण्यासाठीं समाजांत चढाईखोर वृत्ति वाढली पाहिजे.

**शत्रू तो शत्रूच नि शत्रू सेवकही त्याचा.**
**ठेउं नये केव्हांच मुलाजा अशा गुलामांचा !**
**लहानही अपमान करु नये सहन समाजानें**
**पराधीन काळांत करावें पथ्य समाजानें. ११९**

शत्रु तो शत्रुच, शिवाय शत्रूचा नोकरसुद्धां आपला शत्रुच आहे. अशा गुलामांचा कधींही मुलाजा ठेवू नये. समाजानें लहान अपराधसुद्धां सहन करूं नये. पराधीन काळांत हें पथ्य समाजानें केलें पाहिजे.

* * *

**भारत भू जयकार जयाचा त्रिवार गर्जू या.**
**राष्ट्रासाठीं जगणें मरणें हें सुख समजू या.**

## (२१) शिवजन्मोत्सवाचें महत्त्व

**वाढु लागले नवे सभासद मित्रमंडळाचे !**
**वाढु लागलें प्रेम मुलांचें विनायकावरचें.**
**विनायकानें दिली घालुनी शिस्त मंडळांत**
**मेळ्याचा लौकीक लागला वाढु नाशिकांत. १२०**

मित्रमंडळाचे नवीन सभासद वाढूं लागले तशी विनायकावरील मुलांची भक्ति वाढू लागली. विनायकानें मंडळींना शिस्त घालून दिली. मेळयाचा लौकिक नाशिक शहरांत वाढू लागला.

**शाळेंतिल अभ्यास पाहिजे प्रथम करायाला,**
**दहा क्रमांचे आंत पाहिजे नांव असायाला,**
**अभ्यासाव्यतिरिक्त असावा छंद लिहायाचा**
**वाचित जावा ग्रंथ लावुनीं मन इतिहासाचा. १२१**

शाळेंतला अभ्यास प्रथम केला पाहिजे. दहा क्रमांकांचे आंत शाळेंत क्रम असला पाहिजे. अभ्यासाखेरीज लिहावयाचा नाद असावा, इतिहासाचीं पुस्तकें मन लावून नीट वाचावीत.

**आणि चालता मधेंच पाहे सिंह जसा मागें**
**तसें बघावें मागें, घ्यावें मग पुढचे धागे.**
**होतो आपण कोण आणि आहोंत कसें याचा**
**विचार करुनी यत्न करावा, स्वदेशसेवेचा. १२२**

पुढें चालल्यावर सिंह जसा मधेंच मागे बघतो तसें काय झालें आहे तें पाहून पुढचें पाऊल टाकावें. आपण कोण होतो आणि आज आपण कसे आहोंत याचा विचार करून स्वदेशसेवा करीत असावें.

**पाहुनि जागा नीट व्यवस्थित एका बाजूची**
**गुप्तपणें लागली भराया बैठक तरुणांची.**
**तात्या टोपे आणि पेशवे, राणी झांशीची**
**राष्ट्रदैवतें म्हणून चित्रें लावथिलीं त्यांचीं. १२३**

एका बाजूची व्यवस्थित अशी जागा पाहून त्या जागेंत मुलांच्या गुप्त बैठकी होऊं लागल्या. त्या जागेंत तात्या टोपे, नानासाहेब पेशवे आणि महाराणी लक्ष्मीबाई यांचीं चित्रें लावलेलीं असत.

**श्रीटिळकांचें आणि लावलें चित्र शिवाजीचें**
**आणि लावलें चित्र मधोमध श्रीमन् फडक्यांचें !**
**चित्रावरुनी उभा राहतो मागिल इतिहास**
**चित्रावरुनी कळूनि येतें धोरण लोकांस. १२४**

टिळकांचें आणि शिवाजीचेंही चित्र लावलें होतें. आणि मधोमध वासुदेव बळवंत फडक्यांचेंही चित्र लावलें होतें. चित्रावरून आपला मागचा इतिहास आपल्या समोर उभा राहतो. चित्र पाहून लोकांना धोरणाची कल्पना येते.

**कुणी सुचविलें चित्र राणीचें एक तरी लावा**
**राष्ट्रद्रोही मुलें न याचा संशयही यावा!**
**छे छे असलें ढोंग कशाला उगिच करायाचें !**
**इंग्रज राजे नाहित राजे भारत देशाचे ! ! १२५**

राणी व्हिक्टोरियाचे एक तरी चित्र लावा अशी कोणी सूचना केली. हीं मुलें राष्ट्रद्रोही आहेत असा कोणाला संशयही येऊं नये. छे छे, असलें ढोंग उगीच काय म्हणून करावयाचें ? इंग्रज राजे भारताचे राजेच नाहींत.

हिंदुधर्म जो मानित नाहीं नाहीं जो हिंदू
परधर्माचा परदेशी नृप आम्हि कसा वंदू?
हिंदुसंस्कृती नाहीं, नाहीं ध्वज भगवा ज्याचा
कोण मूर्ख मानील तया नृप भारतदेशाचा ! १२६

जो हिंदुधर्म मानीत नाही आणि जो हिंदु नाहीं अशा परदेशांतील परधर्माच्या राजाला आम्ही वंदन कसें करणार! ज्याची हिंदु संस्कृति नाहीं, ज्याचा भगवा ध्वज नाहीं त्याला भारत देशाचा राजा कोण मूर्ख मानील!

जे न आमुचे राजे त्यांचीं चित्रें लावूनी
कशास खोटें करा प्रदर्शन आपण होऊनी ?
राष्ट्रद्रोही म्हणोत कोणी खुशाल आम्हाला
विनायकानें सहजपणें हें सांगितलें त्याला. १२७

जे आमचे राजे नाहींत त्यांचीं चित्रें लावून आपण होऊन खोटें प्रदर्शन कां करा ! आम्हाला कोणी राष्ट्रद्रोही खुशाल म्हणोत. असें विनायकानें स्पष्ट सांगितलें.

अखेर ठरलें विनायकाच्या मित्रमंडळाचे
शहरामध्यें प्रगटपणानें कार्य करायाचें.
शिवउत्सव अन् गणेशउत्सव जे गर्जुनि झाले
उभ्या महाराष्ट्रांत गाजले अन् गर्जुनि उठले! १२८

उघडपणें शहरांत सार्वजनिक कामें करण्याचें विनायकाच्या मित्रांनीं ठरविलें. आणि शिवाजी उत्सव आणि गणपति उत्सव त्यांनीं मोठ्या प्रमाणांत केले. त्यांचा लौकिक उभ्या महाराष्ट्रांत झाला.

**आणि त्यांतुनी गोविंदाच्या काव्यभरारीनें,**
**विनायकाच्या काव्य पदांतिल दाहक तेजानें,**
**करूं लागला वीर गर्जना देश मराठ्यांचा**
**वाढुं लागला समाजामधें द्वेष इंग्रजांचा !** १२९

या उत्सवांतून झालेल्या गोविंद कवीच्या पदांनीं आणि विनायकाच्या स्फूर्तिदायक गाण्यांनीं महाराष्ट्रांत वीरगर्जना होऊं लागल्या. समाजामध्यें इंग्रजांविषयीचा द्वेष वाढूं लागला.

**शिवजन्मोत्सव कुणी करावा हें समजावून**
**देइ विनायक आणि तयाचें भाषण ऐकून**
**मोहरलें मन शब्द मुखांतुनि आले टिळकांचे**
**न बोलतो मी तें बोले मत सावरकर माझें!** १३०

शिवाजीचा उत्सव कोणी करावा हें विनायक समजावून सांगे. आणि त्याच्या भाषणानें टिळकांचें मन प्रफुल्लित होऊन त्यांच्या मुखांतून सहज शब्द निघाले कीं माझें जें मत मी बोलून दाखवीत नाहीं तें सावरकर बोलतो.

**शिवउत्सव हें साधन नाहीं मनोरंजनाचें.**
**शिवउत्सव हे गोडवेड हें आम्हा हिंदूंचें.**
**मान आणि अभिमान शिवाजी हिंदूराष्ट्राचा**
**जन्मदिनोत्सव म्हणूनि करतो श्रीशिवरायाचा.** १३१

शिवाजी उत्सव हें मनोरंजन करण्याचें साधन नाहीं. शिवाजी महाराजांचा उत्सव हें आम्हा हिंदूंचें एक गोड वेड आहे. शिवाजी महाराज म्हणजे हिंदुराष्ट्राचा मान आणि अभिमान होय. म्हणून शिवरायाचा आम्ही जन्मोत्सव करतो.

**परदास्यांतुनि मातृभूमि ही मुक्त करायास**
**शिवरायासम झुंज झुंजतिल जे रात्रंदिवस,**
**शिवउत्सव साजरा करावा अशाच मर्दांनीं**
**सांगु नये शिवजन्म कथेचें पुराण इतरांनीं. १३२**

परदास्यांतून मातृभूमीची मुक्तता करण्यासाठीं शिवाजी महाराजांप्रमाणें जे रात्रंदिवस झुंजत राहतील अशाच मर्दांनी शिवजयंतीचा उत्सव करावा. शिवाजी महाराजांच्या जन्माचें पुराण इतरांनीं सांगूच नये.

**जातिभेद विरहीत जयांचीं विकासलीं चित्तें,**
**हिंदु तेवढे एक जयाचें मन त्याला म्हणतें,**
**मी हिंदू अन् देश आमचा हा हिंदुस्थान**
**ज्यास वाटते त्याच हिंदुनें गावें शिवगान. १३३**

जातिभेद नाहींसा होऊन ज्यांचीं मनें विकसित झालीं आहेत, हिंदु तेवढे एक असें ज्याचें मन त्याला सांगतें, मी हिंदु आहे, आणि हिंदुस्थान हा आमचा देश आहे असें ज्याला वाटतें त्याच हिंदूनें शिवरायाचीं गाणीं गावींत.

**लावाया घालवून सारीं क्रमणें परक्यांचीं,**
**तोडायास्तव सर्व बंधनें परक्या सत्तेचीं,**
**स्फूर्ति मिळावी प्रजेस म्हणुनी आम्ही धडपडतो;**
**शिवजन्माचा उत्सव केवळ त्यासाठीं करतो. १३४**

परक्यांचीं सारीं आक्रमणें घालवून लावण्यासाठीं, परसत्तेची सर्व बंधनें तोडून टाकण्याकरतां प्रजेला स्फूर्ति व्हावी म्हणून आमची धडपड चालू असते. तेवढ्यासाठीं आम्ही शिवाजी महाराजांचा उत्सव करतो.

**देशभक्त मी मजला द्यावा मान समाजानें,**
**खास सवलती द्याव्या मजला प्रिय सरकारानें,**
**असा जयांचा स्वार्थ न करती कार्य स्वदेशाचें**
**नांवहि घेऊं नये तयांनीं श्रीशिवरायाचें ! १३५**

मी देशभक्त आहे आणि लोकांनीं मला मान द्यावा, सरकारनें मला कांहीं खास सवलती द्याव्यात, असा ज्याचा केवळ स्वार्थ असतो, देशाचें कार्य करीत नाहीं, त्यानें शिवाजी महाराजांचें नांव सुद्धां घेऊं नये.

**वर्षांमागुनि वर्षें गेलीं लाथा खाण्यांत**
**तरी कटोरा घेउनि भिक्षांदेही करतात !**
**नाहीं वाटत लाज जयांना भिक्षांदेहीची**
**शिवजन्मोत्सव मिरास नाहीं अशा गुलामांची.! १३६**

लाथा खाण्यांत वर्षांमागून वर्षें गेलीं तरी कटोरा घेऊन भिक्षा मागतात आणि ज्यांना भीक मागण्याची लाज वाटत नाहीं अशा गुलामांची शिवजन्मोत्सव ही कांहीं मिरास नव्हे.

**आणि सांगतो पुन्हां सांगतो ठेवा ध्यानांत,**
**जन्म दिला मानवा रहावा तो स्वातंत्र्यांत;**
**पारतंत्र्य काळांत कसें स्वातंत्र्य मिळायाचें**
**शिवरायानें नीट घालुनी दिले धडे याचे. १३७**

आणि सांगतों, पुन्हा सांगतों, लक्षांत ठेवा. स्वातंत्र्यांत राहण्यासाठींच मानवाचा जन्म झाला आहे. पारतंत्र्यकाळांत स्वातंत्र्य कसें मिळवावयाचें याचे धडे शिवाजी महाराजांनीं घालून दिले आहेत.

**देशासाठीं समरभूमिवर युद्ध करायाची,**
**हिंदूंचें साम्राज्य पुनरपि स्थापन करण्याची**
**हिंदु समाजामधें आक्रमक शक्ति संचरावी**
**यास्तव व्हावा शिवजन्मोत्सव हा गांवोगांवीं. १३८**

देशासाठीं रणांगणावर युद्ध करण्याची आणि हिंदूंचें पुन्हा साम्राज्य स्थापन करण्याची हिंदु जातींत पुन्हां आक्रमक शक्ति यावी म्हणून गांवोगांवीं शिवजयंतीचे उत्सव झाले पाहिजेत.

**राजकीय स्वातंत्र्य असें हें मानवजातीचें**
**साधन असतें एकमेव हें सर्वोन्नत्तीचें.**
**देशाची उन्नत्ती न होते भिक्षांदेहीनें**
**होत नाहिं उन्नती कुणाच्या फुकट सहाय्यानें. १३९**

मानवाची सर्व बाजूंनीं उन्नत्ति करून घेण्याचें राजकीय स्वातंत्र्य हें एक साधन आहे. भिक्षा मागून देशाची उन्नति होत नाहीं. कोणाच्या फुकट साहाय्यानें देशाची उन्नति कधीं होत नसते.

**भाषण ऐसें विनायकाचें प्रकटपणें झालें.**
**ऐकुनि भाषण श्रोते सगळे थरारुनी गेले !**
**नवाच कांहीं प्रकाश दिसला या व्याख्यानांत**
**स्फुरूं लागले नवेच कांहीं विचार लोकांत. १४०**

असें विनायकाचें प्रकट भाषण झालें. तें भाषण ऐकून श्रोत्यांची मनें थरारून गेलीं. या व्याख्यानानें त्यांच्या हृदयांत कांहीं नवाच प्रकाश पडला. लोकांच्या मनांत कांहीं नवेच विचार येऊं लागले.

चकित जहाले लोक भाषणामधील तेजानें;
धुंद जाहले स्वातंत्र्याच्या गोड विचारानें;
स्वातंत्र्याचा परमदेव येऊनि उत्सवाला
विनायकाच्या मुखें बोलतो भास कुणा झाला. १४१

या भाषणांतील तेजाने लोक चकित झाले. स्वातंत्र्याच्या गोड कल्पनेनें ते धुंद झाले. उत्सवांत स्वातंत्र्याचा परमदेव येऊन विनायकाच्या मुखानें बोलला असाही कोणाला भास झाला.

गणेश उत्सव झाला, झालीं अनेक व्याख्यानें;
पदें गाउनी गाजवलीं तीं अभिनव मेळ्यानें!
गोविंदाच्या प्रासादिक अन् सुंदर गीतांनीं
पोचविला आदेश क्रांतीचा घराघरांतूनी. १४२

गणपति उत्सव झाले, अनेकांचीं व्याख्यानें झालीं. मित्रमेळ्याची पदें सर्वतोमुखीं झालीं. गोविंदाच्या प्रासादिक आणि सुंदर पदांमुळें क्रांतीचा संदेश घराघरांतून पोचला.

स्वदेश केला मुक्त पाहिजे परदास्यांतून,
समाज झाला मुक्त पाहिजे परवशतेंतून,
झुगारलें पाहिजे राज्य हें इंग्रजराजाचें
असे लागले विचार वाढूं मित्रमंडळाचे. १४३

स्वदेश परदास्यांतून मुक्त केला पाहिजे. परवशतेंतून समाजाची मुक्तता झाली पाहिजे. इंग्रजांचें राज्य झुगारून दिलें पाहिजे. असे मित्रमेळ्यांतील सभासदांचे विचार वाढूं लागले.

**वाढुं लागला विरोध आतां इंग्रजराज्यांत,**
**जुमानीत ना मुलें कुणाला नाशिक शहरांत.**
**सावरकर जाहले पुढारी मित्रमंडळाचे;**
**वाढत होतें समाजामधें प्रेम तयावरचें. १४४**

इंग्रजांच्या राज्यांत विरोध वाढूं लागला. नाशिक शहरांतील मुलें कुणाला जुमानीत नाहींशी झालीं. मित्रमेळयाचे पुढारी सावरकर झाले. त्यांच्यावर समाजाचें प्रेम वाढत होतें.

**वाढत होतें संघटनाबळ मित्रमंडळाचें**
**जसें वाढतें वर्षाकालीं जल गोदावरिचें !**
**तोंच सुवार्ता आली आली शहर पुण्यांतून**
**परीक्षेंत जाहला विनायक अखेर उत्तीर्ण. १४५**

पावसाळयांत गोदावरीचें पाणी जसें वाढतें तसें मित्रमेळयाच्या संघटनेचें बळ वाढत होतें. तोंच पुणें शहरांतून एक चांगलें वृत्त आलें. विनायक सर्व विषयांत उत्तीर्ण झाला !

**कौतुक केलें विनायकाचें सासुसासऱ्यांनीं**
**कौतुक केलें गुरुवर्यांनीं आणि चहात्यांनीं**
**जोष वाढला विनायकाच्या मित्रमंडळीचा !**
**कुणी घातला हार दिला कुणि गुच्छ गुलाबाचा ! १४६**

सासुसासऱ्यांनीं विनायकाचें कौतुक केलें. गुरुजींनी आणि चहात्या मंडळींनींही त्याचें कौतुक केलें. विनायकाच्या मित्रांचा जोष वाढला. कोणी त्याला हार घातला तर कोणी गुलाबाच्या फुलांचे गुच्छ त्याला दिले.

**आनंदानें भरूनि आला कंठ यशोदेचा**
**आणि तिनें नैवेद्य दाविला देविस पुरणाचा.**
**करूं लागले विचार बाबा उच्च शिक्षणाचे**
**आणि करावें कार्य यापुढें कसें मंडळाचें !** १४७

यशोदेचा कंठ आनंदानें भरून आला. तिनें देवीला पुरणाचा नैवेद्य केला. गणेशपंत उच्च शिक्षण कसें करावें याचा विचार करूं लागले, आणि मंडळाचें कार्य पुढें कसें चालू ठेवावें याचाही गणेशपंतांसमोर प्रश्न होता.

**सभा नि संमेलनें नि चर्चा स्वदेशसेवेच्या,**
**कुठें घोषणा, कुठें प्रतिज्ञा सशस्त्र युद्धाच्या;**
**कुठें गर्जना शिवरायाच्या आणि भवानीच्या !**
**नेमस्तांच्या चर्चा कोठें कुठें इंग्रजांच्या.** १४८

सभा होत. संमेलनें होत आणि स्वदेशसेवेच्या चर्चाही कोठें चालत. कोठें घोषणा चालू होत्या. सशस्त्र युद्धाच्या प्रतिज्ञा कोठें घेतल्या जात. शिवाजी महाराजांच्या आणि देवी भवानीचा कोठें जयजयकार चाले. नेमस्तांविषयीं तर इंग्रजांविषयीं कोठें चर्चा चाले. १४७

**स्वातंत्र्याच्या जयघोषानें निनादली नगरी,**
**स्वातंत्र्याचें गीत लागलें गाउं घरोंदारीं**
**नानाविध चळवळी पाहुनी होइ कुणा भास.**
**नाशिकांत स्वातंत्र्यपार्वती आलि रहायास.** १४९

स्वातंत्र्याच्या घोषणांनीं नाशिकशहर दुमदुमून गेलें. घरोघर स्वातंत्र्याचीं गीतें ऐकूं येऊं लागलीं. नानाविध चळवळी पाहून नाशिक शहरांत स्वातंत्र्यपार्वति रहावयास आली आहे असा कोणाला भास होई.

* * *

शहर पुण्याला करीन माझें शिक्षण मी पुढचें;
वाढवीन मी कार्य आपुल्या प्रिय संघटणेचें !
गगनपार जयघोष करिन मी भारतमातेचा
भडकुनि जाइल राग त्यामुळें इंग्रज राजाचा. १५०

पुणें शहरांत मी माझें पुढचें शिक्षण घेईन. आपल्या प्रिय संघटनेचें कार्य पुण्यांत वाढवीन, समुद्रापलीकडे भारतमातेचा जयघोष नेईन. तो जयघोष ऐकून इंग्रज राजाचा राग भडकून जाईल.

विनायकानें सभा घेउनी मित्रमंडळाची
पुन्हां पुन्हां जाणीव करोनी दिली स्वध्येयाची.
आणि पुढें स्वातंत्र्यलक्ष्मिच्या जयजयकारांत
विनायकानें निरोपिले जन जोडुनिया हात. १५०

विनायकानें मित्र मेळ्याची सभा घेतली आणि त्यानें आपल्या ध्येय धोरणाची पुन्हां पुन्हां त्यांना जाणीव करून दिली. आणि त्यानंतर स्वातंत्र्य लक्ष्मीच्या जयजयकारांत विनायकानें हात जोडून सर्वांचे निरोप घेतले.

* * *

भारतभू जयकार जयाचा त्रिवार गर्जू या.
राष्ट्रासाठीं जगणें मरणें हें सुख समजू या.

# सर्ग पांचवा

## (२२) मुक्त भारताची पहिली सभा

मरण आपुलें तुडवित उडवित चला पुढें जाऊं
अमर होउनी स्वातंत्र्याचीं अमरपदें गाऊं.

*                    *                    *

या न वेगळा विचार होता कधींच चित्तांत;
प्रवास झाला पुरा तयाचा याच विचारांत.
विनायकाचें शिक्षण झालें सुरू पुणें शहरीं,
लाभु लागले नवे मित्र अन् नवीन सहकारी.     १

या विचाराखेरीज विनायकाच्या मनांत दुसरा कोणताही विचार नव्हता. आणि याच एका विचारांत त्याचा प्रवास पुरा झाला. पुणें शहरांत त्याचें शिक्षण सुरू झालें. त्याला नवीन मित्र मिळाले आणि नवे सहकारी लाभले.

विनायकाचें ज्ञान आणि तें पटवुनि देण्याचें
कौशल्यानें दिपून गेले नयन अनेकांचे.
प्रखरबुद्धि पाहून राहिले दूर कुणी कोणी;
तडफ तयाची सहन न होउनि बावरले कोणी.     २

विनायकाचें ज्ञान आणि तें पटवून देण्याचें कौशल्य पाहून अनेकांचे डोळे दिपून गेले. त्याची प्रखर बुद्धि पाहून कोणी कोणी त्याच्यापासून दूर असत तर कोणी त्याची नुसती तडफ पाहून बावरून जात.

**स्वातंत्र्याचें ध्येय आणि तें साधन शस्त्रांचें**
**विचार असले ऐकुनि बुजले हृदय अनेकांचें.**
**मुलें जशी शंकासुर बघुनी भिऊनिया जाती,**
**क्रांती म्हणतां तशीं कुणाचीं हृदयें धडधडतीं. ३**

स्वातंत्र्याचें ध्येय आणि शस्त्राचार हें त्याचें साधन अशासारखे विचार ऐकून अनेकांचें हृदय बुजलें. शंकासूर पाहून मुलें जशीं भिऊन जातात त्याप्रमाणें क्रांति म्हणताच कांहीं लोकांच्या हृदयांत धडकी भरते.

**सूर्यबिंब पाहूनि लोचनें अंधारुनि जाती**
**तशीच अंधी कुणाकुणाच्या आलि मुखावरती.**
**शीड न ज्याला असें रिकामें जहाज इतरांचें,**
**विनायकाचें जहाज होतें माणिक मोत्यांचें ! ४**

सूर्याकडे पाहिल्यानें डोळे जसे अंधारतात त्याचप्रमाणें कांहीं लोकांच्या डोळ्यांवर अंधारी आली. इतरांचें जहाज शीड नसलेलें आणि रिकामें होतें. विनायकाचें जहाज मात्र माणिक मोत्यांनीं भरलेलें होतें.

**इतर मुलें तीं आलीं होतीं फक्त शिकायास,**
**तो तर आला शिकावयाला अन् शिकवायास !**
**गुलामगिरिचीं सुखें सुखावत होतीं इतरांना,**
**बघवत नव्हती परवशता ही सावरकरजींना. ५**

इतर मुलें फक्त शिकावयाला आलीं होतीं तर विनायक शिकायला तर आला होताच, शिवाय शिकवावयास आला होता. इतरांना गुलामगिरींतील सुखांनीं समाधान वाटत होतें. पण सावरकरांना आपल्या देशाची परवशता पाहवत नव्हती.

तरुण लागले जमावयाला विनायकाभवतीं;
होउं लागल्या सभा तयांच्या रात्रीं बेरात्रीं.
वाद आणि संवाद तयांचे ध्येयधोरणाचे.
विषय जाहले विद्यार्थ्यांच्या अपूर्व चर्चेचे ! ६

विनायकाभोवतीं तरुण जमायला लागले. त्यांच्या रात्रीं बेरात्रीं सभा होत व त्यांत त्यांच्या, ध्येयधोरणावर वाद, संवाद आणि चर्चा होत असत.

जशी भुकेनें भूक वाढते लहान बाळांची,
तिथी तिथीनें जशी वाढते कोर शशांकाची,
तशी आपुली भारतमाता मुक्त करायाची
वाढुं लागली हळूहळू ती ईर्षा तरुणांची ! ७

लहान मुलांची भूक जशी भुकेनें वाढते, तिथी-तिथीनें जशी चंद्राची कोर मोठी होत जाते त्याप्रमाणें भारतमाता स्वतंत्र करण्याची तरुणांची ईर्षा हळूहळू वाढत होती.

सभेंत होई परिस्थितीवर वाद कडाक्याचा.
कुणी म्हणे द्या विचार सोडुनि असला क्रांतीचा.
नाहित शस्त्रें सैन्यहि नाहीं क्रांति करायास,
नाहि आपुला जीव रिकामा व्यर्थ मरायास ! ८

सभेमध्यें देशाच्या परिस्थितीवर कडाक्याचा वाद होई. कोणी म्हणे क्रांति करावयाची भाषा सोडून द्या. आपल्या जवळ शस्त्रें नाहींत आणि सैन्यही नाहीं, अशा स्थितीत आपला जीव व्यर्थ मरावयास रिकामा नाहीं.

**शस्त्रें नाहित असले सैनिक काय करायाचे,**
**शस्त्रास्त्राविण व्यर्थ बोलणें तुमच्या क्रांतीचें !**
**म्हणे विनायक अशा नेभळचा रडक्या तरुणांना**
**क्रांतीचा ध्वज पेलायाचा नाहिं अशक्तांना ! ९**

शस्त्रें नसलेले सैनिक काय कामाचे ! शस्त्रांखेरीज क्रांतीचें बोलणें व्यर्थ आहे. अशा नेभळचा आणि रडक्या तरुणांना विनायक म्हणे कीं; 'अशा अशक्त प्रकृतीच्या तरुणांना क्रांतीचा ध्वज पेलणार नाहीं.'

**कुणी म्हणे कां स्वराज्य मिळतें अर्ज विनंत्यांनीं,**
**कुणी म्हणे कां स्वराज्य मिळतें अशा निषेधांनीं.**
**कुणी म्हणे कां स्वराज्य मिळतें करुनि सहकार !**
**म्हणे विनायक स्वराज्य देते केवळ तलवार. १०**

अर्ज विनंत्या करून का स्वराज्य मिळतें असें कोणी म्हणे ! निषेध करून का स्वराज्य मिळतें असें कोणी म्हणें, सहकार करून स्वराज्य मिळतें असें कोणी म्हणे, तर तलवारीच्या जोरावरच स्वराज्य मिळतें असें विनायक म्हणे.

**अर्ज विनंत्या करतिल त्यांना खुशाल त्या करु द्या.**
**निषेध, आदळ आपट करतिल खुशाल ती करु द्या.**
**सुचेल ज्याला जसें तयानें खुशाल वागावें;**
**देशोद्धरणीं साह्य कुणाचें कांहि तरी व्हावें ! ११**

अर्ज विनंत्या करतात त्यांना त्या खुशाल करूं द्या. निषेध आणि आदळ आपट जे करीत असतील त्यांना करू द्या. ज्याला जें सुचेल तसें त्यानें वागावें. मात्र देशकार्यांत प्रत्येकाचें कांहींतरी साहाय्य व्हावें.

**वाऱ्यामागें जसा लागतो धुरळा धांवून,**
**तशी पुढें व्हा येतिल शस्त्रें तुमच्या मागून !**
**तिडीक असते स्वातंत्र्याला अर्ज विनंत्यांची.**
**चला तयारी करूं मित्र हो आपण क्रांतीची. १२**

वाऱ्याच्या पाठोपाठ जसा धुरळा उडत असतो, त्याप्रमाणें तुम्ही पुढें व्हा, शस्त्रें तुमच्या मागें येतील. अर्ज आणि विनंत्यांची स्वातंत्र्याला मोठी तिडीक आहे. मित्रहो, आपण क्रांतीची तयारी करूं चला.

**सद्‌गुण जैसा झांकुनि जातो व्यसना व्यसनांनीं**
**देश आपुला तसा व्यापला उनाड शत्रूंनीं,**
**देश आपुला स्वतंत्र अन् सार्वभौम व्हावास**
**तोफेला पाहिजे धडाडुनि तोक भिडायास. १३**

व्यसन असलें म्हणजे सद्‌गुण जसे दिसून येत नाहींत, तसा आपला देश शत्रूनें व्यापून टाकला आहे. आपला भारतदेश स्वतंत्र आणि सार्वभौम करावयाचा असेल तर तोफेला तोफ धडाडून भिडली पाहिजे.

**तळहातावर घेउनिया शिर चला पुढें जाऊं,**
**अमर होउनी स्वातंत्र्याचीं अमरपदें गाऊं.**
**उणीव नसते शस्त्रास्त्रांचीं क्रांतिकारकांना**
**उलट भासते उणीव तुमची तयार शस्त्रांना. १४**

तळहातावर शिर घेऊन आपण पुढें जाऊं या. अमर होऊन स्वातंत्र्याची अमरगाणीं गाऊं या. क्रांतिकारकांना शस्त्रास्त्रांची उणीव असत नाहीं, उलट आपल्याकडे क्रांतिकारक केव्हां पाहील असे शस्त्रांना वाटत असते.

**गंगेचा पदविलास घुमतो दऱ्यादऱ्यांतून**
**क्रांतीचा गडगडाट शिरु द्या घराघरांतून !**
**तुम्ही लाडके शूर शिपाई हिंदुस्थानाचे**
**भाग्यविधाते तुम्ही आपुल्या प्रिय भारतभूचे ! ! १५**

गगा वहात जाताना दऱ्यादऱ्यांतून जसा आवाज घुमत असतो त्याप्रमाणें क्रांतीचा गडगडाट घराघरांतून शिरूं द्या. हिंदुस्थानचे तुम्ही लाडके शिपाई आहांत. आपल्या प्रिय भारतभूचे तुम्ही भाग्यविधाते आहांत.

**युक्तिवाद बिनतोड आणि वक्तृत्व धारदार**
**शिवप्रभूची जणु जयवन्ती भवानि तलवार.**
**स्वातंत्र्याच्या वेद ऋचांचा पवित्र उच्चार**
**ऐकुनि झाले विनायकाचे अंकित सरदार. १६**

त्याचा युक्तिवाद बिनतोड असे आणि शिवाजी महाराजांच्या जयवंती भवानी तलवारीप्रमाणें धारदार असे. स्वातंत्र्याच्या वेदांमधील पवित्र ऋचांचा उच्चार ऐकून तरुण विनायकाच्या अंकित झाले. म्हणजे विनायक म्हणेल तेंच खरें असें तरुणांना वाटू लागलें.

**वाढुं लागली विनायकाची पुण्यामधें कीर्ती.**
**वाढुं लागली शाळेमधल्या तरुणांची मस्ती.**
**असते तळमळ ज्यास खरोखर ज्या ज्या गोष्टींची**
**तें तें द्यावें तयास, असते वृत्ति निसर्गाची ! १७**

विनायकाचें नांव पुण्यांत लोकांना ठाऊक होऊं लागलें. शाळे-मधल्या तरुणांच्या खोड्या वाढूं लागल्या. ज्याला ज्याची तळमळ असते तें त्याला द्यावें अशी निसर्गाची वृत्ति असते.

**शपथबद्ध होऊनि त्यांतल्या कांहीं तरुणांनीं.**
**विडे उचलले रहावयाचे प्राण समर्पूनी.**
**जसें वाढतें कर्काचें दुख दुखणें शरिरांत**
**तसा वाढला संघटनेचा प्रसार तरुणांत.** १८

प्राण देण्याची वेळ आल्यास प्राण समर्पून देशाच्या स्वातंत्र्यासाठीं कार्य करीत रहावयाचें अशा शपथबद्ध झालेल्या कांहीं तरुणांनीं विडे उचलले. कर्काचें दुखणें म्हणजे कॅन्सर आंत वाढत असूनही जसा तो कळून येत नाहीं त्याप्रमाणें तरुणांत संघटणेचा प्रचार होत होता.

**स्थापन झाल्या अनेक शाखा गांवोगांवांत;**
**परिचय व्हावा सभासदांचा एकामेकांत,**
**आणि करावी पुन्हां उजळणी ध्येयधोरणाची**
**विनायकानें सभा घेतली क्रांतिकारकांची.** १९

गांवोगावांत संघटणेच्या अनेक शाखा स्थापन झाल्या. त्या शाखांतील सभासदांचा एकमेकांशीं परिचय व्हावा आणि संघटनेच्या ध्येय-धोरणाची पुन्हां उजळणी करावी म्हणून क्रांतिकारकांची सभा विनायकानें बोलावली.

**भाग्याचा दिन आज केवढा नाशिक शहराचा,**
**नाशिकामधें पूर लोटला क्रांतिकारकांचा.**
**जसे मावळे पूर्वी जमले लाल महालांत**
**तसेच जमले विनायकाचे मित्र नाशिकांत.** २०

आजचा दिवस नाशिक शहराच्या केवढ्यातरी भाग्याचा होता. नाशिक शहरांत क्रांतिकारकांचा पूर लोटला होता. शिवाजी महाराजांच्या पुण्यांतील लाल महालांत जसें पूर्वी मावळे जमत त्याप्रमाणें नाशिक शहरांत विनायकाचे मित्र आज जमले होते.

**श्रीरामाच्या वास्तव्याचा दिन पहिला पहिला;**
**त्यामागुनि हा आज सुभाग्यें दिन दुसरा दिसला.**
**नाशिकामधें गंगा आली क्रांतिकारकांची,**
**भारतास पण नव्हति कल्पना या शुभयोगाची! २१**

श्रीरामचंद्र रहावयास आले तो पहिला भाग्याचा दिवस होता. तसाच भाग्याचा दिवस नाशिक शहरावर आज दुसरा उजाडला होता. नाशिकामध्यें आज क्रांतिकारकांची गंगा आली होती खरी; पण भारताला या शुभयोगाची कल्पनाच नव्हती.

**जसें उसळतें महासागरीं उधाण पुनवेला**
**उधाण आलें तसें मुलांच्या मर्द उमेदीला.**
**येउं नये मंडळी कुणीही वर भलतीसलती,**
**करीत होते सक्त पहारा कुणि दारावरती! २२**

पौर्णिमेला समुद्राचें पाणी जसें उसळून येते, त्याप्रमाणें मुलांच्या उत्साहाला भरती आली होती. माडीवर सभेच्या जागीं कोणी भलती सलती मंडळी येऊं नयेत म्हणून कांहींजण दारावर सक्त पहारा करीत होते.

**वाटत होतें कुणास आपण विशेष आहोंत,**
**ते ते होते बोलत चालत विशेष तोऱ्यांत!**
**छंद जयांना स्वातंत्र्याच्या ध्येय धोरणाचा**
**लेखित होते इतराला ते कमी महत्त्वाचा. २३**

आपण कोणी विशेष आहोंत असें कोणाला वाटत होतें. ते तरुण तोऱ्यांत चालत आणि बोलत. स्वातंत्र्याच्या ध्येय-धोरणाचा ज्यांना छंद लागला ते तरुण इतरांना आपल्यापेक्षां कमी लेखीत.

**शपथबद्ध जाहलो तुम्ही मी या देशासाठीं;**
**झुंजत राहू प्राणपणानें स्वातंत्र्यासाठीं.**
**जीवन असलें जगण्यापेक्षां पराधीनतेचें,**
**तुकडे तुकडे करीत मरणें श्रेयस्कर साचें** २४

देशकार्य करण्यास तुम्ही आम्ही शपथबद्ध झालों आहोंत. स्वातंत्र्यासाठीं आपण प्राणपणानें लढत राहूं ! पराधीन जीवन जगण्यापेक्षां पराधीनतेचे तुकडे तुकडे करीत मरणें हेंच अधिक श्रेयस्कर आहे.

**सभा जाहली सुरू; जाहलें त्याचें व्याख्यान**
**"तुम्हास येथें पाहुनि होतें मला समाधान"**
**बोलु लागला राव विनायक जोडुनिया हात.**
**भाषण ऐकत बसली होती सर्व सभा शांत.** २५

सभा सुरू झाली. विनायकाचें व्याख्यान सुरू झालें. "तुम्हांला येथें उपस्थित पाहून मला फार समाधान वाटतें" राव विनायक हात जोडून बोलू लागला. सर्व सभा शांतपणें ऐकत होती.

**वासुदेव बळवंत जहाले कां पण परदेशीं !**
**कां चाफेकरबंधू गेले पुण्यामधें फांशी !**
**पुन्हां पुन्हां आठवून ठेउनि ध्येय पुढें त्यांचें**
**करावयाचें असें आपणा व्रत रणचंडीचें.** २६

वासुदेव बळवंत परदेशांत फरारी कां झाले ! आणि पुण्यांत चाफेकर बंधु फांशी कां गेले ? त्यांचें पुन्हां पुन्हां स्मरण करून आणि त्यांचें ध्येय पुढें ठेऊन आपणांस रणचंडीचें व्रत करावयाचें आहे. २६

**रणचंडीचें व्रत असलेले जवान देशांत**
**मायभूमिच्या सेवेसाठीं नित्य असावेत.**
**बळी दिल्याविण सोडुं नये व्रत कोणी तरुणांनीं**
**पारतंत्र्यकाळांत करावें पथ्य जवानांनीं. २७**

मातृभूमीच्या सेवेसाठीं रणचंडीचें व्रत घेतलेले तरुण देशांत असावे लागतात. रणचंडीला बळी दिल्याखेरीज हें व्रत कोणी सोडूं नये. पारतंत्र्य काळांत तरुणांनीं हें व्रत पाळलें पाहिजे.

**प्राणपणानें 'अभिनव भारत' आपण निर्मूं या,**
**अभिनवभारत अमरपदावर आपण चढवूं या.**
**जय न कुणाला मिळावयाचा प्रस्थापित विधिनें;**
**जयजयकार जयाचा होतो केवळ युद्धानें. २८**

प्राणपणानें अभिनव भारत आपण निर्मूं या. अभिनव भारत अमरपदावर आपण चढवूं या. प्रचलित कायद्यानें वागून कोणाला जय मिळावयाचा नाहीं. केवळ युद्धानेंच जयाचा जयजयकार होत असतो.

**अभिनवभारत जागेपणचें स्वप्न असें अपुलें**
**सशस्त्रक्रांती स्वप्नामधलें जागेपण अपुलें !**
**स्वप्नें नाहित विफल व्हायचीं क्रांतिकारकांचीं.**
**विफल न होते कधींच वाणी जशी महर्षींची. २९**

अभिनव भारत हें आपलें जागेपणचें स्वप्न आहे. सशस्त्र क्रांति हें स्वप्नामधलें आपलें जागेपण आहे. ज्याप्रमाणें महर्षींची वाणी खोटी ठरत नाहीं, त्याचप्रमाणें क्रांतिकारकांचीं स्वप्नें खोटीं ठरत नसतात.

**नांगरलें जर नाहिं कोठुनी शेत पिकायाचें !**
**नाहिं दिलें जल वेलिस कोठुनि फूल फुलायाचें !**
**नाहिं पाहिलें तर डोळ्यांना कसें दिसायाचें ?**
**रणावीण स्वातंत्र्य कुणाला कसें मिळायाचें ! ३०**

नांगरलेंच नाहीं तर शेत कोठून पिकेल ? वेलीला पाणीच घातलें नाहीं तर तिला फुलें कोठून येणार ! पाहिलेंच नाहीं तर डोळ्यांना दिसेल कसें ! त्याचप्रमाणें युद्ध केल्याखेरीज स्वातंत्र्य कोणाला कसें मिळणार !

**मायभूमिला रिपुरुधिराचें घालुनिया स्नान,**
**चला वाढवा मायभूमिचा जगामधें मान.**
**अभिनव भारत संघटना ही जवान हिंदूंची**
**अलंकार होऊनि रहावी आइ भवानीची ! ३१**

मातृभूमीला शत्रूच्या रक्तानें स्नान घालून मायभूमीचा जगामध्यें मान वाढवूं चला. तरुण हिंदूंची अभिनव भारत ही संघटणा आई भवानीचा अलंकार होऊन रहावी.

**हा पहिला दरबार आजचा मुक्त भारताचा**
**लोकसभासद या मानाचा क्रम पहिला तुमचा.**
**प्रगटपणें सांगतो ठेउनी छातीवर हात,**
**नाहिं कधीं राहणार हिंदूसमाज दास्यांत. ३२**

स्वतंत्र भारताचा हा पहिला दरबार आहे. तुम्ही लोकसभासद आहांत. मानांत पहिला मान तुमचा आहे. छातीवर हात ठेऊन मी उघडपणें सांगतो, हिंदुसमाज दास्यांत कधींही राहणार नाहीं. ३२

**सूर्य राहतो काय राहुच्या सदैव छायेंत;**
**तापत नाहीं रहात धरणी सदा उन्हाळयांत;**
**धर्मवाद साम्राज्यवाद वा वाद संस्कृतीचे**
**रणावांचुनि सुटले नाहित, नाहि सुटायाचे ! ३३**

राहूच्या कक्षेंत सूर्य नेहमींच का राहतो? धरणीवर नेहमीच उन्हाळा नसतो. धर्मवाद साम्राज्यवाद अथवा संस्कृतीचे वाद युद्ध केल्याखेरीज सुटले नाहींत आणि सुटणार नाहींत.

**पुन्हां पुन्हां घ्या शपथ शत्रुला मारुनि मरण्याची,**
**करा उजळणी नित्य आपुल्या पवित्र ध्येयाची;**
**कुणा आवडो न आवडो हें गीत निसर्गाचें —**
**रणावीण स्वातंत्र्य कुणाला नाहि मिळायाचें. ३४**

शत्रूचा धुव्वा उडाल्यावरच मरूं अशी पुन्हां पुन्हां शपथ घ्या. आपल्या पवित्र ध्येयाची नेहमी उजळणी करा. निसर्गाचें हें गीत कोणाला आवडो अथवा न आवडो युद्धाखेरीज कोणालाही स्वातंत्र्य मिळावयाचें नाहीं.

**रण केल्याविण नाहि मिळालें अमृत देवांना;**
**नाहि लक्ष्मिनें रणांवाचुनी वरिले विष्णूंना !**
**सीतेस्तव लागलें प्रभूला युद्ध करायास**
**रण केल्याविण नाहि मिळालें स्वराज्य कोणास ! ! ३५**

युद्ध केल्याखेरीज देवांना अमृत मिळालें नाहीं. युद्ध केल्याखेरीज भगवान् विष्णूला लक्ष्मी प्राप्त झाली नाहीं. सीतेसाठीं श्रीरामचंद्र प्रभूंना युद्ध करावें लागलें. युद्ध केल्याखेरीज कोणालाही स्वराज्य प्राप्त व्हावयाचें नाहीं.

**श्रीसावरकर वहात होते चिंता देशाची,**
**करीत होते पूर्ण तयारी आणि परीक्षेची.**
**जशी तापते जमीन येता रवि मध्यावरती**
**क्रांतीसाठीं तशीं भडकलीं तरुणांचीं माथीं ! ३६**

सावरकर देशाची चिंता वहात असतांनाच परीक्षेची तयारी पूर्ण करीत होते. मध्यान्हीं सूर्य आल्यावर जमीन जशी तापते तशी क्रांतीच्या विचारानें तरुणांची माथीं भडकत होतीं.

**कसें करावें राज्य असावा कोण कुठें प्रांत**
**हा अमुचा अधिकार कुणीही बोलु नये त्यांत !**
**सत्ता अमुची राज्य आमुचें याच मुजोरींत**
**सरकारानें उगाच केलें दोन नवे प्रांत. ३७**

राज्य कसें करावें, कोणता प्रांत असावा, प्रांत कोठें असावा हें ठरवावयाचा आमचा अधिकार आहे. यांत दुसऱ्यानें कोणी बोलूं नये. आमची सत्ता आणि आमचें राज्य या घमेंडीत दोन नवे प्रांत निर्माण करण्याचें सरकारानें उगीच ठरविलें !

**अशी पसरली एक भयंकर वार्ता लोकांत**
**चिडून गेली प्रजा, उडाली खळबळ देशांत.**
**साम्राज्याच्या मस्तपणाचा तो होता नमुना;**
**आवाहन तें होतें साऱ्या लोकपुढाऱ्यांना. ३८**

अशी भयंकर बातमी लोकांत पसरली. ती ऐकून प्रजा चिडून गेली. देशांत खळबळ उडाली. साम्राज्यसत्तेच्या मस्तपणाचा तो एक नमुना होता. साऱ्या पुढाऱ्यांना तें एक आव्हान होतें.

**मरण आपुलें तुडवित उडवित चला पुढें जाऊं**
**अमर होउनी स्वातंत्र्याचीं अमर पदें गाऊं.**

* * *

## (२३) विलायती कापडाची होळी

**भरूं लागल्या सभा लागलीं होऊं व्याख्यानें;**
**गर्जु लागला देश सभेंतिल तीव्र विरोधानें.**
**मृगामधें वर्षाव जसा पण होतो गारांचा**
**तसा जाहला चोंहिकडे वर्षाव निषेधाचा ! ३९**

सभा होऊं लागल्या, व्याख्यानें होऊं लागलीं, सभेमधून सरकारला होणाऱ्या तीव्र विरोधानें सारा देश गर्जून गेला. मृगामध्ये आकाशांतून जसा गारांचा वर्षाव होतो तसा सरकारवर देशांत निषेधाचा वर्षाव झाला.

**वंगभंग अपमान आमुचा सहन न करणार**
**टिकावयाचा नाहीं असला दुष्ट कारभार;**
**ठराव असले संमत झाले प्रांताप्रांतांत,**
**विरोध उठला गर्जुनि चोंहोकडूनि देशांत ! ४०**

वंगभंग हा आमचा अपमान असून आम्ही तो सहन करणार नाहीं. असला दुष्ट कारभार टिकणार नाहीं अशा अर्थाचे प्रांताप्रातांतून ठराव झाले. साऱ्या देशभर वंगभंगाविरुद्ध चोंहोंकडून विरोध होऊं लागला.

**स्वदेशांत जो माल जाहला तेवढाच घेऊं,**
**जी जी वस्तू विलायती ती फेकुनिया देऊं;**
**होउं लागल्या अशा प्रतिज्ञा घराघरांतून;**
**दडपण आलें सरकारावर विलायतेंतून. ४१**

स्वदेशांत जो माल तयार झाला असेल तेवढाच घेऊं आणि जी जी विलायती वस्तु असेल ती फेकून देऊं, अशा घराघरांतून प्रतिज्ञा होऊं लागल्या; त्याचा परिणाम असा झाला कीं विलायतेंतून सरकारवर दडपण आलें.

**सशास्त्र गाणें ऐकुनि दर्दी डुले समाधींत,**
**मधुरध्वनिनें जसा डुलावा सर्प स्वडौलांत,**
**तशी ऐकुनि विनायकाचीं सुंदर व्याख्यानें**
**स्वदेशिच्या घेतल्या प्रतिज्ञा श्रोतृसमाजानें. ४२**

सशास्त्र गाणे ऐकून समाधि लागल्यासारखें होऊन त्याच अवस्थेंत संगीतज्ञ डोलूं लागतो, गोड आवाज ऐकून सर्प जसा डौलांत डुलत रहातो, त्याप्रमाणें विनायकाची सुंदर व्याख्यानें ऐकून श्रोतृसमाजानें स्वदेशीच्या प्रतिज्ञा घेतल्या.

**विद्यार्थ्यांची अशीच मोठी एक सभा भरली,**
**स्फूर्तिप्रद भाषणें तयांचीं सभेमधें झालीं.**
**थंडगार पाण्यास असावा सुवास वाळ्याचा**
**तसाच होता अशा सभेचा विषय स्वदेशीचा. ४३**

विद्यार्थ्यांची अशीच एक मोठी सभा पुण्यांत भरली होती. त्या सभेंत विद्यार्थ्यांचीं स्फूर्तिकारक भाषणें झालीं. थंडगार पाण्याला वाळ्याचा सुवास असावा त्याप्रमाणें स्वदेशी हा सभेचा विषय होता.

**आणि म्हणे शेवटीं विनायक ऐकुनि घ्या माझें;**
**ठराव करुनी केवळ नाहीं काम जमायाचें !**
**स्वकीय वा परकीय असू द्या कोणी सरकार**
**लोकविरोधाशिवाय नाहीं कुणास बधणार. ४४**

शेवटी विनायकाचें भाषण झालें. तो म्हणाला, 'माझें ऐकून घ्या. अशा नुसत्या ठरावावर कांहीं भागावयाचें नाहीं. परक्यांचें सरकार असो अथवा आपलें सरकार असो म्हणजे स्वराज्य असो, लोकांचा तीव्र विरोध असल्याखेरीज सरकार कोणाचें कांहीं ऐकून घेणार नाहीं.'

**प्रतिकाराचा मर्दपणा अंगांत जिथें नसतो**
**ठरावास वा निषेधास त्या अर्थ तिथें नसतो.**
**निषेध म्हणजे वाटावें आव्हान युद्धाचें**
**तरीच भय मानतात कोणी अशा निषेधाचें. ४५**

अंगांत प्रतिकाराचा मर्दपणा असल्याखरीज ठरावाला किंवा निषेधाला कांहीं अर्थ नसतो. निषेध म्हणजे युद्धाचें आव्हानच वाटलें पाहिजे. तरच कोणी अशा निषेधाचें भय मानतात.

**ठराव करणें, निषेध करणें कामें दुबळ्यांचीं.**
**कोण वाचतो निषेधपत्रें पोकळ धमकीचीं !**
**सत्ता ही नेहमीच असते क्रूर स्वभावाची;**
**तोफ रोखल्याशिवाय नाहीं कुणा नमायाची. ४६**

ठराव करणें, किंवा केवळ निषेध करणें हीं दुबळ्यांचीं कामें आहेत. तुमच्या पोकळ धमकीचीं निषेधपत्रें कोण वाचतो ! सत्ता ही नेहमींच स्वभावानें क्रूर असते. तोफ रोखल्याशिवाय ती कोणापुढेंही नमावयाची नाहीं.

**मेघ गर्जती, वीज कडाडुनि कडकडते जेव्हां**
**काम कराया पाउस जातो धरणीवर तेव्हां !**
**उभे राहती जन जेव्हां भय सोडुनि मरणाचें,**
**बोलाया सरकार लागतें शब्द सबूरीचे ! ४७**

मेघ गर्जना करूं लागले आणि वीज कडकडू लागली असें पाहिल्यावरच पाऊस काम करावयास पृथ्वीवर येतो म्हणजे पावसाला सुरवात होतें. त्याप्रमाणें मरणाची पर्वा न करतां लोक उभे राहिले म्हणजे सरकार सबूरीची भाषा बोलू लागतें म्हणजे सरकार प्रजेचें ऐकून घेतें.

**निदान आपण करूं जागृती गांवोगांवांत.**
**आणि चेतवूं परसत्तेचा द्वेष समाजांत.**
**जमवूं कपडे विलायती अन् करु त्यांची होळी.**
**सरकाराला कळेल लिहिलें काय बरें भाळीं ४८**

गांवोगावांत जाऊन निदान आपण जागृति करूं आणि परसत्ते-विरुद्ध लोकांच्या मनांत द्वेष भडकवून देऊं. विलायती कापड जमवून त्याची जाहीरपणें होळी करूं. तेव्हां आपल्या कपाळीं काय भविष्य लिहिलें आहे हें सरकारला कळेल.

**अशी असावी चळवळ व्हावें अगतिक सरकार;**
**जन भडकावे अशी असावी कार्याला धार;**
**पराधीनतेमधूनि असते क्रांति करायाची,**
**आकर्षुनि घ्यावया लागतीं हृदयें लोकांचीं ! ४९**

सरकार अगतिक होईल अशी चळवळ असावी. लोक भडकतील अशी कार्याला धार असावी. पराधीन काळांत जेव्हां क्रांति करावयाची असते तेव्हा लोकांचीं मनें आकर्षून घ्यावीं लागतात.

**स्वागत झालें विनायकाच्या अमोल सुचनेचें**
**आणि ठरवलें विद्यार्थ्यांनीं होळि करायाचें,**
**सावरकर जाऊनि भेटले श्रीमन् टिळकांना;**
**टिळकांनाही विनायकाला नाहीं म्हणवेना ! ५०**

विनायकाच्या या अमोल सूचनेचें स्वागत झालें. विलायती कापडाची होळी करावयाचा विद्यार्थ्यांनीं निश्चय केला. सावरकर श्रीमान् टिळकांना जाऊन भेटले. विनायकाच्या होळी करावयाच्या कल्पनेला टिळकांनाही नकार देतां आला नाहीं.

**आणि म्हणाले टिळक मुलांनों, बघा पुढें मागें;**
**या कृत्याचे फार दूरवर पोचतील धागे.**
**पाहुनि तुमचें कार्य वाटतें मला समाधान;**
**खुशाल होळी करा; तुम्ही जा, मीही येईन. ५१**

आणि टिळक म्हणाले मुलांनों, पुढच्या मागच्या गोष्टींचा विचार करा. या विलायती कापडाच्या होळीचे धागे फार दूरवर पोचणार आहेत. तुमचें कार्य पाहून मला समाधान वाटतें. तुम्ही खुशाल होळी करा जा. मीही तुमच्यांत सामील होईन.

**मात्र सांगतो पोरखेळ हा होउं नका देऊं.**
**प्रचारांत या पदरीं अपयश आणि नका घेऊं !**
**दक्ष असा कीं तुमचें अमुचें हंसें न व्हायाचें.**
**जावे डोळे दिपून वरच्या राज्यप्रमूखाचे !! ५२**

मात्र कापडाची होळी हा पोरखेळ होऊं देऊं नका आणि या प्रचारकार्यांत अपयश घेऊं नका. तुमचें आणि माझें हंसें होणार नाहीं याची खबरदारी घ्या. राज्यप्रमुखाचें म्हणजे दिल्लीच्या व्हाईसराय साहेबाचे डोळे या होळीनें दिपून गेले पाहिजेत.

**पराधीन काळांत टाकलें पाउल लोकांनीं**
**घेउं नये तें कधींच मागें; त्यांत असे हानी.**
**हाल वाढती दुरावतें यश अशा प्रचारानें**
**टाकावें पाऊल म्हणोनी पूर्ण विचारानें. ५३**

पराधीन काळांत लोकांनीं टाकलेलें पाऊल कधीं मागें घेण्याची पाळी येऊं नये. त्यांत फार नुकसान आहे. अशा प्रचारानें लोकांचे हाल वाढतात आणि यश दुरावतें. म्हणून पूर्ण विचार करून म्हणजे पूर्व तयारीनिशी पाऊल टाकावें.

**विलायती जें कापड कपडे ते जमवायाला**
**पेठेपेठेंतून लागले तरुण फिरायाला.**
**आणि जहाली सर्व तयारी होळि करायाची**
**तिथी ठरवली विनायकानें विजयादशमीची ! ५४**

विलायती कापड आणि कपडे जमविण्यासाठीं तरुण पेठेपेठेंतून फिरू लागले. होळी करावयाची सर्व सिद्धता झाल्यावर होळी करण्यासाठीं दसऱ्याचा दिवस विनायकानें निश्चित केला. ५४

**कपडे कापड जमवुनि त्याची होळि करायाची**
**अभिनव ही कल्पना वाटली तरुण मंडळाची.**
**परंतु होते भिऊन कांहीं अशा प्रकारास**
**सरकाराच्या अवकृपेचें भय वाटे त्यास ! ५५**

विलायती कपडे आणि कापड जमवून त्यांची जाहीरपणें होळी करावयाची तरुणांची कल्पना लोकांना अभिनव वाटली. परंतु अशा प्रकाराचें कांहीं लोकांना भय वाटत होतें. आपल्यावर सरकारची अवकृपा होईल असें त्यांना वाटे.

**हिंदुजातिचा सणांमधें सण विजयादशमीचा.**
**मानवतेच्या विजयाचा दिन विजया दशमीचा.**
**सण दसरा हा इतिहासांतिल मंगलतम दिवस.**
**हा सण म्हणजे हिंदुजातिचा समग्र इतिहास. ५६**

हिंदूंच्या सणांतील विजयादशमीचा सण म्हणजे मानवतेच्या, माणुसकीच्या विजयाचा सण होय. दसरा हा सण इतिहासांतील एक मंगल दिवस आहे. या सणांत हिंदुजातीचा समग्र इतिहास सामावला आहे.

**पवित्र जलवाहिनींत जैशी श्रीगंगामाता**
**दानामध्यें अन्नदान अन् गुणांत निर्भयता,**
**सुगंधामधें सुगंध जसा पारिजातकाचा.**
**सणांमधें सण पवित्र सण हा विजयादशमीचा. ५७**

पवित्र जलवाहिनींत म्हणजे नद्यांत जशी गंगानदी श्रेष्ठ ! दानामध्यें जसें अन्नदान महत्त्वाचें, गुणांत निर्भयता श्रेष्ठ, सुगंधांत पारिजातक फुलाचा सुगंध जसा मोहक त्याप्रमाणें सणांमध्यें विजयादशमीचा पवित्र सण होय.

**कापड कसले, होळि काय, ती कशी करायाची,**
**मिरवणूक ती काय आणि ती कां काढायाची,**
**ठाउक नव्हतें जरी यांतलें अक्षर लोकांस**
**नवें बघावें उत्सुकता ही असते सर्वांस. ५८**

कापड कसलें, ही होळी काय प्रकरण आहे आणि ती कां करावयाची यातलें एक अक्षरही सामान्य लोकांस कळत नव्हतें. पण कांहीं ठाऊक नसलें तरी कांहीं नवें बघण्याची सर्वांना उत्सुकता असते.

**फळाफुलांनीं जसे झांकुनी आम्रतरू जाती,**
**बसून होते लोक बघाया तसें घरावरती;**
**लहान मोठे खडक नदीच्या पुरांत बुडतात.**
**मार्गावरचीं घरें बुडालीं जनसंमर्दांत. ५९**

आंब्याचीं झाडें मोहरानें आणि फळांनीं जशी बहरून जावीं त्याप्रमाणें घरांवरती लोक बसल्यानें घरें लोकांनीं झांकून गेलीं होतीं. पूर आला म्हणजे लहान मोठे खडक पाण्यांत बुडतात त्याप्रमाणें लोकांच्या गर्दींत घरें बुडून गेलीं होतीं.

**सागर-लाटा किनाऱ्याकडे विस्तृत होतात,**
**वाढत होते तसे पुढें जन नेत्या समवेत.**
**जशी चालते रूपगर्विता हळू नि डौलानें**
**चालत होती मिरवणूक ती तशी दिमाखानें ! ६०**

समुद्राच्या लाटा किनाऱ्याकडे येत असतां जशा विस्तृत होत जातात त्याप्रमाणें पुढाऱ्यांबरोबर मिरवणूक मोठी होत चालली होती. आपल्या स्वरूपाचा गर्व असणारी स्त्री गजगतीनें आणि जशी डौलांत चालते तशी मिरवणूक डौलांत चालली होती.

**मधेंच कोठें स्वातंत्र्याचा होई जयकार;**
**सरकाराचा करीत होते कोणी धिःकार. !**
**जसा भक्त तो गरजत जातो नांव विठोबाचें**
**लहान मोठे गर्जत होते व्रत स्वदेशीचें ! ६१**

मिरवणुकींत मध्येंच कोठें सावरकरांचे मित्र स्वातंत्र्याचा जय-जयकार करीत तर मध्येंच कोणी सरकारचा धिःकार करीत. जसा भक्त पांडुरंगाच्या नांवाचा गजर करीत असतो त्याप्रमाणें लहान मोठे लोक स्वदेशीच्या व्रताचा गजर करीत होते.

**ताऱ्यांमधें जसा शोभतो चंद्र चतुर्थीचा,**
**बागेमध्यें जसा शोभतो डौल गुलाबाचा,**
**जसा शोभतो सुंदर पक्षी मयूर पक्षांत**
**तसा विनायक शोभत होता लोकसमूहांत. ६२**

ताऱ्यांमध्यें चतुर्थीचा चंद्र जसा शोभून दिसतो, बागेला गुलाबाच्या फुलांनीं जसा डौल येतो, पक्ष्यांमध्यें मोर जसा सुंदर दिसतो. त्याप्रमाणें लोकांच्या गर्दींत विनायक चमकून दिसे.

**सावरकर दाखवा बघूं द्या, मजला येथून,**
**बघा बघा तो कुणी दाखवी तयास लांबून.**
**आणि पाहुनी विनायकाची मूर्ति डौलदार**
**किती किती हा सुंदर दिसतो निघती उद्गार. ६३**

सावरकर कोण तो मला दाखवा. मला येथूनच त्याला बघू द्या. असें कोणी म्हणाला कीं 'बघा बघा तो' असें म्हणत लांबूनच कोणी विनायकाकडे बोटें करीत आणि विनायकाची ती डौलदार मूर्ति पाहून हा किती सुंदर दिसतो असें लोकांचे उद्गार निघत.

**एकवार जन पहात होते जन संमर्दास**
**एकवार ते पहात होते सावरकरजींस;**
**जसा दहाव्या स्थानिं असावा मंगळ मकरेचा,**
**जवानांमध्यें रुबाब होता सावरकरजींचा. ६४**

एकदां लोक अफाट जनसमर्द पहात तर एकदां सावरकरांकडे लोक बघत. कुंडलींतील दहाव्या स्थानांतील मंगळाप्रमाणें तरुणांमध्यें सावरकरांचा रुबाब विशेष होता.

**एकवार ते मधेंच बघती बळी कापडाचा**
**करीत होते निषेध कोणी इंग्रज राज्याचा !**
**हळूहळूं मिरवणूक गेली, गेली स्वस्थानीं**
**आणि दिला कापडास अग्नी श्रीमन् टिळकांनीं. ६५**

एकदां ते मध्येंच कापडाचा बळी पहात आणि इंग्रजराजाचा कोणी निषेध करीत. हळूहळू विलायती कापडाची मिरवणूक ठरलेल्या जागेवर पोहोचली आणि तेथें श्रीमान् टिळकांनीं होळी पेटवली.

**होळि भडकली धूर पोंचला वरती स्वर्गांत**
**नाचुं लागले सहर्ष चाफेकर आनंदांत.**
**त्या ज्वालांनीं प्रकाशलें वर दाहि दिशा गगन**
**स्वदेशिच्या घोषणीं गर्जलें हें हिंदुस्थान.** ६६

होळी पेटू लागली, त्या होळीचा धूर स्वर्गांत पोंचला तेव्हां चाफेकर स्वर्गांत आनंदानें नाचूं लागले. होळीच्या ज्वालांनीं दाही दिशीं आकाश उजळलें. सारे हिंदुस्थान स्वदेशीच्या घोषणांनीं दुमदुमून गेलें होतें.

**श्रीकृष्णाचें नांव काढतां कुणी मुखांतून**
**कंस जसा मथुरेंत भयानें जाई दचकून,**
**प्रचार पाहुनि हिंदुस्थानांतल्या स्वदेशीचा,**
**सुटून गेला धीर बिचाऱ्या इंग्रज लोकांचा !** ६७

श्रीकृष्णाचें नांव उच्चारतांच मथुरेंत भयानें कंस जसा दचकून जाई, त्याप्रमाणें हिंदुस्थानांतील स्वदेशीचा प्रचार पाहून बिचाऱ्या इंग्रज लोकांचा धीर सुटून गेला.

**होळि पेटली पित्त पेटलें इंग्रज लोकांचें**
**म्हणे करिल ही होळि आमुची व्रत स्वदेशीचें.**
**धंदे बुडतिल सर्व आमुचे विलायतेमधले.**
**वंगभंग मी करीन म्हटलें हें माझें चुकलें !** ६८

इकडे होळी पेटली त्याबरोबर तिकडें इंग्रजांचें पित्त भडकलें. स्वदेशीच्या चळवळीनें आपली होळी होईल, आमचे विलायतेमधील धंदे बुडतील. मी वंगभंग करीन म्हणतो, तें माझें चुकलें असें बडे लाटसाहेब म्हणूं लागले.

**खरा बहाद्दर परंतु गेला भिऊन लोकांना;**
**लोकांपेक्षां भिऊन गेला क्रांतिकारकांना!**
**आणि म्हणाला विचार आम्ही करूं पुन्हां याचा**
**वंगाल्याचे प्रांत वेगळे दोन करायाचा!** ६९

बहाद्दर खरा पण लोकांच्या चळवळीला भिऊन गेला. पण त्याही-पेक्षां क्रांतिकारकांची त्याला भीति वाटली. आणि वंगभंगाच्या आज्ञेचा आम्ही पुन्हां विचार करूं असें तो म्हणाला.

**विजय जाहला शूर मुलांचा मर्द उठावाचा**
**विजय जाहला विनायकाचा आणि पुढाऱ्यांचा.**
**जसा ध्रुवाचा चमकत आहे आग्रह आकाशीं,**
**या होळीचा अजून दिसतो प्रकाश इतिहासीं.** ७०

शूर मुलांच्या मर्द उठावाचा विजय झाला. विनायकाचा आणि पुढाऱ्यांचा विजय झाला. आकाशांत ध्रुवाचा आग्रह जसा चमकत असतो त्याप्रमाणें त्या विलायती कापडाच्या होळीचा प्रकाश इतिहासांत अजून दिसत आहे.

**शपथबद्ध मित्रास विनायक आर्जवुनी बोले,**
**आणि भवानी देवि बोल ते ऐकुनिया डोले!**
**स्वातंत्र्याचें असेंच असतें गीत बहारीचें,**
**जसें काय शारदादेविच्या बोल सतारीचे!** ७१

शपथबद्ध मित्रांना विनायक आर्जवून सांगे आणि त्याचे बोल ऐकून देवी भवानी मान डोलवी! ज्याप्रमाणें श्री शारदादेवीच्या सतारीचे बोल बहारदार असतात त्याप्रमाणेंच स्वातंत्र्याचें गाणें बहारीचें असतें.

**मरण आपुलें तुडवित उडवित चला पुढें जाऊं,**
**अमर होउनी स्वातंत्र्याचीं अमरपदें गाऊं.**

* * *

## (२४) सावरकरांचें लंडनला प्रयाण

होळि पेटली आग भडकली हिंदुस्थानांत
कीर्ति वाढली विनायकाची थोर पुढाऱ्यांत.
प्रजा बोलते एक मुखानें कांहि कधीं जेव्हां
सरकाराला प्रतिकाराचें भय असतें तेव्हां. ७२

होळी पेटली आणि तिची आग हिंदुस्थानभर पसरली. थोर पुढाऱ्यांत विनायकाचें नांव झालें. जेव्हां कधीं कांहीं एक मुखानें प्रजा बोलते तेव्हां प्रतिकाराचें सरकारला भय वाटत असतें.

भूकंपानें होइल केव्हां कुठें हहाकार,
गार हवेची लाट कुणाला करील बेजार,
विरोधास येईल कधीं पण रूप उठावाचें
आणि कधीं पेटेल देश हा नाहि कळायाचें ! ७३

भूकंपानें केव्हां कोठें हाहाकार होईल, थंड हवेच्या लाटेनें कोण कधीं आजारी पडेल, विरोधाला उठावाचें रूप केव्हां येईल आणि देशांत केव्हां भडका उडेल हें कोणाला कांहीं कळावयाचें नाहीं.

सरकाराशीं गोड बोलुनी काम करायाचा
असा एक नेहमीच असतो पक्ष मवाळांचा.
हवा नि पाणी जसें अवश्यक असती पृथ्वीस
तसे मवाळ नि जहाल दोन्ही हवेत देशांस. ७४

सरकारशीं गोड बोलून काम करावयाचा मवाळांचा एक पक्ष नेहमींच असतो. हवा आणि पाणी याची जगाला जशी आवश्यकता असते त्याचप्रमाणें देशाच्या कारभारांत जहाल आणि मवाळ यांची नेहमींच आवश्यकता असते.

**कधी प्रसंगीं गरज भासते मवाळ लोकांची**
**धाव रोखुनी धरावयाला जहाल पक्षाची.**
**शहर पुण्यांतिल अशा सुसज्जन आणि शहाण्यांचें**
**या होळीनें खवळुनी गेलें पित्त मवाळांचें. ७५**

जहाल पक्षाची धाव आवरून घेण्यासाठीं कांहीं प्रसंगीं मवाळांची आवश्यकता भासते. पुणें शहरांतील अशा सुज्ञ आणि सज्जन मवाळांचें या होळी प्रकरणानें पित्त खवळलें.

**निषेध केला लगेच त्यांनीं श्रीमन् टिळकांचा,**
**ओढुनि घेऊं नये म्हणाले राग इंग्रजांचा !**
**मनें बिथरतिल सरकाराच्या विरुद्ध लोकांचीं.**
**होइल हानी आणि त्यामुळें देशप्रगतीची. ७६**

त्यांनीं श्रीमान् टिळकांचा लगेच निषेध केला. इंग्रजांचा राग ओढवून घेऊं नये असें ते म्हणत. सरकारच्या विरुद्ध लोकांचीं मनें बिथरतील आणि त्यामुळें देशाच्या प्रगतीच्या दृष्टीनें मोठी हानि होईल असें ते म्हणाले.

**सरकाराची बघूनि मर्जी मग बोलायाचें**
**असे पुढारी करूं न शकतिल कार्य समाजाचें !**
**आक्रमणाचा गुण असावा देशप्रगतीला**
**आग्रहवृत्ती लागत असते लोकपुढाऱ्याला. ७७**

सरकारची मर्जी कशी आहे तें पाहून मग बोलावयाचें असें पुढारी समाजाचें कार्य करूं शकणार नाहींत. देशाची प्रगति करावयाची तर अंगीं आक्रमणाचा गुण असावा लागतो आणि पुढाऱ्यांत आग्रही वृत्ति असावी लागते.

**लाजवितो हळुवारपणा या मवाळ लोकांचा,**
**येतो केव्हां राग तयांच्या नृपाळनिष्ठेचा !**
**अशीच असते सौम्य प्रकृती मवाळ लोकांची;**
**लवंग पुरते एक प्रकृती बिघडाया त्यांची. ! ७८**

मवाळ लोकांचा हळुवारपणा लाजवितो ! त्यांच्या नृपनिष्ठेचा केव्हां रागही येतो. मवाळ लोकांची सौम्य प्रकृति अशी असते कीं त्यांची ती प्रकृति बिघडावयास एक लवंगसुद्धा पुरते !!

**विद्यार्थी बिघडतील यांच्या उगाच नादानें,**
**व्यत्यय अध्यापनांत येइल राजकारणानें,**
**होइल वाइट लौकिक अपुल्या शिक्षण संस्थेचा**
**उगाच झाला समज चुकीचा हा प्राचार्यांचा. ७९**

सावरकरांच्या नादानें विद्यार्थी निष्कारण बिघडतील, राजकारणामुळें त्यांच्या अध्यापनांत व्यत्यय येईल. आणि आपल्या शिक्षण संस्थेचा लौकिक बिघडेल असा प्राचार्यांचा उगाच गैरसमज झाला.

**आणि काढली आज्ञा त्यांनीं विनायकासाठीं**
**'सोडुनि जा वसतिगृह अमुचें तुझ्या हितासाठीं.'**
**छापुनि आलें विनायकाचें नांव भारतांत**
**आणि वाढला लौकिक त्याचा लोकसमाजांत. ८०**

म्हणून तूं आपल्या स्वतःच्या हितासाठीं आमचें वसतिगृह सोडून जा अशी त्यांनीं आज्ञा काढली. त्यामुळें भारतांतील वृत्तपत्रांतून विनायकाचें नांव प्रसिद्ध झालें. आणि लोकसमाजांत सावरकरांचा लौकिक वाढला.

**दंडहि भरला विद्यार्थ्यांनीं पै पैसा करुनी.**
**महत्त्व असतें दंड भरावा तो सर्वांमिळुनी.**
**लौकिक असतो त्यांत व्यक्तिच्या उदात्त कार्याचा;**
**प्रत्यय असतो मागिल त्याच्या जनसामर्थ्याचा. ८१**

वर्गणी जमवून विनायकाला प्राचार्यांनीं केलेला दंड विद्यार्थ्यांनीं भरला. सर्वांनीं वर्गणी गोळा करून दंड भरावा या गोष्टीला महत्त्व आहे त्यावरून लोकांचा पाठिंबा किती आहे याचा प्रत्यय येतो.

**होता होता दिवस भराभर गेले संपून**
**सावरकर जाहले परीक्षा अखेर उत्तीर्ण !**
**विनायकाचें भलें चिंतलें सहर्ष सर्वांनीं,**
**घरोघरीं वाटली मिठाई गणेशबाबांनीं. ८२**

होता होता भराभर दिवस संपून गेले. सावरकरही परीक्षा उत्तीर्ण झाले. सर्वांनीं विनायकाला यश चिंतिलें. गणेशपंतांनीं विनायक परीक्षेंत उत्तीर्ण झाल्याबद्दल घरोघर मिठाई वाटली.

**आनंदाच्या अभिमानाच्या मधुर नशेमाजीं**
**होते ज्याला त्याला सांगत गणेशबाबाजी :**
**" अखेर झाला तात्या अमुचा पास परीक्षेंत.**
**पुढें बघूं या, " बोलुनि जाती पुढेंच तोऱ्यांत. ८३**

विनायक परीक्षेंत उत्तीर्ण झाला यामुळें होणाऱ्या आनंदाच्या आणि अभिमानाच्या उत्साहांत गणेशपंत तें वृत्त ज्याला त्याला सांगत. ' आमचा तात्या अखेर परीक्षेंत उत्तीर्ण झाला. आतां बघूं या ' असें बोलून ते पुढें जात.

**मित्र जिवाचे जमले कांहीं निरोप द्यायाशीं;**
**हंसून बोले उत्साहानें तो सर्वांपाशीं.**
**सांगत होता पुन्हां पुन्हां तो शब्द धोरणाचे**
**परदास्यांतुनि भारतमाता मुक्त करायाचे. !** ९०

कांहीं जिवलग मित्र त्याला निरोप देण्यासाठीं आले असतां तो सर्वांबरोबर हंसून खेळून बोलत होता. परदास्यांतून आपला देश मुक्त करण्यासाठीं तो त्या कार्याची कल्पना त्यांना पुन्हां पुन्हां करून देई.

**निसर्ग सुंदर जसा ऋतुक्रम निसर्ग भूषवितो**
**युग पुरुषाचा आयुष्यक्रम ठरलेला असतो.**
**आयुष्याचें नाट्य रंगतें विविध प्रसंगांनीं**
**मोल तयाचें असतें भारी सामान्याहूनी.** ९१

निसर्गसुंदर असा ऋतुक्रम जसा निसर्ग भूषवितो, त्याप्रमाणें युगपुरुषाचा आयुष्यक्रम ठरलेला असतो. विविध प्रसंगांनीं जीवनाचें नाट्य रंगतें. सामान्यापेक्षां त्याची किंमतही मोठी असते.

**अभिनव भारत संघटनेचा करा सुविस्तार;**
**माझ्या मागें संघटनेचा तुजवरती भार;**
**विलायतेंतुन कळवित जाइन कार्यक्रम पुढचा—**
**असें सांगुनी तथें घेतला निरोप बंधूंचा.** ९२

'अभिनव भारत' संघटनेचा चांगला विस्तार करा. माझ्यामागें संघटनेचा तुझ्यावरच भार आहे. पुढचे कार्यक्रम मी विलायतेंतून कळवीत जाईन.' असें सांगून विनायकानें भावाचा म्हणजे गणेशपंतांचा निरोप घेतला.

**होइन मी उत्तीर्ण परीक्षा सुखरुप येईन**
**हा दिन दिसला केवळ केली कृपा तुम्ही म्हणुन.**
**आणि ठेवलें मस्तक चरणीं सासुसास-यांचे**
**आणि घेतले विनायकानें निरोप सर्वांचे. ९३**

मी परीक्षा उत्तीर्ण होऊन सुखरूप परत येईन. हा भाग्याचा दिवस तुमच्या कृपेमुळें मला दिसला. असें म्हणत विनायकानें सासुसास-ऱ्यांच्या चरणांवर डोकें ठेवलें आणि इतरांचाही त्यानें निरोप घेतला.

**नका काळजी करूं तुम्ही रे शस्त्राअस्त्रांची,**
**धाडुनि देइन तुम्हास शस्त्रें विविध प्रकारांचीं.**
**तेंहि कार्य मी करीन म्हणतो लंदन शहरांत;**
**निरोप त्याला दिला ठेउनी खांद्यावर हात. ९४**

शस्त्रास्त्रांची तुम्ही मुळीच काळजी करूं नका. विविध प्रकारचीं शस्त्रें मी विलायतेंतून तुम्हास धाडीन, तेंहि कार्य विलायतेंत करावयाचें मीं ठरविले आहे. आणि खांद्यावर हात ठेऊन त्यानें त्यांचा निरोप घेतला.

**आणि म्हणाला पारखून घ्या तरूण संस्थेचे**
**जसें बाळिचें मोती अथवा मोति चौकड्यांचें.**
**उठाव आहे करावयाचा सशस्त्रक्रांतीचा**
**सांगुनि इतकें तयें घेतला निरोप सर्वांचा. ९५**

आणि तो म्हणाला, कानांतील बाळीचें किंवा नथींतील चौकड्याचें मोती जसें पारखून घेतात त्याप्रमाणें संस्थेचे तरुण सभासद पारखून घ्या. आपणांस सशस्त्र क्रांतीचा उठाव करावयाचा आहे असें सांगून त्यानें इतर मित्रांचा निरोप घेतला.

**व्रत स्वदेशी पाळुनि कर संघटणा महिलांची;**
**विचारणा जा करीत माझ्या अनेक मित्रांची;**
**शब्द नको पाडूस खालती प्रेमळ वहिनीचा**
**असें सांगुनी तयें घेतला निरोप पत्नीचा. ९६**

स्वदेशीचें व्रत पाळ; महिलांची संघटणा कर, माझ्या अनेक मित्रांची चौकशी करीत जा. माझ्या प्रेमळ वहिनीचा शब्द कधीं खालीं पाडूं नकोस असें सांगून सावरकरांनीं आपल्या पत्नीचा निरोप घेतला.

**दुःख वाटलें विनायकाला देश सोडतांना**
**आणि जोडुनी हात मनोमन विनवी देवांना :**
**शिक्षण होवो पुरें नि लाभो संगत शूरांची**
**व्हावी माझ्याकडूनि सेवा हिंदुस्थानाची ! ९७**

आपला देश सोडतांना विनायकांना दुःख झालें. माझें शिक्षण पुरें होवो, शूरांची संगत लाभो आणि हिंदुस्थानदेशाची माझ्याकडून सेवा घडो अशी तो मनांत देवाला प्रार्थना करी.

**दाटुनि आले असूं तयाच्या सतेज डोळ्यांत**
**आणि म्हणाला भाव भक्तिनें जोडुनिया हात :--**
**मानवतेचा जिचा जयध्वज अविरत फडफडतो**
**थोर अशा श्रीआर्यभूमिला वंदन मी करतों. ९८**

त्याचे सतेज डोळे पाण्यानें भरले. तो हात जोडून भावभक्तीनें म्हणाला : जिच्या मानवतेचा जयध्वज अविरत फडफडतो अशा थोर आर्यभूमीला माझा नमस्कार असो.

**हिमशिखरावर श्रीशिवशंकर जेथें असतात,**
**युगें युगें ध्यानस्थ मुनीजन जिथें रहातात,**
**जिच्या पाठिशीं शुभ्र हिमालय सदा उभा असतो**
**थोर अशा श्रीआर्यभूमिला वंदन मी करतों. ९९**

हिमशिखरावर ज्या ठिकाणीं श्रीशिवशंकर राहतात, जेथें युगानुयुगें मुनि ध्यानधारणा करतात, जिच्या पाठिशीं शुभ्र हिमालय नेहमीं उभा असतो अशा थोर आर्यभूमीला माझा नमस्कार असो.

**जिचीं भुयारें अमाप भरलीं अमोल रत्नांनीं,**
**तेजोमय जी असे सदोदित सर्व सद्‌गुणांनीं,**
**जिच्या मुखावर कोहिनुराचा प्रकाश झळझळतो**
**थोर अशा श्रीआर्यभूमिला वंदन मी करतों. १००**

जिचीं भुयारें अमाप अमोल रत्नांनीं भरलीं आहेत, सर्व सद्‌गुणांनीं युक्त असल्याने जी नेहमीं कांतिमय दिसते, जिच्या मुखावर कोहिनूर हिऱ्याचा प्रकाश झळझळतो अशा थोर आर्यभूमीला माझा नमस्कार असो.

**जिच्यामधें भू शस्यशालिनी सदाकदा असते,**
**धनधान्यांनीं समृद्ध असतीं सदा जिचीं शेतें;**
**जिचे जलाशय कमलफुलांनीं निसर्ग भूषवितो**
**थोर अशा श्रीआर्यभूमिला वंदन मी करतों. १०१**

जेव्हां पहावें तेव्हां जिची भूमि शस्यशालिनी असते, धनधान्यांनीं जिचीं शेतें समृद्ध असतात जिचे जलाशय कमलफुलांनीं नेहमीं निसर्गानें भूषविलेले असतात, अशा थोर आर्यभूमीला माझा नमस्कार असो.

**गंगा यमुना सिंधु, नर्मदा अन् गोदावरिचें**
**घडे जिला सुस्नान सरस्वति अन् कावेरीचें;**
**अनंत काळापासुनि सागर चरण जिचे चुरतो**
**थोर अशा श्रीआर्यभूमिला वंदन मी करतों. १०२**

गंगा, यमुना सिंधु, नर्मदा, गोदावरी, सरस्वती आणि कावेरी ह्यांचें जिला नित्य स्नान घडतें, अनंत काळापासून सागर जिचें चरण चेपीत आहे अशा थोर आर्यभूमीला माझा नमस्कार असो.

**सप्तसुरांचे, गणितांचे अन् दशांश मापाचे**
**तूंच लावले शोध माउली, अनेक शास्त्रांचे;**
**अध्यात्माचा तुझा विश्वभर सुगंध दरवळतो**
**थोर अशा श्रीआर्यभूमिला वंदन मी करतों. १०३**

सप्तसुरांचे, गणितांचे आणि दशांश मापांचें आणि अनेक शास्त्रांचे आई, तूंच शोध लावले आहेस. तुझ्या अध्यात्माचा सुगंध साऱ्या विश्वांत दरवळून राहिला आहे. अशा थोर आर्यभूमीला माझा नमस्कार असो.

**जगद्वंद्य श्रीरामकृष्ण म्हणतात तुला आई**
**व्यास वाल्मिकी कालिदास म्हणतात तुला आई.**
**आई आई तुझें मूल मी पाय तुझे धरतों.**
**थोर आमुच्या आर्यभूमिला वंदन मी करतों. १०४**

जगाला वंद्य असणारे श्रीरामचंद्र आणि श्रीकृष्ण तुला आई म्हणून हांक मारतात. व्यास, वाल्मीकि आणि कालिदासही तुलाच आई म्हणून हांक मारतात. आई, आई, मी तुझेंच मूल आहे. मी तुझे पाय धरतों. आमच्या थोर आर्यभूमीला मी वंदन करतों.

**मातृभूमि तूं पुण्यभूमि तूं मंगल तूं अमुचें;**
**ऋण आम्हांवर तुझें माउली अनंत जन्मांचें;**
**स्तवनें शत तव पदारविंदीं सादर मी करतों**
**थोर आमुच्या मातृभूमिला वंदन मी करतों. १०५**

आमची मातृभूमि आणि पुण्यभूमि तूंच आहेस. तूं आमचे मंगल आहेस. अनंत जन्मांचें तुझें ऋण आई, आमच्यावर आहे. तुझ्या पद-कमलावर मी शतस्तवनें सादर करतों. आमच्या थोर आर्यभूमीला माझा नमस्कार असो.

**प्रयाण झालें सुरू नि त्याला आलें गहिंवरुनी**
**दिसूं लागले मित्र तयाचे अन् त्याच्या वहिनी.**
**सहज असे गहिंवरुनी येणें प्रेमळ हृदयांस**
**सत्कार्यास्तव विरह लागतो सहन करायास. १०६**

बोट सुरू झाली आणि त्याला गहिंवरून आलें. त्याच्या मित्रांच्या आणि त्याच्या वहिनीच्या त्याला आठवणी होऊं लागल्या. हृदय प्रेमळ असलें म्हणजे असें सहज गहींवरून येतें. पण सत्कार्यासाठीं असा विरह सहन करावा लागतो.

**नित्य लागतो सुस्नेहाला प्रेमळ सहवास,**
**विरह लागतो आठवणींचें सौख्य मिळायास;**
**आठवणींच्या सुखांत होते दिन त्याचे जात;**
**परिचय झाले नवे, लाभले नवे नवे मित्र. १०७**

सुस्नेह जमावयास नेहमीं प्रेमळ सहवास असावा लागतो. आठवणींचें सौख्य मिळावयाला विरह सहन करावा लागतो. आठवणींच्या सौख्यांत त्याचे दिवस चालले होते—म्हणजे त्याचा प्रवास चालला होता. नवे परिचय झाले. आणि त्याला नवे स्नेही मिळाले.

**भर वेगानें जहाज होतें पुढें पुढें जात**
**करीत होता तसे विनायक नवे नवे बेत.**
**जहाज होतें गात आपुलें गायन नित्याचें,**
**गात तयाचें मनही होतें गीत स्वदेशाचें.** १०८

भर वेगानें जहाज म्हणजे बोट पुढें चालली होती. तसे विनायका-चेही नवे नवे बेत सुरू होते. जहाज आपलें नेहमीचें गाणें गात होतें. म्हणजे जहाजाच्या यंत्रांतून नेहमीसारखा आवाज निघत होता. विनाय-काचें मनही स्वदेशाचें नेहमीचें गाणें गात होतें.

**मधेंच वाटें जहाज उलटें होइल जातांना**
**परंतु त्याचें विनायकाला कांहिच वाटेना !**
**मधेंच चालें गजासारखें जहाज डौलानें,**
**मधेंच येई हंसें तयाला गोड विचारानें.** १०९

पुढें जातांना मध्येंच जहाज उलटें होईल असें वाटे; परंतु विनायकाला त्याची पर्वा नव्हती. जहाज मध्येंच हत्तीसारखें डुलत चालें; कांहीं गोड विचारानें विनायक मध्येंच स्वतःशींच हंसे.

**अंबर अन् जग बुडलें होतें घनांधकारांत**
**फुललें होतें गोड चांदणें त्याच्या हृदयांत;**
**उजाडलें कीं दिसें तयाला चोहिकडे पाणी;**
**रात्रंदिन मन गायी त्याचें क्रांतीचीं गाणीं.** ११०

आकाश आणि जहाज दाट अंधकारांत बुडून गेलें होतें; पण विनायकाच्या हृदयांत गोड चांदणें फुललेलें होतें. उजाडलें कीं त्याला चोहोंकडे पाणीच पाणी दिसे. तो रात्रंदिवस क्रांतीचींच गाणीं गात होता.

**कधीं निळें जल कधीं तांबडें बघुनि समुद्राचें**
**असेंच जातिल दिवस म्हणे तो क्रांतिकारकांचे !**
**मधेंच येती उसळुनि वरती जलचर जोरांत**
**असेच करतील आम्हावर जन उगीच आघात. १११**

कधीं निळसर तर कधीं तांबडें समुद्राचें पाणी पाहून क्रांतिकार-कांना असेच दिवस काढावे लागतील असें तो म्हणे. समुद्रांतून जलचर उसळून वर येत. आमच्यावर लोक असेच निष्कारण आघात करतील.

**बघुनि तारे आणि नभांतिल म्हणे सहर्षानें**
**असेंच आम्ही होउनि राहूं सोन्याचीं पानें !**
**विश्रांतिस्तव चेंडुफळीचा खेळ खेळतांना**
**असेंच हिंदू आम्हि टोलवूं म्हणे इसायांना ! ! ११२**

आणि आकाशांत तारका बघून तो हंसत म्हणे कीं असेच आम्ही इतिहासांत सोन्याचीं पानें होऊन राहूं. विश्रांतीसाठीं चेंडूफळीचा खेळ खेळतांना आम्ही हिंदु असेंच ख्रिश्चनांना टोलवूं असें तो म्हणे.

**अशा मनोराज्यांत सुखाच्या एक पहाटेला**
**विनायकाची सहज लागली बोट किनाऱ्याला.**
**जसे पोंचले राव सदाशिव दिल्लीशहरांत**
**राव विनायक तसे पोचले शत्रुशिबीरांत. ११३**

असें सुखकारक मनोराज्य चालू असतां एका पहाटस विनायकाची 'बोट' सहजपणें किनाऱ्याला लागली. दिल्ली शहरांत पूर्वीं श्रीमंत सदाशिवराव भाऊ जसे पोचले त्याच दिमाखांत विनायक सावरकर शत्रुशिबिरांत पोचले.

* * *

**मरण आपुलें तुडवित उडवित चला पुढें जाऊं**
**अमर होउनी स्वातंत्र्याचीं अमरपदें गाऊं**

## (२५) गुप्त मंडळाची स्थापना

अंधारांतुनि उजेडामधे जसें कुणी यावें
खेड्यामधुनी नगरामध्यें जसें प्रवेशावें,
कामगार वस्तींतुनि यावें लक्ष्मिपथावरती
तशी वाटली विनायकाला लंडनची वस्ती. ११४

अंधारांतून उजेडांत जसें यावें किंवा खेड्यामधून नगरामध्यें जसा प्रवेश करावा, किंवा कामगारवस्तीमधून लक्ष्मीपथावर जसें यावें त्याप्रमाणें विनायकाला लंडनची वस्ती वाटली.

प्रसन्नता अन् विशाल वैभव पाहुनि शहराचें
प्रसन्न झालें हर्षित झालें चित्त चकोराचें.
असाच माझा भारत होता उच्च पदावरती
असाच चढवूं म्हणे देश हा महत्पदावरती! ११५

शहराचें विशाल वैभव आणि शहरांतील प्रसन्न राहणी पाहून विनायकाला आनंद वाटला. त्याला समाधान झालें. माझा भारत देश असाच वैभवाच्या उच्च स्थानीं पूर्वी होता आणि त्याला पुनरपि त्याच मोठ्या पदावर आम्हीं चढवूं असें तो म्हणे.

औषध पथ्यावांचुनि नाहीं रोग हटायाचा
स्वातंत्र्याचा प्रश्न रणाविण नाहिं सुटायाचा!
पारतंत्र्य रोगावर आहे औषध युद्धाचें
रणावांचुनि परवशतेचें दुःख न जायाचें!! ११६

औषध आणि पथ्य केल्याखेरीज रोग हटत नाहीं. त्याचप्रमाणें स्वातंत्र्याचा प्रश्न युद्ध केल्याखेरीज सुटावयाचा नाहीं. पारतंत्र्य रोगावर युद्ध हेंच एक औषध आहे. युद्धाखेरीज परवशतेचें दुःख नाहिसें होणार नाहीं.

**चित्त तयाचें भडकुनि होतें अशा विचारांत**
**राहू लागला तशामधें तो भारतभवनांत.**
**क्रांतिकटांच्या सुरम्य वार्ता त्याच सुमाराला**
**देशादेशांतूनि लागल्या त्यास कळायाला. ११७**

अशा विचारानें त्याचें चित्त भडकून होतें. त्यांत विशेष म्हणजे भारतभवनांत तो राहूं लागला त्याच सुमारास देशादेशांतील क्रांतिकारकांच्या सुरम्य बातम्या त्याला कळूं लागल्या.

**भृंग जसे गुंजारव करती गोड फुलांभवती**
**जमूं लागले विलायतेंतिल तरुण तयाभवतीं.**
**क्रांतीचे नव विचार ऐकुनि वाटे तरुणांस**
**हाच पुढारी करील अपुल्या स्वतंत्र देशास ! ११८**

गोड फुलाभोंवती भृंगे जसे गुंजारव करीत असतात त्याप्रमाणें विनायकाच्या भोंवतीं विलायतेंतील हिंदु तरुण गोळा होऊं लागले. विनायक सावरकर यांचें भारतांत सशस्त्र क्रांति घडवून आणावयाचे विचार ऐकून हाच पुढारी आपला देश स्वतंत्र करील असें त्या तरुणांना वाटे.

**परशासन वा असो स्वशासन लबाड लोकांचें**
**असेल लोकांसाठिं खरोखर जर उलथायाचें,**
**क्रांतिमंडळें स्थापायाला प्रथम पाहिजेत**
**क्रांतिमंडळांतून पेटते युद्धाची ज्योत ! ११९**

परसत्ता असो किंवा लबाड लोकांच्या हातीं गेलेलें स्वराज्य असो लोकांच्या हितासाठीं जर तें उलथून टाकावयाचें असेल तर प्रथम सशस्त्र क्रांति करणारीं गुप्त मंडळें स्थापन केलीं पाहिजेत. ही क्रांति करण्यासाठीं स्थापन झालेल्या गुप्त मंडळांतूनच युद्धाच्या ज्वाळा भडकतात.

**दिला जयानीं मान मिळवुनी अपुल्या राष्ट्रास**
**त्या वीरांचें ज्ञान पाहिजे लहानमोठ्यांस;**
**अन् लोकांना स्फुरण चढावें क्रांति करायाचें**
**विनायकानें चरित्र लिहिलें वीर मॅझिनीचें. १२०**

आपल्या देशाचा मान ज्यांनीं वाढविला अशा वीर पुरुषांची लहान मोठ्यांना माहिती असली पाहिजे; आणि क्रांति करावयाचें स्फुरण चढावें म्हणून विनायकांनीं वीर मॅझिनीचें चरित्र लिहिलें.

**प्रथम अग्निच्या फुल्या पडाव्या क्रांतिमंडळांत**
**सहजपणें मग त्यांतुनि फुलतो त्वेष समाजांत.**
**त्वेषांतुनि गडगडाट होतिल कर्कश तोफांचे**
**होतें मन तेव्हांच शांत श्रीदेवि भवानीचें! १२१**

प्रथम क्रांतिमंडळांत अग्नीच्या फुल्या पडाव्या म्हणजे क्रांतिमंडळाचें कार्य सुरू झालें कीं सहजपणें समाजांत त्वेष चढतो. आणि त्या त्वेषांतून तोफांचे कर्कष गडगडाट होतात तेव्हांच श्रीदेवी भवानीचें मन शांत होतें.

**ग्रंथ जाहला प्रसिद्ध, गेले तरुण थरारून**
**स्वातंत्र्याचीं महान तत्त्वें त्यांतिल वाचून;**
**केलिं मुखोद्गत कित्येकांनीं पानेंच्या पानें;**
**ग्रंथ पालखींतूनि मिरवला कुठें समाजानें! १२२**

सावरकरांनीं लिहिलेलें वीर मॅझनीचें चरित्र प्रसिद्ध झालें. त्या ग्रंथांतील स्वातंत्र्याविषयीची महान् तत्त्वें वाचून तरुण थरारून गेले. त्या ग्रंथाचीं पानेच्या पानें कित्येकांनीं मुखोद्गत केलीं. कोठें तर त्या ग्रंथाची लोकांनीं पालखींतून मिरवणूक काढली.

**परवशतेचें जोखड कैसें फेकुनि द्यायाचें**
**विनायकानें केलें दर्शन स्पष्टपणें त्याचें.**
**म्हणे विनायक नीति असावी राज्य करायाला.**
**जसा असावा गंध मनोहर निर्मल पुष्पाला. १२३**

परसत्तेचें जोखड कसें फेकून द्यावयाचें याचें स्पष्ट दर्शन विनायकांनीं या ग्रंथांत केलें आहे. निर्मल फुलाला जसा मनोहर सुगंध असावा त्याप्रमाणें राजकारणाला नीति असावी.

**स्वतंत्र करणें आणि राखणें प्रभुत्व देशाचें**
**हें पहिलें कर्तव्य खरोखर लोकसमाजाचें;**
**असते ज्या राष्ट्रांत मनाई सत्य वदायाची**
**तिथें स्थापना अवश्य असते गुप्तमंडळाची !! १२४**

आपला देश स्वतंत्र करणें आणि आपल्या देशाचा मोठेपणा राखणें हें समाजाचें खरोखर कर्तव्य असतें. खरें बोलण्याची ज्या राष्ट्रांत मनाई असते त्या राष्ट्रांत गुप्तमंडळें स्थापणें अत्यंत आवश्यक आहे.

**कार्य दुहेरी असतें ऐशा गुप्त मंडळाचें**
**तयार करणें मनें नि देणें शिक्षण युद्धाचें.**
**तयार होतिल मनें कि होइल सहाय्य युद्धास**
**आणि मनाचा विकास होइल समर जहाल्यास. १२५**

गुप्त मंडळाचें दुहेरी काम असतें. लोकांचीं मनें तयार करणें हें एक काम आणि युद्धाचें शिक्षण देणें हें दुसरें काम. लोकांचीं मनें एकदां क्रांति करावयास तयार झालीं कीं त्यांची युद्धास मदत होते. आणि युद्ध सुरू झालें म्हणजे मनाचा विकास होतो.

अभिनवभारत शाखा स्थापन इथें करायाला
सहाय्य होइल कुणाकुणाचें या उद्योगाला.
कोण आपला मित्र नि होइल सहकारी भावी
बघूनि हें घ्यावयास गेला तो गांवोगांवीं. १२६

लंडन शहरांत अभिनव भारत या गुप्त संघटणेची शाखा स्थापन करण्यासाठीं कोणाकोणाची आपणांस मदत होईल, कोणाचा स्नेह लाभेल आणि कोणाचें सहकार्य लाभेल हें एकदां बघावें म्हणून सावरकर गांवोगावीं गेले.

प्रजेंत होता क्षोभ वाढला अनेक राष्ट्रांत
वाचित होते सावरकर ते छापिल वृत्तान्त.
कुणी म्हणे प्रतिकार करावा सत्याग्रह करुनी;
कुणी म्हणे प्रतिकार करावा अपक्ष मार्गांनीं. १२७

अनेक राष्ट्रांतील प्रजेंत क्षोभ वाढत होता, आणि त्यावद्दलचे छापील वृत्तान्त सावरकरांच्या वाचनांत येत. सत्याग्रह करून सरकारचा प्रतिकार करावा असें कोणी म्हणत. अपक्ष मार्गांनीं प्रतिकार करावा असें कोणी म्हणे.

समृद्ध शेतें जशीं लुटावीं रानपाखरांनीं,
वृक्ष बहरले जसे खुडावे जंगलपक्षांनीं,
घरें नि वाडे झाडुनि न्यावे अवचित चोरांनीं
लुटूनि नेला तसा देश हा इंग्रज लोकांनीं. १२८

रानपाखरांनीं समृद्ध शेतें लुटावीं, जंगली पक्षांनीं बहरलेले वृक्ष जसे खुडून टाकावेत, चोरांनीं घरें आणि वाडे झाडून न्यावेत, तसा इंग्रज लोकांनीं भारतदेश लुटून नेला होता.

**असह्य झालें प्रजेस ओझें कर भरतां भरतां**
**कसें भरावें पोट; लागली जनतेला चिंता.**
**जनावरांना दुःख सांगतां येत जसें नाहीं**
**पराधीन काळांत बोलतां येत कुणा नाहीं ! १२९**

करांचें ओझें प्रजेला असह्य झालें. पोट कसें भरावें याची प्रजेला चिंता वाटूं लागली. ज्याप्रमाणें जनावरांना आपलें दुःख सांगतां येत नाहीं त्याप्रमाणें पराधीन काळांत प्रजेला आपलीं गाऱ्हाणीं बोलून दाखवितां येत नाहींत.

**वसन्त काळीं नाहिं गात जो कोकिळ तो कसला !**
**पैलु पाडले तरी न चमके हिरा कसा असला !!**
**रसिक जनांना डोलवी न जो तो गवई कसला !**
**स्वतंत्र नाहीं सुराज्य नाहीं देश असा कसला ! १३०**

वसंत ऋतूंत ज्याला कंठ फुटत नाहीं तो कोकिळ कसला. ! पैलू पाडले तरी चमकत नाहीं तो हिरा कसला. ! रसिकांना जो डुलावयास लावत नाहीं तो गवई कसला ? स्वराज्य नाहीं, स्वातंत्र्य नाहीं तो देश कसला ?

**मातृभूमिला रिपुरुधिराचें घालुनिया स्नान,**
**स्वराज्य रविला रिपुरुधिराचें अर्घ्य समर्पून,**
**भारतभूचा जय भगवाध्वज ध्वज वर चढवूं या**
**मयूरसिंहासनीं मायभू भारत बसवूं या. १३१**

मातृभूमीला शत्रूच्या रक्ताचें स्नान घालून आणि स्वराज्य सूर्याला शत्रूच्या रुधिराचें अर्घ्य समर्पून भारत देशाचा जय भगवाध्वज आपण लावूं या आणि मायभूमीला मयूरसिंहासनावर वसवूं या !

अप्रत्यक्ष प्रतिकाराच्या गोष्टि करी कोणी,
कुणी म्हणाले स्वराज्य मिळतें सत्याग्रह करुनी;
रुधिर दिल्याविण आणि घेतल्यावीण सांगतों मी
प्रसन्न नाहीं होत कुणाला स्वतंत्रता लक्ष्मी. १३२

अप्रत्यक्ष प्रतिकाराच्या कोणी गोष्टी करी, तर कोणी सत्याग्रह करून स्वराज्य मिळतें असें म्हणें. पण आपलें रक्त सांडल्याखेरीज आणि शत्रूचे प्राण घेतल्याखेरीज स्वातंत्र्यलक्ष्मी कोणालाही प्रसन्न होत नाहीं असें मी सांगतों.

सभा संपली शिवरायाच्या जयजयकारांत
स्थापन झालें 'अभिनव' भारत भारतभवनांत !
विनायकाच्या नेतृत्वाचा वाटुनि अभिमान
विनायकाचे शिष्य जाहले नवे नवे तरुण. १३३

शिवाजी महाराजांच्या जयजयकारांत सभा संपली, भारतभवनांत अभिनव भारत या गुप्त संघटनेची शाखा स्थापन करण्यांत आली. विनायकाच्या नेतृत्वाच्या अभिमानानें नवे नवे तरुण विनायकराव सावरकरांचे स्नेही झाले.

* * *

मरण आपुलें तुडवित उडवित चला पुढें जाऊं
अमर होउनी स्वातंत्र्याचीं अमरपदें गाऊं.

# सर्ग सहावा

## (२६) सावरकरांची नेतेपदीं निवड

ज्या देशाला धर्म नाहिं तो देश तरी कसला!!
ज्या धर्माला देश नाहिं तो धर्म तरी कसला!

*　　*　　*

सावरकरजी राहु लागले लंडन शहरांत,
जमूं लागले तरुण भारती भारत भवनांत.
जसा काय गडगडाट व्हावा ज्वलंत भूमींत
वाद कडाडुनि होऊं लागले भारत भवनांत! १

सावरकर लंडन शहरांत राहूं लागले. भारतभवनांत भारतीय तरुण मंडळी जमूं लागली. जसा भूकंपाचा गडगडाट होतो तसे भारत-भवनांत कडाडून वाद होऊं लागले.

बघून डोळ्यांतील तेज अन् तेज मुखावरचें
आणि भाषणांतील ऐकुनी कोटिक्रम त्याचे,
आणि ऐकुनी राजनीतिचे अक्षर सिद्धान्त,
कित्येकांनीं सहज जोडले त्याजपुढें हात. २

डोळ्यांतील तेज आणि मुखावरील कांति पाहून आणि भाषणांतील त्याचे कोटिक्रम ऐकून, त्याचप्रमाणें राजनीतीविषयक त्याचें अक्षर सिद्धान्त ऐकून त्याच्यापुढें कित्येकांनीं हात जोडले.

**विनायकाच्या वक्तृत्वांतिल गोड सुगंधांत**
**बहरुनि गेलें भवनभारती लंडन शहरांत.**
**सुगंध लहरी त्याच पोंचल्या हेर कचेरीला**
**विशेष नाहीं त्यांत वाटलें परंतु कोणाला !** ३

लंडन शहरांतील भारतभवन विनायकाच्या वक्तृत्वांतील गोड सुगंधानें भरून गेलें होतें. तो सुगंध हेर कचेरीपर्यंत पोहोंचला होता. पण हेर कचेरीं ि.ल कोणालाही त्यांत विशेष असें वाटलें नाहीं.

**प.याखालीं जळतें कोठें तें न बघायाची**
**अशीच असतीं दुष्ट लक्षणें मदांध सत्तेचीं.**
**लोक काय करणार वांकडें भ्रम तिजला असतो;**
**राजकीय सत्तेंत विशेषें दुर्गुण हा दिसतो.** ४

आपल्या पायाखालीं काय जळत आहे इकडे पहावयाचें नाहीं अशींच मदांधसत्तेचीं दुष्ट लक्षणें असतात. लोक आपलें वांकडें काय करणार असा तिला भ्रम असतो. हा दुर्गुण प्रामुख्यानें राजकीय सत्तेंत दिसतो.

**नाहिं राज्य सोडणार कोणी अर्ज विनंत्यांनीं !**
**नाहिं कुणी सोडणार सत्ता हट्टाग्रह धरुनी !**
**हटवादानें दुर्बलतेला तेज जरी चढतें**
**मस्त बळाला बळच तेवढें आवरुनी धरतें.** ५

अर्ज विनंत्यांनीं कोणी राज्य सोडणार नाहीं, हट्टाग्रहानें सुद्धां आपल्या हातची सत्ता कोणी सोडणार नाहीं. सत्याग्रहानें आणि हट्टाग्रहानें आपल्यामधील दुर्बळतेला तेज चढतें म्हणजे दुर्बलता जरी दिसून येत नाहीं तरी मस्त बळाला बळच आवरून धरतें.

**राष्ट्राराष्ट्रांतील वाद वा प्रश्न गुलामांचे**
**दया बुद्धिनें नाहिं कुणाच्या कधीं सुटायाचे !**
**न्यायबुद्धि ही कधींच नसते राज्यपिपासेला,**
**तोफेला भिडवील तोफ जो न्याय मिळे त्याला. ६**

राष्ट्राराष्ट्रांतील वाद किंवा पराजितांचे प्रश्न कोणाच्या दयाबुद्धीनें कधीं सुटत नाहींत. राज्य पिपासेला न्यायबुद्धि कधीं असत नाहीं जो तोफेला तोफ भिडवील त्यालाच न्याय मिळतो.

**अद्यावत जर शस्त्रें असतिल जर कांहीं हातीं,**
**असतिल सैनिक जर असलेली मर्दाची छाती,**
**तरी कुणी वाचील चिटोरी अर्ज विनंत्यांची;**
**तरीच भाषा ऐकुनि घेइल कुणी निषेधाची. ७**

अद्यावत पद्धतीचीं जर आपल्याजवळ शस्त्रें असतील, आणि मर्दाची छाती असलेलें सैन्य जर आपल्याजवळ असेल तरच अर्ज विनंत्यांचीं चिटोरीं कोणी वाचतील आणि निषेधाची भाषा कोणी ऐकून घेईल.

**परवशतेची चीड पाहिजे अंगि भिनायाला**
**सूड बुद्धिची धुंदि चढाया हवी स्वदेशाला !**
**प्रतिकारांतुनि वाढतात हे सद्‌गुण लोकांत**
**प्रतिकाराला परी लागतो पोलादी हात. ८**

परवशतेची चीड अंगांत सणसणली पाहिजे, स्वदेशाला सूड बुद्धीची धुंदी चढली पाहिजे. समाजामध्यें प्रतिकाराच्या प्रवृत्तींतून हे सद्‌गुण वाढतात. परंतु प्रतिकाराला पोलादी हात असावा लागतो.

**देशोदेशीं वाढत होता विरोध लोकांचा,**
**व्रण वाढावा तसा वाढला द्वेषहि राज्याचा.**
**उठाव होते लहानमोठे होत कुठें कोठें**
**भडकत होतें सरकाराचें पित्त कधीं कोठें. ९**

देशादेशांतून लोकांचा निषेध वाढत होता. आणि व्रण वाढावा तसा राज्याबद्दलचा द्वेषही वाढत होता. कोठें कोठें लहानमोठें लोकांचे उठाव होत होते, तर कोठें कोठें कधीं कधीं सरकारचें पित्तही भडकत होतें.

**परिस्थितीची होई चर्चा भारतभवनांत**
**सावरकरजी बोलत होते प्रमुखपणें त्यांत.**
**अखेर ठरलें विनायकाच्या नेतृत्वाखालीं**
**काम करावें गुप्तपणानें या अवघड कालीं. १०**

अशा परिस्थितीची भारतभवनांत चर्चा होई. तेव्हां त्यांत सावरकरजी भाग घेत. अखेर अशा अवघड परिस्थितींत विनायकांच्या नेतृत्वाखालीं गुप्त चळवळी कराव्यात असें निश्चित झालें.

**कुणी करावें काम कोणतें आणि कधीं कोठें,**
**प्रचार कसला कुणी करावा आणि कुठें कोठें;**
**विनायकानें निश्चित केला कार्यक्रम पुढचा.**
**कुणी सभासद शब्द पाडिना खालिं कधीं त्याचा. ११**

कुणी करावें, कोणतें काम करावें, केव्हां करावें, कोठें काय करावें कोणी कसला प्रचार करावा आणि तोही कोठें कोठें याचा विनायकराव सावरकरांनीं पुढचा कार्यक्रम निश्चित केला. कोणीही सभासद त्यांचा शब्द खाली पाडीत नसे.

**व्यवहाराला नेतृत्वाविण यश केव्हां नसतें;**
**नाहिं जिथें नेतृत्व शांतता तिथें कधीं नसते.**
**असो कुठेंही लोकशाहि वा हुकमत कोणाची**
**त्यास लागते गरज कुणाच्या तरि नेतृत्वाची. १२**

नेतृत्वाशिवाय व्यवहाराला केव्हांही यश येत नाहीं. जेथें नेतृत्व नसतें तेथें शांतता नसते. कोठेंही लोकशाही असो किंवा हुकूमशाही असो कोणाच्यातरी नेतृत्वाची आवश्यकता असते.

**सावरकरजी एक जाहले स्फूर्तीचें स्थान**
**तरुणांमध्यें वाढुं लागला त्यांचा अभिमान.**
**जसे लोक येतात हस्तिनापूर पहायाला**
**येउं लागले जागजागचे जन भेटायाला. १३**

सावरकरजी स्फूर्तिस्थान झाले होते. तरुणांत त्यांच्याबद्दलचा अभिमान वाढत होता. दिल्ली पहावयाला जसे लोक येतात तसे सावरकरांना लोक भेटावयास येत असत.

**गुप्त बैठकी भरूं लागल्या भारतभवनांत**
**अभिनवभारत गर्जुं लागले भारत देशांत.**
**प्रांताप्रांतामधील कांहीं तरूण नेकीचे,**
**गुप्तपणें जाहले सभासद क्रांतिमंडळाचे. १४**

भारतभवनांत " अभिनव भारताच्या " गुप्त सभा होऊं लागल्या. हिंदुस्थानांत अभिनव भारत सर्वतोमुखीं झालें. भारतांतील प्रांताप्रांतांतून आलेले नेकीचे तरुण क्रांतिमंडळाचे गुप्त सभासद झाले.

**बंगभंग केल्यानें झाले लोक पुन्हां एक**
**चिडून गेले तेव्हांपासुनि विलायती लोक.**
**उलट वाढला धीटपणा पण लोकपुढाऱ्यांचा**
**आणि लागला विरोध वाढूं नोकरशाहीचा. १५**

वंगभंगामुळें सर्व भारतीय पुन्हां एक झाले. त्यामुळें विलायतेंतील इंग्रज चिडून गेले होते. याच्या उलट लोकपुढाऱ्यांचा धीटपणा वाढत होता. त्याचबरोबर नोकरशाहीचा विरोधही वाढू लागला.

**विशेषता बंगाल आणि पंजाब अशा प्रांतीं**
**करीत होती नोकरशाही हळूहळूं मस्ती.**
**पोंचत होत्या अनेक वार्ता भारतभवनांत;**
**ठरवित होते प्रतिकाराचे सावरकर बेत. १६**

बंगाल आणि पंजाब या प्रांतांत प्रामुख्यानें नोकरशाहीची मस्ती वाढत होती. त्याविषयीं अनेक बातम्या भारतभवनांत पोंहोचत. त्या ऐकून प्रतिकाराचे बेत सावरकर ठरवीत.

**जुलमाचा प्रतिकार पाहिजे केला शस्त्रांनीं;**
**सुबुद्धि नाहीं सुचावयाची अर्ज विनंत्यांनीं.**
**विषसत्तेचें उतरायाला शस्त्रांचें पाणी**
**दाखवावया प्रथम पाहिजे क्रांतिकारकांनीं. १७**

जुलमाचा प्रतिकार शस्त्रांनीं केला पाहिजे. अर्जविनंत्यांनीं सुबुद्धि सुचावयाची नाहीं. सत्तेचें विष उतरावयासाठीं क्रांतिकारकांनीं आपल्या शस्त्राचें पाणी दाखवलें पाहिजे.

**पर्वा नसते अशा मुलांना जगण्या मरण्याची**
**देशभक्तिनें धुंद जाहली मनवृत्ती ज्यांची.**
**देशभक्तिचें वेड लागलें एकवार ज्यांना**
**जगांत नाहीं शक्ति अशी जी आवरते त्यांना. १८**

देशभक्तीनें ज्यांची मनोवृत्ति धुंद झाली आहे अशा मुलांना जगण्याची आणि मरणाची पर्वा नसते. देशभक्तीचें वेड ज्याला एकदां लागलें त्याला आवरील अशी जगांत कोणतीही शक्ति नाहीं.

**क्रांती वाचुनि देश नाहिं हा स्वतंत्र व्हायाचा,**
**शस्त्रांवांचुनि नाहिं क्रांतिला विजय मिळायाचा.**
**म्हणून ठरलें प्रथम घ्यायचें शिक्षण शस्त्रांचें**
**शस्त्रांसाठीं देशोदेशीं यत्न करायाचे. १९**

क्रांति केल्याशिवाय हिंदुस्थान स्वतंत्र होणार नाहीं. शस्त्रांवाचून क्रांतीला विजय मिळावयाचा नाहीं. म्हणून शस्त्रांचें शिक्षण घ्यावयाचें आणि शस्त्रांसाठीं देशोदेशीं प्रयत्न करावयाचे ठरलें.

**सावरकरजी स्वतांच गेले परीस शहरास,**
**बघूं म्हणाले साह्य कुणाचें होइल कार्यास.**
**देशदेशिच्या गुप्तमंडळांतील पुढाऱ्यांनीं**
**सहर्ष केलें विनायकाचें स्वागत सर्वांनीं. २०**

परीस शहरास म्हणजे पॅरिसला सावरकर स्वतःच गेले. आपल्या कार्याला कोण साहाय्य करतो तें तरी बघूं असें ते म्हणाले. देशादेशांतील गुप्तमंडळाच्या पॅरिसमधील सभासदांनीं विनायकाचें सहर्ष स्वागत केलें.

**लेनिन आणि स्टॅलिन यांच्या गुप्त बैठकींत**
**विनायकाशीं चर्चा होउनि ठरले संकेत.**
**आणि तयांनीं दिली पुस्तिका बॉम्ब करायाची;**
**विनायकानें करुनि प्रतिप्रत धाडियली तीची.** २१

लेनिन आणि स्टॅलिन यांच्या बरोबर गुप्तबैठकींत विनायकांनीं चर्चा केली व कांहीं संकेत ठरले. आणि बॉम्ब तयार करण्याची कृति ज्यांत दिली आहे अशी एक पुस्तिका सावरकरांना मिळाली. विनायकानें तिच्या प्रती हिंदुस्थानांत धाडून दिल्या.

**तोंच कडाडुनि आली वार्ता त्याच सुमारास,**
**हद्दपारिची शिक्षा झाली प्रिय लालाजीस.**
**खटले भरती शिक्षा करती देशसेवकांना**
**हाल तयांचे करती, होती छळ त्यांचे नाना.** २२

याच सुमारास दे. भ. लाला लजपतराय यांना हिंदुस्थान सरकारनें हद्दपार केल्याची हिंदुस्थानांतून बातमी आली. त्याचप्रमाणें देशभक्तांवर खटले भरून त्यांना शिक्षा ठोठावण्यांत येत आहेत व त्यांचे हाल हाल करण्यांत येत आहेत अशा त्यांच्या छळाविषयीच्याही बातम्या कडाडून आल्या.

**सभा घेतली विनायकानें मित्रमंडळाची**
**क्रुद्ध जाहली होति मंडळी क्रांतिमंडळाची !**
**अनेक केल्या त्यांत सूचना अनेक तरुणांनीं**
**विचार केला शांतपणानें त्यांचा नेत्यांनीं.** २३

विनायकानें आपल्या मित्रांची बैठक घेतली. क्रांतिमंडळांचे हे सभासद अगदीं संतापून गेले होते. त्या बैठकींतील सभासद तरुणांनीं अनेक सूचना केल्या. त्यांचा सावरकरांनीं शांतपणें विचार केला.

**सर्वेच उठले एक सभासद भडक विचारांचे**
**आणि म्हणाले पसंत नाहीं काम मला तुमचें !**
**करूं नका भाषणें रावणी उगाच रागांत;**
**योजा भाषा सौम्य नि कळवा दोनच शब्दांत. २४**

बैठकींत ज्वलज्जहाल वृत्तीचे एक सभासद उठले आणि तुमचें हें काम मला कांहीं पसंत नाहीं. रागाच्या भरांत उगाच रावणी भाषणें करूं नका, सोप्या भाषेंत आणि दोनच शब्दांत सरकारला काय तें कळवा असें ते म्हणाले.

**सरकारानें नाहि सोडलें जर लालाजीस**
**बॉम्ब फेकुनी ठार करिन मी मुख्यप्रधानास !**
**क्षणभर हंसला आणि तयाची पाठ थोपटूनी**
**विनायकानें त्यास बसविले कर त्याचा धरुनी २५**

लालाजींवरील हद्दपारीचा हुकूम जर सरकारनें रद्द केला नाहीं तर मुख्यप्रधानावर मी बॉंब फेकणार आहे असेंही तो म्हणाला. विनायकांना त्याचें क्षणभर हसूं आलें, त्यांनीं त्याची पाठ थोपटली आणि त्याचा हात धरून त्याला खालीं बसविलें.

**अव्यवहारी अन् अविवेकी अशा सुमित्राला**
**आवरुनी घ्यावया लागतें सभेंत नेत्याला.**
**उत्साहाच्या भरांत कांहीं करतो तोऱ्यानें**
**भलें बुरें हें पहावयाचें असतें नेत्यानें २६**

अव्यवहारी आणि अविवेकी अशा सन्मित्राला सभेंत आवरून घ्यावें लागतें. उत्साहाच्या भरांत आणि आपल्याच तोऱ्यांत तो कांहींतरी करतो. नेत्याला बरेंवाईट पहावयाचें असतें.

**उत्साहाच्या भरांत होते तरुणांना घाई;**
**उगाच घाई करूनि कांहीं जमायचें नाहीं.**
**कुणी आंधळे झाले, झाले लुळे कुणी कोणी**
**देवाजीनें उगाच केली घाइ अशी म्हणुनी ! २७**

उत्साहाच्या भरांत तरुणांना घाई होते. उगाच घाई करून कांहीं जमत नाहीं. देवाजीनें घाई केली म्हणून कोणी आंधळे झाले तर कोणी कोणी लुळे आहेत.

**पूर्ण वाचल्यावीण बोलणें व्यर्थ जसें असतें,**
**पूर्ण जाणल्यावीण उसळणें तसें बरें नसतें.**
**पिकल्यावांचुनि गोड फळाला गोडपणा नसतो.**
**विचार केल्याविण विद्येला सुज्ञपणा नसतो. २८**

पूर्ण वाचल्याखेरीज आपलें मत देणें व्यर्थ असतें. त्याचप्रमाणें पूर्णपणें सर्व समजून घेतल्याखेरीज रागावणेंही बरें नाहीं. पिकल्याखेरीज फळाला गोडपणा येत नाहीं. विचार केल्याखेरीज ज्ञानाचा उजेड पडत नाहीं.

**देशभक्तिनें खरें बोलणें जिथें गुन्हा असतो,**
**नृपनिष्ठांच्या लाचारीला अंत तिथें नसतो.**
**पदोपदीं अपमान लागतो सहन करायाला.**
**आज्ञा होइल तसें लागतें काम करायाला. २९**

देशावरील प्रेमामुळें (सरकारविरुद्ध) खरें बोलणें हा जिथें गुन्हा असतो तिथे राजापुढें किती लाचारी करावयाची याला अंत असत नाहीं. पावलों-पावलीं अपमान सहन करावा लागतो आणि आज्ञा होईल तसेंच काम करावयास लागतें.

**शत्रूचें बळ बलिष्ठ असतें अनेक दृष्टींनीं**
**जपून केलें काम पाहिजे क्रांतिशिपायांनीं.**
**तत्त्वाची जाहली पाहिजे ओळख लोकांस**
**आपुलेंच हें कार्य पाहिजे कळावया त्यांस. ३०**

अनेक दृष्टींनीं शत्रु हा बलवान असतो. तेव्हां क्रांतीच्या शिपायांना जपून काम करावें लागतें. लोकांना तत्त्वाची ओळख झाली पाहिजे. हें आपलेंच काम आहे हें त्यांना कळलें पाहिजे.

**लोकांसाठीं क्रांती असते जरी करायाची**
**क्रांति आणि ती असते लोकानींच करायाची.**
**करावया पाहिजे तयारी अनेक मार्गांनीं**
**आणि देविला दिले पाहिजे बळी अनेकांनीं. ३१**

लोकांसाठीं क्रांति असते आणि ती लोकांनीं करावयाची असते. त्यासाठीं अनेक मार्गांनीं तयारी करावी लागते आणि देवीला अनेकांनीं बळी द्यावे लागतात.

**समजावुनि पाहिजे घ्यावया महत्त्व कार्याचें**
**प्रेम वाटलें त्यांस पाहिजे सशस्त्र क्रांतीचें.**
**उफाळुनी यावया पाहिजे दिमाख लोकांचा.**
**धरावया ध्वज हवा तयांनीं सशस्त्रक्रांतीचा. ३२**

कामाचें महत्त्व समजून घेतलें पाहिजे. सशस्त्र क्रांतीबद्दल लोकांना प्रेम वाटलें पाहिजे. लोकांचा दिमाख उफाळून यावयास पाहिजे. आणि सशस्त्र क्रांतीचा ध्वज त्यांनीं उचलून धरला पाहिजे.

म्हणुनि करूं या प्रथम तयारी हिंदुस्थानांत
आणि दाखवूं सरकाराला मर्दाचा हात.
किती वाढतो प्रथम बघूं या क्षोभ समाजाचा
प्रचार करुं या तोंवर करु या प्रसार शस्त्रांचा. ३३

म्हणून हिंदुस्थानांत तयारी करून सरकारला मर्दाची मर्दुमकी आपण दाखवू. समाजांत सरकारविरुद्ध क्षोभ किती वाढतो तें आपण प्रथम पाहूं या. क्रांतीचा प्रचार करुया आणि तोंवर शस्त्रांचाही प्रसार वाढवू.

एकमुखानें दिली मान्यता क्रांतिमंडळानें
रान उठवलें विनायकानें युक्ति प्रयुक्तीनें
देशोदेशीं गाजुं लागलें नांव भारताचें
गाजुं लागलें नांव स्वदेशीं सावरकरजींचें ! ३४

सावरकर यांच्या या विचारास क्रांतिमंडळानें एकमतानें मान्यता दिली. त्यानंतर युक्तिप्रयुक्ति करून विनायकांनीं रान उठवलें. देशोदेशीं भारताचें नांव गाजूं लागलें. तसेंच स्वदेशांतही सावरकरांचें नांव लोक घेऊं लागले.

* * *

ज्या देशाला धर्म नाहिं तो देश तरी कसला !
ज्या धर्माला देश नाहिं तो धर्म तरी कसला !

## (२७) बडोदा नरेशांचें आश्वासन

घेउं लागले तरूण शिक्षण बॉम्ब करायाचें
भारतभवनामधें वाढलें प्रेम तयावरचें
दिसूं लागलीं नवीं पिस्तुलें ज्याच्यात्याच्याशीं
सशस्त्र झाले तरुण कुणाशीं हात करायासी. ३५

बाँब तयार करण्याचें शिक्षण तरुण मुलें घेऊं लागलीं. भारतभवनामध्येंही बाँब तयार करण्याचा प्रयत्न होऊं लागला. ज्याच्या त्याच्याशीं पिस्तुलें दिसूं लागलीं. कोणाशीही दोन हात करण्यास तरुणांची आतां तयारी होती.

**जसें एक वेणींत असावें फूल गुलाबाचें**
**तसें एक कमरेस असावें पिस्तुल शूराचे.**
**शोभुनि दिसते जशी नम्रता विद्वांनाभवतीं**
**तशी शोभते तरुण मुलांना मर्दाची मस्ती. ३६**

वेणींत गुलाबाचें एक फूल असावें तसें शूराच्या कमरेला एक पिस्तूल असावें. विद्वानांना जशी नम्रता शोभून दिसतें तशी तरुण मुलांना मर्दाची मस्ती शोभून दिसते.

**कसा द्वेष वाढेल समाजामधें इंग्रजाचा,**
**कसा दीप उजळेल अंतरीं गतस्वराज्याचा,**
**आणि राग येईल कसा निःशस्त्र जगायाचा,**
**सावरकरजी करीत होते विचार केव्हांचा. ३७**

इंग्रजांबद्दल समाजामध्यें द्वेष कसा वाढेल, गेलेल्या स्वराज्याचा दिवा अंतरांत कसा प्रकाशू लागेल म्हणजे स्वराज्य मिळवण्याची ईर्षा लोकांत कशी उत्पन्न होईल आणि शस्त्रांखेरीज जगण्याचा राग लोकांना कसा येईल याचा विचार सावरकर केव्हांपासून करीत होते.

**अनेक वेळां यावर होई चर्चा भवनांत,**
**क्षोभ सभेचा करीत होते सावरकर शांत.**
**अविचारानें करूं नये निर्धार कशाचाही;**
**अविवेकानें यश कोणाला मिळायचें नाहीं. ३८**

यावर अनेक वेळां भारतभवनांत चर्चा झाली. त्या वेळीं सभेंतून उसळणारा राग सावरकर शांत करीत. अविचारानें कशाचाही निर्धार करूं नये. अविवेकानें वागल्यास कोणालाही यश मिळत नाहीं.

युद्धापेक्षां प्रचार असतो कठीण युद्धाचा,
उठाव करणें कठीण असतें लोकसमाजाचा;
राज्यक्रांतीसाठिं लागते सुसाथ सैन्याची
आणि लागते सहानुभूती श्रीमन् धनिकांची. ३९

प्रत्यक्ष युद्धापेक्षां युद्धाचा प्रचार करणें कठीण असतें. लोक उठवणें कठीण असतें. राज्यक्रांति करावयाची तर सैन्याचें चांगलें सहकार्य लाभलें पाहिजे. त्याचप्रमाणें श्रीमंत धनिकांच्या सहानुभूतीचीही आवश्यकता असते.

सैन्य-सहाय्यावांचुनि क्रांत्या निष्फळ होतात;
द्रव्यावांचुनि दिमाख सगळे अडून पडतात.
हेंच नेमकें कमी जाहलें सत्तावन सालीं;
सैन्य उलटलें परंतु नव्हता त्यास कुणी वाली! ४०

सैन्याच्या मदतीखेरीज क्रांति यशस्वी होत नाहीं. द्रव्याच्या अभावी सर्व दिमाख अडून पडतात. सत्तावनच्या बंडांत हेंच नेमकें कमी पडलें. सैन्य उलटलें परंतु त्यांना खंबीर नेता लाभला नाहीं.

म्हणें विनायक सहकाऱ्यांना करूं नका घाई,
अशा प्रसंगीं उगाच करणें घाइ बरें नाहीं.
आणि ठरविलें विनायकानें नृपास भेटावें,
हिंदुराज राजेश्वर यांचें सहाय्य मागावें. ४१

घाई करूं नका असें विनायकराव आपल्या सहकाऱ्यांना सांगत. अशा प्रसंगांत उगाच घाई करणें बरोबर नसतें. राजे रजवाड्यांना भेटावें व त्यांच्याकडून साहाय्याची अपेक्षा करावी असें सावरकरांनीं ठरविलें.

**आले होते निमित्त काढुनि गोड विसाव्याचें**
**महाराज श्रीमंत सयाजीराव बडोद्याचे.**
**गुप्तपणें गांठलें त्यांना क्रांतिकारकांनीं**
**सन्मानानें या या म्हटलें सयाजिरावांनीं. ४२**

बडोद्याचे श्रीमंत सयाजीरावमहाराज गोड विश्रांतीचे निमित्तानें लंडनमध्यें आले होते. क्रांतिकारकांनीं त्यांची गुप्त भेट घेतली. 'या या' असें सन्मानपूर्वक श्रीमंत सयाजीरावांनीं त्यांचें स्वागत केलें.

**स्वागत बघुनी कळूनि येतें अगत्य भेटीचें**
**सुस्वागत हें सुचिह्न असतें पुढिल भविष्याचें.**
**कसा काय अभ्यास चालला सावरकरजींचा**
**प्रथमच केला प्रश्न नृपानें हा आपुलकीचा. ४३**

स्वागत कसें झालें यावरून भेटीचें अगत्य ठरवता येतें. भेटीचा शेवट कसा व्हावयाचा याचें सुस्वागत हें सुचिह्न असतें. सावरकर यांचा अभ्यास कसा काय चालला आहे असें महाराजांनीं आपलेपणानें विचारलें.

**कौतुक होतें त्यांस फार श्रीसावरकरजींचें**
**अभीष्ट होतें चिंतित त्यांना राव बडोद्याचे.**
**हा सावरकर महान नेता होइल देशाचा**
**विनायकावर म्हणूनि होता लोभ नरेशांचा. ४४**

सावरकरांचें त्यांना फार कौतुक असे. श्रीमंत महाराज सावरकरांना अभीष्ट चिंतीत. हा सावरकर देशाचा महान् नेता होईल असें त्यांना वाटे. म्हणन महाराजांचा विनायकरावांवर लोभ होता.

**बरीच झाली चर्चा तेव्हां ध्येयधोरणाची;**
**प्रसन्न झाली गोड प्रकृती सयाजिरावांची.**
**सोडिन मी संस्थान आपुलें भारतभूसाठीं**
**सहाय्य देइन भारतभूच्या स्वातंत्र्यासाठीं. ४५**

या भेटींत अभिनव भारताच्या ध्येयधोरणाची बरीच चर्चा झाली. या चर्चेनें श्रीमंत सयाजीराव महाराज प्रसन्न झालेले दिसले. भारताच्या स्वातंत्र्यासाठीं मी संस्थान सोडीन आणि स्वातंत्र्य मिळविण्याच्या कामांत मी साहाय्य करीन.

**नकोत राजे हें मत तुमचें मलाहि आवडतें**
**भेटा मज भारतांत पाहूं काय पुढें होतें !**
**सांगुनि त्याला निरोपिलें श्रीसयाजिरावांनीं**
**गौरव केला उलट नृपाचा सहर्ष तरुणांनीं. ४६**

संस्थानिक नसावेत हें तुमचें मत मला मान्य आहे. मला भारतांत भेटा. पुढें काय होईल तें पाहूं, असें सांगून श्रीमंत महाराजांनीं क्रांतिकारकांच्या शिष्टमंडळाला निरोप दिला. आणि तरुण क्रांतिकारकांनीं श्रीमंतांचे हे विचार ऐकून त्यांचा गौरव केला.

**जसा गुंफतो कोळी जाळें धाग्याधाग्यानें**
**जोडुं लागले स्नेह विनायक तसे प्रयत्नानें.**
**निरोप गेलें गुप्तपणानें राजस्थानांत;**
**दूत धाडले विनायकानें प्रांतोप्रांतांत. ४७**

कोळी आपलें जाळें एकएक धागा जुळवून जसे तयार करतो. त्याप्रमाणें प्रयत्नपूर्वक सावरकर स्नेही मिळवीत. राजस्थानांतील संस्थानिकांकडे गुप्तपणें सावरकरांनीं निरोप पाठवले. त्याचप्रमाणें प्रांताप्रांतांतून आपले कार्यकर्ते सावरकरांनीं धाडले.

सन अठराशें सत्तावन या मंगल वर्षांत
स्वातंत्र्याचें युद्ध भडकलें झाला आकांत;
बलाढ्य सैन्यापुढें चाललें नाहिं मराठ्यांचें
सहज घेतले परी तयांनीं बळी अनेकांचें ! ४८

सन अठराशें सत्तावन सालीं स्वातंत्र्याचें युद्ध भडकलें आणि मोठा आकांत उडाला. इंग्रजांच्या बलाढ्य सैन्यापुढें मराठ्यांनीं माघार घेतली तरी अनेक इंग्रजांचें त्यांनीं सहज बळी घेतले.

भिऊन असतो सरकाराला जसा गुन्हेगार
भिऊन होतें प्रसंगास त्या इंग्रज सरकार.
या युद्धाला होतिल आतां वर्षें पन्नास,
स्मरण लागलें होउं भारतांतील अनेकांस. ४९

सरकारला गुन्हेगार जसा भिऊन असतो तसे वरील प्रकाराला इंग्रज सरकार भिऊन असे. या युद्धाला आतां पन्नास वर्षें होणार याची भारतांतील अनेकांना आठवण होत होती.

आणि वाटलें पत्रक त्यानें हिंदुस्थानांत ;
इतिहासाची दिली तयानें ओळख पत्रांत.
राज्यक्रांतीसाठिं लागतें साहाय्य सैन्याचें
सैन्यावांचुनि यश क्रांतीला नाहिं मिळायाचें. ५०

सन सत्तावनच्या प्रसंगाबद्दल विनायकरावांनीं पत्रकें छापून आणि तीं वाटून झालेल्या घटनेची लोकांना ओळख करून दिली. राज्यक्रांति करावयाची तर सैन्याचें साहाय्य मिळालें पाहिजे. सैन्य फितूर झाल्याखेरीज क्रांति यशस्वी होत नाहीं.

**आणि आदरांजली वहाया शूर हुतात्म्यांस,**
**आणि कळावा खरा जगाला समग्र इतिहास,**
**पुन्हा पुन्हा चेतवावया ते विचार युद्धाचे**
**विनायकानें पुस्तक लिहिलें त्या इतिहासाचें. ५१**

आणि सत्तावन सालच्या स्वातंत्र्य युद्धांतील हुतात्म्यांना आदरांजली वहावयासाठीं आणि या स्वातंत्र्ययुद्धाचा जगाला खरा इतिहास कळावा म्हणून सावरकरांनीं सत्तावन सालच्या युद्धासंबंधीं इतिहासाचें एक पुस्तक लिहिलें.

**ग्रंथ कशाचा चक्र सुदर्शन तें भगवन्ताचें;**
**समर-वेद तो, दर्शन तें नव भगवद्गीतेचें.**
**म्हणुनि ग्रंथ तो सरकारानें दिसूं दिला नाहीं**
**असा कुठें इतिहास खरोखर कधिं झाला नाहीं! ५२**

तो ग्रंथ कसला, भगवन्ताचें तें सुदर्शन चक्र होतें. तो समरवेद होता, श्रीमद् भगवद्गीतेचें तें नवें दर्शन होतें. म्हणून तो ग्रंथ सरकारनें उजेडांत येऊंच दिला नाहीं. असा प्रकार आजवर कोठें झाला नव्हता.

**जशी मारिलीं कृष्ण भयानें बाळें कंसानें**
**त्यांतलाच हा प्रकार केला नोकरशाहीनें;**
**जसा तरीपण वाढत होता कृष्ण गोकुळांत,**
**तसा ग्रंथ तो खेळत होता हिंदुस्थानांत. ५३**

कृष्णभयानें कंसानें जशी देवकीचीं मुलें मारलीं, तसाच हा प्रकार नोकरशाहीनें केला. तरीसुद्धां गोकुळांत जसा कृष्ण वाढत होता तसा हिंदुस्थानांत हा ग्रंथ फिरत होता.

**हिऱ्यामधें कोहिनूर एकच सर नाहीं दुसरी**
**जगामधें ग्रंथास जोड या नाहि कुठें दुसरी !**
**असा ग्रंथ तो प्रसिद्ध केला प्रयास घेऊनी,**
**त्यांतिल केली किती प्रकरणें पाठ अनेकांनीं! ५४**

हिऱ्यामधें कोहिनूर एकच, त्याला कशाची सर नाहीं. तशी या ग्रंथाला जगामधें कोठें दुसरी जोड नाहीं. असा हा ग्रंथ मोठ्या प्रयत्नानें सावरकरांनीं तो ग्रंथ प्रसिद्ध केला. त्यांतील कितीतरी प्रकरणें अनेकांनीं पाठ केलीं.

**पराक्रमाचा त्याच आणि त्या महान् विजयाचा,**
**अर्धशतस्मृति उत्सव झाला बेत करायाचा.**
**अनेक शहरीं उत्सव झाला हिंदुस्थानांत,**
**खळबळ गेली उडून अवघ्या इंग्रज राज्यांत. ५५**

सत्तावनसालच्या स्वातंत्र्ययुद्धांतील पराक्रमाचा आणि महान् विजयाचा अर्धशत स्मृतिदिन साजरा करण्याचें सावरकरांनीं ठरविलें. हिंदुस्थानांतल्या अनेक शहरांतून सभा झाल्या. त्यामुळें ब्रिटिश साम्राज्यांत खळबळ उडाली.

**विलायतेंतिल भारत जमले भारत भवनांत**
**असा थाट उत्साह पहिला कुणी न जन्मांत.**
**सभेंत झालीं वीर भाषणें वीर गौरवाचीं,**
**विनायकानें दिली माहिती समग्र युद्धाची. ५६**

विलायतेंत त्या वेळीं असणारे हिंदी लोक त्यादिवशीं भारतभवनांत जमले. असा सभेचा थाट पूर्वी कोणी पाहिला नव्हता. शूरांचा गौरव करणारीं स्फूर्तिकारक भाषणें सभेंत झालीं. समग्र युद्धाची माहिती सावरकरांनीं सभेला करून दिली.

**आणि म्हणें त्वेषांत मित्र हो, सन सत्तावनचें**
**तेंच युद्ध आपणांस आहे पुढें लढायाचें.**
**जसा रवीनें अंधकार तो पाहियला नाहीं**
**अपयश हें स्वातंत्र्यरणाला दिसायचें नाहीं. ५७**

आणि सावरकर त्वेषानें म्हणाले, मित्रहो सत्तावन सालीं सुरू झालेलें युद्धच आपणांस पुढेंही चालू ठेवावयाचें आहे. जसा सूर्याला अंधकार ठाऊक नसतो, त्याप्रमाणें स्वातंत्र्ययुद्धाला अपयश कधी दिसावयाचें नाहीं.

**जरी जाहला क्षणिक पराभव क्रांतिकारकांचा,**
**दिसून आला त्वेष आणि उत्साह मराठ्यांचा.**
**ज्ञान जाहलें सामर्थ्याचें स्वदेश बंधूस,**
**दिसून आलें शौर्य आमुचें इंग्रज लोकांस. ५८**

त्या युद्धांतील क्रांतिकारकांचा क्षणैक पराभव झाला असला तरी मराठ्यांचा त्वेष आणि उत्साह चांगलाच दिसून आला. आपल्या देश बंधूंना आपल्यामधील सामर्थ्याची कल्पना आली. इंग्रज लोकांना आमचें शौर्य दिसून आलें.

**स्वातंत्र्याचें युद्ध आणखी यश त्या युद्धाचें**
**असतें नातें त्यांचें जैसे मदन-वसंताचें.**
**स्वातंत्र्याचें युद्ध यशाविण नच थांबायाचें**
**मिळेल जय वा मुक्ति भाग्य हें असतें शूराचें. ५९**

स्वातंत्र्याचें युद्ध आणि त्या युद्धाचें यश यांचा संबंध मदन आणि वसंत यांच्यामधील संबंधासारखा असतो. स्वातंत्र्याचें युद्ध यश संपादन केल्याखेरीज बंदच पडत नाहीं. जय तरी मिळेल किंवा मुक्ति तरी मिळेल असें शूराचें भाग्य असतें.

**दर चौकांतुनि सभा घेतल्या सावरकरजींनीं**
**लंडन गेलें गर्जुनि गाजुनि शिवजयकारांनीं**
**जय जय जय जयकार जाहला शूर हुतात्म्यांचा**
**डळमळला क्षण मुगुट महालीं इंग्रज राजाचा. ६०**

स्वातंत्र्यदिनाच्या स्मृतिदिनासंबंधीं लंडन शहरांतील चौकाचौकांमधून सावरकर यांनीं सभा घेतल्या. शिवाजी महाराजांच्या जयजयकारांनीं लंडन शहर गर्जून गेलें. शूर हुतात्म्यांचा जयजयकार करण्यांत आला. त्या जयजयकारानें राजमहालांतील इंग्रज राजाचा मुकुटही डळमळला.

**थडथडलीं आसनें अचानक पोलिस खात्याचीं;**
**धडधड धडलीं दारें तेव्हां जनदरबाराची;**
**अर्धशतस्मृति उत्सव वार्ता वाचुन ऐकून,**
**कुणाकुणाचीं माथीं गेलीं उगाच भडकून. ६१**

पोलिसखात्यांतील अधिकाऱ्यांच्या खुर्च्या थडथडूं लागल्या. जनदरबाराची म्हणजे पार्लमेंट गृहाचीं दारें धडधडलीं. स्मृतिदिनाच्या वार्ता ऐकून कोणाकोणाचीं माथीं उगाच भडकून गेलीं होतीं.

* * *

**ज्या देशाला धर्म नाहिं तो देश तरी कसला !**
**ज्या धर्माला देश नाहिं तो धर्म तरी कसला ।**

## (२८) साहेबावर लाठीहल्ला

**अभिनव भारत गर्जुं लागलें लंडन शहरांत,**
**होउं लागल्या प्रसिद्ध वार्ता अनेक राष्ट्रांत.**
**जसें नदीचें पात्र वाढतें दर वर्षाकाळीं**
**सरकाराचा वाढत असतो राग अशा वेळीं. ६२**

लंडन शहरांत जिकडे तिकडे अभिनव भारताचें नांव ऐकूं येऊं लागलें. अनेक राष्ट्रांतून या बातम्या प्रसिद्ध होऊं लागल्या. जसे दर वर्षीं पावसाळ्यांत नदीचें पात्र वाढतें तसा सरकारचा रोष अशा प्रसंगीं वाढत असतो.

**वाढूं लागला द्वेष सारखा इंग्रज लोकांचा,**
**करावया अपमान लागले हिंदू तरुणांचा.**
**करूं लागले निंदा इंग्रज शूर मराठ्यांची**
**करूं लागले निंदा कोणी वीर हुतात्म्यांची. ६३**

इंग्रज लोकांच्या मनांतील द्वेष वाढूं लागला. ते हिंदु तरुणांचा अपमान करूं लागले. शूर मराठ्यांची ते नालस्ती करीत तर कोणी वीर हुतात्म्यांची निंदा करीत.

**तयार होते प्राण द्यावया स्वातंत्र्यासाठीं**
**ऐकुनि कां घेतील कुणाच्या ते भलत्या गोष्टी !**
**परंतु नव्हते अतां राहिले जवान पूर्वींचे**
**सरकाराला भिऊन घेतिल ऐकुनि कोणाचें ! ६४**

जे तरुण स्वातंत्र्यासाठीं प्राण देण्यास तयार होते ते का कोणाच्या भलत्या गोष्टी ऐकून घेणार आहेत. सरकारला भिऊन कोणाचें कांहीं ऐकून घेतील असे पूर्वींचे तरुण आतां राहिले नव्हते.

**कुणि निंदले भारतभूच्या शूर हुतात्म्यास**
**धांवुनि होते जात तयाचा प्राणहि घ्यायास;**
**बांध भंगला कीं जोरानें पाणि जसें जातें**
**भय गेलें कीं प्रतिकाराला तेज तसें चढतें. ६५**

भारताच्या शुर हुतात्म्यांची जर कोणी निंदा केली तर त्याचा प्राण घेण्यासाठीं ते धावून जात. बांध फुटला म्हणजे पाणी जसें निघून जातें त्याप्रमाणें प्रतिकाराला तेज चढलें म्हणजे प्रतिकार करावयाचें ठरविलें म्हणजे कोणाची भीति वाटत नाहीं.

**कोणी केला कुठें जरासा तुमचा अपमान**
**खुशाल त्याची धरा जाउनी उघडपणें मान.**
**आजवरीं वागलों भिऊनी इंग्रज लोकांस**
**भय तुमचें वाटुं द्या पुढें या इंग्रज लोकांस. ६६**

तुमचा कोणी जर कोठें अपमान केला तर पुढें होऊन त्याची खुशाल मान धरा. इंग्रजलोकांना आजवर आपण भिऊन वागलों. आता इंग्रजांना तुमचें भय वाटूं द्या.

**विनायकानें दिला इषारा तरूण मित्रांना**
**तसेंच होतें वाटुं लागलें अलीकडे त्यांना.**
**बॉम्ब लागले उडूं भारतामध्यें कुठें कोठें,**
**बंगल्यांतिल तरूण तेव्हां यांत पुढें होते. ६७**

असा इषारा विनायकराव सावरकरांनीं तरुण मित्रांना दिला. आणि तरुणांनाही अलीकडे तसेंच वाटूं लागलें होतें. भारतामध्यें कोठें कोठें बॉंबचे स्फोट होऊं लागले होते. त्यांत बंगाल्यांतील तरुण आघाडीवर असत.

**त्यास करावी इथें मनाई शिक्षण घेण्याची**
**अशी सूचना गेली लिहुनी सर ली साहेबांची.**
**वाऱ्यावरुनी वार्ता आली भारतभवनांत,**
**भारतभवनामधें जाहला एक नवा बेत. ६८**

या बंगाली तरुणांना विलायतेंत शिक्षण घेण्याची मनाई करावी अशी सर साहेबांनीं सूचना लिहून पाठविली आहे ही वार्ता भारतभवनांत वाऱ्यासारखी आली. तेव्हां भारतभवनांत एक नवाच बेत ठरला.

कुठें तरी साहेब चालले होते कामाला,
मधेंच कोणी विद्यार्थ्यानें थांबविलें त्याला.
आणि म्हणाला अर्ज एवढा दाखल घ्या करुनी.
झुरळावाणी त्यास झटकलें त्या साहेबांनीं !! ६९

साहेब कोठेंतरी कामासाठीं चालले होते. त्यांना वाटेंतच कोणा एका विद्यार्थ्यानें थांबवलें आणि हा माझा अर्ज एवढा दाखल करून घ्या असा तो म्हणाला. पण झुरळ जसें झटकून टाकतात तसें साहेबांनीं त्याला धुडकावलें.

तरी परतला नाहीं; होता चालत मागूनी!
अर्ज एवढा घ्यावा सांगत होता फिरफिरुनी.
'हटो निगर' साहेब म्हणे तो 'चल जा येथून'
आणि अर्ज तो दिला तयानें तसाच फेकून. ७०

तरी पण तो तरुण मागें फिरला नाहीं. साहेबाच्या मागून चालला होता आणि माझा एवढा अर्ज घ्या असें पुन्हां पुन्हां सांगत होता. रागानें साहेब म्हणाला 'हटो निगर' येथून चालता हो. आणि तो अर्ज त्यानें तसाच फेकून दिला.

शिवी अशी ऐकतांच गेला तरूण भडकून
आणि एक श्रीमुखांत त्यानें दिलि भडकावून
दरडीवरुनी दगड पडावा कोसळुनी खाली
दूर जाउनी कोलमंडला नांव तयाचें ली. ७१

अशी शिवी ऐकतांच तरुण भडकून गेला आणि त्यानें साहेबाच्या श्रीमुखांत भडकावून दिली. दरडीवरून दगड जसा कोसळतो तसा साहेब कोलमडून पडला. त्या साहेबाचें नांव ली होतें.

**चार मंडळी जमली आले पोलिस धांवूनी**
**पोलिस आला म्हणून जातो कोण अता भिउनी !**
**रात्रीं जमले तरुण सारे भारतभवनांत**
**विनायकानें नीट घेतला ऐकुन वृत्तान्त. ७२**

वाटेवरची चार मंडळी जमली. पोलिस धावून आले. पण आतां पोलिसांना कोण भितो ! भारतभवनांत रात्रीं सर्व तरुण जमले. विनायकानें ती सर्व हकीकत ऐकून घेतली.

**असेंच उत्तर दिलें पाहिजे हरामखोरांना**
**छळिले यानें बंगाल्यांतिल अनेक लोकांना.**
**नाहिं कुणावर दया नि माया कधि यानें केली,**
**असें म्हणाले कुणी नि पडली टाळीवर टाळी. ७३**

हरामखोराला असेंच उत्तर दिलें पाहिजे. बंगाल्यांतील अनेक लोकांना यानें छळलें होतें. त्यानें कोणावर दया माया केली नव्हती, असें कोणी म्हणतांच टाळ्यावर टाळ्या पडल्या.

**दोन तीन दिवसांत गांठलें त्या साहेबास**
**उभे राहुनी समोर त्याच्या म्हणे कुणी त्यास**
**बोललास तूं 'सूव्वर' आम्हां हिंदूलोकांस,**
**नको करू तों गुन्हा आमचा उगाच केलास ! ७४**

त्याच साहेबाला दोनतीन दिवसांत कोणी गांठलें आणि त्याच्या समोर उभे राहून त्याला तो म्हणाला आम्हा हिंदूंना तूं सूव्वर म्हणालास, करूं नये तो आमचा उगाच अपराध केलास.

**तुला पत्र हें लिहिलें आहे नीट जरा वाच,**
**आणि आमुची माग क्षमा तर सुटशिल तेव्हांच !**
**उर्मट तो साहेब असा कां नमेल धमकीला;**
**बोलु लागला उद्धट भाषा त्या विद्यार्थ्याला. ७५**

तुलाच हें पत्र लिहिलें आहे. जरा नीट वाच आणि आमची क्षमा माग तरच तुझी सुटका होईल. पण अशा धमकीला तो उर्मट साहेब का नमणार ! त्या विद्यार्थ्याला तो उद्धटपणें बोलूं लागला.

**नव्हता तो ऐकूनि घ्यावया मवाळ पक्षाचा!**
**मारिल त्याचें पाय धरा हा पथ नव्हता त्याचा !**
**होता तो अभिमानि नि पायिक श्रीमन् टिळकांचा**
**होता तो सच्छिष्य जाहला सावरकरजींचा. ७६**

पण तो विद्यार्थी मवाळपक्षाचा नव्हता. जो मारील त्याचेच पाय धरावे अशा पंथाचाही तो नव्हता. श्रीटिळकांचा तो अभिमानी होता. तो आपणाला त्यांचा पायिक म्हणे आणि आतां तो सावरकरांचा सच्छिष्य झाला होता.

**तोंच फिरवली त्या तरुणानें हातांतील काठी**
**दोन चार लावले तडाखे ली पडला खाली.**
**मेलो मेलो करीत होता तो मार्गावरती,**
**तोंच धांवले लोक नि त्याला उठा उठा म्हणती.७७**

त्यानें लगेच हातांतील काठी फिरविली आणि दोन चार तडाके लगावले. मेलो मेलो करीत ली साहेब खालीं पडला. तोंच लोक धावून आले आणि त्यांना उठा उठा म्हणाले.

**थरथर होते कांपत राजे आणि महाराज**
**मार लागुनी रस्त्यावरती तो पडला आज !**
**काळ आपला वाटत होता जो बंगाल्यांना**
**तो चिलटासम अतां लागला वाटूं तरुणांना. ७८**

ज्याला हिंदुस्थानांतील राजे महाराजे थरथर कांपत तो कांठीचे तडाखे बसून खालीं पडला. बंगाल्यांना जो आपला काळ वाटे तो आतां चिलटासारखा तरुणांना वाटूं लागला.

**सत्ता हातीं असेल तोंवर जन या या म्हणती;**
**जातां खुर्ची जाते मर्जी कुणि न तया पुसती.**
**चकाकणारा वरिल मुलामा गेल्यावर उडुनी**
**अडगळ पाहुनि फेकुनि देती घाण नको म्हणुनी. ७९**

हातांत जोपर्यंत सत्ता असते तोंवर लोक या या म्हणतात. खुर्ची गेली की लोकांची मर्जीही जाते. कोणी त्याला विचारीत नाहीं. चकचकणारा वरचा मुलामा उडून गेल्यावर ती अडगळ होते आणि घाण नको म्हणून फेकून देतात.

**विनायकाच्या उपदेशाचा होता परिणाम**
**उपदेशानें वाढत होता तरुणांचा जोम.**
**वाटुं लागली सरकाराला भीती भवनाची;**
**कृपा लागली वाढुं हळूंहळु पोलिसखात्याची !! ८०**

असा प्रतिकार विनायकाच्या शिकवणुकीचा परिणाम होता. तरुणांमध्यें सावरकरांच्या उपदेशामुळें प्रतिकारशक्ति वाढत होती आणि त्याचबरोबर भारतभवनावर पोलिसांची कृपाही वाढूं लागली.

आणि लागले आजुबाजुला हेर फिरायाला !
कुणी लागले भेट द्यावया भारत भवनाला !
नव्हता दुबळा गबाळ नेता भारतभवनाचा
तरुण शेकडों झेलत होते शब्द सुखें त्याचा. ८१

भारतभवनाच्या आसपास हेर फिरूं लागले तर कोणी हेर भारत भवनास भेट देऊं लागले. भारतभवनाचा नेता दुबळा नव्हता आणि गबाळही नव्हता. तरुण आनंदानें त्याचा शब्द झेलीत होते.

वाढत होता क्षोभ हळूंहळु हिंदुस्थानांत
आणि जरासें सरकारहि तें होतें चिंतेंत.
संशय होता सरकाराला भारतभवनाचा
आणि असावा हात यामधें सावरकरजींचा. ८२

हिंदुस्थानांतही हळूहळू प्रक्षोभ वाढत होता आणि तें सरकारही जरासें चिंतेंतच होतें. भारतभवनांतील हालचालींचा आणि त्यांत सावरकरांचा हात असावा असा सरकारला संशय होता.

* * *

ज्या देशाला धर्म नाहि तो देश तरी कसला !
ज्या धर्माला देश नाहि तो धर्म तरी कसला !

## (२९) हेर कीर्तिकर

काय जाहलें एके दिवशीं भारतभवनांत
रहावयाला तरूण आला एक अकस्मात.
रुबाब त्याचा गोड बोलणें गोड सुधेवाणी
शिकावयाला असेल आला विद्यार्थी कोणी ! ८३

एके दिवशीं काय झालें, भारतभवनांत एक तरुण एक दिवस रहावयास आला. त्याचा स्वभाव गोड होता आणि त्याचें बोलणें सुधेसारखें गोड होतें. कशाचें तरी शिक्षण घेण्यास तो कोणी विद्यार्थी आला असावा.

**कार्यक्रम तो करी साजरे भारतभवनाचे;**
**कुशल विचारी हंसत मुखानें आल्यागेल्याचें;**
**कोण बोलतो काय याकडे लक्ष असें त्याचें**
**जसे डबोल्यावरी लागती लोचन चोराचें. ८४**

भारतभवनांतील कार्यक्रमांना तो उपस्थित असे. आल्यागेल्याची हंसतमुखानें तो चौकशी करी. चोराचें जसें डबोल्याकडे लक्ष असतें तसें त्याचें कोण काय बोलतो इकडे लक्ष असे.

**जसा कुणी शागीर्द असावा इनामदारांचा**
**पाहुं लागला कारभार तो भारतभवनाचा.**
**लोभ आपल्यावरी करावा सावरकरजींनीं**
**करीत होता धडपड म्हणुनी अनेक मार्गांनीं. ८५**

इनामदाराकडील शागीर्द जसा इनामदाराचें काम पहातो त्या प्रमाणें भारतभवनांतील सर्व कामें तो पाही. सावरकरांचा आपल्यावरील लोभ वाढावा म्हणून त्याची अनेकप्रकारें धडपड चालत असे.

**स्वातंत्र्याच्या कथा नि वार्ता बळेंच काढून**
**चर्चा करुनी मत इतरांचें घेई समजून.**
**उभा करी आभास असावा तरूण तडफेचा,**
**आणि असावा खास मित्र हा सावरकरजींचा. ८६**

स्वातंत्र्याच्या चळवळीची गोष्ट आणि प्रसंग आपण होऊन मुद्दाम काढून त्यासंबंधीचे इतरांचे विचार तो समजून घेई. आपण एक तडफदार तरुण आहोंत आणि सावरकरांचे खास मित्र आहोंत असा आभास तो उत्पन्न करी.

**परंतु होते खास मित्र जे सावरकरजींचे**
**त्यांस वाटलें वर्तन त्याचें मात्र संशयाचें !**
**मांजर बसते दृष्टि लावुनी जसें दुधावरती**
**तशी ठेवली पाळत त्यांनीं त्या तरुणावरती. ८७**

परंतु सावरकर यांचे जे खास मित्र होते त्यांना त्याच्या वर्तनाचा संशय येऊं लागला. दुधाकडे मांजर जसें दृष्टि लावून बसतें तशी त्या तरुणावर त्यांनीं पाळत ठेवली.

**हिंदुस्थानांतील असावा हा बहुधा हेर**
**येथिल वार्ता द्यावयास हा जातो बाहेर.**
**संशय आला या तरुणाचा सावरकरजींना**
**नसेल तेव्हां उघडा खोली म्हणती स्नेह्यांना. ८८**

हिंदुस्थानांतील हा कोणी हेर असावा आणि येथील बातम्या देण्यासाठीं तो बाहेर जातो असा त्याचा सावरकरजींना सुद्धां संशय आला. तो नसेल तेव्हां खोली उघडा,

**कागदपत्रें पहा तयाचीं सर्व तपासून;**
**पापें त्याचीं बोलतील तीं घ्या तें ऐकून.**
**चालतात उद्योग कोणते कळेल तरि याचे,**
**पुढें बघूं या आपण त्याचें काय करायाचें ! ८९**

आणि त्याचीं सर्व कागदपत्रें तपासून पहा आणि त्याचीं पापें बोलतील तें ऐकून घ्या. म्हणजे कागदपत्रांतून आपल्याविरुद्ध त्यानें काय लिहून ठेवलें आहे तें पहा. याचे उद्योग चालतात तरी काय व त्याचें काय करावयाचें हें पुढें पाहूं, असें सावरकरांनीं स्नेह्यांना सांगितलें.

शिरले दोघे आंत एकदां कुलूप काढून
आणि पाहिलें सर्व कोपरें त्यांनि तपासून.
दिला साग्र अहवाल आणुनी सावरकरजींना
प्रकार आला कळुनि त्यांतला सर्वच सर्वांना ! ९०

कुलूप काढून दोघे आंत शिरले आणि त्यांनीं सर्व कोपरे सुद्धां तपासून पाहिले. सावरकरजींना साग्र अहवाल त्यांनीं आणून दिला. त्यांतला सर्व प्रकार सर्वांना समजला.

अखेर ठरलें शेवट याचा स्पष्ट करायाचा;
उभे राहिले बंद तयाचा पाहुनि दरवाजा.
त्यांस म्हणाले आहे अमुचें काम महत्त्वाचें
उघडा खोली तुम्हास आहे मज सांगायाचें. ९१

या गोष्टीचा एकदाचा निकाल लावून टाकावयाचें ठरलें. तो खोलींत आहे असें पाहून त्याच्या बंद केलेल्या खोलीसमोर स्नेही उभे राहिले. आमचें काम आहे, तुम्हांला कांहीं सांगावयाचें आहे, खोली उघडा असें ते त्याला म्हणाले.

लिहीत होता कांहि टाचणें फार महत्त्वाचीं;
नव्हती इच्छा मुळींच त्याची क्षण बोलायाची.
पाहुनिया बाहेर परंतू तरुणांचा जोर
कसें बसें उघडलें तयानें खोलीचें दार ! ९२

कांहीं महत्त्वाचीं टिपणें तो लिहीत होता. एक क्षणभर सुद्धां बोलण्याची त्याची इच्छा नव्हती. परंतु खोलीबाहेर तरुण मंडळींची ओरड पाहून त्यानें आपल्या खोलीचें दार उघडलें.

**जसें काय जोरात घुसावें भरतीचें पाणी**
**तरूण शिरले आंत राहिले तयास घेरूनी.**
**आणि म्हणाले राव कुणाला पत्र बरें लिहिता;**
**कोण गांठली प्रिया कळूं द्या ती तुमची वार्ता.** ९३

भरतीचें पाणी जसें जोरांत आंत घुसतें त्याप्रमाणें मित्र खोलींत शिरले व त्याला ते घेरून उभे राहिले आणि म्हणाले 'राव कोणाला पत्र लिहीत आहांत. कोण मैत्रीण तुम्ही गांठली? ती गोड वातमी आम्हाला कळूं द्या तरी.

**धंदे तुमचे काय रात्रिचे कुठें तुम्ही जातां,**
**ऐकूं द्या आम्हास एकदां ही तुमची गाथा.**
**हिंदुस्थानामधून आला हेरगिरीसाठीं**
**कळल्या तुमच्या अम्हास साऱ्या भलभलत्या गोष्टी.** ९४

तुमचा धंदा काय, रात्रीं तुम्ही जाता कोठें ही तुमची हकीगत आम्हांस एकदां ऐकूं द्या. हेरगिरी करण्यासाठीं हिंदुस्थानांतून तुम्ही इथे आला आहांत. तुमच्या चमत्कारिक गोष्टी आम्हांला कळल्या आहेत.

**काढा कागद सर्व दाखवा मज लिहिणें तुमचें**
**काय तुम्ही लिहिलेत पराक्रम सावरकरजींचें !**
**पाहूं द्या आम्हांस एकदां थोर कला तुमची,**
**रीत खरोखर अपूर्व तुमची स्वदेशसेवेची !** ९५

सर्व कागद काढा. तुम्ही काय लिहून ठेवलें आहे तें दाखवा. सावरकरजींचे पराक्रम तुम्ही कसे लिहिले आहेत ती तुमची थोर कला आम्हांला एकदां पाहूं द्या. स्वदेशाची सेवा करावयाची तुमची खरोखर अपूर्व पद्धत आहे.

**द्या सोडुनि तें सगळे; सांगा एकच आम्हास**
**पगार मिळतो किती तुम्हां हें पाप करायास !**
**देशभक्तिचें सोंग आणुनी पोट भरायाचा**
**शिकला कोठें अपूर्व धंदा हा चांडाळाचा ! ९६**

तें सर्व जाऊं द्या. हें पाप करावयाला तुम्हाला पगार किती मिळतो तेवढे एक आम्हांला सांगा. देशभक्तीचें सोंग आणून आपलें पोट भरावयाचा हा चांडाळाचा धंदा तुम्ही कुठें शिकला ?

**देशभक्तिचे गोड गोडवे उगाच गायाचे !**
**उडवायाचे फुगे तेवढे स्वदेशसेवेचे !**
**सभ्यपणें चौघांत बसोनी पोट भरायाचा,**
**भारतांत व्यवसाय वाढला हा चांडाळांचा ! ९७**

देशसेवेचे गोड गोडवे उगाच गावयाचे, स्वदेशसेवेचे नुसते फुगे उडवावयाचे आणि चार चौघांत सभ्यपणाचा आव आणून बसावयाचें हा चांडाळाचा व्यवसाय भारतांत वाढला आहे.

**तुझ्यासारखे हरामजादे भारतभवनांत**
**नव्हति कल्पना, गुप्तपणानें रहात असतात.**
**गुलाम केला देश आमुचा यवन, इसायांनीं**
**शरम तयाची गुलामास या असेल कोठोनी ! ९८**

भारतभवनांत तुझ्यासारखे हरामखोर रहात असतील याची आम्हास कल्पना नव्हती. यवन इसायांनीं आमचा देश गुलाम करून टाकला याची या गुलामाला लाज असणार कोठून !

**जाळतात हे पोट शत्रुला सहाय्य देऊनी;**
**राष्ट्र बुडविलें याच विलक्षण हरामखोरांनीं.**
**ऐकतांच हें उसळुनि बोले काय तुम्ही म्हणतां?**
**कुणापुढें अन् कोणाबद्दल ही भाषा करता! ९९**

शत्रूला मदत करून जे आपलीं पोटें जाळतात त्याच हरामखोरांनीं राष्ट्र बुडविलें. हें बोलणें ऐकतांच तुम्ही हें काय बोलतां, कोणाबद्दल बोलत आहांत आणि कोणापुढे बोलत आहांत असें तो उसळून म्हणाला.

**कोण तुम्हीं समजतां मला अन् तुम्ही असे कोण?**
**उगाच गप्पा मात्र मारतां भिवया चढवून.**
**निघा येथुनी बोलत त्यानें उगारला हात**
**तोंच विनायक सावरकरजी शिरले खोलींत! १००**

तुम्ही मला कोण समजता आणि तुम्ही कोण आहांत! उगीच गप्पा मात्र मारता, निघा येथून असें म्हणत त्यानें हात उगारला आणि त्याच क्षणीं सावरकरजी खोलींत शिरले.

**शिक्षक येतां वर्ग मुलांचा स्वस्थ जसा बसतो**
**विनायकाला बघुनि राहिला शांत उभा जो तो?**
**म्हणे विनायक असे वर्दळी नाहिं बरें येणें,**
**कीर्तीकर, मज सांग ऐकु दे काय तुझें म्हणणें! १०१**

शिक्षक वर्गांत आले म्हणजे मुलांचा वर्ग जसा स्तब्ध बसतो त्याप्रमाणें विनायकाला आंत आलेला पहातांच जो तो शांत उभा राहिला. असें वर्दळीवर येऊं नये; 'कीर्तिकर तुझें काय म्हणणें आहे तें सांग पाहूं' असें सावरकर म्हणाले.

**नको घाबरूं खोटें कांहीं नको मला सांगू,**
**तुला मला शोभणार नाहीं नको असें वागू.**
**तुझेंच अक्षर, तूं लिहिलेल्या या अहवालांत**
**एक खरा तरि शब्द असें कां सांग मला यांत. १०२**

आणि पुढें म्हणाले कीं, घाबरूं नको आणि मला खोटें कांहीं सांगू नको. तुला आणि मला शोभणार नाहीं असें तुझें वर्तन नसावें. हें तुझेंच अक्षर आहे. या अहवालांतील एक शब्द तरी खरा आहे काय मला सांग पाहूं ?

**अकस्मात पाहूनि पुढें श्रीसावरकरजींना**
**घाबरला तो हेर कीर्तिकर आणि म्हणे त्यांना.**
**क्षमा करा अपराध जाहला माझ्या हातून,**
**प्रतारणा मी केली जातो हें घर सोडून ! १०३**

आपल्यासमोर अकस्मात् सावरकर येऊन उभे राहिलेले पाहून कीर्तिकर घाबरला आणि त्यांना म्हणाला माझ्या हातून अपराध झाला याबद्दल मला क्षमा करा. माझ्याकडून तुमची प्रतारणा झाली आहे. मी हें भवन सोडून जातो.

**जाशिल कोठें म्हणत रोखलें पिस्तुल त्यावरती,**
**"थांब थांब वीरेंद्र नको रे करूं अशी मस्ती.**
**कधीं कधीं होतात गुन्हे अन् चुका कुणाकडुनी**
**प्रथम पहावें म्हणूनि त्याचें हृदय तपासोनी. १०४**

कोठें निघून जातोस असें म्हणत त्याच्यावर वीरेंद्र यानें पिस्तूल रोखलें. थांब थांब, वीरेंद्र अशी मस्ती करूं नको. कधीं कधीं गुन्हे आणि चुका हातून घडतात. म्हणून त्याचें हृदय तपासून पहावें म्हणजे गुन्हा कां केला हें समजून घ्यावें

करुनि घ्यावा लाभ आपुला जर झाला कांहीं
नसेल तर घ्या बळी तयाचा यांत गुन्हा नाहीं."
म्हणे विनायक 'काय सांगतो ऐकुनि तें घेऊ;
काय करावें पुढें तयाचें मागुनि तें पाहूं' १०५

आपला कांहीं लाभ होत असेल तर करून घ्यावा. नसेल तर त्याला बळी द्यावा. यांत गुन्हा नाहीं. विनायक पुढें म्हणाले 'तो काय म्हणतो तें ऐकून घेऊं आणि पुढें काय करावयाचें तें ठरवूं.'

मांत्रिकापुढें भूत सोडतें स्वकृतिच्या गांठीं
तसा कीर्तिकर सांगु लागला हळूंहळूं गोष्टी
ऐकुनि म्हणती सावरकरजी खरेंच चुकलास,
करूं नये तो गुन्हा खरोखर उगाच केलास! १०६

मांत्रिकापुढें जसें भूत आपली हकीगत सांगतें त्याप्रमाणें कीर्तिकर हळूहळूं हकीगत सांगत होता. ती हकीगत ऐकून सावरकर म्हणाले, खरेंच तुझी चूक आहे. करूं नये तो गुन्हा निष्कारण तूं केला आहेस.

कुठें तरी तुज सहज मिळालें असतें पोटाला
सुचला तुजला देशघातकी हा धंदा कुठला!
आम्हि प्रतिज्ञाबद्ध जाहलों भारतभूसाठीं
करुनि ठेवला जवळ किनारा भारतभूसाठीं. १०७

पोटापुरतें तुला कोठेंही मिळालें असतें. हा देशाचा घात करणारा धंदा तुला कसा सुचला. भारत भूमीच्या स्वातंत्र्यासाठीं आम्ही प्रतिज्ञा-बद्ध झालों आहोंत. भारतभूमीसाठीं आम्ही किनारा जवळ केला आहे.

करावयाचा तूं आम्हाशीं प्रेमळ सहकार
सोडुनि तें मागून कसा करतोस असा वार ?
देशासाठीं प्रयत्न ज्यांचें युद्ध करायाचें,
बरें काय मागूनि तयांचे गळे चिरायाचे ! १०८

आमच्याशीं तूं प्रेमानें सहकार केला पाहिजेस. तें सोडून मागून आमच्यावर असा वार कां करतोस. देशासाठीं युद्धही करण्याचे आमचे प्रयत्न चालू असतां मागून आमचे गळे चिरणें बरें काय.

राष्ट्रापेक्षां स्ववैभवाच्या अनेक लोभांनीं
शिवरायाचें राज्य बुडविलें शूर मराठ्यांनीं!
स्वहिताहुनि जन परम मानतें हित स्वदेशाचें
हिंदुस्थानामधें न होतें राज्य इसायांचें ! ! १०९

राष्ट्राच्या वैभवापेक्षां स्वतःच श्रीमंत होण्याच्या लोभांनीं अनेक शूर मराठ्यांनीं शिवाजीमहाराजांचें राज्य बुडविलें. स्वहितापेक्षां स्वदेशाचें हित लोकांनीं जर मोठें मानलें असतें तर हिंदुस्थानांत इंग्रजांचें राज्य झालें नसतें.

लोक आपुल्या पक्षामधले करूनि घ्यायाची
अशी असावी लागत असते दृष्टि पुढाऱ्यांचीः
सरकाराची विशेष आहे नजर अशी बघुनी
नजर ठेवली सरकारावर सावरकरजींनीं ! ११०

आपल्या बाजूला लोक वळवून घेण्याची पुढाऱ्यांत एक दृष्टि असावी लागते. आपल्यावर सरकारची पाळत आहे असें पाहून सावरकरांनीं सरकारकडील बातम्या मिळतील इकडे लक्ष ठेवलें.

*           *           *

ज्या देशाला धर्म नाहिं तो देश तरी कसला ! !
ज्या धर्माला देश नाहिं तो धर्म तरी कसला ! !

## (३०) नेपाळेश्वरांचें आगमन

**वृत्त कळाया सरकाराच्या गुप्त कचेरीचें**
**करूं लागले मित्र चाकरी सावरकरजींचे!**
**येउं लागल्या नित्य बातम्या लोक उठावाच्या**
**सुरू जाहल्या तशा हिकमती भारतभवनाच्या! १११**

सरकारच्या हेर खात्यांतील बातम्या कळाव्यात म्हणून सावरकरांच्या स्नेह्यांनीं हेर खात्यांतच नोकऱ्या पत्करल्या. त्यामुळें लोकांच्या उठावाच्या बातम्या रोज कळूं लागल्या. त्या त्या प्रमाणें भारतभवनांत तशा हिकमती करावयाच्या ठरत.

**कुठें धाडले निरोप आतां रहा तयारींत;**
**कुठें धाडले शब्द दाखवा मर्दाचा हात.**
**कुठें धाडले निरोप द्यावें सहाय्य लोकांना**
**आणि आपुला आश्रय द्यावा शूर शिपायांना. ११२**

तयारींत रहाण्याचे निरोप सावरकरांनीं कोठें कोठें पाठवले तर कोठें मर्दाचा हात दाखवा असा इषारा दिला. आपल्या कार्यकर्त्यांना मदत करावी असें कोठें कोठें सुचविलें तर शूर शिपायांना तुम्ही आश्रय द्या असेंही कळविलें.

**सांगत होता वाघ बातमी क्रांतिकारकांची,**
**तशीच होती कृपा तयावर सयाजिरावांची.**
**एकच होता निरोप त्यांना राव नरेशांचा**
**वेळ येउं द्या त्याग करिन मी माझ्या राज्याचा. ११३**

क्रांतिकारकांच्या हालचालींच्या बातम्या रा. वाघ सयाजीराव महाराजांना सांगे. महाराजांचा त्याच्यावर तसाच लोभ होता. महाराजांचा सावरकरांना एकच निरोप असे. ते सांगत कीं वेळ येईल तेव्हां मी माझ्या राज्याचा त्याग करीन.

**असेच गेले गुप्तपणानें निरोप दुसऱ्यांना;**
**होकाराच्या कांहि कांहिनीं डोलविल्या माना!**
**नाहिं मिळालें ज्यांच्याकडुनी वृत्त निरोपाचें**
**त्यांस धाडलें विनायकानें पत्र इशाऱ्याचें. ११४**

असेच निरोप कांहीं राजे महाराजांकडे गुप्तपणें गेले. कांहींनीं मदत करण्याचें कबूल केलें. ज्यांच्याकडून कांहींच उत्तर आलें नाहीं त्यांना सावरकरांनीं इषाऱ्याचीं पत्रें पाठविलीं.

**निर्वाणीचें तुम्हा कळवितो; ठेवा ध्यानांत.**
**क्रांतीकारक होतिल विजयी या संग्रामांत!**
**जसा जलाचा बिंदु न ठरतो कमलदलावरती**
**पराजयाचा राहत नाहीं डाग यशावरती. ११५**

ते आपल्या पत्रांत म्हणतात:—आम्ही हें निर्वाणीचें कळवीत आहोंत! लक्षांत घ्या या संग्रामांत क्रांतिकारकांचा विजय होईल. कमळाच्या पानावर जसा पाण्याचा बिंदु रहात नाहीं, म्हणजे कमळाच्या पानाला जसें पाणी लागत नाहीं त्याप्रमाणें यशाला पूर्वी झालेल्या पराजयाचा डाग रहात नाहीं.

**विजयाचे आमुच्या नगारे झडतिल ज्या वेळीं**
**असाल कोठें तुम्ही नृपांनों, त्या मंगल काळीं?**
**सार्वभौम सरकारपदीं अध्यक्ष असायाचा**
**आणि नृपांनों, कारभार तो करील देशाचा. ११६**

आमच्या विजयाचे जेव्हां नगारे वाजूं लागतील तेव्हां त्या मंगल प्रसंगीं राजे महाराजांनों तुम्ही कोठें असाल! हिंदुस्थानच्या सार्वभौम सरकारपदावर अध्यक्ष असेल आणि देशाचा तो कारभार पाहील.

**शोभेचीं बाहुलीं कशाला हवींत देशांत ?**
**स्वार्थापायीं तुम्हीच केला राज्याचा घात !**
**तुमचें जगणें मरणें आहे हें अमुच्या हातीं;**
**भव्य आमुच्या विजयानंतर देउं तुम्हा माती. ११७**

हीं शोभेचीं बाहुलीं देशांत हवींत कशाला ! स्वार्थापायीं राज्याचा घात तुम्ही केलात, तुमचें जगणें आणि तुमचें मरणें हें आमच्या हातीं आहे. आमच्या भव्य विजयानंतर तुम्हांला आम्ही माती देऊं.

**शस्त्रास्त्रें लागलीं मिळाया क्रांतिकारकांना !**
**धाडित होते नवीं पिस्तुलें सावरकर त्यांना.**
**बॉम्ब लागले तयार होऊं वर बंगाल्यांत**
**होउ लागले स्फोट तयांचे अनेक मार्गांत ! ११८**

शस्त्रात्रें क्रांतिकारकांना मिळूं लागलीं. त्यांना सावरकर पिस्तुलें धाडीत होते. बंगाल्यांत बाँब तयार होऊं लागले आणि त्यांचे स्फोट भर रस्त्यावर होऊं लागले.

**निरोप गेले संघटकांना सावरकरजींचे--**
**शिकार कोठें मिळेल ठेवा लक्ष अतां तुमचें.**
**कोठुनि कैसे सहाय्य होइल हेरुनि तें ठेवा;**
**प्रसंग येता क्षणहि आपुला फुकट नये जावा. ११९**

संघटकांना सावरकरजींनीं निरोप पाठवून शिकार कोठें मिळेल इकडे तुमचें लक्ष असूं द्या असें कळवलें. आणि वेळ पडेल तेव्हां कोठून आणि कोणाकडून तुम्हांला मदत मिळेल हें पाहून ठेवा. प्रसंग येईल तेव्हां आपला एक क्षणही फुकट जाऊं नये असाही निरोप पाठविला.

**शतावधानी लागत असतो सर सेनाधीश;**
**तसाच लागत असतो नेता क्रांति करायास.**
**गुप्त चळवळी कळत असाव्या नोकरशाहीला**
**वाटत होतें अलीकडे श्रीसावरकरजींना !! १२०**

सैन्याला जसा शतावधानी सरसेनापती लागतो, तसाच क्रांति-कारकांना शतावधानी नेता असावा लागतो. आपल्या गुप्त चळवळी सरकारला कळत असाव्यात असें अलीकडे सावरकरांना वाटूं लागलें होतें.

**तोंच आणली एक सुवार्ता जिवलग मित्रानें**
**नेपाळेश्वर भूषविती जन निज वास्तव्यानें.**
**फडफडतो श्री जय भगवाध्वज अविरत डौलांत**
**नेपाळेश्वर तिथें पहा जा रहात असतात. १२१**

तोंच एका स्नेह्यानें चांगली वातमी आणली. नेपाळचे हिंदुसम्राट लंडनमध्यें रहावयास आले होते. जिथें भगवा ध्वज सारखा फडफडत आहे त्या प्रासादांत राजाधिराज नेपाळेश्वर रहात होते.

**खडर्याचें जिंकलें रणांगण शूर मराठ्यांनीं**
**जसा पुण्याला मोद जाहला या शुभ वार्तांनीं;**
**नेपाळेश्वर ऐकुनि आले नृपाळ नगरांत**
**आनंदीआनंद पसरला भारतभवनांत. १२२**

शूर मराठ्यांनीं खडर्याची लढाई जिंकल्याच्या वार्ता ऐकून पुणें शहरांत जिकडे तिकडे आनंद पसरला त्याप्रमाणें लंडन शहरांत हिंदुसम्राट नेपाळेश्वर रहात आहेत या वृत्तानें भारतभवनांत आनंद पसरला.

**परदेशांतिल विद्यार्थ्याला जशि असते घाई;**
**वाटत असते बघेन केव्हां मी माझी आई.**
**हिंदूंचा ध्वज जय भगवाध्वज वर फडफडतांना**
**बघेन केव्हां असें जहालें सावरकरजींना. १२३**

परदेशांतील विद्यार्थ्याला आपल्या आईला केव्हां भेटूं याची जशी घाई झालेली असते त्याप्रमाणें हिंदूंचा फडफडणारा विजयशाली भगवा ध्वज केव्हां बघेन असें सावरकरांना झालें होतें.

**नाहिं लागली झोंप चांगली तयास त्या रात्रीं**
**राव विनायक मोजित होते पळेंपळें नुसतीं!**
**जसे भलोरी घेते पाडस एकच गोष्टीचे**
**चला बघूं ध्वज एकच होतें हें गाणें त्याचें. १२४**

विनायकांना त्या रात्रीं झोप आली नाहीं. रात्रीचे तो तास मोजीत होता. मूल जसें एकाच गोष्टीचा नाद घेतें त्याप्रमाणें आपण भगवा ध्वज बघूं चला हें त्यांचें गाणें चालू होतें.

**कधी संपते रात्र एकदां उजाडतें केव्हां**
**हिंदूंचा तो धर्मविसावा बघतों मी केव्हां,**
**याविण दुसरा विचार त्याच्या मनामधें नव्हता.**
**जय भगवाध्वज बघावयाचा ध्यास तदा होता. १२५**

एकदाची रात्र संपते केव्हां आणि उजाडते केव्हां आणि हिंदूंचा तो धर्म विसावा मी पाहतों केव्हां याखेरीज विनायकाच्या मनांत दुसरा विचार नव्हता. भगवाध्वज बघावयाचा त्याला ध्यास लागला होता.

**चला चला रे मला दाखवा तो भगवा झेंडा;**
**चला चला रे मला बघूं द्या तो भगवा झेंडा.**
**मला वाहुं द्या हृद्‌गत माझें त्याच्या पायाशीं**
**आणि घेउ द्या मला लोळणें त्या शुभचरणाशीं. १२६**

चला रे चला तो भगवा झेंडा मला दाखवा. चलारे मला तो भगवा ध्वज पाहूं द्या. माझें हृद्‌गत त्याच्या चरणांवर मला वाहूं द्या आणि त्याच्या शुभ चरणाशीं मला लोळण घेऊं द्या असें सावरकर सारखे म्हणत.

**आणि निघाले तसेच दिसला ध्वज तो लांबून,**
**प्रेमातिशयें कंठ तयाचा आला दाटून !**
**म्हणे मनाशीं धन्य जाहलों हा ध्वज पाहूनी;**
**वंदन केलें त्रिवार त्यानें पुन्हा पुन्हा नमुनीं. १२७**

आणि सावरकर निघाले. त्यांना तो भगवा ध्वज लांबून दिसूं लागला. या ध्वजाच्या दर्शनानें मी धन्य झालों असें त्यांना झालें. प्रेमातिशयानें त्यांचा कंठ भरून आला. पुन्हां पुन्हां मस्तक नमवून त्यांनीं भगव्या ध्वजाला त्रिवार वंदन केलें.

**बघे उत्तरेकडे एकदां पुन्हा बघे खालीं;**
**बघे दक्षिणेकडे एकदां पुन्हा बघे खालीं.**
**आणि बघे श्री जय भगवाध्वज वर फडफडतांना**
**सांगायाचें तयास होतें पण तें वदवे ना. १२८**

एकदा उत्तरेकडे बघे आणि पुन्हां मान खालीं घाली, एकदा दक्षिणेकडे बघे आणि पुन्हां मान खाली घाली. आणि जय भगवाध्वज वर फडफडतांना तो बघे. तेव्हां त्याला कांहीं बोलावयाचें होतें पण तें त्याला बोलून दाखवतां आलें नाहीं.

तसाच होता उभा राहिला उभा किती वेळ;
घेई डोळे मिटून होता स्तब्ध किती वेळ.
जसें जहालें धनंजयाला दर्शन विश्वाचें
तयास झालें दर्शन हिंदू जय साम्राज्याचें ! १२९

तो तसाच कितीतरी वेळ उभा राहिला होता. डोळे मिटून घेऊन तो कितीतरी वेळ स्तब्ध होता. अशा स्थितींत अर्जुनाला जसें विश्वरूप दर्शन झालें तसें त्याला हिंदुसाम्राज्याचें दर्शन घडलें.

इकडुनि तिकडे घाली फेऱ्या प्रासादाभवतीं
बघे कुठें दिसतात काय ते हिंदूंचे नृपती.
थांबे क्षणभर चाले क्षणभर डोकावुनि पाही
सांगायाचें होतें पण तें तें सुचलें नाहीं. १३०

नेपाळेश्वर रहात होते त्या प्रासादाभवती सावरकर इकडून तिकडे फेऱ्या घालूं लागले. हिंदूंचे राजे कोठून दिसतात काय तें तो पहात होता. क्षणभर थांबे, क्षणभर डोकावून पाही. त्याला कांहीं बोलावयाचें होतें. पण बोलायचेंच त्याला सुचेना.

डोळ्यावाटे वहात होतें प्रेमाचें आसूं,
मधेंच चमके आनंदाचें मुखावरी हासूं,
मधेंच सारी केस पुसे मुख; पुटपुटला कांहीं.
सांगायाचें होतें पण तें तें सुचलें नाहीं. १३१

डोळ्यांतून प्रेमाचे आसूं वहात होते. मध्येंच त्याचे चेहऱ्यावर हंसू दिसे. तो मध्येंच आपले केस सारी. तोंड पुसे. पुटपुटे पण त्याला काय सांगावयाचें तेंच सुचेना !!

**उतार नदिला वर्षाकालीं मिळत जसा नाहीं**
**भरल्या भांड्यांतून मधुध्वनि होत जसा नाहीं.**
**जाती भारावूनि भावना जेव्हां हृदयांत**
**सांगायाचें तेंच सांगतां नाहिं कधीं येत. १३२**

पावसाळ्यांत नदीला जसा उतार मिळत नाहीं, भरलेल्या भांड्यांतून गोड आवाज निघत नाहीं, त्याचप्रमाणें जेव्हां हृदयांत भावना भारावून येतात तेव्हां सांगावयाचें असून काय सांगावयाचें तें सांगतां येत नाहीं.

**विचार त्याच्या मनांत नाना येत किती होते,**
**चालत होते पाय; ठिकाणीं मन कोठें होतें!**
**जरी परतला मध्येंच थांबे करी नमस्कार,**
**जशी लेक फिरफिरून बघते वळून माहेर. १३३**

त्याच्या मनांत अनेक विचार येत होते. तो चालत होता पण त्याचें चित्त ठिकाणावर होतें कुठें! सासरीं जातांना मुलगी माहेराकडे जशी फिरफिरून मागें वळून पाहते त्याप्रमाणें तो परत जाताना मध्येंच थांबे आणि वळून नमस्कार करी.

**कसा तरी पोंचला विनायक भारतभवनांत;**
**विशेष आतां परि दिसला तो जरा उमेदींत.**
**कांहि तरी जाहला असावा निश्चय पण त्याचा,**
**वाटत होतें सहज तयाच्या मुखाकडे बघतां. १३४**

सावरकर कसे तरी भारतभवनांत पोंचले. त्यांची उमेद वाढल्यासारखी दिसत होती. त्यांच्याकडे पाहिलें की त्यांनीं कांहींतरी निश्चित ठरवलें असावें असें वाटे.

**घोळत होता विचार त्याच्या कांहीं चित्तांत;**
**असेच गेले दोन चार दिन त्याच विचारांत.**
**अखेर ठरलें विनायकाचें वृत्त निवेदूनी**
**स्वातंत्र्यास्तव सहाय्य घ्यावें कांहि नृपाकडुनी. १३५**

त्याच्या चित्तांत कांहीं विचार घोळत होता आणि त्याच विचारांत दोनचार दिवस त्याचे असेच गेले. भारताच्या स्वातंत्र्यासाठीं नेपाळच्या महाराजांकडून सहाय्य मागण्यासाठीं आपलें निवेदन पाठवावयाचें विनायकानें ठरविलें.

**आणि घेतला कागद त्यानें आणि पुढें शाई**
**कसें लिहावें किती वेळ तें तें सुचलें नाहीं.**
**तोंच कापलें बोट लागलें रुधिर वहायाला,**
**म्हणे मदन-घ्या रक्त तुम्हाला पत्र लिहायाला. १३६**

आणि त्यानें लिहिण्यासाठीं कागद आणि शाई पुढें घेतली तोंच मदनलाल धिंग्रा यानें आपलें बोट कापलें आणि त्यांतून रक्त वाहूं लागलें. पत्र लिहावयास ही शाई घ्या असें तो म्हणाला.

**म्हणे विनायक 'मदन एवढें काम करायाचें**
**उद्यां सकाळीं पत्र नृपाला नेउनि दे माझें.**
**थांब तिथें तूं परतायाची नको करूं घाई;**
**उत्तर देतिल काय मला तूं आणुनी तें देई.' १३७**

सावरकर म्हणाले मदन एवढें काम कर. उद्या सकाळीं नेपाळच्या महाराजांना हें माझें पत्र नेऊन दे. तिथें थांब, परत फिरण्याची घाई करू नकोस. ते जें उत्तर देतील तें मला आणून दे.

उत्तर आलें अखेर इतुकें हिंदुनृपाकडुनी
"प्रभू करिल तें खरें" हर्षला निरोप ऐकूनी.
आणि वाढली विनायकाची आशा जोमानें
जसा वाढतो आषाढांतिल पाउस वेगानें. १३८

हिंदुनृपाकडून 'प्रभु करील तें खरें' एवढेंच उत्तर आलें. तें उत्तर ऐकून सावरकरांना आनंद झाला. आणि आषाढ महिन्यांत पाऊस वाढतो तशी त्यांची आशा जोरांत वाढली.

* * *

ज्या देशाला धर्म नाहिं तो देश तरी कसला!!
ज्या धर्माला देश नाहिं तो धर्म तरी कसला!!

## (३१) पडतिल कौलें माणिकमोत्यांचीं

वाढत होता छळ हिंदूंचा हिंदुस्थानांत,
वाढत होता त्वेष सारखा क्रांतिकारकांत.
पडूं लागलें मरून इंग्रज भर रस्त्यावरती
चढूं लागले तरुण त्यामुळें वर फांसावरती. १३९

हिंदुस्थानांत हिंदूंचा छळ वाढत होता. तसा तसा क्रांतिकारकांच्या मनांत त्वेष वाढत होता. भर रस्त्यावर अनेक इंग्रजांचे वध झाले आणि त्यामुळें अनेक तरुणांना फांसावर चढावें लागलें.

बोलुं लागले इंग्रज कांहीं करूनिया त्रागा;
इंग्रज सरकारास म्हणाले ओळखुनी वागा.
कुणी म्हणाले सहाय्य घ्यावें समाजवाद्यांचें,
सशस्त्र चळवळ करूं नये हें मत नेमस्तांचें. १४०

इंग्रज सरकारचें सामर्थ्य ओळखून वागा असें त्राग्यानें इंग्रज लोक बोलूं लागले. कोणी म्हणाले समाजवादी पक्षाचें साहाय्य घ्यावें. नेमस्तांचें म्हणणें असें कीं स्वराज्यासाठीं सशस्त्र चळवळ करूं नये.

**हळूहळू होईल शहाणें इंग्रज सरकार**
**करूं नये हे उगाच कोणी हे अत्याचार.**
**असे धाडले निरोप कोणी सावरकरजींना;**
**हंसून बोले राव म्हणावें काय शहाण्यांना ! १४१**

इंग्रज सरकार हळूहळू शहाणें होईल, उगाच अत्याचार कोणी करू नयेत असें कोणी सावरकरांना निरोपही धाडले. या शहाण्यांना काय म्हणावें असें सावरकर उपाहासानें म्हणत.

**प्रकटपणें धाडलें तयानें निरोप लोकांस–**
**सशस्त्र चळवळ करावयाची हौस न आम्हांस.**
**क्रांतीविण उजळणार नाहित भाग्यें देशाचीं,**
**तुझ्या हिताची गोष्ट भारता, ऐकुनि घे माझी. १४२**

सावरकरांनीं उघडपणें त्यांना निरोप धाडले. सशस्त्र चळवळ करण्याची आम्हांस हौस नाहीं. पण क्रांति घडवून आणल्याखेरीज देशाची भाग्यें उजळत नसतात. तुझ्या हिताचें हें माझें सांगणें भारता तूं ऐकून घे.

**काळाच्या उतरणीवरूनी अदम्य वेगांत**
**कोसळणारे प्रपात त्यांना क्रांती म्हणतात.**
**थांबवितां येणार धांव ही कुणा न क्रांतीची,**
**तुझ्या हिताची गोष्ट भारता, ऐकुनि घे माझी. १४३**

काळाच्या उतरणीवरून अदम्य वेगांत कोसळणाऱ्या प्रपातांना क्रांति म्हणातात. क्रांतीची ही धांव कोणालाही थांबवितां येणार नाहीं. तुझ्या हिताचें हें माझें सांगणें भारता तूं ऐकून घे.

**समप्रदेशीं नदीसारखे प्रशांत जे फिरती**
**प्रगमन आत्मक ओघ तयांना म्हणती उत्क्रांती.**
**उत्क्रांती थांबली कि पडतें पाउल क्रांतीचें**
**तुझ्या हिताचे बोल भारता, ऐकुनि घे माझे ! १४४**

समप्रदेशांवर नदीसारखे प्रगमनात्मक जे प्रशांत ओघ वहातात त्याला उत्क्रांति म्हणतात. उत्क्रांति थांबली कीं क्रांतीचें पाऊल पडतें. तुझ्या हिताचें हें माझें सांगणें भारता तूं ऐकून घे.

**महान् तत्त्वासाठिं जहाल्या जगांतल्या क्रांत्या.**
**विश्वाचा क्रम ठरलेला हा क्रांत्या-उत्क्रांत्या.**
**तलवारीविण उजळत नाहीं मशाल तत्त्वाची**
**तुझ्या हिताची गोष्ट भारता, ऐकुनि घे माझी. १४५**

जगांत महान तत्त्वासाठीं क्रांत्या झाल्या आहेत. क्रांति आणि उत्क्रांति हा विश्वाचा क्रम ठरलेला आहे. तलवारीखेरीज तत्त्वाची मशाल उजळत नाहीं. तुझ्या हिताचें हें माझें सांगणें भारता तूं ऐकून घे.

**देशासाठीं मरूनि जगतो धन्य असे त्याची.**
**चिरंजीव तो होउनि करतो कीर्ति स्वराष्ट्राची.**
**अपजय हो पायरी जयाची अन् उत्कर्षाची;**
**तुझ्या हिताची गोष्ट भारता, ऐकुनि घे माझी. १४६**

देशासाठीं मरतो म्हणून जो जगतो त्याची धन्य होय. तो चिरंजीव होय. तो स्वराष्ट्राची कीर्ति करतो. जयाची आणि उत्कर्षाची अपयश ही पायरी असते. तुझ्या हिताचें हें माझें सांगणें भारता तूं ऐकून घे.

**करावयाचा असतो जेव्हां सुघोष सत्तेचा,**
**पवित्र असतें युद्ध नि असतो प्रचार युद्धाचा !**
**युद्धावांचुनि ही परवशता नाहिं सुटायाची !**
**तुझ्या हिताची गोष्ट भारता, ऐकुनि घे माझी.१४७**

सत्तेची घोषणा करावयाची असते तेव्हां युद्ध आणि युद्धाचा प्रचार करणें हें पवित्र कार्य असतें. युद्धांवाचून परवशता नाहींशी व्हावयाची नाहीं. तुझ्या हिताचें हें माझें सांगणें भारता तूं ऐकून घे.

**दाखविली तर स्विकार कर तूं सहानुभूतीचा;**
**दिलें निमंत्रण आदर कर तूं त्या बोलवण्याचा;**
**नको भीक मागूस भारता, उगाच अन्नाची.**
**तुझ्या हिताची गोष्ट सांगतो ऐकुनि घे माझी.१४८**

कोणी सहानुभूति दाखवली तर ती तूं स्वीकार. तुला कोणी निमंत्रण दिलें तर त्या निमंत्रणाचा तूं आदर कर. उगाच अन्नासाठीं मात्र कोणाकडे भीक मागूं नको. तुझ्या हिताचें हें माझें म्हणणें भारता तूं ऐकून घे.

**आर्यभूमिसम सुपीक आहे तुजपाशीं शेती,**
**सप्तनद्यांचे रुंद कालवे अखंड खळखळती,**
**पूर्विसारखे काढ भारता पीक सुवर्णाचें**
**तुझ्या हिताचे बोल भारता, ऐकुनि घे माझे ! १४९**

आर्यभूमीसारखी सुपीक शेती तुझ्यापाशीं आहे. सप्तनद्यांचें रुंद कालवे अखंड वहात आहेत. पूर्वीप्रमाणें भारता सोन्यासारखें पीक काढ. तुझ्या हिताचें हें माझें म्हणणें भारता, तूं ऐकून घे.

**नको घालु शेतींत कुणाचा नांगर परक्याचा**
**पाळ एवढी शर्त किं होइल जयजयकार तुझा.**
**स्वातंत्र्योत्तर होइल कीर्ती तव साम्राज्याची**
**तुझ्या हिताची गोष्ट सांगतो ऐकुनि घे माझी. १५०**

कोणा परक्याचा नांगर शेतींत घालूं नकोस. एवढी अट पाळ कीं तुझा जयजयकार होईल. स्वातंत्र्योत्तर तुझ्या साम्राज्याची कीर्ति वाढेल. तुझ्या हिताचें हें माझें म्हणणें ऐकून घे.

**मयूर अन् कोहिनूर पिकतील तुझिया शेतींत,**
**कालिदास पिकतील शिवाजी पिकतिल देशांत;**
**तुझ्या घरावर पडतिल कौलें माणिकमोत्यांचीं.**
**तुझ्या हिताची गोष्ट सांगतो ऐकुनि घे माझी. १५१**

तुझ्या शेतींत मयूर सिंहासनें आणि कोहिनूर पिकतील. देशांत कालिदास व शिवाजी जन्मास येतील. तुझ्या हिताचें हें माझें म्हणणें तूं ऐकून घे.

**आणि ठेव ध्यानांत एवढें पुन्हां पुन्हां माझें**
**स्वातंत्र्याविण दिवस न येतिल सुख–सा म्राज्याचे.**
**रणावीण स्वातंत्र्यपौर्णिमा नाहिं फुलायाची.**
**रुधिर दिल्याविण कृपा न होइल आइ भवानीची. १५२**

आणि हें माझें पुन्हां पुन्हां सांगणें ध्यानांत ठेव. स्वातंत्र्याशिवाय साम्राज्याचें सुख मिळणार नाहीं. युद्ध केल्याखेरीज स्वातंत्र्याची पौर्णिमा फुलावयाची नाहीं. रक्त दिल्याखेरीज आई भवानीची कृपा व्हावयाची नाहीं.

* * *

**ज्या देशाला धर्म नाहि तो देश तरी कसला !!**
**ज्या धर्माला देश नाहि तो धर्म तरी कसला !!**

# सर्ग सातवा

## (३२) बाडग्यांचा संबंध नको

स्वराज्य नाहीं राजा नाहीं द्रोह तिथें कसला,
देशासाठीं वध केला तर त्यांत गुन्हा कसला!

*　　　*　　　*

आज काय खुदिराम बसूला कुठें दिलें फांशी,
आज काय सत्येंद्रनाथ अन् दत्त दिलें फांशी.
जुलूम होता वाढत आतां हिंदुस्थानांत
आणि जरासे राव विनायक होते रागांत ! १

आज काय खुदिरामला कोठेसें फांशी दिलें. आज काय सत्येंद्रनाथ आणि दत्त यांना फांशीं दिलें. असा हिंदुस्थानांत जुलूम चालू होता. आणि त्यामुळें विनायक जरा संतापलेच होते !

डांबुनि बंदीघरीं पुढारी लोक कुणी कांहीं
समाज जातो भिऊन ऐसे होत कधीं नाहीं !
झाड तोडतां बहरुनि येतें झाड पुन्हां वरती
अनेक येती पुढें पुढारी ते गेल्यावरती. २

कांहीं पुढारी मंडळी आणि कोणी दुसरे यांना तुरुंगांत डांबून ठेवल्यानें लोक भयभीत होऊन जातात असें कधीं होत नाहीं. झाड तोडलें कीं तें पुन्हां डवरून येतें. त्याप्रमाणें एक पुढारी गेल्यावर अनेक पुढारी पुढें येतात.

**करूं लागले बोध शहाणे उगाच तरुणांना**
**वाढुं लागला तरुणांचाही विरोध वृद्धांना.**
**होउं लागल्या सभा परिषदा लंडन शहरांत**
**अभिनवभारत गर्जत होतें प्रमुखपणें त्यांत. ३**

काहीं शहाणे लोक तरुणांना उगाच उपदेश करूं लागले. वृद्ध लोकांना तरुणांचा विरोध होऊं लागला. लंडन शहरांत सभा आणि परिषदा होऊं लागल्या. त्यांत अभिनव भारत प्रमुखपणें चमकूं लागलें.

**मंदिर जैसें भरुनि जातें श्रीशिवभक्तांनीं**
**भरलें होतें पूर्ण सभागृह हिंदी तरुणांनीं.**
**अनेक वेळां निनादलें तें जयजयकारांनीं**
**कीर्तन जैसे वारकऱ्यांच्या टाळमृदंगांनीं. ४**

श्रीशिवभक्तांनीं देऊळ जसें भरून जातें तसें हिंदी तरुणांनीं सभागृह भरून गेलें होतें. वारकऱ्यांच्या टाळ मृदंगांनीं जसें कीर्तन गाजतें त्याप्रमाणें जयजयकारांनीं तें सभागृह अनेक वेळां दुमदुमून गेलें.

**नांव सुचवलें अध्यक्षास्तव कुमारस्वामींचें**
**पित्त खवळलें लालाजी हरदयाळभाईचें !**
**त्यांत म्हणाले कुणी करावें भाषण लालांनीं;**
**आग भडकली किती नको हें सांगाया कोणी! ५**

अध्यक्ष म्हणून कुमारस्वामीचें कोणी नांव सुचवतांच लाला हरदयाळ यांचें पित्त भडकून गेलें. त्यांतच लालाजींनीं भाषण करावें असें कोणी सुचवतांच लालाजी किती भडकून गेले असतील हें कोणी सांगण्याची गरज नाहीं.

**तोंच सुचवलें त्यास खुणेनें सावरकरजींनीं,**
**ताड ताड पद टाकित गेले लालाजी निघुनी.**
**प्रसिद्ध झालें दुसऱ्या दिवशीं पत्र दैनिकांत;**
**प्रकार सारा कळूनि आला स्वच्छ उजेडांत. ६**

इतक्यांत सावरकर यांनीं खूण करतांच ताडताड पावलें टाकीत लालाजी निघून गेले. दुसऱ्या दिवशीं वर्तमानपत्रांतून त्यांचें पत्र प्रसिद्ध झाल्यावर एकंदर प्रकारावर उजेड पडला.

**मी व्याख्याता म्हणुनि नियुक्ती केलि कुणी माझी,**
**हा माझा अपमान मानतो म्हणती लालाजी.**
**हिंदुधर्म सोडून जाहला ख्रिश्चन धर्माचा,**
**मला नको सहकार बाडग्या अशा गृहस्थाचा. ७**

मी व्याख्यान द्यावें अशी कोणी सूचना केली तो त्यानें माझा अपमान केला असें मी समजतों असें लालाजी म्हणाले. ज्यानें हिंदुधर्म सोडून ख्रिश्चन धर्म स्वीकारला अशा बाडग्या गृहस्थांशीं माझा संबंध-सुद्धां येऊं नये.

**परराष्ट्रांतिल परजातीची असेल जी पत्नी,**
**त्या पत्नीचा कधीं भरंवसा धरूं नये कोणी.**
**कडू कारलें किती घोळलें तूप साखरेंत**
**कडूपणा त्या कडू फळाचा नाहिं कधीं जात ! ८**

परराष्ट्रांतील परजातीची पत्नी असेल त्या पत्नीचा कोणी कधीं भरंवसा धरूं नये. तूप साखरेंत कडू कारलें किती घोळलें तरी त्याचा कडवटपणा कधीं जात नाहीं.

**आणि दोन राष्ट्रांत वाढतें वैर कधीं जेव्हां**
**जन्मराष्ट्र अभिमान वाढतो स्त्रियांमधें तेव्हां.**
**राष्ट्राचा अभिमान तियेचा होत कमी नाहीं**
**परराष्ट्राच्या पतीस तेव्हां मानित ती नाहीं. ९**

दोन राष्ट्रांत जेव्हां वैर वाढतें तेव्हां तिच्यांतील आपल्या राष्ट्राचा अभिमान वाढतो. तिच्या अंगीं असलेला राष्ट्राभिमान कमी होत नाहीं. त्याचप्रमाणें परराष्ट्रीय पतीला ती जुमानीत नाहीं.

**राष्ट्राचा अभिमान आणि अभिमान स्वधर्माचा**
**परधर्माचा पति केला तरि नाहिं सुटायाचा,**
**गुण जन्मावर अधिष्ठलेली जाइल जरी जात,**
**राष्ट्रजातिचा कधीं न होइल जगांतुनी अन्त. १०**

परधर्मीय इसमाशीं लग्न केलें तरी राष्ट्राचा आणि स्वधर्माचा अभिमान नाहींसा होत नाहीं. गुणधर्मावर आधारलेली जात नाहींशी झाली तरी जगांतून राष्ट्रजातीचा अन्त कधीही होणार नाहीं.

**राष्ट्राचा अभिमान भावना कुडींकुडींमधलीं;**
**पति ही केवळ सोबत असते सुखदुःखामधलीं!**
**पोषाखानें ऐट बदलते जरी रुबाबाची**
**ठेवण नाहीं बदलत त्यानें वृत्तिप्रवृत्तींची. ११**

राष्ट्राभिमानाच्या भावना हाडामाशीं खिळलेल्या असतात. पति ही सुखदुःखामधील केवळ सोबत आहे. पोषाखानें रुबाबाची ऐट बदलली तरी रुचि आणि प्रवृत्तीची ठेवण बदलत नाहीं.

**राष्ट्राचा अभिमान जयाच्या मनांमधें नसतो,**
**तोच हिंदु निर्लज्ज आपुलें धर्मांतर करतो.**
**धर्म बदलणें अधोगती ही मूर्ख मनुष्याची;**
**राष्ट्राला भयभीती असते अशाच लोकांची. १२**

राष्ट्राचा अभिमान ज्याच्या मनांत असत नाहीं तोच निर्लज्ज हिंदु आपलें धर्मांतर करतो. आपला धर्म बदलणें ही मनुष्याची अधोगति आहे. अशाच लोकांची राष्ट्राला भयभीति असते.

**राष्ट्र आणि संस्कृती नि भाषा यांचा अभिमान**
**पतिपत्नीच्या प्रेमापेक्षां असतो व्यापून!**
**पतिपत्नीचा प्रेमभाव ही वैयक्तिक स्फूर्ती,**
**राष्ट्र आणि संस्कृतीभाव ही विश्वाची मूर्ती. १३**

राष्ट्र, संस्कृति आणि भाषा यांचा अभिमान पतिपत्नीच्या प्रेमापेक्षां अधिक व्यापक असतो. पतिपत्नीचा प्रेमभाव ही वैयक्तिक स्फूर्ति आहे. तर राष्ट्र आणि संस्कृतीच्या भावना ही विश्वाची मूर्ति आहे.

**टाकुनिया गंगाजल प्यावें विहिरींतिल पाणी,**
**फेकुनि पादत्राण फिरावें उगाच अनवाणी,**
**शहर सोडुनी गांवकडेला कुठें तरी बसणें,**
**तसें हिंदुनें धर्म सोडुनी परधर्मी जाणें! १४**

गंगाजळ टाकून विहीरींतील पाणी पिणें, पादत्राणें टाकून अनवाणी फिरणें, शहरांतील वस्ती सोडून गांवाच्या बाजूला कोठेंतरी राहणें तसें हिंदुधर्म सोडून परधर्मांत जाण्यासारखें होय.

**हिंदुधर्म जो सोडुनि जातो दुसऱ्या धर्मांत**
**त्यांत तयाचा निश्चित असतो कांहितरी स्वार्थ!**
**हिंदुधर्म सोडूनि जाहला खिश्चन धर्माचा**
**मला नको सहकार बाडग्या अशा गृहस्थाचा. १५**

हिंदुधर्म सोडून जो दुसऱ्या धर्माचा स्वीकार करतो तेव्हां असें धर्मांतर करण्यामागें त्याचा कांहींतरी स्वार्थ असतो. हिंदुधर्म सोडून जो खिश्चन धर्माचा झाला अशा बाडग्या गृहस्थाशीं मला सहकार करावयाचा नाहीं.

**अशा गृहस्थाबरोबरीनें देणें व्याख्यान,**
**मला वाटतो यांत खरोखर माझा अपमान.**
**मडक्यामधुनी पिणें जसें जल श्रेष्ट नृपाळानें**
**तसें बाडग्या बरोबरीनें भाषण मीं देणें ! १६**

अशा बाडग्याच्या बरोबर व्याख्यान देणें यांत मला माझा मोठा अपमान वाटतो. राजानें मडक्यांतून पाणी पिण्यासारखें बाडग्याच्या बरोबरीनें मी व्याख्यान देणें आहे.

**वाढत होती चळवळ तिकडे क्रांति करायाची,**
**भडकत होतें माथें गोऱ्या नोकरशाहीचें.**
**यज्ञमंडपीं जसा पसरतो होमांतिल धूर**
**समाजामधें वाढुं लागला द्वेषहि चौफेर ! १७**

क्रांतिकारकांची चळवळ तिकडे वाढत होती तसें इंग्रज नोकरशाहीचें माथें भडकत होतें. यज्ञमंडपामध्यें होमांतील धूर जसा पसरतो तसा समाजामध्यें इंग्रजांबद्दलचा द्वेष चोहीकडून वाढत होता.

**संपादक करतात समर्थन अत्याचारांचें**
**असें विलक्षण झालें होतें मत सरकाराचें.**
**शिक्षा केल्या तयांस मोठ्या सक्त मजूरीच्या**
**नका विचारूं करुण कहाण्या हाल अपेष्टांच्या! १८**

संपादक अत्याचाराचें समर्थन करतात असें सरकारचें विलक्षण मत झालें होतें. मोठ्या म्हणजे लांब मुदतीच्या शिक्षा त्यांना देण्यांत आल्या. त्यांच्या हालअपेष्टांच्या कहाण्या कांहीं विचारू नका !

**आणि पाहुनी टिळक अग्रणी सर्व पुढाऱ्यांचे**
**अखेर ठरलें सरकाराचें त्यांस धरायाचें!**
**आणि पाहुनी संधि पकडले त्यांस अकस्मात**
**सरकारानें परांजितांवर केला आघात. १९**

सर्व पुढाऱ्यांचे टिळक हे अग्रणी आहेत असें पाहून त्यांनाही पकडावयाचें म्हणजे त्याच्यावरही खटला भरावयाचा असें सरकारनें ठरविलें, आणि संधि पाहून त्यांना अकस्मात पकडलें. पराजितांवर सरकारनें हा आघात केला.

**न्यायमंदिरामधें मिळाला न्याय खरा नाहीं;**
**अगतिक झाले श्रीटिळकांचे अनेक अनुयायी.**
**न्याय न मिळणें हेंच हिताचें कधीं कधीं असतें,**
**पराजितांच्या त्यागबुद्धिला तेज नवें चढतें. २०**

न्यायमंदिरांत म्हणजे कोर्टांत बरोबर न्याय मिळाला नाहीं म्हणून टिळकांचे अनुयायी अगतिक झाले होते. न्याय न मिळणें हेंच कधीं कधीं हिताचें असतें. त्यामुळें पराजितांच्या त्यागबुद्धीला नवें तेज चढतें.

आपण व्हावें सरकाराच्या पात्र विलोभास
वाटत असतें भूषण याचें उगाच कोणास.
अशाच कोणा नृपनिष्ठानें वर सरकाराला
खरें नि खोटें लिहुनि कळविलें याच सुमाराला. २१

सरकारी कृपेला आपण पात्र व्हावें याचें कोणाला उगाच भूषण वाटतें. अशा कोणा राजनिष्ठानें खरेंखोटें कांहींतरी सरकारला याच सुमारास कळविलें.

नानुवृत्तिचे लोक नेहमी अनेक असतात
जसे तांदुळामधें नको ते पांखड असतात.
सावरकर अन् टिळक यामधें लोभ असे कांहीं
ऐकुनि सरकारांस वाटलें यांत बरें नाहीं ! २२

तांदुळामध्यें जसे नको ते पाखड असतात त्याप्रमाणें समाजामध्यें नानावृत्तीचे लोक नेहमीं असतात. सावरकर आणि टिळक यांचा एक-मेकांवर लोभ आहे हें ऐकून सरकारला बरें वाटलें नाहीं.

अभिनव भारत देइल उत्तर या अभियोगाचें
सांगत होते मित्र कुणाला सावरकरजींचे.
कहर उडाला दडपशाहिचा हिंदुस्थानांत,
त्या ग्रहणाच्या कळा पसरल्या नाशिक शहरांत. २३

टिळकांवरील खटल्याचें उत्तर अभिनव भारत देईल असें सावरकर यांचे मित्र बोलत असत. हिंदुस्थानमध्यें दडपशाहीनें कहर उडवला होता. त्या ग्रहणाच्या कळा नाशिक शहरांत पसरल्या.

* * *

स्वराज्य नाहीं राजा नाहीं द्रोह तिथें कसला,
देशासाठीं वध केला तर त्यांत गुन्हां कसला!

## (३३) गणेश सावरकरांना शिक्षा

नाशिक आहे मुख्य केंद्र हें क्रांतीकार्याचें.
होतें तिकडे लक्ष कधीचें नोकरशाहीचें
जसा रोखुनी डोळा बसतो राहु रवीवरती,
सरकाराची या केंद्रावर होति तशी दृष्टी. २४

क्रांतिकारकांचें नाशिक हें एक मुख्य केंद्र आहे इकडे नोकरशाहीचें केव्हांपासून तरी लक्ष होतें. जसा रवीवर राहू आपला डोळा रोखून असतो तशी या केंद्रावर सरकारची दृष्टि रोखलेली होती.

आणि मुख्य श्रीगणेश आहे नाशिक केंद्राचा
होता म्हणुनी त्यावर डोळा नोकरशाहीचा.
निमित्त शोधुनि त्यास पकडले मुंबइ शहरांत
निमित्त काढुनि जसा प्रचारक शिरतो वाड्यांत.२५

आणि या नाशिक केंद्राचे गणेशपंत सावरकर प्रमुख आहे म्हणून नोकरशाहीचा त्यांच्यावर डोळा होता. कांहीं तरी निमित्त काढून प्रचारक वाड्यांत शिरतो त्याप्रमाणें कांहींतरी निमित्त शोधून त्यांना मुंबई शहरांत पकडण्यांत आलें.

अखेर झाली शिक्षा ऐकुनि गणेशपंतांस
पीडा गेली असें वाटलें इंग्रज लोकांस!
होता पोलिस मुख्य कोणसा इंग्रज जातीचा
द्वेष पोंचला शिगेस तेव्हां त्या अधिकाऱ्याचा. २६

अखेर गणेश सावरकर यांना शिक्षा झाली. पीडा गेली असें इंग्रज लोकांना वाटलें. इंग्रज जातीचा कोणी पोलिसप्रमुख होता. त्या अधिकाऱ्याचा द्वेष शिगेस पोंचला !

म्हणे ' फिरवतो नांगर याच्या घरदारावरुनी
क्रांतीची भाषाच यापुढें करुं नये कोणी.
हीं चिलटें करणार म्हणें देशांत नवी क्रांती
क्रांती म्हणजे पोरखेळ कां हीं पोरें म्हणती. २७

याच्या घरदारावरून नांगर फिरवतो. म्हणजे क्रांतीची भाषाच यापुढें कोणी करणार नाहीं. काय म्हणे हीं चिलटें देशांत नवी क्रांति करणार ! क्रांति म्हणजे पोरखेळ आहे अशीं ही पोरें समजतात असें तो अधिकारी म्हणे.

कोठें आम्ही बलाढ्य इंग्रज हे हिंदू कोठें,
कोठें तें साम्राज्य आमुचें – भारत हा कोठें !
इंग्रज राज्यामधें विसावा रवीसही नसतो;
मिजास पण हा गणु सावरकर पहा किती करतो! २८

आणि तो पुढें असेंही म्हणे कीं आम्ही बलाढ्य इंग्रज कोठें आणि हे हिंदु कोठें! आमचें साम्राज्य कोठें आणि हा भारतदेश कोठें ! इंग्रजी राज्यांत सूर्यालाही विसावा मिळत नाहीं. पण हा सावरकर किती मिजास करतो पहा.

ठोका दंडा बेडि नि काढा धिंड गणेशाची,
या मूर्खाला तरी घडूं द्या अद्दल जन्माची !
अंदमान बेटांतुनि वाचुनि हा कसला येतो !
इतरांना तरि कळेल शेवट काय कसा होतो.' २९

दंडाबेडी ठोकून या गणेश सावरकराची धिंड काढा. या मूर्खाला तरी जन्माची अद्दल घडू द्या ! अंदमान बेटांतून हा कसला वांचून येतो. अशा चळवळीचा इतरांना तरी काय शेवट होतो हें कळेल.

**अशा वल्गना करीत होता पोलिस अधिकारी,**
**ऐकत होता उभा राहुनी काळ पुढें दारीं !**
**मोजित होते वर्ष विनायक भारतभवनांत**
**होइल केव्हां साम्राज्याचा अखेरचा अंत !** ३०

अशा वल्गना तो पोलिस अधिकारी करीत होता आणि पुढील दारीं उभा राहून काळ ऐकत होता. इंग्रजीसाम्राज्याचा अखेर अंत केव्हां होईल याची विनायकराव सावरकर वर्षें मोजीत होते.

**वाळवणें ठेवावि नि यावा मधेंच पाऊस**
**गडबड उडते जशी स्त्रियांची ती उचलायास,**
**तशी पोंचली आज्ञा येउनि कुणा वरिष्ठाची**
**आणि उडाली एकच धांदल पोलिस खात्याची!** ३१

वाळवणें ठेवावीं आणि मध्येंच पाऊस यावा म्हणजे स्त्रियांची तीं वाळवणें उचलण्यासाठीं जशी गडबड उडते त्याप्रमाणें कोणातरी वरिष्ठाचा हुकूम आला आणि पोलिसखात्याची धांदल उडाली !

**आग लागली आणि जळालें घरकुल कोणाचें**
**क्षणांत जैसें वृत्त पसरतें घरकुल जळल्याचें,**
**तसें येथुनि गणेशबाबा पुण्यास जाणार**
**नाशिकामधें वृत्त पसरलें हें दारोदार !** ३२

आग लागून कोणाचें घरकुल जळालें म्हणजे ती बातमी म्हणजे तें घर जळाल्याची वार्ता सर्वत्र होते. त्याप्रमाणें गणेशपंत सावरकर यांना पुण्यास नेणार ही बातमी नाशिक शहरांत घरोघर झाली.

**दारा आडुनि जसें बोलणें ऐकुनि सासूचें**
**सून बांधतें धोरण अपुल्या पुढील कामाचें;**
**आडवेळ पाहूनि उघडलें खोलीचें दार,**
**सहज समजला गणेश संकट नवीन येणार ! ३३**

दाराआड उभें राहून सासूचें बोलणें ऐकल्यावर आपल्या पुढील कामाचें धोरण सून जशी बांधते त्याप्रमाणें आडवेळीं तुरुंगाच्या खोलीचें दार उघडल्याचें पाहून आपल्यावर कांहीं नवें संकट येणार हें गणेशपंत सावरकर यांच्या तेव्हांच लक्षांत आलें.

**घरांत येतें आणि नको जें तें भलत्या वेळीं**
**मागुनि समजा येत असावें संकट त्या वेळीं.**
**संसारांतिल अशुभ दिनांच्या अभद्र काळांत**
**नकोत ते ते प्रकार सारे घडून येतात ! ३४**

भलत्या वेळीं जें नको तें घरांत आलें म्हणजे त्या मागून कांहीं संकट येणार असें समजा. संसारांतील अशुभ दिवसांच्या अभद्र काळांत नको नको ते सारे प्रकार घडून येतात.

**जसा अवेळीं पडूं नये पाऊस कधीं काळीं,**
**फळास येऊं नये अवेळीं वृक्ष कधीं काळीं,**
**नारळ फोडूं नये अवेळीं धनिक असो कोणी,**
**तसा अवेळीं परका येऊं नये कधीं कोणी ! ३५**

ज्याप्रमाणें अवेळीं पाऊस पडू नये, वृक्षाला अवेळीं केव्हांही फळें लागूं नयेत, श्रीमंत असला तरी अवेळीं कोणी नारळ फोडूं नये, त्याप्रमाणें अवेळीं कोणी परका कधीं घरीं येऊं नये.

**घे थाळी टमरेल आणि घे कपडे खाकेंत,**
**मला म्हणाले वरिष्ट त्याला आण कचेरींत.**
**आणि म्हणे निश्वास सोडुनी तो दावेदार**
**'चलान' येथुनि तुझें असावें लौकर जाणार ! ३६**

थाळी, टमरेल घे आणि कपडे खाकेंत घे. तुला कचेरींत घेऊन ये असें मला साहेब म्हणाले. आणि असें बोलल्यानंतर एक निश्वास सोडून तुझें चलान येथून लवकर जाणार असावें असें तो दावेदार म्हणाला. 'चलान' म्हणजे अंदमानला पाठवावयाची कैद्यांची तुकडी.

**राव कुणाला ठार मारलें काय गुन्हा केला,**
**हा चलनाचा मान एवढा प्राप्त कसा झाला !**
**कुठें दरवडा घातलास, तूं खून किती केले ?**
**रामोशाचें भाग्य बामणा तुला कसें आलें ! ३७**

काय राव कोणाला ठार मारलें आणि काय गुन्हा केला ? हा चलनाचा एवढा मान कसा मिळाला ? कोठें दरवडा घातलास, किती खून केलेस ? हें रामोशाचें भाग्य बामणा तुला कसें मिळालें.

**केव्हां येते वेळ विलक्षण आणि अशी कांहीं**
**उत्तर तेव्हां तयास देणें दिसत बरें नाहीं !**
**भल्या भल्यांना स्वीकारावें लागतसें मौन;**
**मानुनि घ्यावें आणि लागलें त्यांत समाधान ! ३८**

अशी कांहीं विलक्षण वेळ केव्हां येते, तेव्हां प्रश्नाला उत्तर देणें बरें दिसत नाहीं ! भल्याभल्यांना मौन स्वीकारावें लागतें आणि त्यांतच समाधान मानून घ्यावें लागतें.

* * *

**स्वराज्य नाहीं, राजा नाहीं, द्रोह तिथें कसला !**
**देशासाठीं वध केला तर त्यांत गुन्हा कसला.**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ............ २० मि: ......
क्रमांक ............ नों: दि: ...



## (३४) गणेशपंतांची मिरवणूक

पडली नव्हती सुवर्ण किरणे अजूनि संध्येची,
झाली नव्हती रविरायाची वेळ निघायाची,
नीट दिसावें दिवसाढवळ्या लहान थोरांना
फिरवित, मिरवित न्यावें ठरलें गणेशपंतांना. ३९

संध्येची सुवर्ण किरणे अजून पडली नव्हती. आणि सूर्य मावळण्यास अजून वेळ होता. दिवसाढवळ्या लहान थोरांना नीट दिसावें म्हणून गणेशपंत सावरकर यांना गांवांतून फिरवीत मिरवीत न्यावयाचें पोलिसखात्याचें ठरलें.

आणि ठोकल्या बेड्या त्यांच्या बळेंच हातांत
पायामधल्या लोहशृंखला अडकवल्या त्यांत.
तोंच बांधलें पाठीवरती थाळी टमरेल
आणि टाकलें पांथस्थानें पहिलें पाऊल ! ४०

आणि त्यांच्या हातांत पोलिसांनीं बळेंच बेड्या घातल्या आणि पायामधील लोखंडाच्या साखळ्या त्यांत अडकवल्या ! आणि पाठीवर थाळी टमरेलही बांधलें आणि पांथस्थानें पहिलें पाऊल बाहेर टाकलें.

राजबंदिला लोहशृंखला म्हणजे फुलमाळा
ही फुलमाळा ज्यास लाभली तो पावन झाला.
असेंच असतें दिव्य दिव्य या फुल फुलमाळेचें
या मानास्तव लागत असतें निशाण क्रांतीचें ! ४१

राजबंदीला लोखंडाच्या साखळ्या फुलांच्या माळेप्रमाणें वाटतात. ही फुलांची माळ ज्याला लाभली तो पवित्र झाला ! या दिव्य फुलांच्या माळेचें असेंच दिव्य असतें. या मानासाठीं क्रांतीचें निशाण उभारावें लागतें.

**तोंच उघडला बंदिघराचा दिल्ली दरवाजा**
**'चलो' म्हणाला सुरूं जाहला प्रवास बाबांचा.**
**पुढें नि मागें चालत होते सशस्त्र पोलीस**
**लोक लागले जमूं भराभर त्यांस बघायास. ४२**

तोंच तुरुंगाचा दिल्ली दरवाजा उघडला. पोलीस 'चलो' म्हणाला आणि बाबांचा प्रवास सुरू झाला ! पुढें आणि मागें सशस्त्र पोलिस चालत होते. त्यांला पहाण्यासाठीं भराभर लोक जमूं लागले.

**आणि विलक्षण दृश्य बघोनी गणेशबाबांचें**
**भरुनि आलें दुःखभरानें नयन कितीकांचे.**
**लोकांचा उत्साह निघाला जणुं वनवासाला,**
**गांवाचा आनंद आवघा मावळुनी गेला. ! ४३**

आणि गणेशपंत सावरकरांचें तें विलक्षण दृश्य पाहून कित्येकांच्या डोळ्यांत पाणी आलें. जणूं काय लोकांचा उत्साहच वनवासाला निघाला होता. गांवाचा सारा आनंद मावळून गेला.

**चोर दरवडेखोर घालती त्या पोषाखांत**
**गणेश पाहुनि डोळ्यावरती ठेवियला हात,**
**आणि म्हणाले वृद्ध आणुनी प्राण जरा कंठीं,**
**सरकारानें सूड उगवला या पोरावरती. ४४**

चोर आणि दरवडेखोर यांना जो पोषाख तुरुंगांत देतात त्याच पोषाखांत गणेशपंतांना पाहून डोळ्यावर हात ठेवीत आणि प्राण कंठांत आणून वृद्ध माणसांचे उद्‌गार निघाले कीं या पोरावर सरकारनें सूड उगवला !

होत्या गेल्या स्त्रिया देवळामधें पुराणाला
तशाच मागें घरांस फिरल्या बघुनि गणेशाला.
आणि देवळांतील पुराणें स्थगित कुणी केलीं;
शिस्तखोर मंडळी फिराया नाहिं कुणी गेली. ४५

देवळांत पुराण ऐकण्यासाठीं बायका गेल्या होत्या. गणेशपंतांना पाहून त्या तशाच घरीं परतल्या आणि देवळांतील पुराणें कोणी बंद केलीं. नियमानें फिरावयास जाणारी मंडळी फिरावयास गेली नाहींत.

कधींच होत्या सुटून गेल्या गांवांतिल शाळा;
शाळेमधलीं मुलें जहालीं सभोवती गोळा.
आणि लागलीं स्वातंत्र्याचा करावया घोष,
देउं लागले सरकाराला कुणी कुणी दोष. ४६

गावांतल्या शाळा तर केव्हांच सुटल्या होत्या. त्यामुळें गणेशपंतांच्या सभोवती शाळेमधलीं मुलें गोळा झालीं. आणि स्वातंत्र्याच्या घोषणा करूं लागली. कोणी कोणी सरकारला दूषणें देत होते.

दोन्हि बाजुनीं पहात होते लोक गणेशास
जशी काय पालखी निघाली आज फिरायास.
कुणी अरेरे ! म्हणे नि काढी निषेध उद्गार;
गणेश होता हंसून त्यांना करित नमस्कार. ४७

रस्त्याच्या दोन्ही बाजूंनीं उभे राहून जशी काय आज पालखी फिरावयास निघाली आहे असें बाबा सावरकरांना लोक पहात होते. अरेरे असें कोणी म्हणे आणि निषेध करी. गणेशपंत त्यांना हंसत हंसत नमस्कार करीत.

**आणि नको करुणास्पद असलें दृश्य बघायाला**
**श्रीसूर्यानें मेघ आपुल्या डोळ्यांवर धरला !**
**दुःख शोक अन् निषेध कोणी व्यक्त करायास**
**थांबवला व्यापार; लावलें कुलुप दुकानास. ४८**

आणि हें करुणास्पद दृश्य पहावयास नको म्हणून सूर्यानें आपल्या डोळ्यावर ढग धरला होता. दुःख, शोक आणि निषेध व्यक्त करण्यासाठीं व्यापाऱ्यांनीं आपला धंदा थांबवला, आणि कुलपें लावून दुकानें बंद केलीं.

**घरांत कोठें वृक्षांवर अन् कुठें लतांवरती**
**बसुनि पांखरें करूं लागलीं किलकिल चिवचिव ती.**
**कुठें जरासें दूर लागलें श्वान रडायास,**
**भुंकत होतें श्वान पाहुनि सशस्त्र पोलीस. ४९**

कोठें घरांत तर कोठें वृक्षावर तर कोठें वेलीवर वसून पांखराची चिवचिव अशी किलकिल चालू होती. जरासें लांब कोठेंसें कुत्रें रडत होतें. सशस्त्र पोलिसांवर कुत्रीं भुंकत होतीं.

**स्वागत केलें गुप्तमंडळामधील मित्रांनीं**
**भरून गेलें स्वातंत्र्याच्या नभ जयकारांनीं !**
**गणेशही सामील जाहला जयजयकारांत**
**आणि वाजवी बळें सांखळ्या वर करुनी हात ! ५०**

गुप्तमंडळांतील मित्रांनीं बाबांचें स्वागत केलें. स्वातंत्र्याच्या जयजयकारांनीं आकाश भरून गेलें. त्या जयजयकारांत गणेशपंतही सामील झाले. आणि हात वर करून ते बळेंच साखळ्या वाजवीत.

**तोंच पुढें येऊन कुणीसे हळूंच खुणवीलें**
**ज्याचे त्याला शब्द खुणेचे सहजपणें कळले.**
**दटावयाला तोंच लागले पोलिस तरुणांना;**
**जन उत्साहापुढें तयांचें कांहिंच चालेना! ५१**

तोंच पुढे येऊन कोणीसें हळूंच खुणावलें. ज्याचे त्याला खुणेचे शब्द सहजपणें कळले. तोंच तरुणांना पोलीस दरडावूं लागले. पण लोकांच्या उत्साहापुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं.

**दिमाख गेला म्हणुन शरमले मनांत पोलीस;**
**मौज यांत पण वाटत होती गणेशपंतास.**
**जशी निघावी मिरवणूक ही लोकपुढा यांची**
**तशी चालली मिरवणूक ती गणेशपंतांची. ५२**

आपला दिमाख गेला म्हणून पोलिस मनांतून शरमले होते. पण त्यांची गणेशपंतांना मौज वाटत होती. लोकांच्या पुढाऱ्यांची जशी मिरवणूक निघावी तशी गणेशपंतांची ही मिरवणूक चालली होती.

**तोंच घोळका द्वाड मुलांचा घरामधें शिरला**
**आणि म्हणे मिरवणूक आली चला बघायाला.**
**शिवलीलामृत वाचित होत्या घरामधें वहिनी,**
**बसल्या होत्या चार मैत्रिणी ऐकाया कोणी. ५३**

तोंच द्वाड मुलांचा घोळका घरांत शिरला आणि मिरवणूक आली बघावयाला चला असें म्हणाला. घरामध्यें यशोदावहिनी शिवलीलामृत वाचीत होत्या आणि कोणी चार मैत्रिणी ऐकत बसल्या होत्या.

**पोथीवरुनी कशी उठूं मी तुम्हींच या बघुनी**
**आणि आमुचीं मुलें काय दिसतात बघा कोणी.**
**दिसला कोणी सांगा त्याला बोलविते वहिनी**
**म्हणेन मी ये त्यास भेटिचीं वेळ विचारुनी. !** ५४

पोथीवरून मी कशी उठू, तुम्हीच मिरवणूक बघून या आणि तिकडे आमचीं मुलें कोणी तुम्हांला दिसतात का बघा. दिसलीं तर वहिनी बोलवीत आहे असें सांगा. भेटीची वेळ (म्हणजे तुरुंगांत असलेल्या गणेशपंतांच्या भेटीची वेळ) विचारून ये असें मी त्यांला सांगणार आहे.

**एक असावें मनांत घडतें जनामधें दुसरें,**
**दैवाचा हा खेळ मानवा काय म्हणूं दुसरें ! !**
**धांवत येउनि तोंच म्हणे कुणि सून गरीबाची**
**दिसते मज मिरवणूक बाई ही बहुधा तुमची.** ५५

तोंच एक गरिबाची सून धांवत येऊन म्हणाली ' बाई ही बहुधा तुमचीच म्हणजे गणेशपंतांची मिरवणूक दिसते. मनांत एक असावें आणि जनांत दुसरें घडावें हा दैवाचा खेळ होय. याहून दुसरें मानवा, मी तरी काय म्हणणार.

**तशाच गेल्या वहिनी यशोदा भाषण ऐकून**
**हातामधलें पान पोथिचें तसेंच टाकून.**
**आणि जाउनी राहतात जों उभ्या पुढें खालीं**
**मिरवणूक ती गर्जत गाजत घरापुढें आली !** ५६

हें तिचें म्हणणें ऐकून पोथीचें पान तसेंच टाकून वहिनी यशोदा तशाच खालीं जाऊन पुढें उभ्या राहतात तो मिरवणूक गर्जत घरापुढें आली.

**आणि पाहिलें तोंच पाहिलें गणेशपंतांना**
**पाहुनि पतिला रडूं तियेचें तिलाच अवरेना !**
**हुंबरडा ऐकूनि सतीचा गहिंवरले कोणी;**
**वाहुं लागलें कित्येकांच्या डोळ्यांतुनि पाणी.** ५७

आणि पाहतात तो गणेशपंत त्यांना दिसले. पतीला पाहून यशोदा वहिनींना रडूं आवरतां येईना. सतीचा हंबरडा ऐकून कोणास गहिंवरून आलें तर कित्येकांच्या नेत्रांतून पाणी वाहूं लागलें !

**क्षणभर झाला भास थांबला वायु वहायाचा**
**ऐकु येइना श्वास कुणाला कुणास कोणाचा.**
**खळखळ सळसळ शब्द तेवढे लोहशृंखलांचे**
**विजेसारखे भेदित होते हृदय अनेकांचें.** ५८

वाराच बंद झाला असा क्षणभर भास झाला. नुसता श्वाससुद्धां कोणाचा कोणाला ऐकूं येईना. साखळदंडाचा खळखळ आवाज अनेकांचीं हृदयें विजेसारखा भेदून गेला.

**पहात होतीं मुलें कोवळीं सतरा अठराचीं;**
**मुलें मुलें तीं होति सभासद क्रांतिमंडळाचीं.**
**खुणा जाहल्या तिथेंच ठरलें कांहि तरी त्यांचें**
**काळालाही कळलें नाहीं वृत्त प्रतिज्ञेचें !** ५९

सतरा अठरा वयाचीं कोवळीं मुलें हा प्रकार पहात होतीं. क्रांतिमंडळाचीं तीं मुलें सभासद होतीं. एकमेकांमध्यें खुणा होऊन त्याचें कांहींतरी ठरलें. त्यांनीं केलेल्या प्रतिज्ञांचें वृत्त काळालाही समजलें नाहीं.

**येइल तात्या लौकर अपुला विलायतेंतून,**
**करूं नको काळजी नि मीही सुटून येईन.**
**नको रडूं बघ मिरवणूक ही अमुच्या विजयाची !**
**अशी लागते करावयाला भक्ति स्वदेशाची. ६०**

आपला तात्या विलायतेंतून लौकर येईल काळजी करू नकोस. आणि मी सुद्धां लौकर सुटून येईन. रडूं नकोस. आमच्या विजयाची ही मिरवणूक पहा. स्वदेशभक्ति अशी करावी लागते.

**असें म्हणाले गणेशबाबा सती यशोदेला**
**वैद्य सांगतो जसा आपुल्या जुनाट रोग्याला.**
**येउनि बसल्या उजाड झाल्या घरामधें वहिनी;**
**कळलें नाहीं पंथि लावली आणि कधीं कोणी! ६१**

जुन्या रोग्याला वैद्य जसें औषध सहज सांगतो तसें सती यशोदेला गणेशपंत सहज म्हणाले. उजाड झालेल्या घरामध्यें वहिनी जाऊन बसल्या. कधीं कोण समई लावून गेलें हें त्यांच्या लक्षांतही आलें नाहीं.

**तोंच मारली दारावरती थाप हळू कोणी**
**स्वप्न संपलें आणि विनायकराव बसे उठुनी.**
**आणि म्हणाले उघडा उघडा खोलीचें दार;**
**मदन आंत येऊन म्हणे घ्या हें तुमचें पत्र. ६२**

इतक्यांत कोणीतरी दारावर थाप मारली. स्वप्न संपलें आणि विनायकराव उठून बसले आणि म्हणाले उघडा, उघडा खोलीचें दार उघडा. हें तुमचें पत्र घ्या असें आंत येत मदनलाल म्हणाला.

* * *

**स्वराज्य नाहीं राजा नाहीं देश असा कसला !**
**देशासाठीं वध केला तर त्यांत गुन्हा कसला !**

## (३५) येसूवहिनींचें अभिनन्दन

पत्र वाचलें पुन्हां वाचलें ठेवियलें खालीं,
पुन्हां घेउनी पुन्हां वाचलें; ठेवियलें खालीं !
पत्र कुणाचें अवचित येतें असें कधीं कांहीं
पुन्हां पुन्हां वांचूनि तृप्तता होत कधीं नाहीं. ६३

विनायकांनीं पत्र वाचलें! पुन्हां वाचलें आणि खालीं ठेऊन दिलें. पुन्हां घेऊन वाचलें आणि खालीं ठेवलें. कोणाकडून अवचित कधीं केव्हां असें पत्र येतें कीं तें पुन्हां पुन्हां वाचून तृप्तता होत नाहीं.

शब्द कमी पडतात पडे कमि तेजहि शब्दांचें.
शब्दांहुनि बोलतात अश्रू हृदय बिचाऱ्यांचें !
सांगत होते करुण कहाणी टिपलेले आसूं;
ऐकुनि ती काहणी तयाचे मावळले आसूं.! ६४

शब्द कमी पडतात, शब्दांचें तेजही कमी पडतें. बिचाऱ्याचें हृदय शब्दांपेक्षां अश्रुच बोलतात. टिपलेले अश्रु करुण कहाणी सांगत होते. ती कहाणी ऐकून विनायकाचे चेहऱ्यावरील हंसू नाहिसें झालें.

सुखदुःखाचे भाव बोलतें बिंब मुखावरचें
गुपीत कांहीं ठेवत नाहीं निसर्ग कोणाचें !
दिसून नाहीं देत आपुल्या भाव मुखावरचा
मुक्त असावा एक, असावा तो शठ मुलखाचा ! ६५

सुखदुःखाच्या भावना मुखावर प्रतिबिंबित होतात. निसर्ग कोणाचें कांहीं गुप्त ठेवीत नाहीं. ज्याच्या चेहऱ्यावर भाव प्रकट होत नाहीं तो एक मुक्त असावा किंवा तो मुलखाचा शठ तरी असावा !!

**पत्र ठेउनी म्हणे मदन जा भेट मला रात्रीं**
**सवड काढुनी ये मग बोलू कांहि नव्या गोष्टी !**
**थांब पहा पण दार आपुलें वाजवितो कोण;**
**तोंच उघडुनी दार पातले विद्यार्थी दोन. ६६**

पत्र खालीं ठेऊन तो मदनलालला रात्रीं मला भेट. सवड काढून ये, आपण कांहीं नव्या गोष्टी बोलूं. पण थांब; आपलें दार कोण वाजवितो तें पहा. इतक्यांत दार उघडून दोन विद्यार्थी आंत आले.

**यावें यावें मदन, भिडे घ्या खुर्ची सरकून**
**काय एवढें विशेष आला अवेळ साधून !**
**बरें जाहलें संपुनि गेले कष्ट परीक्षांचे;**
**व्हाल तुम्ही साहेब आमुचे लठ्ठ पगाराचे ! ६७**

या मदन भिडे या. ती खुर्ची सरकवून घ्या. अशा अवेळीं येण्या इतकी काय विशेष बातमी आहे. परीक्षांचे कष्ट संपले हें बरें झालें ! आता तुम्ही मोठ्या पगाराचे आमचे साहेब होणार !

**विद्यार्जन संपलें किं फुलतो बाग विचारांचा**
**एक अंक संपतो अपुल्या जीवननाट्याचा.**
**आयुष्यांतिल पहिला असतो काळ शिकायाचा**
**वर्षामधला श्रावण जैसा मास बहारीचा ! ६८**

विद्यार्जन संपलें कीं विविध विचारांचा बगीचा फुलतो. जीवन नाट्याचा एक अंक संपतो. आयुष्यांतील पहिला वहिला शिकावयाचा काळ वर्षाऋतूमधील श्रावण महिन्यासारखा बहारदार असतो.

**पुढील सप्ताहांत आमुचें जहाज जायाचें**
**म्हणून आलों घ्यावयास मी शुभदर्शन तुमचें !**
**लोभ असावा जरी जहालों नोकर सरकारी**
**तुमचें झालें ऋण आम्हांवर अमोल अन् भारी. ६९**

पुढील आठवड्यांत आमची बोट सुटणार म्हणून तुमच्या दर्शनासाठीं आम्ही आलों आहोंत. आम्ही सरकारी नोकर जरी झालों तरी आमच्यावर आपला लोभ असावा. आमच्यावर आपलें अमोल ऋण झालें आहे आणि तें फार आहे.

**छे, छे, आपण मनांत आणूं नका असें कांहीं**
**स्वदेशसेवा करतां येइल राहुनि कोठेंही !**
**उद्यां तुम्ही होणार सुभ्याचे बडे सुभेदार**
**कर्तुमकर्तुम् तुमच्या हातीं असेल अधिकार ! ७०**

छे, छे, आपण असें मनांत आणूं नका. कोठेंही राहून स्वदेशाची सेवा करतां येईल. उद्यांपासून तुम्ही जिल्ह्याचे बडे अधिकारी होणार. कमर्तुकर्तुम् असा तुमच्या हातीं अधिकार असेल.

**काम कचेरींतील आपुलें करीत असतांना**
**सहाय्य होइल कसें बघा हें अमुच्या मित्रांना.**
**निसर्ग निर्बंधांत ठेउनी गति स्वच्छंदाची**
**चंद्र फुलवितो रात्र चांदणी सहर्ष पृथ्वीची. ७१**

कचेरींत आपलें काम करीत असतांना आमच्या मित्रांना कसें सहाय्य देतां येईल तें बघा. आपले छंद निसर्गनियमानुसार पाळत असतांना पृथ्वीवर चंद्र सहर्ष चांदणी रात्र फुलवतो.

**आम्ही जेव्हां मिरवित येऊं झेंडा क्रांतीचा**
**तेव्हां आपण पुढें करावा हात सहाय्याचा.**
**उलथुनि टाकूं राज्य इंग्रजी यवन-इसायांचें**
**तुम्ही व्हाल मग नोकर अपुल्या नव सरकाराचे.** ७२

आम्ही जेव्हां क्रांतीचा झेंडा मिरवीत येऊं तेव्हां तुमच्या मदतीचा हात तुम्ही पुढें करावा. यवन-इसायांचें राज्य उलथून टाकल्यावर आपल्या नव्या सरकाराचे तुम्ही नोकर व्हाल.

**असाल तेथुनि शुभ चिंतावें राज्यक्रांतीचें,**
**मनांत आम्ही समजुनि आहों मित्र तुम्ही अमुचे.**
**तोंच तार येऊनि थडकली सावरकरजींना**
**अंदमान बेटांत धाडलें गणेशपंतांना !** ७३

ज्या ठिकाणीं तुम्ही असाल तेथून राज्यक्रांतीचे शुभ चिंता. तुम्ही आमचे मित्र आहांत हें आम्ही मनांतून ओळखून आहोंत. इतक्यांत गणेश सावरकरांना अंदमान बेटांत धाडल्याची तार विनायकांना आली.

**आधिच होते भडकुनि ऐकुनि शिक्षा टिळकांची**
**बोलत होले मित्र तयाचे भाषा सूडाची!**
**जशास तसे दिलें न उत्तर जर बलवानास**
**होतो त्याचा तापच नसतां विरुद्ध पक्षास !** ७४

टिळकांना शिक्षा झाल्याचें ऐकल्यापासून विनायक सावरकर आधिच भडकून होते. त्यांचा आपण सूड घेतला पाहिजे असें त्यांची मंडळी बोलत होती. बलवान असणाऱ्यांना जशास तसें उत्तर दिलें नाहीं तर विरुद्ध पक्षास त्याचा तापच होतो.

**वाढत होती मस्ति हळूहळुं इंग्रज राजाची,**
**वाढत होती तशी तयारी राज्यक्रांतीची.**
**बसेल धक्का सरकाराच्या मस्त मिजाशीला**
**असा विनायक आंखित होते कार्यक्रम अपुला. ७५**

इंग्रज सरकारचा माजुरीपणा हळूहळू वाढत होता. तसतशी राज्य-क्रांति करावयाची तयारी वाढत होती. सरकारची मस्त मिजास कमी होईल असा आपला कार्यक्रम विनायक होते आखीत होतें.

**असाच असतो क्रांतीचा शुभवेळ सलामीचा.**
**चेतवावया लागत असतो त्वेष समाजाचा.**
**अग्निरसाचा पर्वत येतो जसा उफाळून**
**तसा भडकतो समाज; पडते सत्ता उलथून. ७६**

क्रांतीच्या प्रारंभीचा शुभकाळ असाच असतो. समाजाचा त्वेष वाढवावा लागतो. ज्वालापर्वत जसा उफाळून येतो तसा समाज उसळतो आणि सत्ता उलथून पडते.

**लोकसभेला करून द्याया परिचय संस्थेचा,**
**प्रात्यक्षिक येथेंच करावें विचार नेत्याचा;**
**नव्हतें त्याचें तितकेसें पण चित्त समाधा नी;**
**मनांत येई करीत असतिल काय घरीं वहिनी ! ७७**

पार्लमेंटला आपल्या अभिनवभारत संस्थेची थोडीशी चुणूक येथेच दाखवावी असा नेत्यांचा म्हणजे सावरकरांचा विचार होता. पण त्यांच्या चित्ताला तितकेसें समाधान वाटत नव्हतें. घरी वहिनी काय करीत असतील हें त्याच्या मनांत येई.

**पत्र लिहावें एक आपुल्या प्रेमळ वहिनीस**
**दार लावुनी बसे विनायक पत्र लिहायास.**
**मोठा जो असतो अन् असतो महान ध्येयाचा**
**नाहि तयाच्या येत मुखांतुनि शब्द निराशेचा ! ७८**

आपल्या प्रेमळ वहिनीला पत्र लिहावें म्हणून विनायक दार लावून पत्र लिहावयास बसले. जो विचारानें मोठा असतो आणि ज्याचें ध्येय मोठें असतें त्याच्या मुखांतून निराशेचा शब्द निघत नाहीं.

**पुसले त्यानें प्रथम आपुल्या अश्रु मुखावरचे**
**हळू टिपावे जसे दवाचे बिंदु फुलावरचे.**
**भरूनि घेई टाक; ठेवि तो; भरुनि पुन्हां घेई.**
**कांहि वेळ पण काय लिहावें तें सुचलें नाहीं ! ७९**

फुलांवरचे दवबिंदु टिपावे तसे त्यानें आपल्या मुखावरील अश्रु पुसले. टाक भरून घेतला तसाच तो खालीं ठेवला. पुन्हां तो भरून घेतला. काय लिहावें हेंच त्याला कांहीं वेळ सुचलें नाहीं.

**वहिनी, तुमचें पत्र मिळालें कळलें मज वृत्त,**
**आणि मला आनंद जाहला तें वाचुनि पत्र.**
**अनेक फुलतीं फुलें फुलोनी सुकूनिया जाती,**
**कुणास त्याची महती, करतो कोण बरें गणती. ८०**

वहिनी तुमचें पत्र मिळालें आणि तिकडील वृत्त समजलें. तुमचें पत्र वाचून आनंद झाला. अनेक फुलें फुलतात आणि ती सुकूनही जातात तिकडे कोण लक्ष देतो आणि त्याला महत्त्व कोण देतो.

**धीर केवढा विशाल तुमच्या अंतःकरणांत,**
**उदात्ततेचा पवित्र निर्झर खळखळतो त्यांत.**
**बघून तुमची अगाध निष्ठा ही ध्येयावरती**
**अम्हा मुलांचीं शिरें खरोखर सहजपणें नमतीं. ८१**

तुमचें अंतःकरण केवढ्या तरी विशाल धीरानें भरलें आहे. त्यांत तुमच्या उदात्ततेचा पवित्र निर्झर वहात आहे. ध्येयावरील ही तुमची अगाध निष्ठा पाहून आम्हा मुलांचीं मस्तकें सहजपणें तुमच्या चरणीं नमतात.

**अनेक फुलतीं परी तोडलें पद्म गजेंद्रानें**
**तेंच तेवढें धन्य जाहलें हरिपद-स्पर्शानें.**
**धन्य खरोखर धन्य आपुला वंश तसा वहिनी.**
**कष्ट आपुले रुजू जहाले भारत-भूचरणीं. ८२**

अनेक कमलें फुलतात पण गजेंद्रानें तोडून जें हरिचरणीं वाहिलें गेलें तें कमल खरोखर धन्य होय. त्याचप्रमाणें वहिनी आपला वंशही धन्य आहे. भारतभूचरणीं आपले कष्ट रुजू झाले.

**अमर खरोखर अमर वंश तो जो लढतालढतां**
**होतो जो निर्वंश अपुल्या प्रिय राष्ट्राकरतां.**
**तुम्ही बांधलें सहर्ष कंकण महान् कार्याचें;**
**हवा महत्तमपणा बाणला अंगि अतां तुमचे ! ८३**

आपल्या राष्ट्रासाठीं लढतां लढतां ज्याचा निर्वंश होतो तो वंश खरोखर अमर झाला. महान् कार्याचें कंकण तुम्ही सहर्ष बांधलें आहांत. आता तुमच्या अंगीं मोठेपणा बाणला पाहिजे.

**आणि पाहिजे करावयाला कार्य असें कांहीं**
**म्हणतिल पूर्वज पूर्वी झालें असें कुणी नाहीं !**
**इतिहासांतरि चरित्र तुमचें पुराण होईल.**
**तशीच तुमची नित्य कीर्तनें समाज गाईल. ८४**

आणि तुम्ही आतां असें कांहीं कार्य केलें पाहिजे कीं आमच्या कुळांत असें कोणी झालेंच नाहीं असें पूर्वजांनीं म्हणावें. इतिहासांत तुमचें चरित्र पुराण होईल. त्याचप्रमाणें समाजांत तुमचीं कीर्तनें होतील.

**वहिनी वहिनी तुम्ही देवता आणि तुम्ही स्फूर्ती.**
**कीर्ति तुम्ही आमुची नि केवळ धैर्याची मूर्ती.**
**धन्यवाद मी वहिनि, तुम्हाला पुन्हां पुन्हां देतों.**
**वंदुनि तुमची पूज्य पदें मी पत्र पुरें करतों. ८५**

वहिनी तुम्ही देवता आहांत आणि तुम्ही आमची स्फूर्ति आहांत. तुम्ही आमची कीर्ति आहांत. तुम्ही केवळ धैर्याची मूर्ति आहांत. वहिनी मी तुम्हांला पुन्हां पुन्हां धन्यवाद देतो. आणि तुमच्या पूज्य चरणास नमस्कार करून मी हें पत्र पुरें करतों.

**पत्र जाहलें पुरें नि त्याचें मन झालें शांत**
**आणि ठेवलें बाजुस त्यानें लिहिलेलें पत्र;**
**शांत जाहलें तरी मनाला नसते विश्रांती.**
**मनास नसते विश्रांती ही--ही त्याची महती. ८६**

पत्र लिहून झालें तेव्हां त्याचें मन जरी शांत झालें आणि लिहिलेलें पत्र त्यानें बाजूला ठेवलें. मन जरी शांत असलें तरी मनास विश्रांति असत नाहीं. मनाला विश्रांति नसते हेंच त्याचें महत्त्व आहे.

**असेच होते दिवस चालले याच विचारांत,**
**जवान कोणी सैनिक आला भारतभवनांत.**
**लवुनि म्हणाला नम्रपणें कां सावरकर तुम्ही ?**
**तुमच्यापाशीं बोलायाचें असें मला कांहीं. ८७**

विचार करण्यांत असेच कांहीं दिवस चालले होते, भारतभवनांत कोणी तरुण सैनिक आला आणि लवून नमस्कार करून म्हणाला तुम्हीच कां सावरकर ? तुमच्याशीं मला कांहीं बोलावयाचें आहे.

**बसा बसा राहतां कुठें अन् नांव तरी काय ?**
**इकडे आला कुठें कशाला अन् करतां काय ?**
**प्रश्न विचारुनि हेरित होता असेल हा कोण;**
**राजकारणी धूर्तपणें घेतात निरीक्षून. ८८**

बसा बसा, तुम्ही राहता कुठे, तुमचें नांव तरी काय ? इकडे कोठें आला आणि करतां काय असे प्रश्न सावरकरांनीं त्याला विचारले. हा कोण असावा याचा ते तर्क करीत होते. राजकारणी धूर्तपणानें निरखून घेत असतात.

**सरकाराला वाटत असते भीति पुढाऱ्यांची**
**आणि वाटते पुढाऱ्यांस भयभीती हेरांची.**
**नातें असतें सरकाराचें आणि पुढाऱ्यांचें**
**जसे काय संबंध असावे मुंगुससर्पाचे ! ! ८९**

सरकारला पुढाऱ्यांची भीति वाटत असते आणि पुढाऱ्यांना हेरांची भयभीति असते. सरकारचें आणि पुढाऱ्यांचें नातें मुंगुससर्पासारखें असतें.

**आणि कुणी जे सशस्त्र क्रांतीकारक असतात.**
**सर्वच त्यांना भयभीतीनें विरोध करतात.**
**आग आग ती धरील हातीं असे असा कोण ?**
**जीव सुखाचा घालिल दुःखामधें असा कोण ! १०**

आणि जे कोणी सशस्त्र क्रांतिकारक असतात त्यांना सर्वांकडूनच विरोध असतो. ती आग हातांत कोण धरणार ? सुखाचा जीव दुःखामध्यें कोण घालणार ?

**छान जाहलें बरें भेटला बोलुं पुढें कांहीं;**
**असें जरा कामांत, पुन्हां या वेळ मला नाहीं.**
**तळमळ आहे किती नि आहे धीर किती याला**
**जरा बघावें; म्हणुनि म्हणाले सावरकर त्याला. ९१**

भेट झाली हें छान झालें बरें ! पुढें केव्हां तरी बोलूं. आज जरा कामांत असल्यामुळें मला वेळ नाहीं. आलेल्या जवानास भेटण्याची तळमळ किती आहे आणि किती दिवस तो थांबतो हें पहाण्यासाठीं सावरकर त्याला म्हणाले.

**पुन्हां आपणां भेटायाला मी कसचा येतों.**
**दोन शब्द बोलून आपला निरोप मी घेतों.**
**मला भेटला माझा ईश्वर हेंच समाधान,**
**नाहिं वेळ आपणांस तर मी जातों येथून. ९२**

आपली भेट घेण्यासाठीं मी पुन्हां कसला येतों ! दोन शब्द बोलून मी आपला निरोप घेतो. मला माझा ईश्वर भेटला यांतच मला समाधान आहे. आपल्याला वेळ नाहीं तर मी जातों.

**तळमळ त्याची आणि पाहुनि विनम्रता त्याची**
**ओळख पटली त्यास तयाच्या हृदयसतारीची;**
**बरें बरें आतांच बसूं तर सांगितलें त्यांनीं**
**आणि घेतलें दार लावुनी सावरकरजींनीं. ९३**

त्याची तळमळ पाहून आणि त्याचा नम्रपणा पाहून सावरकरांनीं त्याचें हृदय ओळखलें. बरें, बरें. आतांच आपण बोलत बसूं असें त्यांनीं सांगितलें आणि सावरकरांनीं दार लावून घेतलें.

**बोलत होते किती वेळ ते कांहि तरी गोष्टी.**
**किती जाहला वेळ तयाची तमा कुठें होती.!**
**जिव्हाळ्याचा विषय असावा आणि नवा स्नेही**
**बोलायाला दिवसरातही पुरत कधीं नाहीं. ९४**

कोणत्या तरी गोष्टी ते कितीतरी वेळ बोलत होते. किती वेळ झाला याची त्यांना पर्वा कोठें होती. जिव्हाळ्याचा विषय असला आणि नवा स्नेही असला म्हणजे दिवस रात्रही पुरत नाहींत.

**दिवस संपतो कुठें नि होते रात्र सुरू कोठें**
**ध्येयवेडया तो, त्याच्या हें गांवि कधीं नसतें.**
**निजेल तेव्हां रात्र नि उठता दिवस सुरू होतो,**
**ध्येयवादि कार्यांत आपुल्या धुंद सदा असतो ! ९५**

दिवस कधीं संपतो आणि रात्र कधीं सुरू होते हें जो ध्येयवेडा असतो त्याला माहीतच असत नाहीं. निजेल तेव्हां रात्र आणि उठेल तेव्हां त्याचा दिवस सुरू होतो. ध्येयवादी आपल्या कार्यांतच सदा धुंदफुंद असतात.

**तुम्हीं वाटलीं छापिल पत्रें अमुच्या सैन्यास;**
**वाचुनिया तीं पत्रें आलों मी भेटायास.**
**माझ्या आज्ञेवरूनि हलतें सैन्य हजारांचें**
**म्हणाल तेव्हां राहिन येउनि मी मागें तुमचे. ९६**

तुम्हीं छापिल पत्रें आमच्या सैन्यांत वाटलीं होतीं. तीं पत्रें वाचून मी तुम्हांला भेटावयास आलों आहे. हजारों सैनिक माझ्या हुकमतीखालीं असतात. तुम्हीं म्हणाल तेव्हां मी तुमच्या मागें येऊन उभा राहीन.

**दार उघडलें अखेर ठरलें कांहि तरी त्यांचें**
**दोघांवाचुनि तें तिसऱ्याला कसें कळायाचें !!**
**हांसत होते पण दोघांच्या मुखीं समाधान;**
**जवान गेला विनायकाचा निरोप घेऊन. ९७**

त्यांचें कांहींतरी ठरलें. काय ठरलें तें दोघांवाचून तिसऱ्याला कसें कळणार ? ते दोघे हंसत होते. त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसत होतें. विनायकांचा निरोप घेऊन जवान निघून गेला.

* * *

**स्वराज्य नाहि राजा नाहीं द्रोह तिथें कसला**
**देशासाठीं वध केला तर त्यांत गुन्हा कसला.**

## (३६) मदनलाल फांशीं गेला

**निजलें होतें शहर नि होती निजूनिया वसती**
**घालित होते गस्त शिपाई भर मार्गावरती !**
**ताऱ्यांनीं तर अंबर होतें प्रकाशलें वरती.**
**आणि खालती उजळत होत्या लाख निळ्या ज्योती ९८**

शहर निजल्यासारखें दिसत होतें. वस्ती निजून होती. रस्यावरून शिपाई गस्त घालीत होते. वरती आकाशांत ताऱ्यांचा प्रकाश पडला होता आणि खालीं लाख निळ्या ज्योती उजळत होत्या.

**हेंच असावें नभ भ्रमानें चुकलेल्या कोणी**
**देव अंगना खेळत होत्या प्रासादांमधुनी.**
**आणि अशा अपरात्रीं होते भारतभवनांत,**
**करीत होते सावरकरजी कांहितरी बेत. !** ९९

हेंच आकाश असावें अशा भ्रमानें देवांगना खालीं येऊन प्रासादामधून त्यांची क्रीडा चालू होती. आणि अशा अपरात्रीं भारत भवनांत सावरकरजी कांहींतरी बेत करीत होते.

**तोंच वाजलें दार चतुर्भुज आंत हळू आला;**
**ये इकडे मजपाशीं जो तो बैस म्हणे त्याला.**
**आजपासुनी मित्र आमुचा तूं अमुचा भाऊ;**
**तुझें नि अमुचें गाणें एकच-एकपणें गाऊं.** १००

तोंच दार उघडून चतुर्भुज आंत आला. ये इकडे ये माझ्यापाशीं बैस, आजपासून तूं आमचा मित्र झाला आहेस, तूं आमचा भाऊ आहेस, तुझें आणि आमचें एकच गाणें ! तें आपण एकत्र गाऊं.

**व्यवसायानें व्यवसायींचा जमतो व्यवहार.**
**ध्येय एक असल्यावर जमते हृदयाची तार.**
**ध्येयासाठीं मनुष्य असतो जगत जगावरती.**
**ध्येयासाठीं प्रकाशती रविचंद्र जगावरती.** १०१

व्यवसायानें व्यवसायींचा व्यवहार जमतो. ध्येय एक असल्यावर एकमेकांच्या हृदयाची तार जमते. मनुष्य ध्येयासाठीं जगांत जगत असतो. जगावर रविचंद्र ध्येयासाठीं प्रकाशत असतात.

**ध्येयासाठीं बकुल फुलें, अन् जाइ जुई फुलती.**
**ध्येयासाठीं देवि धरित्री फिरे स्वतांभवतीं.**
**ध्येय नाहिं तर जगणाऱ्यांचें जीवन तें कसलें !**
**ध्येय नाहिं तें मरणाऱ्यांचें मरण तरी कसलें. ! ! १०२**

बकुळवृक्ष ध्येयासाठीं फुलतो. जाईजुई ध्येयासाठीं फुलते. ध्येयासाठीं देवी धरित्री आपल्याच भवती फिरत असते. ध्येय नाहीं तर जगणाऱ्यांचें तें जीवन कसलें ! ध्येय नाहीं तर मरणाऱ्याचें तें मरण तरी कसलें !

**ध्येयाच्या सावलींत नसतो मान नि अपमान;**
**ध्येयाच्या सावलींत नाहिं स्वार्थाला स्थान.**
**ध्येयासाठीं धुंदफुंद जो गढलेला असतो**
**जनस्तुतीची उगाच पर्वा तो कसचा करतो ! १०३**

ध्येयाच्या सावलींत मान आणि अपमान कांहीं कोणी मानीत नाहीं ! ध्येयाच्या सावलींत स्वार्थाला स्थान नसतें. धुंदफुंद होऊन जो ध्येयाच्या मागें असतो तो लोकांच्या स्तुतीची कसली पर्वा करणार ?

**हार घातला छत्रपतींना सावरकरजींनीं**
**आणि लावलें एक निरांजन त्यांजपुढें त्यांनीं.**
**तेवत होते नभीं निरांजन निसर्ग देवीचें**
**तेवत होतें इथें निरांजन देवि भवानीचें ! १०४**

सावरकरांनीं छत्रपतींच्या छायाचित्राला हार घातला आणि छायाचित्रापुढें निरांजन लावलें. आकाशांत निसर्ग देवीचें निरांजन तेवत होते. इथें भवानी देवीचें निरांजन तेवत होतें.

**निरांजनाच्या पिवळ्या पिवळ्या मंद उजेडांत.**
**शुद्ध भावना पूज्यपदावर विनम्र होतात.**
**हात जोडुनि केला त्यानें एक नमस्कार.**
**अन् दरवळलाही उदबत्यांचा सुगंध चौफेर. १०५**

निरांजनाच्या पिवळ्या पिवळ्या मंद उजेडांत पूज्यपदीं शुभ भावना विनम्र होतात. हात जोडून त्यानें नमस्कार केला. उदबत्यांचा सुगंध भारतभवनांत दरवळूं लागला.

**तोंच दिलीं पिस्तुलें तयानें सर्वांचे हातीं.**
**म्हणे ' चतुर्भुज रहा उभा ये या देवापुढतीं.**
**हात जोड अन् नमस्कार कर शिवाजिराजांना !**
**शरण जाउनी नम्रपणानें सांग पुढें त्यांना. ' १०६**

आणि सर्वांच्या हातांत त्यानें पिस्तुलें दिलीं आणि छत्रपतींच्या छायाचित्रापुढें उभें रहाण्यास चतुर्भुजास सांगितलें. हात जोडून शिवाजी महाराजांना नमस्कार करावयास त्यांनीं सांगितलें.

**तोंच राहिले उभे सभासद गुप्तमंडळाचे.**
**चतुर्भुजानें उच्चारियले सुशब्द शपथेचे.**
**आणि पुढें जाऊन म्हणाले सावरकर त्याला**
**शपथबद्ध झालास जाग तूं पवित्र शपथेला. १०७**

तोंच गुप्तमंडळाचे सभासद उभे राहिले. स्पष्ट शब्दांत चतुर्भुजानें शपथ घेतली. पुढें होऊन सावरकर त्याला म्हणाले आजपासून तूं शपथबद्ध झाला आहेस. आपल्या पवित्र शपथेला तूं जाग.

**हा कट आहे पृथ्वीवरती चारहि खंडांत**
**गुप्तकटाचा प्रमुख पुढारी मजला म्हणतात.**
**आणि विनायक सावरकर मी प्रमुख असे त्याचा;**
**शब्द मान्य लागतो करावा अखेरचा माझा. १०८**

हा कट पृथ्वीवर चारही खंडांत आहे. त्या कटाचा प्रमुख मला म्हणतात. मी विनायक सावरकर त्या कटाचा प्रमुख आहे. माझा शब्द अखेरचा असतो व तो मान्य करावा लागतो.

**चतुर्भुजानें प्रणाम केला मस्तक नमवूनी.**
**गुप्त कटाची सभा संपली, तो गेला निघुनी.**
**संधि पाहुनि त्यास धाडिलें हिंदुस्थानांत.**
**चतुर्भूज पोंचला; उडाला एकच आकांत! १०९**

चतुर्भुजानें शिर नमवून नमस्कार केला. गुप्तकटाची सभा संपली. चतुर्भुज निघून गेला. सावरकरांनीं योग्य संधि पाहून चतुर्भुजाला हिंदुस्थानांत पाठविलें. तो हिंदुस्थानांत पोचला आणि देशांत एकच आकांत उडाला.

**करीत होते सावरकरजी कामें नित्याचीं,**
**वाचित होते नित्य पुस्तकें ते अभ्यासाचीं.**
**उत्तर द्यावें श्रीटिळकांच्या निर्दय शिक्षेचें—**
**विचार होते घोळत कांहीं मनामधें त्यांचे ! ११०**

सावरकर नित्याचीं कामें करीत होते. तसेंच ते अभ्यासाचीं पुस्तकें रोज वाचीत असत. सरकारनें टिळकांना केलेल्या शिक्षेचें उत्तर कसें द्यावें यासंबंधीं त्यांच्या मनांत विचार घोळत होते.

**कसें काम करणार मदन हें याच विचारांत**
**तळमळ तळमळ करीत होतें मन नव्हतें शांत.**
**अखेर आला मदन घ्यावया निरोप शेवटचा**
**बोलत होते सुमार नव्हता तयास वेळेचा. १११**

मदनलाल याच्याकडून काम कसें होणार या विचारांत त्यांचें मन तळमळ करीत होतें. त्यांना शांतता नव्हती. अखेर ठरल्याप्रमाणें मदनलाल त्यांचा शेवटचा निरोप घेण्यासाठीं भारतभवनांत आला. ते किती वेळ बोलत होते. त्यांना वेळेचा सुमार नव्हता.

**शिक्षक समजावूनि सांगतो ग्रंथांतिल पाठ,**
**सांगत होते तसे विनायक कार्यक्रम नीट;**
**आणि म्हणाले जबाब तूझा खिशामधें ठेव,**
**फत्ते होइल तुझी नि होइल जगामधें नांव. ११२**

पुस्तकांतील धडे जसा शिक्षक समजावून देतो त्याप्रमाणें विनायक पुढील कार्यक्रम मदनलालला नीट समजावून देत होते. आणि शेवटीं म्हणाले हा तुझा जबाब खिशांत ठेव. तुझ्या कार्यांत तुला यश मिळेल आणि जगांत तुझें नांव होईल.

**ठेउनि मस्तक विनायकाच्या पदकमलावरती**
**मदनलाल तेथून निघाला कामगिरीवरती.**
**युद्धावर चालल्या मुलाला आइ जशी बघते,**
**दूर दिसेना तोंवर नेते बघत तया होते! ११३**

विनायकराव सावरकर यांच्या पायावर मस्तक ठेऊन मदनलाल तिथून आपल्या कामगिरीवर निघाला. युद्धावर निघालेल्या मुलाकडे जशी आई बघते त्याप्रमाणें मदनलाल दिसेनासा होईपर्यंत नेते म्हणजे विनायकराव त्याच्याकडे पहात होते.

आणि सकाळीं दुसऱ्या दिवशीं आली शुभवार्ता,
घाबरलें सरकार इंग्रजी घाबरली जनता !
कुणा वाइलीसाहेबाचा वध कोणी केला !
इभ्रत गेली सरकाराची, मान कमी झाला ! ! ११४

आणि दुसऱ्या दिवशीं सकाळीं एक शुभवार्ता प्रसिद्ध झाली. सरकार घाबरून गेलें. इंग्रज लोक घाबरून गेले. कर्नल वाइलीसाहेबाचा कोणी तरी वध केला. त्यामुळें सरकारची इभ्रत कमी झाली. मान कमी झाला.

मदनलाल हें नांव ऐकुनि हिंदी तरुणांत
आनंदी आनंद पसरला भारतभवनांत !
भेटुनि गेले मित्र तयाचे त्यास सकाळींच.
या वार्तेनें खुशीत होते जवान सगळेच ! ! ११५

हिंदी तरुणांत आणि भारतभवनांत मदनलालचें नांव ऐकून आनंद पसरला. सकाळींच कारागृहामध्यें त्याचे मित्र त्याला भेटून गेले. सारेच तरुण या बातमीनें खुषींत होते.

कुणी म्हणे शाबास मदन तूं कमाल केलीस,
कुणी म्हणाले या जन्माचें सार्थक केलेंस,
इंग्रजास तूं मारलेंस हें फार बरें केलें.
इतिहासांतरि कुणी म्हणाले नांव तुझें झालें. ११६

कोणी म्हणाले मदन शाबास, तूं कमाल गेलीस. कोणी म्हणाले जन्मास आल्याचें सार्थक केलेंस. एका इंग्रजास ठार मारलेंस हें तूं बरें केलेंस. इतिहासांत तुझें नांव झालें.

नाहिं दिलें हें काम मला कां सावरकरजींनीं
म्हणून होते रागवले पण त्यांत कुणी कोणी !!
उत्सुकता अन् हौस असावी कार्य करायास
फुलें फळें येतात गोजरी अशा प्रयत्नास !! ११७

सावरकरांनीं हें काम आपणांस सांगितलें नाहीं म्हणून कोणी रागावले होते. काम करावयाला उत्सुकता आणि हौस असावी लागते. तर त्या प्रयत्नास चांगलीं फुलें फळें येतात.

असे कांहि अपघात जाहले जर कोठें कोठें
कुणा कुणाची लाचारी पण पूर्ण भरा येते.
उपद्रव्यांनीं एक घेतली सभा निषेधाची,
राजनिष्ठ कां दवडिल असली संधि सुवर्णाची ! ११८

असे जर कोठें अपघात झाले तर कोणा कोणाची लाचारी उतास येते. वाईली साहेबाच्या खुनाचा निषेध करण्यासाठीं उपद्रव्यांनीं एक सभा घेतली. अशी सोन्यासारखी संधि कोणी राजनिष्ठ कां फुकट दवडील ?

ग्रासत असतो रवीस राहू, केतु शशांकास
ग्रासुनि होते अनेक राहू भारत देशास !
ठरले होते कुणी घ्यायचें अध्यक्षस्थान
देश जाणतो त्या राहूचें नांव अगाखान !! ११९

रवीला एक राहू ग्रासत असतो. चंद्राला एक केतु ग्रासत असतो. भारत देशाला अनेक राहूकेतूंनीं ग्रासलें होतें. त्या सभेचें अध्यक्षस्थान कोणी घ्यावयाचें हें अगोदरच ठरलें होतें. त्या राहूचें नांव आगाखान हें सारा देश जाणतो.

**सभेमध्यें बेशिस्त बोलले जर कोणी कांहीं**
**सभेमधें गय त्याची आतां करायची नाहीं.**
**कळावयाला हवें खरोखर इंग्रज लोकांस,**
**मदनलालला अनेक असती साह्य करायास ! १२०**

या सभेंत जर कोणी कांहीं बेशिस्त बोलले तर त्याची आतां गय करावयाची नाहीं. मदनलालच्या मागें अनेक तरुण आहेत हें इंग्रज लोकांना खरोखर कळावयास हवें.

**द्वेष वाढतो त्वेष वाढतो जित जेत्यांमाजीं**
**समीप आली वेळ म्हणावें युद्ध जुपायाची.**
**क्रांति आणि ती सशस्त्र असते प्रभा स्वराज्याची.**
**क्रांतीवाचुनि उत्क्रांतीची नदि न वहायाची ! १२१**

जेव्हां जित आणि जेते यांच्यामध्यें द्वेष आणि त्वेष वाढतो तेव्हां दोघांमध्यें युद्ध जुंपण्याची वेळ समीप आली असें समजावें. क्रांति आणि ती सशस्त्र ही स्वराज्याची प्रभात असते. क्रांति झाल्याखेरीज उत्क्रांतीची नदी वहायाची नाहीं.

**आणि धाडले निरोप त्यानें सर्व स्नेह्यांस**
**असा उपस्थित वेळेंपूर्वी या व्याख्यानास.**
**बसा पांगुनि जागोजागीं मीहि तिथें येतों.**
**राज आणि वीरेंद्रहि येतिल; पुढेंच मी बसतों. १२२**

आणि सावरकरांनीं आपल्या सर्व स्नेह्यास निरोप धाडून या व्याख्यानास वेळेपूर्वी उपस्थित रहा असें कळविलें होतें. सभागृहांत पांगन वेगवेवेळे बसा. राजू आणि वीरेंद्रही येतील. मी पुढेंच येऊन बसतों.

**सायंकाळीं जसे थव्यानें पक्षि घरीं येती**
**जमूं लागले लोक भराभर तसे सभेसाठीं.**
**आले राजे, कोणि पूर्वींचे नोकर सरकारी.**
**आणि पुढारी, कुणी बहाद्दर, हिंदी व्यापारी. १२३**

सायंकाळीं पक्षी जसे थवे करून आपल्या घरट्याकडे परततात, त्याप्रमाणें सभेसाठीं लोक भराभर जमू लागले. राजे महाराजे आले, कोणी पुढारी आले. माजी सरकारी नोकर आले. हिंदी व्यापारीही सभेस आले.

**राज्यावरची निष्ठा अपुली व्यक्त करायाची**
**राजनिष्ठ कां दवडिल असली वेळ सुवर्णाची !**
**भरूनि गेल्या जागा नव्हती खुर्चि बसायाला,**
**उभें रहाणें कठीण झालें अनेक लोकांला ! ! १२४**

राज्यावरची निष्ठा व्यक्त करावयाची ही सोन्याची संधि कोणता राजनिष्ठ फुकट दवडील! सर्व जागा भरून गेल्या, एकही खुर्ची रिकामी नव्हती. उभें रहाणेंसुद्धां अनेकांना कठीण झालें.

**तोंच वाजल्या टाळ्या कडकड, रुमाल वर उडले;**
**खास राखल्या जागेवरती सावरकर बसले.**
**आणि पहातो सरसेनानी जसा स्वसैन्यास**
**विनायकानें एकवार पाहिलें स्वमित्रांस. १२५**

तोंच टाळ्यांचा कडकडाट झाला. अनेकांनीं वर रुमाल उडविले. खास धरून ठेवलेल्या जागेवर सावरकर जाऊन बसले. सर सेनापति आपल्या सैन्याकडे जशी एकवार नजर टाकतो त्याप्रमाणें विनायकांनीं आपल्या मित्रांकडे दृष्टि टाकली.

**पाहुं लागले विनायकाला उंचावुनि माथीं.**
**कोण बरें हा कोण एवढा हिंदी विद्यार्थी,**
**कोण बरें हा आणि एवढें कां स्वागत केलें?**
**कित्येकांनीं कित्येकांना प्रश्न असे केले. १२६**

हा एवढा हिंदी विद्यार्थी कोण आहे हें पाहण्यासाठीं डोकीं उंचावून विनायकाला लोक पाहूं लागले. हा कोण आणि त्याचें एवढें स्वागत कां झालें असा कित्येकांनीं कित्येकांना प्रश्न केला.

**कुणी लागले मदनलालला दूषण द्यायास,**
**अभिनवभारत करीत होतें हंसून उपहास.**
**कुणी म्हणाले डाग लागला हिंदुस्थानाला**
**तोंच म्हणाले ओढा खालीं या बदमाषाला. १२७**

मदनलालला कोणी दोष देऊं लागले तेव्हां अभिनव भारत मंडळाचे सभासद हंसून त्याचा उपहास करीत. हिंदुस्थानला यानें डाग लावला असें कोणी वक्ते म्हणताच 'या बदमाशाला खालीं ओढा ? असा त्यानीं गिल्ला केला.

**उठले अध्यक्ष नी म्हणाले बसा जरा शांत**
**आणि वाचला ठराव; होता कापत पण हात !**
**एक मतानें ठराव व्हावा ही इच्छा माझी**
**नाहीं नाहीं तोंच म्हणाले श्रीसावरकरजी. १२८**

तेव्हां अध्यक्षांनीं उठून जरा शांत बसा असें सांगितलें. त्यांनीं ठराव वाचला तेव्हां त्यांचा हात कापत होता. हा ठराव एकमतानें व्हावा अशी माझी इच्छा आहे असें ते म्हणताच 'नाहीं, नाहीं' असें सावरकर उठून म्हणाले.

**माझा आहे विरोध तुमच्या अशा ठरावास**
**सावरकरजी पुन्हां म्हणाले तों अध्यक्षास.**
**अजूनि नाहीं न्याय जाहला कोण खुनी त्याचा;**
**मदनलालचा निषेध येथें कसा करायाचा ? १२९**

अजून न्यायालयांत कोणी खून केला याचा निर्णय लागला नसतां मदनलाल याचा निषेध येथें कसा करतां येईल. तुमच्या ठरावास माझा विरोध आहे. अध्यक्षांना सावरकरांनीं उभे राहून पुन्हां सांगितलें.

**कोण कोण हा विरोध करतो अशा ठरावाला ;**
**कुणी म्हणाले काढा ओढुन राजद्रोह्याला !**
**'सावरकर सावरकर' ओरड अशी कुणी केली.**
**विनायकाचें नांव ऐकतां सर्व सभा उठली. १३०**

अशा ठरावाला कोण विरोध करतो त्या राजद्रोह्याला ओढून बाहेर काढा असें कोणी म्हणाले. तोंच 'सावरकर' 'सावरकर' असें कोणी ओरडलें. विनायक सावरकरांचें नांव ऐकतांच सारी सभा उठली!

**कुणी पळाले, कुणी धांवले त्यास धरायास;**
**उभेच होते सावरकरजी उत्तर द्यायास.**
**आणि कुणीशी हातांमधली उगारली काठी**
**तोंच रोखलें व्ही. अय्यरनें पिस्तुल त्यावरती ! १३१**

त्याला धरावयाला कोणी धांवले तर कोणी पळाले ! उत्तर देण्यासाठीं सावरकर उभेच होते. त्याच्यावर हातांतील काठी कोणीशी उगारली तोंच व्ही. अय्यर या मित्रानें त्याच्यावर पिस्तुल रोखलें.

**बाणानें वरच्यावर जैसा बाण छेदतात**
**विनायकानें तसाच त्याचा वर धरला हात.**
**बघत राहतिल कसे सभासद क्रांतिमंडळाचे,**
**मिळेल तें फेकून उठवलें रान विरोधाचें. १३२**

बाणानें बाण जसा वरच्यावर छेदून टाकतात त्याप्रमाणें विनायकांनीं त्याचा हात वरच्यावर धरला. क्रांतिमंडळाचे सभासद हा सारा प्रकार स्वस्थ राहून कसे पहाणार ! हातांत येईल तें फेकून त्यांनीं सभेंत विरोधाचें रान उठवलें.

**पसार झाले कोणी, कोणी रक्तानें न्हाले.**
**मेलो मेलो करीत खालीं कुणी कुणी बसले !!**
**दडुनि राहिले कुणी म्हणाले जा पोलिस आणा.**
**पोलिस आले म्हणून आतां कोण भितो त्यांना!! १३३**

कोणी पळून गेले तर कोणाचीं डोकीं फुटलीं. ‘मेलो’ ‘मेलो, करीत कोणी कोणी खालीं बसले. कोणी दडून राहिले तर कोणी पोलिस बोलवा म्हणाले. पोलिस आले म्हणून आतां त्यांना कोण भिणार !!

**कुठें उडाला ठराव, गेले कुठें अगाखान,**
**विचारलेंही नाहीं कोणी, विचारतो कोण !**
**सभा उधळली परत निघाले श्रीसावरकरजी;**
**भलें जाहलें खोड मोडली नृपाळनिष्ठांची ! १३४**

ठरावाचा कागद कोठें उडाला आणि सभेचे अध्यक्ष आगाखान केव्हां निघून गेले याची कोणी चौकशी केली नाहीं ! कोण चौकशी करतो !! सभा उधळली गेली. सावरकर निघाले. राजनिष्ठांची खोड मोडली हें बरें झालें !!

**झालि चौकशी सुरू म्हणाले न्यायाधिश त्यास**
**समजूं दे आम्हांस एकदां कां वध केलास !**
**पूजार्पण झाल्यावर होतो भक्त समाधानी**
**तसेच होते उभे लालजी शांत समाधानी. १३५**

खटला सुरू झाला. न्यायाधीश त्याला म्हणाले, हा खून कां केलास हें एकदां आम्हांला समजूं दे. पूजार्चन केल्यावर भक्ताला जसें समाधान वाटतें, त्याच समाधान वृत्तीनें मदनलाल तसेच उभे होते.

**जसा चोर दडपून ठेवतो वस्तू दुसऱ्याची**
**सरकारानें लपुनि ठेवली प्रत वक्तव्याची.**
**लिहिलें आहे स्पष्ट त्यांत मी मी म्हणणें माझें**
**त्याहुनि नाहीं कुणास कांहीं मज सांगायाचें. १३६**

जसा चोर एकाद्याची वस्तु दडवून ठेवतो त्याप्रमाणें मदनलाल यांच्या वक्तव्याची प्रत सरकारनें दडवून ठेवली होती. त्या वक्तव्यांत मी माझें म्हणणें स्पष्ट लिहिलें आहे. त्या वेगळें कोणास कांहीं मला सांगावयाचें नाहीं.

**न्यायाधिश लागले लिहाया कागद शेवटचा;**
**आणि मोडला अखेर त्यांनीं टाक लिहायाचा.**
**उपहासानें हंसले कोणी त्यांस समोरून.**
**असा जाहला भास आणि ते गेले शरमून !! १३७**

शेवटचा कागद न्यायाधीश लिहूं लागले आणि शेवटीं त्यांनीं लिहावयाचा टाक मोडला! समोर कोणीतरी उपहासानें हंसत आहे असा त्यांना भास झाला. ते मनांत ओशाळले.

**दोन तीन दिन झाले असतिल तोंच अकस्मात**
**प्रसिद्ध झाला जबाब त्याचा अनेक पत्रांत.**
**म्हणे मदन मी हिंदू आहे, भाव असा माझा—**
**देशाचा अपमान मानतों मी तो देवाचा. १३८**

दोन तीन दिवस झाले असतील तोंच अनेक वर्तमान पत्रांतून मदनलाल धिंग्रा याचा जबाब अकस्मात प्रसिद्ध झाला. त्या जबाबांत मदनलाल म्हणतो मी हिंदु आहे आणि हिंदूंच्या भावनेप्रमाणें देशाचा अपमान तो देवाचा अपमान मी मानतों.

**भारतभूमी परदास्यांतुनि मुक्त करायासी**
**देइन ऐसें रक्तावांचुनि कांहिं न माझ्याशीं.**
**तोफ वापरूं शकलों नाहिं जरि दुर्दैवानें**
**सूड घेतला लहानसा मी प्रिय पिस्तूलानें. १३९**

भारतभूमि परदास्यांतून मुक्त करण्याकरतां मला देतां येईल असें माझ्या रक्ताखेरीज माझ्याशीं कांहीं नाहीं. दुर्दैवानें मला तोफ वापरतां आली नाहीं तरी पण माझ्या आवडत्या पिस्तुलानें मी लहानसा सूड घेतला आहे.

**देशासाठीं कसें मरावें, कुणास मारावें**
**स्वतांच आपण बळी जाउनी जगास शिकवावें.**
**हें प्राणार्पण करीत आहे मी आनंदानें—**
**मला वाटतें यांत धन्यता याच विचारानें. १४०**

देशासाठीं कसें बलिदान करावें आणि कोणाचा बळी घ्यावा हें स्वत:च बळी जाऊन जगास शिकविलें पाहिजे. म्हणून मी आनंदानें प्राणार्पण करीत आहे; या विचारानें मला धन्यता वाटते.

अनुक्रम ...३५५९५..... दि:
क्रमांक ....२५८८..... ३४३

जबाब वाचुनि खळबळ गेली उडून देशांत
जो तो बोले प्रसिद्ध झालें कसें बरें पत्र !
सरकाराच्या तिजोरींतला जबाब लालाचा
प्रसिद्ध झाला, गुन्हां यामधें असेल कोणाचा ? १४१

मदनलालचा जबाब वर्तमान पत्रांत वाचून देशांत खळबळ उडाली. हा जबाब प्रसिद्ध झाला कसा असें जो तो बोले. सरकारी तिजोरींत ठेवलेला मदनलालचा जबाब प्रसिद्ध कसा झाला? यांत कोणाचा गुन्हा झाला आहे ?

कोणी कोणी बोलत होते, मत होतें त्यांचें–
असेल कारस्थान सर्व हें सावरकरजींचें !
वाढत होतें कार्य भारतीं सशस्त्र क्रांतीचें
चित्त वेधलें त्या कार्यानें लोकपुढाऱ्यांचें. १४२

हें सर्व कारस्थान सावरकरजींचें असेल असें कोणी बोलत व तसें त्यांना वाटे. हिंदुस्थानांत सशस्त्र क्रांतीची संघटना वाढत होती. या कार्याकडे लोकपुढाऱ्यांचेंही लक्ष गेलें.

मदनलालजी गेले फांशी या शुभ घटनेचें
देशोदेशीं स्वागत झालें सभेंत तरुणांचे.
अजूनि तिकडे कुणास दिसतो धिंग्रांचा तारा.
कधीं कधीं भारतांत सुटतो धिंग्रांचा वारा! ! १४३

मदनलालजी फांशी गेले. या शुभ घटनेचें देशोदेशींच्या तरुणांच्या सभेंत स्वागत झालें. अद्याप तिकडे धिंग्रांचा तारा कोणाला दिसतो आणि भारतांत धिंग्राचा वाराही कधीं कधीं सुटतो.

* * *

स्वराज्य नाहीं राजा नाहिं देश असा कसला !
देशासाठीं वध केला तर यांत गुन्हा कसला !

भाग पहिला समाप्त.

REFBK-0013503
93403